हिंदी राष्ट्रवाद —

— विकास आणि भवितव्य.

ले.–स. रं. सुंठणकर.

प्रकाशक—
स. रं. सुंठणकर, एल्‌एल्‌.बी.
कमला कॉटेज, टळकवाडी,
बेळगांव.

मुद्रक—
एस्. वाय्. अंकले, एल्‌एल्‌.बी.
श्रीरामतत्त्व-प्रकाश प्रेस,
बेळगांव.

हिंदी राष्ट्रवाद —

- विकास आणि भवितव्य.

लेखकः—स. रं. सुंठणकर,

एल्. एल्. बी. बेळगांव.

'मार्क्सवाद,' 'सोव्हिएट रशिया,' गॉर्की 'शिवाजी' इत्यादि
ग्रंथांचे कर्ते.

[७ नोव्हेंबर १९४१]

मूल्य १॥ रुपया] [पृष्ठ संख्या १८०

हिंदी राष्ट्राचे भवितव्य.

ब्रिटिश भांडवलशाहीने आपल्यामध्ये फैलावून दिलेल्या समाजाच्या नव्या द्रव्यांचा फायदा हिंदी जनतेला सहजासहजी मिळण्यासारखा नाही. तसा तो मिळण्यासाठी एक तर तत्पूर्वी इंग्लंडांतील अधिकारारूढ वर्गाच्या जागीं कामगारांची स्थापना झाली पाहिजे, किंवा इंग्रजांचें जूं आपण होऊन अजीबात झुगारून देण्याइतके हिंदी लोकच समर्थ झाले पाहिजेत. पण कांही झालें तरी, ज्या देशांतील सौम्यस्वभावाचे अगदी हलक्या वर्गांतीलसुद्धा रहिवाशी, प्रिन्स सॉल्टिकोव्ह याने म्हटल्याप्रमाणें, 'नांवाजलेल्या इटालियन नागरिकांपेक्षाहि अधिक सभ्य व अधिक कलावन्त' असे आहेत, ज्यांची शरणागति देखील एक प्रकारें शांत आणि ओजस्वी असते, ज्यांनी आपसांतील भेदभाव असतांनाहि ब्रिटिश अधिकाऱ्यांना प्रसंगी आपल्या शौर्यानें चकित करून सोडलें, ज्यांचा देश हा आपली सर्वांची भाषा व धर्म यांचें मूलस्थान आहे आणि ज्यांच्या जाठ लोकांत प्राचीन जर्मनांचें व ब्राह्मणांत प्राचीन ग्रीकांचें प्रतीत पाहावयास मिळतें, त्यांच्या त्या महान् आणि मनोवेधक देशाचें संजीवन लौकरच, किंवा थोडें उशीरा कां होईना, पण होणारच होणार, अशी अपेक्षा करण्यास मुळीच हरकत नाही.

—कार्ल मार्क्स.

('लेटर्स ऑन इंडिया,' १८५३, पृष्ठ ५९)

हिंदी राष्ट्रवादाच्या उंबरठ्यावर.

सांप्रत गांधीवाद ह्मणजेच राष्ट्रवाद असे मानण्याची प्रथा पडलेली आहे. पण वस्तुस्थिति तशी नाही. गांधीवाद आणि राष्ट्रवाद हे एकरूप नाहीत. उलट हे दोन वाद परस्परविरोधी आहेत. ते कसे हे आता पाहू. आधी राष्ट्रवादात कोणता अर्थ गर्भित आहे, व राष्ट्राराष्ट्राच्या निरनिराळ्या वस्तुस्थितीत तो अर्थ कसा पालटतो याचा ऊहापोह होणे अवश्य आहे. काही राष्ट्रात राष्ट्रवादाचे तत्त्वज्ञान क्रांतिकारी होऊ शकते तर इतर राष्ट्रात ते प्रतिगामी ठरते! आजच्या हिंदुस्थानात राष्ट्रवाद हे क्रांतिकारी ध्येय आहे. हिंदुस्थानच्या प्रचलित वस्तुस्थितीत आमूलाग्र बदल झाला पाहिजे अशी ज्याला जाणीव झालेली आहे त्यालाच खरा राष्ट्रवादी ह्मणता येईल. हिंदी स्वातंत्र्याच्या चळवळीस प्रारंभ झाल्यापासून आजपावेतो जे कोणी जनतेचे पुढारी होऊन गेले किंवा जे आहेत त्या सर्वांचे—मग ते कोणत्याही राजनैतिक पक्षाचे असोत—असे ठाम मत झाले आहे की, परकीय अमलापासून हिंदुस्थानचे अपरिमित नुकसान झालेले आहे, त्याचा आर्थिक ऱ्हास झालेला आहे, त्याच्या माथी आर्थिक मागसलेपण कायमचे स्थान करून बसले आहे. हिंदी वस्तुस्थितीचे पृथक्करण केल्यास हे स्पष्ट होईल की, जोपर्यंत हिंदुस्थान देश हा परकीय साम्राज्याची वसाहत आहे ह्मणजे जोपर्यंत हिंदी जनता परकीयाकडून पिळली जाते, तोपर्यंत हिंदी राष्ट्राचे कल्याण, प्रगति व उत्कर्ष घडवून आणणारी पार्श्वभूमिका हिंदुस्थानात बनविता येणार नाही. हिंदी जनतेला राष्ट्रीय स्वातंत्र्य हे केवळ जरूर आहे एवढेच नसून तिला त्याशिवाय गत्यंतर नाही; राष्ट्रीय स्वातंत्र्याचा प्रश्न हा अख्या राष्ट्राला जीव की प्राण आहे असाच निर्णय ते पृथक्करण देईल.

या दृष्टीने विचार केल्यास राष्ट्रवाद हा भावनेचा अगर इभ्रतीचा

ह्मणून प्रश्नच राहू शकत नाही. अखिल जनतेच्या जगण्याबद्दलचा तो प्रश्न होऊन बसतो. याहूनही बारकाईने निरीक्षण केल्यास परकीय अंमलाने हिंदुस्थानची कशी हानि केली आहे याचे हुबेहूब चित्र आपल्या डोळ्यासमोर उभा राहील. दोनशे वर्षांपूर्वी जेव्हा आपले सांप्रतचे शासनकर्ते या देशात आले, त्यावेळी हिंदुस्थानचा सामाजिक व आर्थिक दर्जा, अर्वाचीन सुधारणेच्या अग्रभागी आज विराजमान होणाऱ्या कोणत्याहि युरोपीय देशाच्या वरचा नाही तरी निदान बरोबरीचा होता, यात शंका नाही. पण आज आपण काय पाहतो? कोणताही युरोपिअन देश भौतिक दृष्ट्या हिंदुस्थानापेक्षा खात्रीने पुढे गेलेला आहे. आजच्या जगात ज्या कित्येक देशांचे वर्चस्व प्रस्थापित झालेले आहे त्या देशापेक्षा हिंदुस्थान देश आर्थिक दृष्ट्या मागसलेला आहे असे विधान केल्यास त्याला पुष्कळ हिंदी जनाकडून विरोध येईल असा माझा विश्वास नाही. दोनशे वर्षांपूर्वी अशी वस्तुस्थिति नव्हती. हिंदुस्थान हा त्यावेळी त्या देशापेक्षा आर्थिक दृष्ट्या कदाचित् पुढेही गेलेला असावा. हिंदुस्थानची तत्कालीन प्रगति सर्व साधारणपणे तशीच होत गेली असती, तर हिंदुस्थान देश हा आपला दर्जा कायम ठेवून जगातल्या इतर देशांच्या पुढे गेला नसता ह्मणून कशावरून?

या विलक्षण वस्तुस्थितीचे स्पष्टीकरण दोन तऱ्हेने केले जाते. ज्यानी आपल्या देशाची सर्वसामान्य प्रगति थोपविली असे आपले राज्यकर्ते युक्तिवाद लढवितात की अर्वाचीन पद्धती पचविण्याचे सामर्थ्य हिंदुस्थान देशात नाही. आपण केलेल्या हिंदुस्थानच्या हानीचे समर्थन करण्याचा हा वायफळ प्रयत्न आहे. इतिहासाकडे वैज्ञानिक आणि पूर्वग्रहालिप्त दृष्टीने अवलोकन करणाऱ्यांचे दुसरे स्पष्टीकरण आहे. ते सत्यस्वरूप आणि शास्त्रशुद्ध आहे. इतर देशापेक्षा अर्थकारणात हिंदुस्थान का मागे पडला याचे ते पुढील कारण देतात. ब्रिटिशानी हिंदुस्थान ज्यावेळी जिंकिला, त्यावेळी यूरोपमध्ये काही प्रचंड स्थित्यंतरे घडून आली, परंतु त्यापूर्वीच निदान दोनशे वर्षे तरी

युरोपीय स्थित्यंतरांच्या प्रक्रियेला सुरवात झाली होती. त्या स्थित्यंतराना भांडवलदारी लोकशाही क्रांति असे ऐतिहासिक नाव आहे. ह्मणजे नवोदित अर्थोत्पादन शक्तींच्या विकासात अडथळा आणणारे जुने अनुत्पादक असे कृषिप्रधान जमिनदारी अर्थकारण उलथून टाकून ज्या सामाजिक उटावाने नव्या सामाजिक संबंधावर नवे भांडवलशाही अर्थकारण उभारिले, त्या उठावास भांडवलदारी लोकशाही क्रांति असे संबोधिले जाते. १८ व्या शतकात त्या क्रांतिला अंतिम विजय मिळाला असला तरी तिच्या प्रक्रियेला (Process) १६ व्या शतकातच प्रारंभ झाला होता.

विविध राष्टांचा आह्मी अभ्यास करू लागलो तर आह्माला असे आढळून येईल की प्रत्येक राष्ट्रात काही कालाच्या अंतराने अत्यंत परिणाम-कारक असे महत्त्वाचे बदल अवश्य ह्मणून घडून येत असतात. प्रस्थापित संस्था, परंपरागत सामाजिक संबंध कालांतराने जीर्ण होतात आणि पुढील प्रगतीच्या मार्गात अडथळा करू लागतात. परंतु मानवी मनातील प्रगती-बद्दलची जी सनातन प्रेरणा असते, ती त्या अडथळ्याना धाब्यावर बसवून मानवी जीवनाच्या अनुभवातून जुन्या समाजरचनेत ज्या अभिनव शक्ती निर्माण होतात, त्यांच्या विकासास स्वतंत्रता प्राप्त करून देते. सर्व मानव जातीत या नियमाचा अंमल असलेला आढळून येतो. तेंव्हा यूरोपमध्ये ज्याप्रमाणे १८ व्या आणि १९ व्या शतकात जुन्या जीर्ण समाज पद्धतीस उलथून टाकून नव्या उत्पादन पद्धतीवर व सामाजिक संबंधावर नवी समाजरचना उभारू पाहणाऱ्या अभिनव शक्ती उत्कर्ष पावत होत्या, त्याचप्रमाणे परकीय सत्तेच्या अभावी हिंदुस्थानातही वस्तुस्थिति प्राप्त झाली असती. १७ व्या व १८ व्या शतकातील–विशेषतः ब्रिटिशांचा पाय या भूमीस लागल्यावेळी–हिंदी सामाजिक वस्तुस्थितीची छाननी केल्यास, आह्मास आढळून येईल की, ज्या सामाजिक शक्तींनी यूरोपची मध्ययुगीन समाजपद्धति उध्वस्त करून आजची भांडवलशाही समाजपद्धति प्रस्थापित

केली, तशाच मासल्याच्या सामाजिक शक्ती हिंदुस्थानातही उदयास येत होत्या. विशेषतः कापूस–विणकाम व्यवसाय हा अत्यंत उर्जितावस्थेप्रत पोचला होता हे जगद्विख्यात आहे. १८ व्या शतकात, किंबहुना १७ व्या शतकातही वस्त्रव्यवसाय (*textile industry*) हा आपली खेड्याची मर्यादा ओलांडून मोठमोठ्या शहरात कारखान्यांच्या रूपाने प्रसार पावत होता. या कारखान्यात लहान मोठे कामकऱ्यांचे तांडे कात–काम अगर विण–काम एकत्र करीत असलेले दृष्टीस पडत होते. कालांतराने उत्पादनाच्या गरजा वाढता वाढता अर्वाचीन यंत्रसामुग्रीचा प्रवेशही येथील व्यवसायात झाला असता. अर्थात् यंत्राने आपल्याबरोबर येथच्या समाजात अनुषंगिक पुरोगामी वातावरण आणले असते. इतर देशातील विकासक्रम अशाप्रकारे घडून आला. तो हिंदुस्थातही प्रत्ययास आला असता. हा विकासक्रम परकीय सत्तेने कसा थोपविला आणि केवळ कापसाच्या धंद्याचाच नव्हे, तर येथील अन्य अनेक धंद्यांचा तिने कसा नायनाट केला हे सर्वांना माहीत आहेच.

परकीय आक्रमणाचे हिंदुस्थान देशावर अत्यंत घातुक असे कोणते परिणाम झाले? हिंदी समाजरचनेत क्रांति घडवून आणण्यासाठी हिंदी क्षितिजावर नुकत्याच उदयास आलेल्या सामाजिक शक्ती ब्रिटिश सत्तेने नामोहरम केल्या! हिंदी राष्ट्रीय जीवनास सामाजिक क्रांतीची जी ऐतिहासिक अवश्यकता होती तिला जोमाचा प्रतिबंध ब्रिटिश आक्रमणाने केला. हिंदुस्थानास जर जगातल्या पुढारलेल्या राष्ट्रांचा दर्जा प्राप्त करून घ्यावयाचा असेल, तर त्याला या क्रांति दिव्याचाच अनुभव घेतला पाहिजे. ह्मणजे ज्या परकीयसत्तेने हिंदुस्थानच्या ऐतिहासिक विकासक्रमास अडथळे आणले तिच्यापासून हिंदुस्थानची सुटका करविली पाहिजे. इंग्लंडला कच्चामाल पुरविण्याठी आणि इंग्लंडचा पक्का माल उजवण्यासाठी हिंदुस्थानची आर्थिक प्रगति थोपविणे ब्रिटिश औद्योगिक हिताच्या दृष्टीने अवश्य होते. या ब्रिटिश अवश्यकतेतच हिंदी आर्थिक ऱ्हासाचे बीज सामावलेले होते.

अशा परिस्थितीखाली हिंदुस्थानच्या राज्यकारभारात काही दिखाऊ सुधारणा घडून आल्याने हिंदुस्थानास राजकीय स्वातंत्र्य मिळाले असे ह्मणता येणार नाही. तर आपल्या देशात ऐतिहासिक दृष्टया अवश्य होणारी क्रांति ज्या परकीय द्रव्याने स्थगित केली आहे, त्या द्रव्याच्या दूरीकरणानेच आह्मास राज्यनैतिक स्वातंत्र्य मिळेल. यूरोपमधली राष्ट्रे आज आपल्याला अर्वाचीन सुधारणेच्या अग्रभागी असलेली दिसून येतात. याला कारण त्या देशात १८ व्या आणि १९ व्या शतकात काही क्रांतिकारी बदल घडून आले; तशा तऱ्हेचे बदल घडून आणणारी राजपद्धति आपल्या देशात हवी आहे. तेव्हा हिंदी राष्ट्रवाद याचा व्यापक अर्थ ब्रिटिश सरकारच्या जागी दुसरे कोणते तरी सरकार प्रचलित करणे असा नाही.तर राष्ट्रवाद या शब्दाने अख्या राष्ट्राची प्रगति आणि उत्कर्ष या बद्दलची प्रेरणा ध्वनित होते. त्या प्रेरणेला संपूर्ण वाव मिळाल्याशिवाय व देशाच्या प्रगतीच्या मार्गातील सर्व अडथळे दूर झाल्याशिवाय राष्ट्रवादाच्या कल्पनेला मूर्त स्वरूप प्राप्त झाले आहे असे ह्मणता येणार नाही. परकीय सरकार हे आपल्या देशाच्या प्रगतीच्या मार्गातील प्रमुख धोंड आहे असे ह्मणणे भाग आहे. कारण जुन्या जीर्ण झालेल्या हिंदी सामाजिक संस्थांचे ते आतापर्यंत संरक्षक किल्ला बनलेले आहे; मृत्युपंथास लागलेल्या सामाजिक संबंधाना त्या सरकारने चकाकी आणलेली आहे; १८ व्या शतकात उदित झालेल्या पुरोगामी सामाजिक शक्तींचे उन्मूलन करून हिंदी राष्ट्राचा विकास सतत दोनशे वर्षे थोपवून धरलेला आहे. सारांश, राष्ट्रवादाला आपल्या देशात क्रांतिकारी महत्त्व प्राप्त झालेले आहे; आणि राष्ट्रवादी चळवळ ही क्रांतिकारी चळवळ बनलेली आहे. काही तुटपुंज्या राजकीय सुधारणा मोठ्या मुष्किलीने मिळविणे हे हिंदी राष्ट्रवादाचे उद्दिष्ट नाही आहे. हिंदी राष्ट्रवाद या शद्वात प्रचंड सामाजिक अर्थ भरलेला आहे. त्या राष्ट्रवादाच्या विजयाने आपल्या राष्ट्रीय जीवनाच्या सर्व अंगोपांगात प्रचंड क्रांति घडून येणार आहे. ह्मणूनच हिंदी

राष्ट्रवादी चळवळीने बहुजनसमाजाचा केवळ विश्वासच नव्हे तर सक्रिय पाठींबाही मिळविलेला आहे.

१९१९–२० पर्यंतच्या हिंदी राष्ट्रीय चळवळीचे स्वरूप क्रांतिकारी नव्हते. त्या चळवळीवर राजकारणाचा नुसता मुलामा देण्यात आला होता. तिचा दृष्टिकोण राज्यकारभारात काही मामुली सुधारणा प्राप्त करून घेण्यापलीकडे नव्हता. तिचा फैलाव केवळ उच्चवर्गाचा काही सुशिक्षित जनतेपुरता होता. त्या चळवळीचा बहुजनसमाजावर काही एक परिणाम झालेला नव्हता. पण १९१९ पासून त्या चळवळीला अजिबात् निराळे स्वरूप प्राप्त होऊ लागले. ती बहुजनसमाजाची चळवळ बनू लागली. सर्व सामाजिक विकासाची प्रेरक शक्ति अशी जी अज्ञात क्रांतिकारी प्रेरणा ती त्या चळवळीच्या द्वारे व्यक्त होऊ लागली. या उपर हिंदी राष्ट्रवाद्यानी सनदशीर सुधारणा, सनदी नोकऱ्यांचे हिंदीकरण इत्यादी मागण्यांची भाषा अजिबात् सोडून दिली. प्रचलित वस्तुस्थितीत कसा आमूलाग्र बदल घडून येईल या संबंधाचा दृष्टिकोण बहुजनसमाजापुढे मांडणे अवश्य होऊन बसले. स्वराज्यप्राप्तीने बहुजनसमाजांच्या दैनंदिन जीवनात कशी प्रचंडक्रांति घडून येईल हे त्या समाजास समजावून देणे जरूर वाटू लागले. जनतेला सामाजिक क्रांतीची स्पष्ट कल्पना देण्याची जरूरी निर्माण झाली. ती क्रांति घडवून आणण्यास प्रचलित सरकारच्या जागी जनहितानुवर्ति असे लोकसरकार उभारावे लागते; सर्व राष्ट्राच्या कल्याणाच्या अगर प्रगतीच्या आड जे सामाजिक संबंध किंवा ज्या सामाजिक संस्था येतील त्यांचे निर्मूलन या अभिनव जनसरकारने केले पाहिजे इत्यादि ऐतिहासिक अवश्य गोष्टींची जाणीव जनतेमध्ये निर्माण करणे जरूर भासू लागले. सारांश, जे राज्ययंत्र अखिल हिंदी जनतेचे जीवन अधिकाधिक सुखावह आणि विकसित करू शकेल अशाप्रकारचे राज्ययंत्र, प्रचलित साम्राज्य राज्ययंत्राऐवजी, स्थापन करण्याची ऐतिहासिक आवश्यकता आणि अज्ञात प्रेरणा हिंदी समाजात प्रादुर्भूत

झालेली होती. या वस्तुस्थितीचे स्पष्टीकरण बहुजनसमाजास करून देणे जरूर होते, इतकेच नव्हे, तर तदनुरूप काँग्रेसचा कार्यक्रम १९२० सालानंतर आखणेही अवश्य होते.

अशा तऱ्हेचे राष्ट्रीय स्वातंत्र्याचे चित्र डोळ्यासमोर आणले ह्मणजे हे स्वातंत्र्य ध्येय गाठण्याच्या कामी गांधीवाद कुचकामाचा ठरतो हे स्पष्ट होते. हे राष्ट्रवादाचे चित्र ह्मणजे वांछित विचारसरणीचे फळ आहे अशातली गोष्ट नाही. हिंदुस्थानातील प्राप्त परिस्थिति आणि सामाजिक शक्ती यांच्या पार्श्वभूमीवर चितारलेले ते वास्तव चित्र आहे. परकीय सत्तेने दोनशे वर्षे थोपवून धरलेल्या हिंदी समाजाच्या विकासक्रमाच्या कोंडलेल्या प्रेरणेचे ते मूर्त स्वरूप आहे. तेव्हा प्रथम त्या प्रेरणेचा कोंडमारा करणाऱ्या परकीय सत्तेचा बांध फोडला पाहिजे. ह्मणजे त्या प्रेरणेतून असा काही जोराचा प्रवाह निघेल की, जो परकीय सत्तेवर आधारलेले राष्ट्रीय विकासाच्या मार्गातील सर्व अडथळे उडवून येईल. हा जो हिंदी राष्ट्रवादाचा कार्यक्रम वर विशद करण्यात आला त्याची ऐतिहासिक अवश्यकता आहे. अंकित देशाव्यतिरिक्त अन्य देशात जे राष्ट्रवादाचे स्वरूप आज आढळून येते, ते झोटिंग अशा दरोडेखोरी आक्रमक वृत्तीचे प्रदर्शन आहे.अशा राष्ट्रवादाला फॅसिझम् ह्मणजे झोटिंगवाद हे नाव आहे. हिंदी राष्ट्रवाद असा नाही आहे. त्याने परकीय देश पादाक्रांत करण्याची अथवा त्यातून लूट मिळविण्याची हाव बाळगलेली नाही. हिंदी राष्ट्रवाद हा प्रगतीच्या प्रेरणेने स्फूर्त झालेला आहे. विलंबित क्रांतीचा अमल तात्काळ सुरू व्हावा असे त्या राष्ट्रवादाला वाटते.

यापुढे गांधीवाद ह्मणजेच राष्ट्रवाद असा जो समज या देशात प्रचलित आहे तो कसा संपूर्ण चुकीचा आहे हे पाहू. गांधीवाद ह्मणजे अध्यात्म विचार, नैतिक कल्पना व धार्मिक मते यांची एक खिचडी आहे. गांधीवादात परस्पर विरोधी अशा अनेक अवास्तव कल्पनांचा अंतर्भाव

आहे. गांधीवादाचा राजकीय कार्यक्रम हा राष्ट्रीय आकांक्षाना विरोधक आहे हे सिद्ध झाले ह्मणजे गांधीवाद आणि राष्ट्रवाद हे एकच नाहीत हे स्पष्ट होईल. आपण आधी म. गांधींचा विधायक कार्यक्रम घेऊ आणि तो गांधीच्या ह्मणण्याप्रमाणे आपल्याला स्वातंत्र्याप्रत नेईल काय ते पाहूं. ह्मणजे विधायक कार्यक्रमाच्या आचरणाने हिंदी जनतेची प्रगति आणि उत्कर्ष यासाठी अवश्यक असे वर चित्रिलेले राष्ट्रीय स्वातंत्र्य हस्तगत होईल काय याचा विचार झाला पाहिजे. गांधींचा विधायक कार्यक्रम हा सर्वांना माहीत आहेच. त्याचा येथे विस्तार करण्याची जरूरी नाही. त्या कार्यक्रमाचा मध्य बिंदु चरखा हा असून चरखा आणि अहिंसा यांचा अन्योन्य संबंध आहे असे गांधीजी ह्मणतात. इतकेंच नव्हे, तर चरखा ही अहिंसेची मूर्तिमंत आविष्कृति किंबहुना प्रत्यक्ष आचार आहे असा म. गांधीचा विश्वास आहे. इतक्यावरच गांधीजी स्वस्थ बसत नाहींत, तर असा विश्वास प्रत्येक काँग्रेसवाद्याने बाळगला पाहिजे आणि दररोज नियमाने चरखा फिरवित बसले पाहिजे; असे सश्रद्ध वर्तन करणाराच खरा काँग्रेसवादी नि खरा राष्ट्रवादी असा गांधीजींचा अट्टाहास आहे. विधायक कार्यक्रमात चरख्याखालोखाल ग्रामोद्योगांच्या पुनरुज्जीवनास महत्त्वाचे स्थान आहे. या विधायक कार्यक्रमाच्या आचरणाने देशातील सर्व आर्थिक दुःखे नष्ट होऊन स्वातंत्र्याच्या लढ्याची गरज भासणार नाही, असा गांधीजींचा युक्तिवाद आहे. जणू काय, जादूची कांडी फिरवून स्वराज्य मिळविण्याचा हा मार्ग आहे! सारांश, गांधीना हिंदुस्थान देशास परत मध्ययुगीन आर्थिक अवस्थेप्रत न्यावयाचे आहे. ह्मणजे प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण, स्वयंतृप्त, आपल्या सर्व गरजा आपणच भागविणारे असे स्वतंत्र आर्थिक घटक बनेल; परस्परस्पर्धा व युद्धाची कारणे नाहीशी होतील आणि हिंदुस्थानाने साऱ्या जगाला अहिंसेच्या प्रत्यक्ष आचाराचे नमुनेदार उदाहरण घालून दिलेसे होईल असे गांधीना वाटते. ही विचारसरणी

ऐकायला मोठी रम्य वाटते. पण ती अंधश्रद्धाळू जनतेला. ज्याना ह्मणून इतिहासाचे थोडे तरी ज्ञान आहे व आर्थिक शक्तींच्या प्रभावाची कल्पना आहे,त्याना या विचार परंपरेतील खुळचटपणा निसंदिग्धपणे कळून चुकेल. चरख्याने जगात अहिंसा प्रस्थापित होऊन शांति नांदते असे ह्मणावे, तर चरख्याचा शोध हा काही अर्वाचीन नाही. इंग्रज येथे येण्यापूर्वी घरोघरी चरखे होते. मग त्यावेळी युद्ध मारामाऱ्यांचा सर्वत्र सुकाळ का होता? स्वातंत्र्य का गेले? जगभर निदान हिंदुस्थानात तरी शांतीचे साम्राज्य कसे पसरले नाही? पूर्वी चरखा असता जे स्वातंत्र्य गेले ते आता पुनः चरखा आल्यानंतर, चरखारूप जादूने प्राप्त झाले अशी कल्पना केली तरी, टिकेल ह्मणून कशावरून?

आता विधायक कार्यक्रमाच्या आचरणाने बहुजनसमाजाचे सर्व आर्थिक प्रश्न सुटतील असा जो गांधींचा अभिप्राय आहे त्यासंबंधी साहजिकच असा प्रश्न उद्भवतो की, विधायक कार्यक्रम जर हिंदुस्थानच्या सर्व आर्थिक दुःखांचे निरसन करतो तर हिंदुस्थानास स्वातंत्र्याची तरी काय गरज आहे? शिवाय या अभिप्रायानुसार हिंदुस्थानच्या ऱ्हासाची जबाबदारी साम्राज्यशाही पिळणुकीवर पडत नाही. तर ती आपले ग्रामीण अर्थकारण सोडून शहराकडे धाव घेणाऱ्या हिंदी जनतेवर पडते! आपले राज्यकर्ते झाले तरी हिंदी ऱ्हासाची जबाबदारी हिंदी लोकावरच टाकतात. हिंदी जनता न भांडता, न झगडता, शहाणेसुरतेपणे नांदू लागली ह्मणजे आपले हिंदुस्थानातील कार्य संपले असा पोक्त उपदेश ब्रिटिश लोक सतत करीत आले आहेत. व्यवहारात गांधींचाही उपदेश याच मासल्याचा आहे. तुह्मी दुःखामध्ये आनंदाने दिवस कंठा; दारिद्र्य ह्मणजे अध्यात्मिक मनोरथ पूर्ण करणारा कल्पद्रुम आहे असे समजा; ह्मणजे राजकीय दास्य आणि आर्थिक पिळणूक हीं नुसती भासमात्र आहेत असे तुह्मास कळून येईल अशी गांधीजींची अध्यात्मप्रवण शिकवण आहे.

यापेक्षाही नजरेत स्पष्ट भरणारी अशी गांधीवादातील आणखी काही उदाहरणे घेऊ. हिंदी राष्ट्रीय आकांक्षा परिपूर्ण होण्यासाठी आपल्या समाजाच्या आर्थिक रचनेत मूलगामी बदल होणे जरूर आहे असे वर कथन केले आहे. पण गांधींना आपल्या समाजस्थितीत बदल नको आहे. उदाहरणार्थ, ऐतखाऊ जमिनदारी पद्धति गांधींना जीवंत ठेवावयाची आहे. आपल्या देशात बहुसंख्य जनता शेतकऱ्यांची आहे. त्या जनतेला स्वातंत्र्य लढ्यात जर सामील करून घ्यावयाचे तर जमिनदारीचे उच्चाटण हा राष्ट्रीय कार्यक्रमाचा एक भाग असणे अवश्य आहे; पण गांधींना या उच्चाटनात हिंसेचा वास येतो. त्यांना जमिनदार आणि कुळे यांचा संबंध पितापुत्रासारखा असावासे वाटते. आपल्या कुळावर पितृतुल्य प्रेम करण्याजोगे जमिनदारांचे हृदय परिवर्तन करता येईल असा गांधींना गाढ विश्वास आहे. वास्तविक तीस कोटी किसान जनतेला दास्यात डांबणाऱ्या जमिनदारी पद्धतीचा विध्वंस केल्याविना राष्ट्राची प्रगति होणार नाही हे त्या महात्म्याला उमजत नाही. उलट, देशाची प्रगति खुंटविणाऱ्या जुन्या जीर्ण महारोगरूप सरंजामी सामाजिक संबंधाविरुद्ध जनतेच्या उठावात गांधींना हिंसा दिसते, परंतु शेतकऱ्यांची सतत पिळणूक चालविणाऱ्या सावकार–जमिनदारांच्या वर्तनात त्यांना अहिंसा आढळून येते. असा हा विलक्षण गांधीवाद आहे.

हिंसेशिवाय प्रचलित वस्तुस्थितीत बदल घडून येणार नाहीं, किंबहुना हिंसा हा जीवनाचा धर्म आहे. जीवन ही एक अनेक स्थित्यंतरांची साखळी आहे. स्थित्यंतराच्या अभावी जीवनाची स्थिति ही साचलेल्या पाण्याच्या तलावासारखी होते, पण गांधींची अहिंसा ह्मणजे मानवी जीवनाच्या प्रक्रियेचा पूर्ण विराम होय. ज्या वेळी आपले राष्ट्रीय जीवन स्वातंत्र्यासाठी नव्या दमाने मुसमुसत आहे, ज्यावेळी भूतकालीन सामाजिक अवशेषांची दुर्गंधी प्रेते गाडून, नजीकच्या भविष्यकाली सुगंधी व स्वतंत्र वातावरण हुंगण्या

साठी सगळी हिंदी जनता धडपडत आहे,अशावेळी, शिव शिव! एक व्यक्ति पुढे सरसावते,तिच्याभोवती' भविष्यवादी महात्मा 'ह्मणून सगळी जनता गोळा होते; पण ती व्यक्ति अहिंसेच्या नावाखाली हिंदी राष्ट्रास इतर राष्ट्राप्रमाणे सन्मानाने जगण्यासाठी स्वतंत्रपणे धडपड करण्यास प्रतिबंध करते.खरोखरच गांधीवाद हे निष्क्रिय आणि निधनप्रवण तत्त्वज्ञान आहे. उलटपक्षी, राष्ट्रवाद ही तेजस्वी जीवनासाठी धडपड आहे. वस्तुतः ज्याना आहे त्या वस्तुस्थितीत बदल नको आहे त्यानी अहिंसेचे तुणतुणे वाजविलेले शोभते. परंतु देशाचे स्वातंत्र्य आणि प्रगति ही प्राप्त करून घेण्यासाठी सज्ज झालेल्या हिंदी जनसेनेचे नेतृत्व पत्करून हिंदुस्थानास स्वातंत्र्याप्रत नेणाऱ्या शक्तीना गांधीजी अहिंसेचा बांध घालताहेत हे विचित्र होय. अहिंसातत्त्वाचा विजयाने हिंदुस्थानच्या कपाळी कायमची गुलामगिरी बसणार हे पक्के समजा; कायमची गुलामगिरी आणि मरण यात फरक तो कोणता? तेव्हा हिंदुस्थानास जर जगावयाचे असेल तर क्रांति दिव्यातून पार पडण्याशिवाय त्याला गत्यंतर नाही. ह्मणूनच हिंदी राष्ट्रवाद हा क्रांतीच्या तत्त्वज्ञानाने स्फूर्त झाला पाहिजे. पण गांधीवाद हे प्रतिक्रांतीचे तत्त्वज्ञान आहे.

याप्रमाणे गांधीवाद आणि राष्ट्रवाद यामध्ये दोन ध्रुवाचे अंतर असता दोन्ही एकच समजले जातात, किंबहुना गांधीवादासाठी राष्ट्रवाद बाजूला सारला जातो हे किती आश्चर्यजनक आहे बरे? हिंदी राष्ट्रवाद्यानी आता राष्ट्रवाद सोडून देऊन गांधीवादाची पूर्ण दीक्षा घेतलेली आहे.आणि ती सुद्धा मनापासून नव्हे, तर गांधींच्या जुलूमाखाली. महात्माजी आणि त्यांचा गांधीवाद यांच्या उत्पत्तीला कारण बहुजनसमाजामधले अज्ञान, अंधश्रद्धा, विभूतिपूजनबुद्धि इत्यादि होत. गांधीवाद हे आपल्या जनतेमधले अज्ञान, भेकडपणा, निराशावाद, मागासलेपण इत्यादींचा ह्मणजे जनतेत जे काही अत्यंत वाईट आणि टाकाऊ आहे, त्या सर्वांचे प्रदर्शन आहे!

काँग्रेसचे युद्धविरोधी धोरण सुद्धा गांधीवादाचाच घातुक परिणाम आहे. अर्थात्, आह्मास स्वतंत्र व्हावयाचे असेल तर ही वस्तुस्थिति बदललली पाहिजे. सर्व दुःखांचे मूळ असे हिंदी बहुजनसमाजातले अज्ञानमूलक मागासलेपण नाहीसे होऊन त्या समाजास राजनैतिक ज्ञान प्राप्त झाले पाहिजे. ते ज्ञान प्राप्त झाले ह्मणजे बहुजनसमाजास आपल्यामधल्या क्रांतिकारी प्रेरणेची जाणीव होईल; आपण पूजित असलेल्या पुढाऱ्यांचे सत्य स्वरूप त्याच्या नजेरत भरेल; व अखेर बहुजनसमाजास आपल्यामधल्या प्रचंड शक्तीबद्दल विश्वास वाटून त्यामधील गुलामगिरीमुळे आलेले भीति व निराशावाद हे दोष अंतर्धान पावतील. आह्मी हिंदी लोक सदा सर्वकाळ दुसऱ्यावर विसंबून राहाणारे लोक आहोत. खुद्द आमच्यावरसुद्धा आमचा विश्वास नाही! मग अज्ञानात रुतलेल्या आणि मागासलेल्या अशा शेतकरी आणि इतर दरिद्री जनतेची कथा काय? तुरुंग भरून स्वातंत्र्य मिळवू पाहणारे काँग्रेसजन घ्या. त्यांच्यातील शेकडा नव्याण्णव लोकाना हिंदुस्थान आत्मप्रयत्नाने स्वातंत्र्य मिळवील असे वाटत नाही! हा आत्मविश्वासाभाव अगर निराशावाद हाच त्याना गांधीवादाची कास धरण्यास भाग पाडतो.

आपली सुशिक्षित जनता जर इतकी दुबळी, तर आपला मागसलेला बहुजनसमाज कसा असेल याची कल्पना सहज करता येईल. महात्मा गांधी काही तरी चमत्कार करून आपली स्थिति सुधारतील असे त्याच्या अज्ञ व भोळ्या मनास वाटते. सारांश, बहुजनसमाजाच्या अज्ञानातून गांधीनी महात्मागिरी प्राप्त करून घेतलेली आहे. चमत्कार घडवून आणण्याचे ह्मणजे आपली स्थिति सुधारण्याचे सामर्थ्य आपल्यात आहे अशी जनतेत जाणीव निर्माण झाली ह्मणजे, गांधीना बाजूस सारून ती आपले स्वातंत्र्य आपल्या मनगटाच्या जोरावर मिळवील. दारिद्र्य, दुःख, अधःपात इत्यादींचे सातत्य हे, हिंदी जन-मनावरील गांधीवादाची पकड दूर करून, खरा राष्ट्रवाद त्या जनतेत उत्पन्न करील यात शंका नाही.

सध्याचे युद्ध सुरू झाल्यापासून तर गांधीवादाचे स्वरूप अधिकाधिक उघडकीस येत आहे. गांधीवाद आणि राष्ट्रवाद यामध्ये चाललेला हिंदी लढा हा मृत भूतकाळ आणि जीवंत भविष्यकाळ यामधला लढा आहे. ही क्रांति आणि प्रतिक्रांति यामधली रस्सीखेच आहे. या रस्सीखेचीमुळे आपल्या देशाची राजनैतिक प्रगति स्थगित झाली असून जनता दिङ्मूढ बनलेली आहे. यूरोपच्या रणभूमीवर सांप्रत चाललेले सोव्हिएट–जर्मन युद्ध हे देखील क्रांति व प्रतिक्रांति यामधले अंतिम अंतरराष्ट्रीय युद्ध आहे. यावेळी खरा राष्ट्रवादी हा तटस्थ राहूच शकत नाही आणि जो राहतो तो पर्यायाने प्रतिक्रांतीलाच हात देतो असे ह्मणणे भाग आहे.अशावेळी गांधीवाद हा अहिंसेच्या निमित्याने हिंदी जनतेला युद्ध विरोध करण्यास लावून फॅसिझमला सहाय्य करीत आहे. गांधीवाद आणि नाझी तत्त्वज्ञान यात वैचारिक साम्य आहे हेच खरे! राष्ट्रवादी दृष्टिकोण हा आपल्याला क्रांतीच्या विजयावर जागतिक संस्कृतीचे सरंक्षण, मानवी समाजाचा विकास, खऱ्या लोकशाहीचा उदय इत्यादि अवलंबून आहेत, हे पक्के जाणवितो आणि सांप्रतच्या नाझी–विरोधी युद्धात नेटाचा सहकार करण्यास प्रोत्साहन देतो. प्रतिक्रांतीच्या विजयात संस्कृतीचा विनाश, मध्ययुगीन झोटिंगशाहीचा अमल इत्यादि सामावलेली आहेत याचा तो इशारा देतो.

हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न हा आता केवळ राष्ट्रीय राहिलेला नसून आंतरराष्ट्रीय प्रश्नात विलीन झालेला आहे. नाझीवादाच्या यशस्वी आक्रमणाने जेथे अख्ख्या जगाचे स्वातंत्र्य धोक्यात आणलेले आहे, तेथे हिंदुस्थानास तो कसचे स्वातंत्र्य देणार? अशा प्रसंगी नाझीवादाचा यदा कदाचित् विजय झालाच तर हिंदुस्थानचे स्वातंत्र्य किती शतकानी दूरावेल, याची कल्पनाच करवत नाही. उलट, जगाची नाझीवादापासून सुटका करण्यासाठी चाललेल्या प्रचंड युद्धात नेटाने व स्वयंस्फूर्तीने सहभागी होण्यानेच हिंदु-

स्थानचे स्वातंत्र्य समीप येऊन ठाकणारे आहे. सध्या हा एकच स्वातंत्र्याचा मार्ग उरलेला आहे. याशिवाय अन्य कोणताही मार्ग हिंदुस्थानास गुलामगिरीत कायम खितपत ठेवणारा आहे. खरा राष्ट्रवाद हाही (हिंदी समाजाची प्रगति व उत्कर्ष ही ज्याचे ध्येय आहे,)आपल्याला हा एकच मार्ग दर्शवितो. असा क्रांतिवादी दृष्टिकोण मराठी वाचकापुढे ठेवण्याचा डॉ. सुंटणकर यानी या ग्रंथद्वारे जो यशस्वी प्रयत्न केलेला आहे, त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. मराठी वाचकानी हे पुस्तक मननपूर्वक वाचावे अशी त्याना माझी शिफारस आहे.

Dehra Dun
28 th July 1941.

M. N. Roy

ब्रिटीशपूर्व राष्ट्रवाद

हिंदुस्थान हा अत्यंत प्राचीन देश आहे. त्याला सांप्रतचे राष्ट्रीय स्वरूप ब्रिटिश अमलाखाली प्राप्त झाले. म्हणून याला मागील इतिहास नाही असे म्हणणे अर्थात असत्य आहे. उलट, मानवी संस्कृतीचा जन्म याचठिकाणी झाला आहे. तिचा पाळणाही येथेच हलला आहे. अवखी मानव जात संस्कृतीचे व ज्ञानाचे प्राथमिक धडे याच देशापासून पढलेली आहे. जगातला आदिग्रंथ ऋग्वेद हा हिंदभूमीतच लिहिला गेला. यावरून हिंद देश हा आरंभापासूनच राष्ट्र होते असे म्हणता येणार नाही. राष्ट्रवादाची कल्पनाच मुळी अर्वाचीन ! खुद्द तिच्या मायभूमीत म्हणजे युरोप खंडात तिचा जन्म होऊन अद्याप तीनशे वर्षेही झाली नसतील ! मग, तीन चार हजार वर्षांच्या पूर्वीपासून हिंदुस्थान हे एक राष्ट्र होते असे म्हणण्यात काय हशील ? येथे मोठमोठाली साम्राज्ये अस्तित्वात होती हे खरे आहे. मौर्य, हर्ष, चालुक्य, मोगल, मराठे इत्यादि राज्यांनी अर्धा अधिक हिंदुस्थान व्याप्त होता यात शंका नाही. पण या साम्राज्यांचे व इतर तत्कालीन राज्यांचे स्वरूप पैतृक (Patriarchal) अगर सरंजामी (Feudal) असे होते.

या राज्यविस्तारांच्या बुडाशी कोणत्याही जनसमुदायाच्या आकांक्षा नव्हत्या. वैयक्तिक, कौटुंबिक किंवा सरंजामी 'महत्वाकांक्षा' या त्यातील प्रेरक शक्ती होत्या. राजा हा पिता व प्रजा ही त्याची मुले; राजा हा स्वामी व प्रजा ही त्याची नोकर अशा कल्पनांचा अमल तत्कालीन राजशक्तींच्या मुळाशी होता. राज्यकारभारात प्रजेला कोणतेच अधिकार नव्हते. इतकेच नव्हे, तर प्रजेला अगर जनतेला काही हक्क असतात ही कल्पनाच त्या काळी कोणत्याही सुबुद्ध मेंदूला शिवलेली नव्हती. राज्य या शब्दात राजसत्ता अभिप्रेत असते आणि राष्ट्र या कल्पनेच्या बुडाशी जनसत्तेची कल्पना असते. सारांश, राज्य राजाचे, तर राष्ट्र लोकांचे. तेव्हा मोठमोठाली राज्येसाम्राज्ये अस्तित्वात होती, याचा अर्थ ती राष्ट्रवादाच्या कल्पनेने प्रेरित होती, असा होत नाही.

राष्ट्रवादाची कल्पना ही समाजविकासक्रमाच्या एका विशिष्ट अवस्थेतच प्रादुर्भूत होत असते. अमुक एका भौगोलिक प्रदेशात वास करणाऱ्या अनेक जनसमुदायांच्या विशिष्ट आर्थिक विकासाचे फळ ह्मणजे राष्ट्रवाद. आर्थिक शक्तींच्या दडपणाखालीच समपरिस्थितीत राहणाऱ्या विविध जनसमुदायांचे राष्ट्रीय एकीकरण होते. जोवर अशा शक्तींचा पुरेसा विकास झालेला नसतो, तोंवर रा वादाची कल्पनाच लोकांच्या डोक्यात उद्भवू शकत नाही. या नियमाला आमला देश हा अपवाद नाही. समुद्रवलयांकित असे हिंदुस्थानचे द्वीपकल्प ह्मणजे आशिया खंडापासून हिमालयाच्या नैसर्गिक भिंताडाने पृथक् केलेला भौगोलिक आविष्कार होय. अशा तऱ्हेची निवळ भौगोलिक आविष्कृति ही हिंदुस्थानात निवासणाऱ्या विविध जनसंघामध्ये राष्ट्रवादाची कल्पना प्रसवू शकत नाही. अनेक भाषा व विविध संस्कृती यामुळे अलिप्त राहिलेले नानाविध वंश आणि जाति यांचे एकत्रित राष्ट्रीकरण होण्यास देशातील उत्पादनशक्तींच्या विकासाची आवश्यकता लागते. हिंदुस्थानातील जनता जोपर्यंत खेड्यातील ग्रामपंचायत, बाराबलुतेदार, जाति इत्यादि संस्थामध्ये आत्मनिष्ठ, आत्मतृप्त अशा वस्तुस्थितीत कालक्रमणा करीत होती, व्यापारी व औद्योगिक दळणवळणाने सूत्रबद्ध झालेली नव्हती, तोपर्यंत राष्ट्रवादाच्या उत्पत्तीस भौगोलिक परिस्थितीची कितीही अनुकूलता असली तरी तेथे राष्ट्रवादाच्या कल्पनेचा उदय होणे शक्य नव्हते.

मग हिंदी राष्ट्रवादाचा उगम केव्हा झाला? ब्रिटिश राजवटीत का तत्पूर्वी? ब्रिटिश छत्राखाली झाला असल्यास तो तत्पूर्वी का झाला नाही? राष्ट्रवादाचे बी येथेच उगवले का ते युरोपातून आणण्यात आले? समाजविकासक्रमाच्या कोणत्या अवस्थेत राष्ट्रवाद उद्भवतो? त्यासाठी अर्थोत्पादन शक्ती विकसित व्हाव्या लागतात असे वर ह्मटले आहे. त्याचा अर्थ काय? यासंबंधी युरोपीय इतिहासाचा काय दाखला आहे?

युरोपीय समाजाची आजवर एकंदर चार स्थित्यंतरे झाली. यापुढे तो पाचव्या स्थित्यंतरात पदार्पण करणार आहे. ती चार म्हणजे प्राथमिक साम्य युग (primitive communism) दास्ययुग, संरजामी युग आणि भांडवलशाही ही होत. आपला भारतीय समाज अशाच स्थित्यंतरातून उत्क्रांत झालेला आहे. किंबहुना सतराव्या शतकाच्या आरंभापर्यंत दोन्ही समाजाचा विकास सामान्यतः एकसारखाच होत असलेला आढळून येतो. आरंभी समाजाच्या रानटी काळात म्हणजे प्राथमिक साम्य व दास्य या युगद्वयात मानव हा मृगयेवर आपला चरितार्थ चालवीत असता, जमिनीतून पीक काढण्यास शिकतो व निरनिराळ्या टोळ्या करून राहतो. पुढे या टोळ्यामध्ये सुपीक जमिनीसाठी झगडा सुरू होतो. प्रबळ टोळी कमकुवत टोळ्याना जिंकून आत्मसात् करते व जिंकलेल्या प्रदेशावर राज्य करू लागते. त्या टोळीचा स्वामी काबीज केलेल्या सर्व भूभागाचा राजा बनतो. या क्रमानुसारच इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, डेन्मार्क इत्यादि युरोपीय राज्ये अस्तित्वात आली. तीनशे वर्षांपूर्वी ही राज्ये राष्ट्रीय जागृतीने एकत्रित झालेली नव्हती. या राज्यांचे तत्कालीन स्वरूप ईश्वरानुशासित अगर धर्मानुशासित संरजामी राजसत्ता (theocratic feudal monarchy) हे होते. या राज्यांचे अधिष्ठान धर्मनिष्ठा व नृपनिष्ठा हे होते. त्याकाळी राजा व पाद्री या कल्पित ईश्वरांशात सर्व सत्ता केंद्रित होती. ही वस्तुस्थिति १६ व्या शतकाच्या अखेर पावेतो हिंदुस्थान व यूरोप या दोन्ही भूखंडात सर्व साधारणपणे सारखी उन्नत झालेली होती. पण सतराव्या शतकात प्रारंभी इंग्लंडातील संरजामी समाजाच्या गर्भात नूतन व्यापारी मध्यम वर्ग निर्माण झाला. त्या वर्गाने उत्पादनात क्रांति घडवून आणली. जगड्व्याळ व्यापार पेठ वसविली. जगाला मालपुरवठा करण्यासाठी कारखानदारी अस्तित्वात आली. नवा भांडवलदार वर्ग निर्माण झाला. युरोपातील अन्य देशही इंग्लंडच्या पाऊलावर पावले टाकू लागले. मालांचे उत्पादन विभाजन आणि विनिमय

राष्ट्रवादाची कल्पना ही समाजविकासक्रमाच्या एका विशिष्ट अवस्थेतच प्रादुर्भूत होत असते. अमुक एका भौगोलिक प्रदेशात वास करणाऱ्या अनेक जनसमुदायांच्या विशिष्ट आर्थिक विकासाचे फळ ह्मणजे राष्ट्रवाद. आर्थिक शक्तींच्या दडपणाखालीच समपरिस्थितीत राहणाऱ्या विविध जनसमुदायांचे राष्ट्रीय एकीकरण होते. जोवर अशा शक्तींचा पुरेसा विकास झालेला नसतो, तोंवर रा वादाची कल्पनाच लोकांच्या डोक्यात उद्भवू शकत नाही. या नियमाला आपला देश हा अपवाद नाही. समुद्रवलयांकित असे हिंदुस्थानचे द्वीपकल्प ह्मणजे आशिया खंडापासून हिमालयाच्या नैसर्गिक भिंताडाने पृथक् केलेला भौगोलिक आविष्कार होय. अशा तऱ्हेची निवळ भौगोलिक आविष्कृति ही हिंदुस्थानात निवासणाऱ्या विविध जनसंघामध्ये राष्ट्रवादाची कल्पना प्रसवू शकत नाही. अनेक भाषा व विविध संस्कृती यामुळे अलिप्त राहिलेले नानाविध वंश आणि जाति यांचे एकत्रित राष्ट्रीकरण होण्यास देशातील उत्पादनशक्तींच्या विकासाची आवश्यकता लागते. हिंदुस्थानातील जनता जोपर्यंत खेड्यातील ग्रामपंचायत, बाराबलुतेदार, जाति इत्यादि संस्थामध्ये आत्मनिष्ठ, आत्मतृप्त अशा वस्तुस्थितीत कालक्रमणा करीत होती, व्यापारी व औद्योगिक दळणवळणाने सूत्रबद्ध झालेली नव्हती, तोपर्यंत राष्ट्रवादाच्या उत्पत्तीस भौगोलिक परिस्थितीची कितीही अनुकूलता असली तरी तेथे राष्ट्रवादाच्या कल्पनेचा उदय होणे शक्य नव्हते.

मग हिंदी राष्ट्रवादाचा उगम केव्हा झाला? ब्रिटिश राजवटीत का तत्पूर्वी? ब्रिटिश छत्राखाली झाला असल्यास तो तत्पूर्वी का झाला नाही? राष्ट्रवादाचे बी येथेच उगवले का ते युरोपातून आणण्यात आले? समाजविकासक्रमाच्या कोणत्या अवस्थेत राष्ट्रवाद उद्भवतो? त्यासाठी अर्थोत्पादन शक्ती विकसित व्हाव्या लागतात असे वर ह्मटले आहे. त्याचा अर्थ काय? यासंबंधी युरोपीय इतिहासाचा काय दाखला आहे?

युरोपीय समाजाची आजवर एकंदर चार स्थित्यंतरे झाला. यापुढे तो पाचव्या स्थित्यंतरात पदार्पण करणार आहे. ती चार ह्मणजे प्राथमिक साम्य युग (primitive communism) दास्ययुग, संरजामी युग आणि भांडवलशाही ही होत. आपला भारतीय समाज अशाच स्थित्यंतरातून उत्क्रांत झालेला आहे. किंबहुना सतराव्या शतकाच्या आरंभापर्यंत दोन्ही समाजाचा विकास सामान्यतः एकसारखाच होत असलेला आढळून येतो. आरंभी समाजाच्या रानटी काळात ह्मणजे प्राथमिक साम्य व दास्य या युगद्वयात मानव हा मृगयेवर आपला चरितार्थ चालवीत असता, जमिनीतून पीक काढण्यास शिकतो व निरनिराळ्या टोळ्या करून राहतो. पुढे या टोळ्यामध्ये सुपीक जमिनीसाठी झगडा सुरू होतो. प्रबळ टोळी कमकुवत टोळ्याना जिंकून आत्मसात् करते व जिंकलेल्या प्रदेशावर राज्य करू लागते. त्या टोळीचा स्वामी काबीज केलेल्या सर्व भूभागाचा राजा बनतो. या क्रमानुसारच इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, डेन्मार्क इत्यादि युरोपीय राज्ये अस्तित्वात आली. तीनशे वर्षांपूर्वी ही राज्ये राष्ट्रीय जागृतीने एकत्रित झालेली नव्हती. या राज्यांचे तत्कालीन स्वरूप ईश्वरानुशासित अगर धर्मानुशासित सरंजामी राजसत्ता (theocratic feudal monarchy) हे होते. या राज्यांचे अधिष्ठान धर्मनिष्टा व नृपनिष्ठा हे होते. त्याकाळी राजा व पाद्री या कल्पित ईश्वरांशात सर्व सत्ता केंद्रित होती. ही वस्तुस्थिति १६ व्या शतकाच्या अखेर पावेतो हिंदुस्थान व यूरोप या दोन्ही भूखंडात सर्व साधारणपणे सारखी उन्नत झालेली होती. पण सतराव्या शतकात प्रारंभी इंग्लंडातील सरंजामी समाजाच्या गर्भात नूतन व्यापारी मध्यम वर्ग निर्माण झाला. त्या वर्गाने उत्पादनात क्रांति घडवून आणली. जगड्व्याळ व्यापार पेठ वसविली. जगाला मालपुरवठा करण्यासाठी कारखानदारी अस्तित्वात आली. नवा भांडवलदार वर्ग निर्माण झाला. युरोपातील अन्य देशही इंग्लंडच्या पाऊलावर पावले टाकू लागले. मालांचे उत्पादन विभाजन आणि विनिमय

यांच्यावर म्हणजे जागतिक अर्थकारणावर आपला ताबा प्रस्थापित व्हावा म्हणून या वर्गाने धर्मानुशासित सरंजामी सत्तेशी झगडा आरंभिला. तत्कालीन सरंजामी सत्ता ही सामाजिक उत्पादनात व्यत्यय आणू लागली. अशा प्रसंगी या भांडवलदार वर्गाने, प्रथम इंग्लंडात आणि नंतर अन्य युरोपीय देशात, आपापल्या देशातील जनतेचा पाठिंबा मिळवून, सत्ता ही राजाची नसून राष्ट्ररूपी अखिल प्रजेची आहे, असा राष्ट्रवादाचा नवा सिद्धान्त उद्धृत केला आणि धर्मानुशासित एकतंत्री राजसत्ता उलथून टाकिली. याचा परिणाम असा झाला की या नवीन वर्गाने घडवून आणिलेल्या औद्योगिक क्रांतीमुळे निरनिराळे वंश, जाति, भाषा, संस्कृति इत्यादि विषयक भेदभाव पार वितळून जाऊन त्यांचे स्थान राष्ट्रीय स्निग्धतेने (National cohesion) पटकाविले.

या प्रकारे युरोपात राष्ट्रवाद, लोकशाही वगैरे तत्त्वांचा उदय होऊन नवयुग निर्माण झाले. पण अशा तऱ्हेचा राष्ट्रवाद उत्पन्न होण्यास अवश्य लागणारा आर्थिक विकास ब्रिटिशपूर्वकालीन हिंदुस्थानात केव्हाही झालेला नव्हता. युरोपातल्याप्रमाणेच भारतीय समाज सुद्धा प्राथमिक, वर्णाश्रम, सरंजामी इत्यादि साधारणतः समान युगाच्या उत्क्रांतिपथातून विकास पावत आला आहे. इतकेच नव्हे, तर यूरोप हा गुलामगिरीतच खितपत पडला असता आपल्या समाजाने सरंजामी युगात पदार्पण केले होते. विविध शास्त्रे, तत्वज्ञान, शिल्पकला, कारागिरी यामध्ये बरीच आघाडी मारलेली होती. परदेशाशी व्यापार व उद्योगधंदे याना बरकत आली होती. पण ही वस्तुस्थिति फार वेळ टिकली नाही. मौर्य कालानंतर शक, यवन, युचि हूण, श्वेतहूण इत्यादि परकीयांच्या स्वाऱ्यानी हिंदुस्थानास सुमारे हजार वर्षे पछाडिले व समाजाची प्रगति खुंटविली. पुढे मुसलमानांच्या स्वाऱ्यामुळे तर देशातील स्वास्थ्य नाहीसे झाले. देशभर बेबंदशाही माजली. यामुळे जमीन सुपीक असून पुरेसे उद्योगधंदे प्रचलित असताही, अठराव्या शतकाच्या आरंभापर्यंत, औद्योगिक क्रांति घडवून

आणून राष्ट्रवाद व मर्यादित लोकसत्ता निर्माण करणारा असा प्रभावी श्रीमान व्यापारी मध्यम वर्ग येथे निपजलाच नाही.

अशा प्रकारचा वर्ग निर्माण होण्यास देशात शांतता आणि सुव्यवस्था असावी लागते. त्याचें अस्तित्व फक्त प्रबळ अशा मध्यवर्ति एकत्रित राजसत्तेखालीच (centralised feudal state) असू शकते. अशा तऱ्हेची सरंजामी सत्ता काही अंशी रजपूत, मराठे आणि शीख यांच्यामध्ये पादुर्भूत झाली होती. मराठेशाहीत तिला व्यापक स्वरूपही प्राप्त झाले होते. मोंगलशाहीत अशी प्रबल सत्ता होती. तथापि ती परकीय असल्यामुळे समाजप्रगतीस पोषक होऊ शकली नाही. मुसलमानांच्या वारंवार होणाऱ्या स्वाऱ्या येथल्या सरंजामी समाजाच्या स्वतंत्र विकासास प्रचंड अडथळा करीत होत्या. कारण, राजकीय सत्ता ह्मणजे अखिल जनतेच्या सर्वश्रेष्ट इच्छाशक्तीचा (sovereign will) आविष्कार आहे, ही कल्पना परक्या अमलाखाली रुजून फोफावणे शक्य नसते. पुढे शिवाजीने परकीय अमलाविरुद्ध बंड केले. जहागिरीदारांचे निर्मूलन करून एकत्रित सरंजामी सत्ता प्रस्थापित केली. त्यामुळे व्यापारास उत्तेजन मिळू लागले. त्याच्या राजकीय वंशजानी त्याचेच धोरण पुढे चालू ठेविले असते, तर सर्व हिंदुस्थानभर मराठी सत्तेचे मध्यवर्ति एकत्रित सरंजामी राज्ययंत्र निर्माण झाले असते. या सत्तेखाली प्रबळ व्यापारी मध्यम वर्ग निर्माण झाला असता आणि त्याने युरोपातल्याप्रमाणे येथे भांडवलशाही लोकसत्ता (bourgeois democracy) प्रस्थापिली असती. तथापि राष्ट्रवादाचा उगम पहिल्या प्रथम मराठी सत्तेखाली झाला हे कोणालाही नाकबूल करता येणार नाही. परंतु तो राष्ट्रवाद समाजात नवजीवन निर्माण करणारा असा नव्हता तर पूर्वपरंपरेवर हिंदुधर्मनिष्ठेवर आधारलेला असा सरंजामी स्वरूपाचा होता ! त्या राष्ट्रवादाला हिंदु राष्ट्रवाद ह्मणता येईल. सावरकरवाद हा झाला तरी हिंदु राष्ट्रवादाचीच पुस्ती होय.

शिवाजीचा उदय व ब्रिटिश लोकसत्तेचा उदय ही समकालीन होत. शिवाजीने स्वराज्याची शपथ घेतली त्याच सुमारास इंग्लीश जनतेने पहिल्या चार्लस राजास फाशी दिले. शिवाजीनंतर लगेच शीख आणि रजपूत यानी उचल घेतली. या त्रयींचे बंड ह्मणजे हिंदी समाजाची वाढ खुंटविणाऱ्या परक्या मुसलमानी सरंजामशाहीविरुद्ध एतद्देशीय सरंजामशाहीचे यशस्वी बंड होय. शिवाजीने स्वराज्य स्थापिल्यावर एतद्देशीय सरंजामशाही फोफावली. १८ शतकात ती मध्यवर्ति एकत्रित राजसत्ता निर्माण करणार अशी चिन्हेही दिसू लागली. याच सुमारास ह्मणजे १८ व्या शतकाच्या मध्यकाली उदयोन्मुख सुसंपन्न असा व्यापारी मध्यमवर्ग हिंदभूमीच्या क्षितिजावर चमकू लागला होता. सोळासतराव्या शतकातील प्रबळ मोंगली सत्तेमुळे आणि तदुत्तर प्रभावी ठरलेल्या शीख मराठ्यांच्या एतद्देशीय सरंजामशाहीमुळे वायव्य दिशेकडून येणाऱ्या परक्या मुसलमानांच्या स्वाऱ्याना पायबंद बसला. डच, इंग्लीश, पोर्तुगीज इत्यादि युरोपिय प्रवाशांच्या द्वारे हिंदुस्थानचा जगाशी जोराचा व्यापार आणि दळणवळण ही सुरू झाली. या समग्र वस्तुस्थितीचा परिणाम ह्मणजेच सुसंपन्न अशा हिंदी मध्यम व्यापारी वर्गाचा उदय. याच वेळी आणखी एक योग जमून आला. तो ह्मणजे ब्रिटिश भांडवलशाही ही आपली भूमि निष्कंटक करून, विश्व पादाक्रांत करण्याच्या मार्गास लागली असता, हिंदुस्थानात ईस्ट इंडिया कंपनीच्या रूपात अकस्मात अवतीर्ण झाली. येथील चक्रवर्ति राजसत्ता काबीज करण्याच्या कामी येथील सरंजामशाहीची ती प्रतिस्पर्धी बनली. पुढे १७५७ पासून १८५७ पर्यंत असा सतत शंभर वर्षे येथील सरंजामशाही आणि ब्रिटिश भांडवलशाही यामध्ये लढा चालला. त्यात सरंजामशाही हार पावून ब्रिटिश पार्लमेंटची अनियंत्रित सत्ता अखिल हिंदुस्थानभर प्रस्थापित झाली.

ब्रिटिश भांडलवशाही येथे आलीच नसती, तर काय झाले असते? युरोपातल्याप्रमाणे हिंदुस्थानात व्यापारी व कारखानदार असा मध्यमवर्ग

नुकताच कोठे उदयास येत होता. तो विकास पावून पुढे मागे सरंजामी सत्ताही काबीज करू शकता, पण ईस्ट इंडिया कंपनीरूप ब्रिटिश भांडवलशाहीने ' हा हन्त हन्त नलिनीं गज उज्जहार ' या सुभाषितानुरूप हिंदी उदयोन्मुख भांडवलदारवर्गाच्या तोंडचा सत्तेचा घास हरण केला. नाहीतर, इंग्लंडफ्रान्समधल्याप्रमाणे भांडवलशाहीने येथेही राष्ट्रवाद निर्माण करून लोकसत्ता प्रस्थापिली असती. सारांश, प्राचीन काली शकयवनहूणादिकांच्या स्वाऱ्यामुळे, तदुत्तर परकीय मुसलमानाच्या सतत ६०० वर्षे चालू असलेल्या हल्ल्यामुळे आणखी गेल्या दोन शतकातील ब्रिटिश आक्रमणाने, गेली दोन हजार वर्षे आपला समाज पुढील प्रगतीचा टप्पा गाठू शकला नाही. आहे त्याच परिस्थितीत तो खितपत पडलेला आहे.

ब्रिटिश भांडवलशाहीने हिंदुस्थान पादाक्रांत केला नसता, तर हिंदुस्थान हे सांप्रतच्याप्रमाणे एक राष्ट्र न बनता युरोपप्रमाणे निरनिराळ्या आर्थिक व सामाजिक विकासावस्थेत असलेल्या अनेक राष्ट्रांचे खंड बनले असते. वेगवेगळ्या आचारविचारांचे परस्परविरोधी असे अनेक समाज–ब्रिटिश सत्तेच्या अभावी--एकत्रित होऊन सर्व हिंदुस्थानचे एक राष्ट्र बनणे शक्य नव्हते, असे १८ व्या शतकाच्या आरंभापर्यंतच्या एकंदर वस्तुस्थितीवरून वाटते.

१८ व्या शतकारंभी मोंगलांचे सरंजामी साम्राज्य कोलमडून पडले. त्याला कारण मराठे, शीख, रजपूत इत्यादींच्या एतद्देशीय सरंजामशाहीने उचल खाली हे होय. असे वर निदिष्ट केलेले आहेच. याकाळात आर्थिक उत्पादन हे, खेड्यापुरते मर्यादित न राहता, चोहोंकडे देशभर पसरून प्रचंड कारागिरांच्या कारखान्यानी भरलेली अशी अनेक शहरे वसवू लागले. या शहरात प्रचंड प्रमाणावर व्यापार करणारा असा सुसंपन्न मध्यम वर्ग अवतरू लागला होता. हा वर्ग तत्कालीन सरंजामी राजाना वेळोवेळी द्रव्य पुरवून आपल्या नियंत्रणाखाली ठेवू लागला होता. पण युरोपातल्याप्रमाणे येथील सरंजामी सत्तेला उलथून टाकण्यासाठी, राष्ट्र हे

लोकांचे, राजसत्तेवर लोकप्रतिनिधींचे संपूर्ण नियंत्रण हवे इत्यादि लोकशाही कल्पना जनतेत पेरून तिचा पाठिंबा घेऊन, लोकसत्ताक राज्ययंत्र उभारण्याचे सामर्थ्य या नुकत्याच उदयास आलेल्या व्यापारी वर्गात आलेले नव्हते. त्यामुळे मोगलानंतर, या देशात भांडवलशाही लोकसत्ता निर्माण होण्याऐवजी मराठ्यांचे सरंजामी साम्राज्यच प्रामुख्याने नांदू लागले.

मराठी सत्तेने या नूतन वर्गाचा उपयोग आपल्या राज्याच्या बळकटीस केला असता आणि देशात उद्योगधंदा वाढावा ह्मणून सर्वत्र शांतता-सुव्यवस्था निर्माण केली असती,तर इंग्लंड फ्रान्स आदि पाश्चात्य देशात-ल्याप्रमाणेच येथली भांडवलशाही उत्कर्ष पावून राष्ट्रवादास जन्म देती आणि लोकशाही स्थापन करती ! अशा तऱ्हेचा आर्थिक दृष्टिकोन येथील कोणत्याही सत्तेला प्राप्त झाला नव्हता. देशात विचारक्रांति होऊन समाजाचा सांस्कृतिक विकासही झाला नव्हता. समाजातील धर्मश्रद्धेचे स्थान सारासारविचार शक्तीने पटकाविले नव्हते. युरोपातल्याप्रमाणे धर्मसुधा-रणेची चळवळ लोकजागृति करण्याइतकी प्रभाव पावू शकली नव्हती. अशा परिस्थितील धर्मभावनेवर आधारलेला मराठी सत्तेचा देशाभिमान कुचकामाचा ठरला. एकत्रित हिंदुराष्ट्र निर्माण करण्याचा मराठी सत्तेचा कार्यक्रम फोल झाला. उत्तर मराठेशाहीत तर मराठ्यानी मुलुखगिरीचा अवलंब करून देश हैराण करून सोडला.

मराठे आदिकरून तत्कालीन राजेराजवाड्यानी देशभर लूट चालवून शेती, व्यापार, धंदा धुळीस न मिळविता देशात शांति आणि व्यवस्था प्रस्थापित केली असती, तर नवोदित संपन्न अशा व्यापारी वर्गाने आपले तन-मन-धन इंग्रजास कशाला वाहिले असते. ? या परिस्थितीचा फायदा, अर्वाचीन राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र यावर आधारलेल्या ब्रिटिश भांडवलशाहीने घेतला, आणि नवोदित व्यापारी वर्गाचे पाठबळ मिळवून येथील सरंजामशाहीची कंबर मोडिली.

१८ व्या शतकातील सतत लढाया लूट चालविणाऱ्या येथील सरंजामी राजांच्या अंमलाला, शेतकरी, व्यापारी, कारागीर, बुद्धिजीवि असे सर्व वर्ग ह्मणजे, राजेरजवाडे आणि त्यांचे साथीदार हस्तक वगळले असता, बहुतेक सर्व हिंदी समाज कंटाळलेला होता. त्यामुळे अखिल जनतेला इंग्रज हे येथे शांतता आणि सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी ईश्वराने मुद्दाम पाठविलेले दूत आहेत असे वाटू लागले. हेच ब्रिटीशांच्या यशातील खरे मर्म होय. या वस्तुस्थितिशिवाय सहा हजार मैलावरून केवळ व्यापारासाठी येणारे मूठभर इस्ट इंडिया कंपनीचे लोक सर्व देश सहज लीलेने काबीज करतात, या गोष्टीचा उलगडा होणे शक्य नाही. याठिकाणी आणखी एका परिस्थितीचा विशदपणे उल्लेख करणे अत्यवश्य आहे. यावेळी सरंजामी समाजपद्धतीचा काळ निघून गेला होता. केवळ शेतीच्या व वैयक्तिक कारागिरी उत्पादनावर समाजाचा उदर निर्वाह होणे अशक्य झाले होते. समाजाच्या उत्पादनशक्ती खुल्या करून त्यात नवजीवन निर्माण करण्यास नूतन सामाजिक शक्तीची अत्यंत जरूरी होती. ती सामाजिक शक्ति ह्मणजे कारखानदारी (Large Scale production) होय. तिचा उदयही झाला होता, पण तिच्या उत्कर्षास अनुकूल असे शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणारे मध्यवर्ति प्रबळ राज्ययंत्र उभारण्यात आले नाही. ह्मणून या सामाजिक शक्तीने, आत्मविकासार्थ, ब्रिटीशानी येथें उभारलेल्या भांडवलशाही राज्ययंत्राकडे (Bourgeois state) धाव घेतली. ब्रिटिशानी त्या शक्तीचा पुरेपूर फायदा घेतल्यावर, ह्मणजे तिच्या मदतीनें येथची सरंजामशाही उध्वस्त केल्यानंतर, ब्रिटिश कारखानदारीच्या उत्कर्षास, ती शक्ति अडथळा करू लागली ह्मणून तिलाही कापून काढिले.

याप्रमाणे हिंदी जनतेला सरंजामशाहीच्या पाशातून मुक्त करण्याचे श्रेय सुसंपन्न अशा नवोदित मध्यम वर्गास न मिळता, ते, कंपनीरूप ब्रिटीश भांडवलशाहीने त्या वर्गापासून हिरावून घेतले. एतद्देशीय शेतकरी

वर्गांतून सैन्य जमवून इंग्रजानी एकामागून एक अशा हिंदी सरंजामी राजांचा पाडाव केला. यावरून सरंजामशाहीचा पायाच असा जो शेतकरी तोच तिला उखडून काढण्यास सज्ज झाला हे सिद्ध होत नाही काय? सारांश, सरंजामशाहीस उलथून टाकणाऱ्या शक्ति १८ व्या शतकाच्या हिंदी समाज घटनेत प्रादुर्भूत झाल्या होत्या. पण दुर्दैव हे की हिंदी भांडवलशाहीला त्या शक्तींच्या जोरावर युरोपातल्याप्रमाणे राज्यक्रांति आणि तदुत्तर सामाजिक विकास ही घडवून आणता आली नाहीत. उलट या आणीबाणीच्या प्रसंगी कंपनीरूपांतरित ब्रिटीश भांडवलशाही दत्त म्हणून उभी राहिली! तिने समाजात वावरणाऱ्या क्रांतिप्रवण शक्तींना काबूत आणिले; सरंजामी नबाबराजांच्या हातून सत्ता हरण केली; अखेर नवोदित कारखानदारीरूप पुरोगाम सामाजिक शक्तीचा कोंडमारा करून हिंदी राष्ट्राचा विकास खुंटविला.

यूरोपमधल्या १७ व्या आणि १८ व्या शतकातील नवोदित भांडवलशाहीने (Rising bourgeoisie) द्विविध क्रांतिकार्य केले. पहिले यूरोपातली सरंजामी सत्ता उलथून टाकण्याचे, आणि दुसरे यूरोपीय राष्ट्रांचा औद्योगिक विकास घडवून आणण्याचे. या दोन कार्यांपैकीं हिंदी सरंजामी सत्ता पादाक्रांत करून तिच्याऐवजी भांडवलशाही राज्ययंत्र उभारण्याचे एक क्रांतिकार्य ब्रिटीशानी पार पाडले. परंतु तदुत्तर हिंदुस्थानचे औद्योगीकरण घडवून आणण्याचे सामाजिक क्रांतिकार्य त्यानी टाळले. उलट वसाहती पिळणारे राज्ययंत्र (colonial state) येथे उभारण्यात येऊन ज्या नवोदित कारखानदारी सामाजिक शक्तींनी ब्रिटीशाना सत्ता प्रस्थापित करण्यास हात दिला होता, त्यांचीच मुस्कटदाबी करण्यात आली. याला कारण, येथचा व्यापारी कारखानदार वर्ग उत्कर्ष पावून प्रबळ झाला, तर परकीय आक्रमणापासून तो आपल्या मायदेशाची मुक्तता करील, ही भीति ब्रिटीश राज्यकर्त्यांच्या हृदयात सतत वास करीत होती. म्हणून

ब्रिटीशानी सत्ता काबीज केल्यावर, प्रथम येथील नवोदित व्यापारी भांडवलदार वर्ग (commercial bourgeoisie) नेस्तनाबूत केला, आपल्याला कायमचा टेकू मिळावा ह्मणून अभिनव जमिनदार पद्धति निर्माण केली आणि ती पद्धत आणि हतबल एतद्देशीय संस्थाने यांचा मजबूत पाया बनवून त्यावर साम्राज्य राज्ययंत्राची (Imperialist State) उभारणी केली. शेतकरी आणि कारागीर या वर्गांना परत भूदास्य पत्करावे लागले. ब्रिटीश उद्योगधंद्याचा परमोत्कर्ष करू पाहणाऱ्या अभिनव साम्राज्यवादी शासनयंत्राच्या दडपणाखाली उदयोन्मुख हिंदी भांडवलदारी मुळातच खुरडिली गेली. अर्थातच देशाचा आर्थिक कोंडमारा होऊन हिंदी समाजाची प्रगति स्थगित झाली.

तात्पर्य, राष्ट्रवादाला जन्म देणे, भांडवलशाही लोकसत्ता स्थापन करणे, सरंजामी पाशातून शेतकरी वर्गाचे विमोचन करणे इत्यादि प्रमुख कार्ये घडवून आणण्याचे सामर्थ्य भांडवलदार वर्गात असते, तोच जेथे घायाळ होऊन पडला, तेथे तो हिंदी राष्ट्रवादास कसचा जन्म देणार? मग हिंदी राष्ट्रवादास प्रसविण्याचे ऐतिहासिक कार्य कोणी केले ? केव्हा केले ? ही जबाबदारी अर्थात पुढे शंभर वर्षांनीं ब्रिटीश कृपाछत्राखाली वाढलेल्या नव्या हिंदी भांडवलदार वर्गाचे नेतृत्व पत्करणाऱ्या बुद्धिजीवि मध्यम वर्गावर पडली, ह्मणजे १८७०।१८८० च्या सुमारास ब्रिटिश कृपांकित अभिनव भांडवलदार वर्गाच्या मध्यम वर्गीय बुद्धिजीवि पुढाऱ्यानी हिंदी राष्ट्रवादास जन्म दिला. हे कसे ते विषयानुषंगाने पुढे विवाचिले जाईल. पण सध्या पुढील प्रकरणांत ब्रिटीश या देशात सुस्थिर झाल्यानंतर आपल्या देशावर त्याचा काय परिणाम झाला आणि त्यातूनच पुढे कोणकोणती विविध आंदोलने आपल्या देशात डोलू लागली हे पाहू.

राष्ट्रवादाची पार्श्वभूमि :: २

ब्रिटीश सत्तेने आपल्या समाजातील पुरोगामी उत्पादन शक्तींची संपूर्ण खच्ची केल्यामुळे लोकशाही, राष्ट्रवाद, समता, स्वातंत्र्य इत्यादि अर्वाचीन राजनैतिक कल्पनांचा प्रादुर्भाव आपल्या समाजात झाला नाही हे आपण गेल्या प्रकरणात पाहिले. येथील सत्ता हाती घेऊन व पुरोगामी सामाजिक शक्ती हतबल करून एवढ्यावरच, ब्रिटीश भांडवलशाही समाधान पावली नाही, तर तिने इकडील जुने पुराणे कृषिप्रधान अर्थकारण (agrarian economy) पुनरुध्दृत करून हिंदी समाजास शे दोनशे वर्षे मागे खेचिले. आता हे मात्र खरे की, तिने येथे उभारलेले सरकार हे भांडवलशाही राज्ययंत्र होते. इकडच्या जुन्या जीर्ण आणि विस्कळीत अशा सरंजामी बेजबाबदार राज्ययंत्रापेक्षा हे अभिनव इंग्रजी राज्ययंत्र पुष्कळ पटाने संघटित आणि सुव्यवस्थित होते. पण काही झटले तरी हे नूतन राज्ययंत्र राष्ट्राभिमानी नव्हते. ते परकीय भांडवलशाहीने आपल्या भांडवलदारांच्या उत्कर्षासाटीं निर्माण केलेले होते. अर्थात् यूरोपीय भांडवलशाही राज्ययंत्राप्रमाणे (bourgeois state) सार्वजनिक शिक्षण, मुद्रणस्वातंत्र्य इत्यादींच्या द्वारा राष्ट्रीय जागृति करण्याचे कार्य, येथच्या परकीय राज्ययंत्राने आपल्या शिरावर घेणे शक्य नव्हते. उलट जनजागृति घडवून आणण्यापेक्षा जनतेला प्राथमिक अज्ञान स्थितीत (primitive ignorance) ठेवण्यातच इकडील परकीय सत्तेचा स्वार्थमूलक कार्यभाग साधण्याजोगा होता. याच हेतूने यापूर्वी प्रतिपादिल्याप्रमाणे सरंजामी राजांची भूते आणि नवोत्पादित जमिनदारी यांच्या सामाजिक पायावर ब्रिटीश राज्ययंत्राची उभारणी झाली. याप्रमाणे ब्रिटीश

भांडवलशाहीने हिंदुस्थानांत उभारलेल्या भांडवलशाही–स्वरूपी सरकारने एतद्देशीय जनतेतील सनातन व प्रतिगामी शक्तीशी गट्टी करून नवोदित व्यापारी आणि बुद्धिजीवि मध्यमवर्गाची गळचेपी केली. याच गळचेपणीची कटु फळे ह्मणजे लागोपाठ उद्भवणारी सामाजिक प्रतिक्रिया आणि तदुत्तर राजकीय निद्रा ही होत. इकडचा नवोदित मातबर मध्यम वर्ग नूतन राज्ययंत्रात भरडून निघाल्यामुळे परकीय आक्रमणास विरोध करण्याची ताकद असणारे एकमेव द्रव्यसुद्धा समाजातून नाहीसे झाले. “ शांतता आणि सुव्यवस्था ” या नावाखाली परकीय सत्तेने बहुजनसमाजाचा अजाण पाठिंबा मिळविला. देशातील अंदाधुंदीस कंटाळलेला व अस्थिर अर्थ जीवनामुळे थकून भागून शांतलेला हापापलेला आपला समाज बहुकाल टिकणाऱ्या अशा राजनैतिक निद्रेला वश झाला. ही समाजाची निद्रांकित स्थिति सर्व सामान्यपणे इ. स. १७५७ ते १८५७ पर्यंत अशी शंभर वर्षे टिकली असे ह्मणण्यास प्रत्यवाय नाही.

याप्रमाणे सामाजिक वातावरण कोंदट असल्यामुळे या काळात कोणतीहि राष्ट्रीय चळवळ येथे बी धरू शकली नाही. ब्रिटीश सत्ता उलथून टाकण्यासाठी १८५७ च्या बंडाच्या रूपाने पहिला मोठा प्रयत्न करण्यात आला हे खरे! परंतु हा प्रयत्न ह्मणजे देशातील राष्ट्रीय चळवळीचा एक भाग होता असे मात्र ह्मणता येणार नाही. मृत्युपंथास लागलेल्या येथील सरंजामशाहीची ती अंतकालीन किंकाळी होती. या बंडाचे स्वरूप द्विविध होते. हिंदी जनतेचा सामाजिक विकास थोपविणाऱ्या परकीय अंमलाचा नाश करणाऱ्या उद्देशाने ते उभारले होते, या दृष्टीने बंडाचे स्वरूप क्रांति-कारी होते; परंतु मोंगलांच्या अगर मराठ्यांच्या सरंजामी साम्राज्यशाहीचे पुनरुज्जीवन करण्याचा त्या बंडाचा दंडक समाजविकासदृष्ट्या प्रतिगामी स्वरूपाचा होता. या त्याच्या प्रतिगामित्वामुळेच ते पराभूत झाले. या बंडाचा उठाव, पुरोगामी सामाजिक कल्पना आणि राजकीय कार्यक्रम यांना

प्रेरित झालेल्या एतद्देशीय भांडवलदार वर्गाच्या नेतृत्वाखाली झाला असता तर तो खात्रीने यशस्वी झाला असता. पण अशा तऱ्हेचा राष्ट्रीय उठाव त्यावेळी होणे शक्य नव्हते. कारण, क्रांति यशस्वी होण्यास लागणाऱ्या सामाजिक द्रव्यांचा समाजात पूर्णपणे अभाव होता. ह्मणजे एतद्देशीय भांडवदार वर्गाची अपरिपक्व दशेतच मुस्कटदाबी झाली होती. यंत्रप्रधान भांडवली संस्कृति आणि तिचे पुरोगामी तत्त्वज्ञान ही तत्कालीन हिंदी समाजात खोल रुजू शकली नाहीत. त्यांचा निवळ बहिरंग देखावा मात्र नुकताच कोठे दृग्गोचर होत होता. प्रो. सीली याने १८५७ च्या बंडाचे केलेले निदान फारच मार्मिक आहे. तो ह्मणतो की त्या बंडाला येथील जनतेची सक्रिय सहानुभूति तर नव्हतीच, उलट काही जनसंघ ब्रिटीशांच्या बाजूने लढण्यास तयार होते. पुढे तो असेही विधान करतो की ज्यावेळी बंड हे केवळ बंडच न राहता सार्वजनिक राष्ट्रीय भावनेचे ते प्रदर्शन बनेल, त्याच क्षणाला ब्रिटीश साम्राज्याचे संरक्षण करण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरतील. कारण वस्तुतः ब्रिटीश हे हिंदुस्थानचे जेते नसून जेते ह्मणून त्याना हिंदुस्थानात केव्हाही राज्य करता येणार नाही.

१८५७ सालच्या बंडाचे प्रधान स्वरूप लष्करी होते. पदच्युत आणि असंतुष्ट बनलेल्या सरंजामी सरदारांच्या गुप्त मसलतीतूनच बंडाची निष्पत्ति झालेली होती. राष्ट्रीय भावनेची काहीशी जाग असणाऱ्या अशा शीख समाजाने तर यावेळी ब्रिटीशाना बहुमूल्य मदत केली. शीखांच्या लष्करी सहाय्यामुळेच इंग्रज सरकारला बंडाचा बीमोड करता आला. याच सुमारास इंग्रजी शिक्षणप्रसारामुळे अभिनव बुद्धिजीवि वर्ग उदयास आला होता. अर्वाचीन व पुरोगामी विचारसरणीचा हा वर्ग बंडाच्या समयी ब्रिटीश सरकारला पूर्ण पाठिंबा देत होता. विशेषतः लहानसहान एतद्देशीय संस्थानातील काही जनता बंडात सामील झाली होती. सारांश, इतिहासाने मरणाच्या दारात लोटलेली अशी मागसलेली सरंजामी सामाजिक शक्ति ही,

पुरोगामी राजनैतिक विचारसरणी देशात प्रसृत करणाऱ्या परकीय सत्तेविरुद्ध राष्ट्रीय एकजूट बनवू शकली नाही. बहुकालीन अंदाधुंदी आणि अराजकता यामुळें उद्भवलेल्या प्रतिक्रियेतून आपल्या समाजाची मुक्तता झालेली नव्हती. म्हणून तो ' शांतता आणि सुव्यवस्था ' याची हमी घेणाऱ्या परकीय राजसत्तेला—मग ती कितीही महाग पडो—चिकटून राहिला. म्हणून १८५७ सालच्या बंडाचा मोड झाला. याच बंडाला स्वातंत्र्ययुद्ध असे सनातनी राष्ट्रवादी म्हणतात. ते बंड दिसायला जरी क्रांतिकारी दिसत होते, तथापि ब्रिटिश सरकारमार्फत हिंदुस्थानांत अवतीर्ण झालेल्या प्रगत आणि पुरोगामी अशा सामाजिक व राजकीय विचारांच्या ' मूले कुठारः ' करणारे होते, या दृष्टीनें बंडाचे स्वरूप अत्यंत प्रतिगामी होते.

येथे पार्लमेंटने उभारलेली राज्यपद्धति झाली तरी, पुरोगामी सामाजिक व राजकीय विचार येथील समाजात विकास पावण्यास अडथळा करणारी होती. त्या राज्यपद्धतीने तर अशा विचारांचा नवोदित व्यापारी मध्यम वर्गरूपी पायाच खणून काढिला होता. या राज्यपद्धतीची सर्व भिस्त नवनिर्मित जमिनदार सरदार वर्गावर होती. पण अशा प्रतिगामी वर्गावर आपले राज्य अवलंबून असावे हे ब्रिटीश भांडवलशाहीच्या उदारमतवादी मुत्सद्यापैकी पुष्कळाना पसंत पडेना. हा प्रतिगामी वर्ग केव्हां भडकेल व आपल्या सत्तेवर केव्हा गदा आणील याचा नेम नाही अशी भीति त्यांच्या हृदयात वास करीत होती. तेव्हा अशा प्रतिगामी शक्तींच्या प्रतिकाराविरुद्ध बंदोबस्त म्हणून पुरोगामी पाश्चात्य विद्याविशारद अशा हिंदी बुद्धिजीवी वर्गाचा एक कडेकोट किल्ला उभारावा या मताचे ते पुरस्कर्ते होते. असा बुद्धिजीवी वर्ग उभारल्यानें त्यापासून—मातबर मध्यम वर्गाचा आर्थिक पायाच त्याच्या बुडाशी नसल्यामुळे—ब्रिटिश सत्तेला धोका तर प्राप्त होणारच नाही, उलट, सरंजामी सामाजिक प्रतिक्रियेपासून उद्भवणाऱ्या संकटापुढे, तो तिची ढाल बनेल असे त्याना वाटत

होते. म्हणून पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार हिंदुस्थानात जारीने करावा असे ते प्रतिपादू लागले. या पुरोगामी विचारसरणीला द्विविध विरोध होता. एक येथील ब्रिटिश अधिकाऱ्यांचा. दुसरा एतद्देशीय सनातन्यांचा. या दोन्ही वर्गांच्या विरोधाची कारणेही पण निरनिराळी होती. पहिल्या वर्गाला असे वाटे की, पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार झाल्याने हिंदी लोक जागे होऊन त्यांचा राजनैतिक दृष्टिकोन विकास पावेल, व अंती ते आपले राज्य परत हिसकावून घेतील. हा त्यांचा अंदाज खरा ठरला हे पुढील इतिहासावरून स्पष्ट होते. याच्या उलट येथील सनातनी घाबरले की पाश्चात्य शिक्षणाने धर्म बुडतो व आपल्या धार्मिक व सामाजिक संस्था खिळखिळ्या होतात. या त्यांच्या भीतीला, हिंदुस्थानांत प्रथम इंग्रजी शाळा चालू करणाऱ्या ख्रिश्चन मिशनरी मंडळीचे वर्तन कारण होय.

भवति न भवति होउन अखेर हिंदी जनतेला इंग्रजी शिक्षण देण्याचा कायदा पार्लमेंटमध्यें पास झाला आणि पाश्चात्य शिक्षण हिंदुस्थानात प्रचलित करण्याची मुहूर्तमेढ रोविण्यात आली. या ब्रिटिश धोरणाचा सुपरिणाम म्हणजे, १८४० च्या सुमारासच अर्वाचीन विचारांचा व पुरोगामी प्रवृत्तीचा असा अभिनव सुशिक्षितांचा एक वर्ग अस्तित्वात आला. या वर्गाच्या द्वारे पाश्चात्य देशातील लोकशाही, राष्ट्रवाद समाजक्रांति धर्मसुधारणा इत्यादि कल्पना या देशात पसरू लागल्या. या पुरोगामी कल्पनानी सुशिक्षित तरुणांची डोकी भारून गेली. आर्यसंस्कृति आणि वैदिक परंपरा यांच्या नावाखाली धुडघूस घालून प्रगतिप्रवाह थोपविणाऱ्या जुन्या बुरसलेल्या देशातील धार्मिक आणि सामाजिक आचारविचाराना मूठमाति दिल्याशिवाय अर्वाचीन राष्ट्रांच्या पंक्तीस आपला देश बसणे शक्य नाही असे त्यांच्या मनानी घेतले. जनतेच्या जुन्या पुराण्या अज्ञ कल्पनावर अधिष्ठित झालेल्या ब्रिटिश राजवटीलासुद्धा हा अभिनव विचारांचा लोंढा अखेर प्राणघातक ठरणारा होता. कारण

बुद्धिवादी विचारसरणीच्या प्रसाराचे पर्यवसान अखेर राजकीय आणि सामाजिक क्रांतीत होते असा युरोपीय इतिहासाचा दाखला आहे. आणि या विचारसरणीचा फैलाव ही नूतन शिक्षण घेतलेली मंडळी देशभर करीत होती. तथापि येथील प्रतिगामी सामाजिक शक्तीस तोड देऊन आपल्या राज्यास बळकटी आणणारा असा नवा सुशिक्षित वर्ग उभारणे ब्रिटीशाना भाग पडले.

पण काही झाले तरी पाश्चात्य शिक्षण हिंदुस्थानात प्रचलित करण्यात ब्रिटीश भांडवलशाहीने कमालीचे धाडस दाखविले यात शंका नाही. त्यामुळे बुद्धिजीवींच्या मनावर प्रतिगामी राष्ट्रवादाची जी मोहिनी पडली होती, तिचा निरास होऊ लागला. पुढे याच बुद्धिजीवि वर्गाने हिंदी राष्ट्रवादाच्या सिद्धांताचा पाया घातला. पाश्चात्य शिक्षण हिंदुस्थानात सुरू करावे असे प्रतिपादणाऱ्या ब्रिटीश मुत्सद्यात मेकॉले हाच अग्रेसर होता. इंग्रजी शिक्षण येथे प्रचलित झाल्याबद्दलचे खरे श्रेय त्यालाच दिले पाहिजे. पुरोगामी पाश्चात्य शिक्षणाच्या प्रसाराचा अखेर परिणाम काय होणार याची अगाऊ कल्पना त्याला नव्हती असे नाही. शिक्षणाच्या प्रभावामुळे येथे लोकशाहीसाठी चळवळ सुरू होणार याची त्याला स्पष्ट कल्पना होती, असे त्याच्या १८३३ च्या रिफार्म बिलाच्या चर्चेच्यावेळीं पार्लमेंटमध्ये झालेल्या भाषणावरून स्वच्छ होते. मग कोणत्या हेतूने प्रेरित होऊन ब्रिटीश साम्राज्यवाद्यानी येथे पाश्चात्य शिक्षण चालू करण्याचे धाडस केले बरे? ते ह्मणतात त्याप्रमाणे मागसलेल्या लोकाना सुसंस्कृत करण्याचा भूतदयात्मक पवित्र हेतू त्यांच्या या कृतीच्या बुडाशी होता असे ह्मणणे तर हास्यास्पदच ठरेल! साहजिकच, ब्रिटीश सरकार हे एक हिंदुस्थानाच्या अत्यंतिक कल्याणासाठी उभारलेले राज्ययंत्र आहे, त्याच्या तोडीचे पुरोगामी राज्ययंत्र येथील पुरातन परंपरेवर उभारता येणे शक्य नाही, अशी ब्रिटीश सरकारची मनःपूर्वक स्तुतिस्तोत्रे गाणारा बुद्धिजीवि वर्ग येथील समाजात निर्माण होणे साम्राज्यवाद्याना हवे होते. १८५७ च्या बंडासमयी ब्रिटीश

राज्य टिकण्याच्याकामी या वर्गाची किती बहुमोलाची मदत झाली, यावरून साम्राज्यवाद्यांचे हे धोरण कसे शहाणपणाचे होते याची स्पष्ट कल्पना येते. इंग्रजी शिक्षणप्रसाराचा तात्कालिक परिणाम असा झाला की येथील समाजातील अत्यंत पुरोगामी द्रव्य बंडाच्यावेळी ब्रिटीश भांडवलशाहीला चिकटून राहिले.

पाश्चात्य शिक्षण घेतलेला येथचा बुद्धिजीवि वर्ग हा ब्रिटीश भांडवलशाहीचा सर्वतोपरी मिंधा बनला. हा वर्ग ब्रिटीश साम्राज्य देवीला आपले तनमन वाहू लागल्यामुळे येथील ब्रिटीश वर्चस्वाचा पाया दृढतर झाला. ब्रिटीश राज्य, न्यायनीति आणि शहाणपणावर उभारलेले, ब्रिटीश राजकीय संस्था देशाला हितकारक असे या वर्गाला मनापासून वाटत होते. हा वर्ग ज्या व्यापारी मध्यम वर्गाचा बौद्धिक प्रतिनिधी होता, तो वर्गच नेस्तनाबूत झाल्यामुळे तो राजकारणात क्रांतिकारी होणे शक्य नव्हते. म्हणून तो प्रथमतः राजकारण बाजूस ठेवून देशातील धार्मिक आणि सामाजिक सुधारणेची धुरा वाहू लागला. यामुळे तर, आपल्या समाजातील प्रतिगामी सनातन्यांचा या मंडळींवर फारच घुस्सा होऊ लागला.

ही नव शिक्षित मंडळी अत्यंत आनंदाने आणि उत्साहाने पाश्चात्य अभिनव शिक्षणाचा आस्वाद घेऊ लागली. अर्वाचीन राजनैतिक तत्त्वे आणि पुरोगामी सामाजिक तत्त्वज्ञान यांचा अभ्यास ही मंडळी मोठ्या आवडीने व कळकळीनें करू लागली. दिवसेदिवस अशा तरुणांची संख्या हजारानी मोजण्यात येऊ लागली.केवळ एतद्देशीय शाळा कॉलेजातच नव्हे,तर विलायती विद्यापीठातही शिक्षण घेण्यासाठी शेकडोगणिक युवक समुद्रपर्यटणा-संबंधाचे सामाजिक निर्बंध बाजूस सारून धाव घेऊ लागले. आर्य संस्कृति, वेदशास्त्रपुराणपरंपरा इत्यादींचा अभिमान बाळगणाऱ्यांच्या दृष्टीने ही मंडळी अराष्ट्रीय ठरू लागली.स्पेन्सरकॉम्टेप्रणीत धर्म तो यांचा धर्म, बेन्थॅमामिल्लचे तत्त्वज्ञान ते यांचे तत्त्वज्ञान. जुन्या जीर्ण वस्तुस्थितीविरुद्ध बंड पुकारून

नवभारतास प्रसवू पाहणारी ही मंडळी हिंदुस्थानचे प्राथमिक बंडखोर होत. याना मनःपूर्वक वाटत होते की हिंदी समाजाने उराशी कवटाळून धरलेल्या जुन्या बुरसलेल्या धर्मसमाज-संस्था आणि आचारविचार ही उध्वस्त झाल्याशिवाय नवभारताचा उदय होणे शक्य नाही. प्रारंभी ही मंडळी जरी राजकारणात निष्प्रभ व निष्क्रिय होती, तथापि लौकरच अराष्ट्रीय म्हणून संबोधिला जाणारा हा सुशिक्षित तरुणांचा तांडा अर्वाचीन राष्ट्रवादाचे पितृस्थान पटकाविता झाला.

नव शिक्षित तरुणानी हिंदी राष्ट्रवादाला जन्मास कसे घातले हे पुढे पाहू. तत्पूर्वी त्यानी कोणत्या सामाजिक आणि धार्मिक चळवळी हाती धरल्या? त्या चळवळींचे महत्त्व काय? त्यांचा समाजाच्या विचारसरणीवर कसा काय परिणाम झाला? या गोष्टींचा खल होणे जरूर आहे. कारण या चळवळीनी राष्ट्रवादाची पार्श्वभूमिका तयार केली. इंग्रजी शिक्षणाने नव युवकात चिकित्सक बुद्धि निर्माण झाली. आपले धार्मिक व सामाजिक आचारविचार व चालीरीती, ही मंडळी सूक्ष्म बुद्धिवादाच्या कसास लावू लागली. आपल्या समाजातील शब्दप्रामाण्यबुद्धि, मूर्तिपूजा, देवतासंख्यत्व अंधश्रद्धा, वेडगळ कल्पना, सती, स्त्रीदास्य, बालविवाह, अखंडवैधव्य, व्यक्तिस्वातंत्र्याभाव, जातिभेद, अस्पृश्यता इत्यादि धार्मिक व सामाजिक चालीरीती हीच आपल्या सामाजिक अवनतीस कारण होत, असे त्याना बुद्धिवादाच्या या दुर्बिणीने दाखवून दिले. युरोपीय राष्ट्रानी अशाप्रकारच्या मध्ययुगीन धार्मिक आणि सामाजिक आचारविचारांची राखरांगोळी केल्यामुळे तेथे बुद्धिवादप्रणीत विज्ञानयुग निर्माण झाले. विज्ञानसहाय्याने त्यानी अखिल विश्व पादाक्रांत केले. अशा राष्ट्रांच्या अग्रभागी असलेल्या ब्रिटनशी हिंदुस्थानची गाठ पडली म्हणून हिंदुस्थान हरले असे आपल्या राजकीय अधःपतनाचे त्यानी निदान केले. ल्यूथरोत्तर यूरोपमध्ये ज्याप्रमाणे धर्म सुधारणा झाली, तशी

येथे झाली पाहिजे, भटाब्राह्मणांचे बंड मोडले पाहिजे, मूर्तिपूजा वेडगळ धर्माचार इत्यादि बंद होणे जरूर आहे, एकेश्वरी धर्माची प्रस्थापना झाली पाहिजे वगैरे मतप्रचार, आसेतुहिमाचल हिंदुस्थानभर, नवीन विद्येने स्फूर्त झालेली ही तरुण मंडळी करू लागली. एकेश्वरी तत्त्वज्ञानाचे नूतन पंथ अस्तित्वात येऊ लागले. या अभिनव मतप्रणालींचा तत्कालीन झोरक्या ह्मणजे राजा राममोहन रॉय होय, त्याने क्रिस्ती पंथाच्या धर्तीवर ब्रम्हो समाजाची स्थापना केली. त्याच्याच अनुकरणाने पुढे मुंबईत रानडेभांडारकरानी प्रार्थना समाजाची प्रस्थापना केली. तसेच पंजाबात दयानंद सरस्वतीने आर्यसमाज प्रस्थापित केला.

दक्षिणेत अगदी अलीकडे ॲनीबिझंटने जगद्‌गुरु पंथ अस्तित्वात आणिला. हे सर्व समाज हिंदु धर्माचे शुद्धीकरण करण्याच्या उद्देशाने उघडण्यात आले. त्याना वेडगळ आचार–विचारविरहित हिंदु धर्म अगर हिंदुधर्माचे क्रिस्तीकरण असे संबोधण्यास हरकत नाहीं. एकोणिसाव्या शतकात धर्म मागे पडून विज्ञानयुग हे आपला प्रभाव गाजवीत होते, हे या नव शिक्षित धर्मनिष्ठांच्या लक्षात आले नाही. समाजाच्या एका विवक्षित अवस्थेत धर्माने विशेषतः एकेश्वरी पंथानी रानटी समाजांस सजाण केले, त्या समाजांची संघटना घडवून आणली, त्याना प्रगतिपथारूढ केले ही गोष्ट जरी सत्यास धरून असली, तथापि गेल्या तीन–चारशे वर्षांत यूरोपात विज्ञानाने जी प्रगति केलेली आहे त्यामुळे धर्माचे सिंहासन विज्ञानाने पटकाविलेले आहे. वास्तवविज्ञान, रसायनविज्ञान, ज्योतिष्यविज्ञान, प्राणी-वनस्पतिविज्ञान, मानसविज्ञान इत्यादि शास्त्रातील नवनव शोधानी असे दाखवून दिले की मानवप्राणी हा खालच्या दर्जाच्या अनेक प्राण्यातून उत्क्रांत झालेला आहे, सर्व सजीव सृष्टि ही देखील एका मूलभूत जड द्रव्यापासून उत्पन्न झालेली आहे आणि अखेर मन हे सुद्धा मेंदू या जडेंद्रियाचे कार्य आहे. याप्रकारे विश्वाची उत्पत्ति आणि स्थिति यांचा

परमेश्वराशी काही एक संबंध नाही, असे उपर्युक्त विविध विज्ञानानी प्रस्थापित केले. याचाच अर्थ परमेश्वरावरील ह्मणजेच धर्मावरील यूरोपीय समाजाची श्रद्धा उडाली; आणि तो समाज आपल्या नित्याच्या व्यवहारात विज्ञानावरच अधिकाधिक विसंबून राहू लागला. ही वस्तुस्थिति १९व्या शतकातील आपल्या समाजधुरीणाना आकलन न झाल्यामुळे यूरोपच्या धार्मिक इतिहासाचे ते अंधानुकरण करू लागले. तथापि एकंदरीत ही त्यांची धार्मिक चळवळ पुरोगामी होती. कारण आपल्या धार्मिक आचारविचाराना ही पुढारी मंडळी बुद्धिवादाच्या काट्यात घालून तोलू लागली. अर्थातच तर्कशास्त्राच्या कसोटीस लावल्याबरोबर धर्म आणी ईश्वरवाद यांचे सिंहासन डळमळू लागते व विज्ञानाचे प्रभुत्व प्रस्थापित होते. धार्मिक आचारविचाराप्रमाणे सामाजिक चालीरीतीनाही हा नूतन बुद्धिजीवि वर्ग बुद्धिवादाच्या कसास लावू लागला.

आपले सामाजिक आचार विचार झाले तरी, धर्मग्रंथ आणि बहुकालीन रूढी यावर आधारलेले होते. धर्मग्रंथ व रूढि ही मानवी स्वार्थबुद्धीवर रचविण्यात आलेली होती. पुरुषवर्गाचा स्वार्थ स्त्रीपारतंत्र्यास कारणीभूत झालेला होता. उच्च वर्गाचा स्वार्थ हा जातिभेद, अस्पृश्यता, शिक्षणबंदी इत्यादीस कारण होता. बुद्धिवादाचा चष्मा लावल्याबरोबर या नव शिक्षितांची दृष्टि साफ झाली व त्याना आपल्या धर्मग्रंथातील व रूढीतील ह्मणजेच सामाजिक चालीरीतीतील व आचारविचारातील दोष स्पष्टपणे दिसू लागले. राजा राममोहन रॉय आदिकरून १९ व्या शतकातल्या पूर्वार्धातील नव शिक्षितानी व्याख्याने व वृत्तपत्रे यांच्याद्वारे आपल्या चालीरीतींच्या बुडाशी मानवी स्वार्थ आणि अज्ञान ही कशी आहेत हे जनतेच्या स्पष्ट निदर्शनास आणून दिले. हिंदू धर्म व समाज यातील दोषांचे निर्मूलन करण्यास ही मंडळी आटोकाट प्रयत्न करू लागली. त्यासाठी सरकारी सहाय्यही त्यानी घेतले. सतीसारखी अमानुष चाल बंद करण्यात

आली. समाजात खळबळ उडू लागली. हजार दोन हजार वर्षे झोपी गेलेला समाज जागा झाला. निर्बुद्ध जनतेत विचारांचे अंकुर फुटू लागले. सामाजिक आचारविचारात क्रांति झाली पाहिजे असे सर्वांना वाटू लागले. एका वाक्यात सांगायचे ह्मणजे हिंदी समाज चिकित्सक आणि कार्यप्रवण बनण्यास प्रारंभ झाला.

सारांश, बेकनच्या काळानंतर यूरोपमध्ये विचारक्रांति होऊन धार्मिक, सामाजिक आणि राजनैतिक सुधारणा अमलात आल्या; त्याचप्रमाणे आपल्या देशात व्हावे; त्यासाठी विज्ञानप्रणीत पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार जारीने येथे व्हावा, इत्यादि राजा राम मोहनरॉय, लोकहितवादी, जोतिबा फुले आदिकरून तत्कालीन समाजधुरीणाना वाटत होते. तदनुसार त्यांनी आपल्या चळवळींचा उपक्रमही केला. सतराव्या शतकात बेकनच्या काळी इंग्लंडात, आणि अठराव्या शतकात रूसो—व्हाल्टेरच्या काळी फ्रान्समध्ये जशा बुद्धिप्रामाण्यवादी चळवळी झाल्या, त्याचप्रकारच्या या चळवळी होत. त्या सर्वांना मिळून हिंदी नवजीवनाची चळवळ (Indian Renaissance Movement) असे नाव प्रामुख्याने देण्यास हरकत नाही.

धार्मिक आणि सामाजिक बाबीप्रमाणे राजकीय बाबीनाही या नव शिक्षितानी आपला बुद्धिवादी चष्मा लाविला. त्याबरोबर याना ब्रिटीश पार्लमेंटाप्रमाणे हिंदी पार्लमेंट असावे आणि तद्वारा हिंदी राज्यकारभार चालावा असे वाटू लागले. याप्रमाणें बुद्धिवादाच्या प्रसारातून हिंदी राजकीय आकांक्षांचा उदय झाला. याचाच अर्थ बुद्धिवादाने हिंदी राष्ट्रवादास जन्म दिला. ते कसे हे पुढील प्रकरणी पाहू. त्यापूर्वी कार्ल मार्क्स याने ब्रिटीश आक्रमणानंतरच्या हिंदी सामाजिक वस्तुस्थितीची जी काटेकोर आणि सखोल मीमांसा केलेली आहे, त्याचा याठिकाणी संक्षिप्त अनुवाद करूं. येथे ब्रिटिशोत्तर घडून आलेल्या सामाजिक स्थित्यंतराचा भौतिक उलगडा त्यामुळे होईल.

' हिंदुस्थानातील ब्रिटीश राज्य ' या विषयावर लिहिताना कार्ल मार्क्स ह्मणतो:—

" All the civil wars, invasions, revolutions, conquests. famines, strangely complex, rapid and destructive as the successive action in Hindustan may appear, did not go deeper than its surface. England has broken down the entire frame-work of Indian society, without any symptoms of reconstitution yet appearing. British steam aud science uprooted, over the whole surface of Hindustan, the union between agricultural and manufacturing industry. The small stereotype forms of social organism (village system) have been to the greater part dissolved, and are disappearing, not so much through the brutal interference of the British soldier, as to the working of English steam and English free trade. Those family communities were based on domestic industry, in that peculiar combination of hand-weaving, hand-spinning and hand-tilling agriculture which gave them self supporting power.

English interference having placed the spinner in Lancashire and the weaver in Bengal, or sweeping away both Hindu spinner and weaver, dissolved those semi-barbarian semi-civilised communities, by blowing up their economical basis and thus produced the greatest, and to speak the truth, the only social revolution ever heard of in Asia.

Now sickening as it must be to human feeling to witness those myriads of industrious patriarchal and inoffensive social organisations, disorganised and dissolved into their units, thrown into a sea of woes, and their individual members losing at the same time their ancient from of civilisation, and their hereditary means of subsistence, we must not forget that these idyllic village communities, inoffensive though they may appear, had always been the solid foundation of oriental despotism, that they restrained the human mind within the

smallest possible compass, making it the unresisting tool of superstition, enslaving it beneath traditional rules, depriving it of all grandeur and historical energies. We must not forget the barbarian egotism which, concentrating on some miserable patch of land, had quietly witnessed the ruin of empires, the perpetration of unspeakable cruelties, the massacre of the population of large towns with no other consideration bestowed upon them than on natural events, itself the helpless prey of any aggressor who deigned to notice it at all. We must not forget this undignified, stagnatory and vegetative life, that this passive sort of exitence evoked on the other part, in contradistinction, wild, aimless, unbounded forces of destruction and rendered murder itself a religious rite in Hindustan, we must not forget that these little communities were contaminated by distinctions of caste and by slavery, that they subjugated man to external circumstances, instead of elevating man into the sovereign of circumstances, that they transformed a self-developing social state into never changing natural destiny, and thus brought about a brutalizing worship of nature, exhibiting its degradation in the fact that man, the sovereign of nature, fell down on his knees in adoration of Hanuman, the monkey, and Sabbata, the cow. England, it is true, in causing a social revolution in Hindustan, was actuated only by the vilest interests, and was stupid in her manner of enforing them. But that is not the question. The question is, can mankind fulfil its destiny without a fundamental revolution in the social state of Asia ? If not, whatever may have been the crime of England, she was the unconscious tool of history in bringing about that revolution.

या अवतरणाचे स्वतंत्र मराठीकरण खालील प्रमाणेः—

हिंदुस्थानात यादवी, क्रांत्या, दुष्काळ, परकीय स्वाऱ्या इत्यादींचा

सुकाळ ब्रिटीशपूर्व दोन हजार वर्षांच्या काळात सारखा चालू होता, तथापि या सर्वांचा परिणाम हिंदी समाजपातळीच्या खाली खोलवर झालेला असा आढळून येत नाहीं. ब्रिटीशानी मात्र अख्खी हिंदी समाज रचना खिळखिळी करून मोडून टाकिली आहे. तिच्या ऐवजी नवी समाजरचना निर्माण होण्याची चिन्हेही दृग्गोचर होत नाहीत. ब्रिटीश यंत्र आणि विज्ञान यानी हिंदी शेती आणि ग्रामोद्योग यामधला अनादिकालीन सांधाच आधी उखडून काढिला. ब्रिटीश यंत्र आणि खुला व्यापार यामुळे बारा बलुतेदारांच्या ग्रामासंस्था नष्ट झाल्या व होत आहेत. हिंदी कौटुंबिक ग्रामसमाज हे, चरखा, हातमाग इत्यादि हस्तव्यवसाय आणि हातशेती या घरगुती उद्योगधंद्यावर आधारलेले होते. ब्रिटीश आक्रमणामुळे चरखा हातमागादि हस्तव्यवसाय नष्ट झाले.त्याबरोबर त्यावर पोसिले जाणारे अर्धरानटी, अर्धसंस्कृत असे ग्रामसमाजही (village communities) लुप्त होऊ लागले. याप्रमाणे हिंदी समाजाचा आर्थिक पायाच उखडून काढून ब्रिटीशानी आशियात अश्रुतपूर्व अशी एकमेव महत्तम सामाजिक क्रांति घडवून आणिली.

अर्थात्, लक्षावधी आर्थिक आणि सामाजिक ग्रामसंस्था मोडकळीस येऊन धुळीस मिळालेल्या, त्यातील व्यक्तींची वंशपरंपरागत उपजीविकेची साधने आणि त्यांची पुरातन संस्कृति ही नाश पावत असलेली इत्यादि दृश्ये पाहून मानवी भावनाना चटका लागून राहिल्याशिवाय कसा राहील? पण हे विसरून चालता कामा नये की या ग्रामसंस्था दिसायला निरुपद्रवी दिसत असल्या तरी, त्यांच्या भरभक्कम पायावरच पौर्वात्य सुलतानशाहीची उभारणी झालेली होती; उंबरातील किड्याप्रमाणे हिंदी मनाचा त्यानी कोंडमारा केला होता, वेडगळ आचारविचारानी त्या मनाला भारून रूढीचे दास बनविले होते, त्याला मानवी भव्यता व ऐतिहासिक कार्यशक्ती यापासून पारखे केले होते; लहानशा जमिनीच्या तुकड्याभोवती घुटमळणाऱ्या हिंदी

एकलकोंड्या वृत्तीला, कित्येक साम्राज्ये उदयास आली काय, किंवा नाश पावली काय, देशात घोर अत्याचार झाले काय अगर नागर जनतेच्या कत्तली झाल्या काय इत्यादि गोष्टींची दिक्कत नव्हती; अशा ग्राम्य, निष्क्रिय आणि कोंडलेल्या वनस्पतिसदृश जीवनामुळे रानटी, ध्येयशून्य व अमर्यादित अशा विध्वंसक शक्तींना उत्तेजन मिळाले होते; आणि वध अगर खून यानासुद्धा धार्मिक विधींचा दर्जा प्राप्त झालेला होता. या छोटेखानी ग्रामसंस्था ह्या जातिभेद आणि अस्पृश्यता यानी दूषित झालेल्या होत्या.त्यानी मानवाला बाह्य परिस्थितीवरचे त्याचे हक्काचे स्वामित्व देण्याऐवजी त्याला परिस्थितीचा बंदा करून ठेविले होते. या संस्थामुळें हिंदी मनाला स्वयंविकासणाऱ्या सामाजिक क्रमाचे आकलन न होता, ते दैववादातच घुटमळू लागले; मानवाचे पाशवीकरण करणाऱ्या निसर्गपूजेला अग्रस्थान प्राप्त झाले. या मानवी अधःपतनाची इतकी परसीमा झाली की हनुमानरूपी मर्कटापुढे आणि सवितारूप गाईपुढे निसर्गाचा स्वामी मानव हा शतशः लोटांगणे घालू लागला. ही सर्व ग्रामसंस्थांची कटु फळे होत. म्हणून ब्रिटीश यंत्राने त्यांचा विध्वंस केला याबद्दल शोक करण्यापेक्षा समाधान मानणेच वाजवी होय. ही सामाजिक क्रांति घडवून आणण्याच्या बुडाशी इंग्लंडचा अत्यंत अप्पलपोटेपणाचा हेतु होता यात शंका नाही. पण येथे हा प्रश्न नाही. इंग्लंडचा गुन्हा कोणताही असो. पण ती क्रांति घडवून आणण्यात इंग्लंड हे इतिहासाचे नकळत हत्यार बनले होते ही गोष्ट निर्विवाद आहे.

या मार्क्सकृत मीमांसेपासून खालीलप्रमाणे उलगडा होतो. कोणत्याही समाजाची विचारसरणी अगर संस्कृति बदलण्यापूर्वी त्या समाजाचा आर्थिक पाया म्हणजे उत्पादनाची साधने यात बदल घडून यावा लागतो, हा मार्क्सचा प्रमुख सिद्धांत आहे. तदनुसार आपल्या समाजातील वेडगळ आचारविचार, निष्क्रियता, दैववाद, अज्ञान इत्यादीला कारण आपल्या

ब्रिटीशपूर्वकालीन समाजाचा ग्रामसंस्थारूप पाया होय असे मार्क्सचे ह्मणणे आहे. तोच उखडून निघाल्यानंतर त्यावर आधारलेली येथील सरंजामी संस्कृति हीही कोलमडून पडणार हे क्रमप्राप्तच आहे. यूरोपमध्ये सरंजामी समाज नेस्तनाबूत होऊन नूतन भांडवलशाही समाज व त्याची संस्कृति ही उत्क्रांत झाली, त्याप्रमाणे येथील सरंजामी समाजाचा पाया ब्रिटिश भांडवलशाहीने उध्वस्त केला तरी, नवा समाज अस्तित्वात आला नाही. तथापि ग्रामसंस्थारूप सामाजिक पाया निखळल्यामुळे येथील सरंजामी विचारसरणीचा निरास होऊ लागला आणि यूरोपियन भांडवलशाही संस्कृतीचे पुरोगामी विचार ग्रहण करण्याची पात्रता येथील समाजात येऊ लागली. ह्मणूनच हिंदी नव शिक्षितानी यूरोपियन बुद्धिवादी विचारसरणीचे जे बी या देशात आणले, ते तात्काल येथे रुजू लागले. आणि हजारो वर्षे निद्रांकित झालेला आपला समाज खडबडून जागा झाला आणि विचार करू लागला.

सारांश, आर्थिक क्रांति आणि पाश्चात्य शिक्षण यायोगे हिंदुस्थानांत बुद्धिवादाचा जन्म होऊन हिंदी राष्ट्रवादाची पार्श्वभूमि तयार झाली. आता राष्ट्रवादाचा उदय कसा झाला हे पुढील प्रकरणी पाहू.

राष्ट्रवादाचा उगम :: ३

" The India of the past we can never hope to revive, but the India of the future; it is for us to shape and to fashion "

—Late Justice Mr. RANDE.

ब्रिटीश भांडवलशाहीने हिंदुस्थानात घडवून आणलेली सामाजिक क्रांति आणि प्रचलित केलेले विज्ञानात्मक शिक्षण यामुळे राष्ट्रवादाचे बी या देशात रुजण्यास भूमिका तयार झाली असे गेल्या प्रकरणात सांगण्यात आले. भूमिका तयार झाली याचा अर्थ काय ? अशा प्रकारची कुतूहलता साहजिकच सामान्य माणसात निर्माण झाल्यास नवल नाही. पाश्चात्य देशाप्रमाणेच आह्मीही पुढे जावे; तेथच्या समाजरचनेप्रमाणेच आपला समाज विकास पावावा; त्यांची यंत्रविद्या आपण शिकावी; त्यांच्याप्रमाणेच आपणही विज्ञानविशारद व्हावे; आम्हालाही पार्लमेंट असावे; अशा प्रकारच्या एक ना दोन अनेक आर्थिक, सामाजिक, राजनैतिक आणि सांस्कृतिक आकांक्षाना वाचा फुटू लागली. आपले गतकालीन दोन हजार वर्षांचे जिणे व्यर्थ ! इंग्लंडच्या पाऊलावर पाऊले टाकण्यातच हिंदुस्थानचा तरणोपाय आहे. असे येथच्या अभिनव समाज नेत्याना वाटू लागले आणि त्यानी आपल्या दृष्टीचा मोर्चा इंग्लंडच्या सनदशीर इतिहासाकडे वळविला.

१८५७ च्या बंडाचा बीमोड झाल्यानंतर हिंदी राजनैतिक क्षेत्रातून सरंजामशाहीचे उच्चाटन झाले. साम्राज्यशाहीने एतद्देशीय संस्थानिकांच्या रूपाने सरंजामशाहीची मढविलेली प्रेते जतन करून ठेविली असली तरी, हिंदी राजकीय चळवळीशी त्यांचा प्रत्यक्ष असा काही एक संबंध राहिलेला नाही. नवोदित हिंदी भांडवलदार वर्ग कसा नामोहरम कर-

ण्यात आला याचे वर्णन यापूर्वी येऊन गेलेलेच आहे. स्वार्थप्रेरित ब्रिटिश भांडवलशाहीने उत्पादनाची नवी यांत्रिक साधने येथे प्रचलित न होऊ दिल्यामुळे असंख्य खेडूत जनता अज्ञानावस्थेत, आर्थिक हलाखीत आणि सामाजिक कोंडमाऱ्यात आपले जीवन कंठीत होती. राजनीति, विविध राजकीय घटना, स्वातंत्र्य किंवा पारतंत्र्य इत्यादि कल्पना त्या ग्रामीण जनतेच्या ध्यानी, मनी अगर स्वप्नीही येणे शक्य नव्हते. पाश्चात्य वळण आणि विचार यात वाढलेली अर्वाचीन शिक्षित मंडळीच काय ती अल्पस्वल्प जीवंतपणाची ग्वाही देत होती. खेडोपाडी विखुरलेल्या असंख्य जनतेशी तुलना केली असता ही सुशिक्षित मंडळी वाळवंटात जशी जलस्थाने (oases) तशी अत्यल्प होती. परंतु हाच सुशिक्षितांचा अत्यल्प तांडा हिंदुस्थानच्या विस्तीर्ण इतिहासात पहिल्या प्रथम राजनैतिक राष्ट्राभिमान (Political patriotism) आणण्यास कारणीभूत झाला. अर्थात् अर्वाचीन राजनैतिक विचारसरणीत तरबेज झालेल्या सुशिक्षित वर्गाचा उदय म्हणजे हिंदी स्वातंत्र्याच्या चळवळीचा उदय होय !

अर्वाचीन राजकीय विचारसरणी झाली तरी पाश्चात्य देशातून हिंदुस्थानात उसनी आणलेली ! ती येथेच का निर्माण झाली नाही ? तिला प्रसविणारा व्यापारी मध्यम वर्गाचा विकास, ब्रिटीशपूर्वकालीन राजकीय अस्थिरता आणि देशातील यादवी यामुळे स्थगित झाला. पुढे ब्रिटीशानी राजसत्ता काबीज करून तर त्या वर्गाचे अस्तित्वच नाहीसे केले. परिणामी भांडवलशाही लोकसत्तेचे तत्त्वज्ञान येथील समाजात विकास पावू शकले नाही. पाश्चात्य शिक्षणाच्या योगे जेव्हा अर्वाचीन राजकीय कल्पना येथील बुद्धिजीवींना अवगत झाल्या, तेव्हा त्या कल्पनांचा पुरस्कार जोमाने आणि उत्साहाने येथील शिक्षित जनता करू लागली. आरंभी, ब्रिटीशानी येथे उभारलेले सरकार भांडवलशाही राज्ययंत्र (bourgeois state) असल्यामुळे त्या जनतेला ते अत्यंत प्रिय झाले. पण

कालांतराने ब्रिटीश राजनैतिक तत्वज्ञान, आणि त्याची एतद्देशीय अंमल-बजावणी यामधील विसंगति तिच्या नजरेत भरली. प्रातिनिधीक सरकार ही अत्युत्कृष्ट राजसंस्था असून अँग्लो सॅक्सन वंशानें ती देणगी देऊन मानव जातीला आपले ऋणी करून ठेविले आहे इत्यादि बाळकडू येथील इंग्रजी अधिकाऱ्यानी आधुनिक शिक्षिताना पाजले होते. पण त्या अधिकाऱ्यांचा या देशातला राजकारभार ज्यावेळी या शिक्षितानी निरखून पाहिला, त्यावेळी त्याना त्या कारभारात प्रातिनिधीक तत्त्वाचा संपूर्ण अभाव आढळून आला. त्यामुळे या नवशिक्षितामध्ये असंतोष उद्भवला. या असंतोषातच हिंदी राष्ट्रवादाचा उगम झाला.

या पुरोगामी बुद्धिजीवींचा झगडा प्रचलित सरकार उलथून पाडण्यासाठीं नव्हता; तर प्रचलित राज्ययंत्राचे लोकशाहीकरण करण्यासाठीं होता. अर्थात या झगड्याचे तत्त्वज्ञान ब्रिटिश भांडवलदार वर्गाकडून त्यानी उसने घेतले होते. इंग्रजी राजकीय तत्त्वज्ञानाचे अभ्यासू आणि ब्रिटीश सनदशीरवादाचे चहाते असे हे जे हिंदी राष्ट्रीय चळवळीचे जनक, त्याना, जगात महत्तम सनदशीर लोकशाही संस्था म्हणून गणण्यात आलेल्या ब्रिटीश पार्लमेंटच्या वर्चस्वाखालीं उभारलेल्या हिंदी राज्ययंत्राची सत्ता आणि न्याय्यता नाकबूल करणे शक्य नव्हते. त्यांचा प्रचलित सरकारवर इतकाच आक्षेप होता की सर्व भांडवलशाही राजनैतिक घटनांचा मूलमंत्र म्हणजे जे लोकप्रतिनिधीत्व त्यालाच या सरकारात वाव नव्हता.

ब्रिटीश सरकारनें हिंदुस्थानावर प्रातिनिधीक संस्था बहाल कराव्या म्हणून चाललेली ही चळवळ स्वयंसिद्ध राष्ट्रीयत्वाच्या सिद्धांतावर उभारलेली होती. ब्रिटीशानी हिंदुस्थानांतील विविध जनसमूहांचे राजकीय एकत्रीकरण करणारी मध्यवर्ति सत्ता तर प्रस्थापिली होतीच. त्यामुळें पुरोगामी बुद्धिजीवीमध्ये हिंदुस्थान हे एक राष्ट्र आहे अशी कल्पना जागृत

झालेली होती.तसेच सार्वजनिक राजकारभारात आपल्याला प्रातिनिधीक स्थान असावे ही आंकाक्षा त्यांच्यामध्ये उद्भवलेली होती. अर्थात् या अभिनव राष्टवादाची उभारणी जुनी परंपरा अगर संस्कृतिसमानता यावर झालेली नव्हती.

मग या नव्या राष्ट्रवादाचे स्वरूप काय ? त्याचे उद्दिष्ट कोणते ? हा नवा राष्ट्रवाद ह्मणजे एक विशिष्ट राजनैतिक कल्पना होय. तिचा उद्देश या देशांत भांडवलशाही राष्ट्रीय राज्ययंत्र उभारणे हा होता. हेच थोडेसे फोड करून जनभाषेत सांगावयाचे ह्मणजे सर्व हिंदी जनता ह्मणजे एक राष्ट्र या कल्पनेने येथील उपर्युक्त पुरोगामी बुद्धिजीवी प्रेरित झाले; आणि त्याना वाटू लागले की आपणच हिंदी जनतेचे खरेखुरे प्रतिनिधी असून देशाच्या राजकारभारात भागीदार होण्याचा आपला हक्क आहे, पण तो हक्क सरकार आपल्याला भोगण्यास देत नाही. याचा परिणाम असा झाला की ब्रिटीश सरकारबद्दल असलेला त्यांचा विस्मय वितळू लागला. ही मंडळी हळुहळू सरकारवर सौम्य टीका करू लागली. सारांश, सरकारबद्दल त्याना वाटत असलेल्या जिव्हाळ्याचे राजनिष्ठ विरोधात रूपांतर झाले. ही वस्तु-स्थिति १८७०।८० च्या सुमारास घडून आली. या वस्तुस्थितीतच हिंदी राष्ट्रीय चळवळीचे बीज दृष्टोत्पत्तीस येते. ह्मणजे या वस्तुस्थितीतूनच हिंदी राष्ट्रवादाचा उगम झाला. या अभिनव राष्ट्रवादास भांडवलशाही राष्ट्रवाद अथवा पुरोगामी राष्ट्रवाद (Bourgeois Nationalism) असे ह्मणता येईल. आता या राष्ट्रवादाच्या बुडाशी प्रभावी आणि प्रेरक अशी कोणती भौतिक शक्ति होती याचा आधी विचार करू.

ती भौतिक शक्ति ह्मणजे हिंदी मध्यम वर्गाचे आर्थिक पुनरुज्जीवन हे होय. १८५७ च्या बंडानंतर ब्रिटीश सरकारने काहीसे नरमाईचे धोरण स्वीकारले. अर्वाचीन बुद्धिजीवी आणि पुरोगामी व्यापारी वर्ग यानी बंडाच्या आपत्प्रसंगी सरकारला बहुमोलाची मदत केली होती. त्यामुळे या

वर्गद्वयाना सरकारने आपल्या कृपाछत्राखाली घेऊन त्याना आपल्या आर्थिक उत्कर्षास वाव देण्यास प्रारंभ केला. बुद्धिजीवीना डाक्टर-वकीलीसारख्या धंद्यात आणि बड्या सरकारी नोकऱ्यामध्ये रेलचेल पैसा मिळू लागला. हिंदी व्यापारी वर्ग तर पक्या कच्या मालांच्या वाढत्या आयात–निर्यातीमुळें पुनश्च भरभराटीस येऊ लागला. या दोन्ही वर्गांच्या हातात द्रव्य अमंचळ साचू लागल्यामुळे आपल्या आर्थिक विस्ताराबद्दल त्यांच्या आकांक्षा वाढू लागल्या. त्याचप्रमाणे आंग्ल शिक्षितांचा भरणाही झपाट्याने होऊ लागला. डाक्टर–वकलीसारख्या प्रागतिक (Liberal) धंद्यात शिक्षितांची अति गर्दी होऊ लागली. सर्व शिक्षिताना नोकरीत गुंतविणे सरकारला शक्य होईना. उच्च अधिकाराच्या जागा हिंदी बुद्धिजीवींना देणे ह्मणजे सार्वजनिक कारभारावरील आपला ताबा शिथिल करणें असें सरकारला वाटत होते. तसेच हिंदी पुनरुज्जीवित भांडवलदाराना औद्योगिक क्षेत्रात प्रवेश करू देणे ह्मणजे ब्रिटीश भांडवलशाहीच्या औद्योगिक मक्तेदारीचा भंग होऊ देणे असेही ब्रिटीश मुत्सद्याना वाटले.

अशा प्रकारे हिंदी व्यापारी आणि बुद्धिजीवि वर्गांची आर्थिक कुचंबणा होऊ लागल्यामुळे त्याना हिंदी राजकीय पुनर्घटनेची अत्यावश्यकता भासू लागली. हिंदी सुशिक्षितानी तर, इंग्रजी अधिकाऱ्याकडून शिकलेल्या राजनैतिक तत्त्वज्ञानाच्या आधारावर प्रातिनिधीक राज्यव्यवस्थेची घोषणा करून हिंदी राजकीय चळवळीचा पाया घातला आणि व्यापारी मध्यमवर्गानें त्याच चळवळीला जोराचा पाठिंबा दिल्याने तिचा पाया दृढतर झाला. सारांश, परकीय सत्तेविरुद्ध सुरू झालेल्या राष्ट्रीय चळवळीची प्रेरक शक्ति पुनरुज्जीवित हिंदी भांडवलदार वर्गाची होती. तथापि हिंदी राष्ट्रवादाचे तत्त्वज्ञान निर्माण करण्याचे श्रेय पुरोगामी हिंदी बुद्धिजीवीना मिळणे जरूर आहे. या दोन्ही वर्गांनी सरकारशी जो विरोध आरंभिला तो हिंदी राष्ट्राच्याच नावाखाली. कारण केवळ आपल्या आर्थिक आकांक्षांच्या नावाने

लढा चालविण्याने सरकारवर परिणाम तर होणारच नाहीं; आणखी अखिल हिंदी जनतेचा त्या लढयास पाठिंबाही मिळणार नाहीं, हे नवशिक्षित पुढारी जाणून होते.

त्यानी अशी हाकाटी चालू केली की, अखिल हिंदी जनता म्हणजे एक राजनैतिक घटक अथवा राष्ट्र असून त्याच राष्ट्राचे आपणच खरेखुरे प्रतिनिधी आहोत, म्हणून हिंदी जनतेचे हितसंबंध रक्षण करण्याची पात्रता केवळ आपणातच आहे. सारांश, हिंदी राष्ट्रीय जीवन, परंपरा, संस्कृति, तत्त्वज्ञान इत्यादीपासून इंग्रजी राज्यकर्त्यांप्रमाणेच अलिप्त राहणारी पण हिंदी राष्ट्रवादास जन्म देणारी ही पुढारी मंडळी लोकप्रतिनिधित्वाचा हक्क जोराने प्रतिपादू लागली.

हिंदी राष्ट्रवादाच्या या जनकाना राष्ट्रवादी म्हणून संबोधण्यापेक्षा सनदशीर लोकसत्तावादी आणि समाजसुधारक म्हणून संबोधणेच योग्य होय. आपल्या पूर्वजांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक शिकवणीपेक्षा त्यांचा ब्रिटिश राजनीतीवर गाढ विश्वास होता. त्यांचा पंथ वस्तुतः राष्ट्रवादाचा नसून प्रातिनिधीक राज्यपद्धतीचा होता. यूरोपिअन भांडवलशाहीच्या पूर्वजाप्रमाणे नूतन सामाजिक संबंधानुरूप अभिनव राज्ययंत्राचा सिद्धान्त बसविण्याचे काम ही मंडळी करीत नव्हती.

सामाजिक दृष्ट्या ही मंडळी क्रांतिकारी (Revolutionary) होती. ह्मणजे यूरोपीय समाजाच्या उत्क्रांत अवस्थेत हिंदी समाजाने पदार्पण करावे असे त्याना वाटत होते. यापेक्षाही स्पष्ट भाषेत सांगावयाचे ह्मणजे हिंदुस्थानचे इंग्लंड बनावे असे त्याना वाटे. पण राजनैतिक दृष्ट्या ही मंडळी केवळ सुधारक (reformist) होती. सारांश, सामाजिक क्रांतीस हे पुरोगामी राष्ट्रवादी भुकलेले होते, पण राज्यक्रांतीची त्याना जरूरी भासली नाही. कारण ब्रिटिश भांडवलशाहीने येथच्या सरंजामी राज्ययंत्राच्या जागी भांडवलशाही राज्ययंत्र उभारून राज्यक्रांति घडवून आणलेली होती.

ब्रिटिशानी हिंदुस्थानात उभारलेले राज्ययंत्र सनदशीर लोकशाहीच्या ब्रिटिश पुरस्कर्त्यांच्या शिकवणीस साजेसे नसून त्यात ब्रिटिश परंपरेस अनसरून जरूर त्या सुधारणा होणे अवश्य आहे, असे ब्रिटिश मुत्सद्यांच्या नजरेस स्पष्ट आणून देण्यासाठीच त्यांचा लढा होता. म्हणून त्यांचा हा विरोध राजनिष्ठात्मक होता असेच म्हणावे लागते. देशाच्या राज्यकारभारात त्याना ब्रिटिशाबरोबर भागीदारी हवी होती. येथचे सरकार परराष्ट्रीय असले तरी ते ब्रिटिश भांडवलशाहीने उभारलेले होते. वर्गीय स्नेहामुळे त्या सरकारशी जुळते घेणे त्याना भाग होते. राज्ययंत्राविषयीच्या भांडवलशाही तत्त्वज्ञानाशी त्यांचा मूलतः विरोध नव्हता.

त्यांची खात्री होती की आपल्या पुरोगामी सामाजिक ध्येयांचा मार्ग चोखाळण्यास अन्य कोणत्याही स्वरूपाचे शासनयंत्र उपयोगी पडणार नाही. सरंजामी एकतंत्री बेजबाबदार अशी राजसत्ता, धार्मिक मागासलेपणा, पितृप्रस्थ कुटुंबातील पुराणप्रियता इत्यादींचे उच्चाटन या देशातून होणे त्याना अवश्य वाटत होते. ते घडून येऊन जनतेची प्रगति व राष्ट्राचा सांस्कृतिक विकास होण्यास सुबुद्ध सरकारचे छत्र त्यांना हवेसे वाटत होते. अशा तऱ्हेचे सरकार अगर राज्ययंत्र तत्कालीन हिंदी समाजरचनेतून— जीत सुशिक्षित पुरोगामी व मातबर मध्यम वर्गाची संख्या 'दर्यामे खसखस' अशी होती—उत्क्रान्त होणे जवळजवळ अशक्यच होते. तेव्हां दुधाची तहान ताकावर भागवावी या न्यायाने, स्वतःचे नाही तर ब्रिटिश भांडवलशाहीप्रणीत हिंदी सरकार पत्करणे त्याना भाग पडले. पण भांडवलशाही लोकसत्ताक राजनीतीनुसार हे हिंदी सरकार प्रातिनिधीक नव्हते. अर्वाचीन सुबुद्ध राज्ययंत्र हे केव्हाही जनतेकडून अधिकार प्राप्त करून घेणारे असे म्हणजेच लोक प्रातिनिधीक असले पाहिजे. तद्वत् हिंदी सरकारही हिंदी पुरोगामी बुद्धिजीवींचा आपल्या शासनरचनेत समावेश करून घेणारे असे असलेच पाहिजे अशी त्यांची अट्टाहासाची मागणी होती. या मागणीतच

हिंदी राष्ट्रीय कल्पनेचे बीज सामावलेले आहे. बीजास पुढे पाणी घालून त्याचे रोपात रूपांतर ब्रिटिश कृपांकित अशा पुनरुदित हिंदी व्यापारी मध्यम वर्गानें केले. या विधानांचे यापेक्षाही जास्त स्पष्टीकरण हवे.

प्रातिनिधीक सरकारची मागणी करण्याच्या मागे कोणत्या प्रेरक शक्ती होत्या याचे किंचित् दर्शन वर येऊन गेलेच आहे. ब्रिटिशांनी हिंदुस्थानात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित केली हे निःसंशय खरे आहे. पण त्याबरोबरच हिंदुस्थानच्या आर्थिक पिळणुकीच्या बाबतीतली आपली मक्तेदारी निर्भेळ राहावी या इराद्यानें ब्रिटिश भांडवलशाहीने हिंदी जनतेला लष्करी आणि राजकीय क्षेत्रापासून अगदी अलिप्त ठेवण्याची खबरदारी घेतली. त्यामुळे शांतता असूनही हिंदी व्यापारी मध्यमवर्गाची वाढ होईना. अर्वाचीन शिक्षणाचा प्रसार होऊ दिल्यामुळे हिंदी बुद्धिजीवीमध्यें अभिनव राजनैतिक दृष्टिकोण जागृत झाला होता, तथापि त्याना लष्करी आणि राजनैतिक सत्तेमध्ये सहभागी करून घेण्याचे सरकार मनावर घेईना. हिंदुस्थानची बेदाद आर्थिक पिळणूक आणि देशाच्या औद्योगिक वाढीस पायबंद यामुळे नाडणुकीची ब्रिटिश मक्तेदारी शिथिल करू शकणारा असा हिंदी भांडवलदार वर्ग उदयास येईना.

ब्रिटिश राजवटीतील सुशिक्षितांच्या सुरवातीच्या पिढ्या राजकारणात निरुपद्रवी होत्या. उलट, हिंदी सामाजिक आणि धार्मिक संस्थावर टीकेची झोड उठवून आणि हिंदुस्थानचा राजनैतिक मागसलेपणा उघडकीस आणून ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या बळकटीस त्या सतत सहाय्य करीत होत्या. हिंदी जनतेतील अत्यंत पुरोगामी आणि सुबुद्ध असे द्रव्य आपल्याला इतके अनुकूल आहेसे पाहून साम्राज्यवादी मुत्सद्यांचे चांगलेच फावले. त्यांनी, हिंदी जनता ही स्वराज्यास अपात्र असून तिला आत्मरक्षणार्थ परक्या सुसंस्कृत राष्ट्राकडे धाव घेण्याशिवाय गत्यंतर नाही हे, हिंदी शिक्षितांची वचने पुराव्यास घेऊन, दाखवून देण्यास सुरवात केली. ही कृत्रिम वस्तु-

स्थिति फार दिवस टिकू शकली नाही. कालांतराने अनेक आपत्तीतूनही व्यापारी मध्यम वर्ग उदयास आला. त्या वर्गाच्या पाठिंब्याने बुद्धिजीवी मध्यम वर्गास धैर्य प्राप्त झाले आणि त्याच्या राजकीय दृष्टिकोणात अकस्मात् बदल घडून आला.आणि तो बुद्धिजीवी वर्ग ब्रिटिश सनदशीरपणा **बद्दलचे आपले प्रेम आणि विश्वास कायम ठेवूनही हिंदुस्थानात प्रातिनिधीक संस्था अस्तित्वात याव्या ह्मणून जोमाची चळवळ करू लागला.**

वस्तुतः मध्यम वर्गाला सरकारात जे प्रतिनिधीत्व हवे होते, ते केवळ आपल्या वर्गाच्या हितासाठीं. त्याच्या प्रातिनिधीक सरकारच्या मागणीतील इत्यर्थ हाच की, ब्रिटिशानी हिंदुस्थानात उभारलेले सरकार ही एक हिंदुस्थानच्या हितासाठी निर्मिलेली उत्कृष्ट राज्यसंस्था आहे, अशी आपली ख्याति व्हावी, असे सरकारला वाटत असेल तर सरकारने मत्ताधीश (propertied) व बुद्धिजीवी (intelligenta) अशा द्विविध मध्यम वर्गाच्या आकांक्षाकडे दुर्लक्ष करता कामा नये. जनतेचे आपण प्रतिनिधी आहोत ह्मणून देशाच्या राज्यकारभारातील उच्च जागा आपणास मिळाल्या पाहिजेत असा आपला हक्क, पहिल्या प्रथम, अर्वाचीन हिंदी भांडवलशाहीचा बौद्धिक अग्रेसर (ideological vanguatd) असा जो पाश्चात्य विद्याशिक्षित हिंदी मध्यम वर्ग त्याने नोंदविला. लागोपाठ आर्थिक स्वायत्ततेची मागणी पुढे करून हिंदी भांडवलदार वर्गाने उपर्युक्त प्रातिनिधीक सरकारच्या मागणीचा पाठपुरावा केला. सारांश, हिंदी बुद्धिजीवी आणि भांडवलदार अशा द्विविध मध्यम वर्गाचा उदय ह्मणजेच हिंदी राष्ट्रवादाचा उगम होय! लोकशाहीच्या तत्त्वानुसार आपल्याला सरकारचे घटक होण्याचा अधिकार पोंचतो हे सिद्ध करण्यासाठी अखिल हिंदी जनता ह्मणजे एक राजकीय घटक अथवा राष्ट्र आणि आपण त्या राष्ट्राचे प्रतिनिधी आहोत, हा सिद्धांत हिंदी भांडवलशाहीचा बौद्धिक प्रतिनिधी असा जो सुशिक्षित मध्यम वर्ग त्याने उद्धृत केला.

जोवर या तरुण बुद्धिजीवी वर्गांची चळवळ केवळ धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रापुरतीच मर्यादित होती, तोवर सरकारला हा वर्ग आपला पाठिराखा आहे, असे वाटले. पण जेव्हा का त्या वर्गानें राजकीय क्षेत्रात उडी घेतली आणि प्रातिनिधीक संस्था अस्तित्वात आणण्याबद्दल आणि उच्च सरकारी नोकऱ्यांचे द्वार सुशिक्षिताना खुले करण्याबद्दल ब्रिटिश सरकारकडे मागणी केली, त्यावेळी मात्र सरकारचे धाबे दणाणले आणि सरकारला अशी धास्ती वाटू लागली की, पुढे मागे हा बुद्धिजीवी वर्ग, उदयोन्मुख अशा भांडवलदार वर्गांचा पाठिंबा मिळवून अखिल हिंदी राष्ट्राच्या नावे आर्थिक स्वातंत्र्य आणि लोकशाही सरकार यांची मागणी केल्याशिवाय राहणार नाहीं.

इ. स. १८८५ मध्यें हिंदी राष्ट्रीय सभेचा जन्म होण्यापूर्वी कांही वर्षांपासूनच हिंदी भांडवलदार वर्गांच्या आकांक्षा अर्वाचीन कारखान्यांच्या वाढत्या स्वरूपात दृग्गोचर होत होत्या. पण सरकारी वक्रदृष्टि आणि साम्राज्यशाही भांडवल याबरोबर टक्कर देता देता त्या कारखान्यांच्या नाकी नऊ येत असत ! अशा बिकट परिस्थितीत झुंजणाऱ्या नवोदित भांडवलदाराना आणि पाश्चात्य शासनशास्त्रपरिचित बुद्धिजीवींना पुढील प्रगतीस आणि विकासास वाव न मिळाल्यामुळे, या दोन्ही वर्गांची गाऱ्हाणी आणि हितसंबंध याना संघटित चळवळीचे स्वरूप देऊन त्या चळवळीचे नेतृत्व पत्करणाऱ्या अभिनव बुद्धिजीवि पुढाऱ्याना क्रांतीचा मार्ग स्वीकारण्याशिवाय गत्यंतर नव्हते. अशाच वेळीं राष्ट्रीय सभेचा जन्म झाला. किंबहुना 'लोकांची गाऱ्हाणी' आणि 'राष्ट्रीय आकांक्षा' याना तोंड फोडण्यासाठीच राष्ट्रसभा जन्मास आली असे ह्मणण्यास हरकत नाहीं. अर्थात् त्यावेळची लोकांची गाऱ्हाणी याचा अर्थ सुशिक्षिताना उच्च पदवीच्या जागा हव्या होत्या इतकाच ! आणि तत्कालीन 'राष्ट्रीय आकांक्षा' याचा अर्थ पुनरुदित हिंदी भांडवलदार वर्गाला औद्योगिक क्षेत्रात प्रवेश पाहिजे होता एवढाच !

यांप्रकारे असंतुष्ट झालेले दोन वर्ग देशातली प्रचंड शक्ती बनून साम्राज्यशाहीस हाणून पाडतात की काय अशी धडकी काही ब्रिटिश स्वदेशाभिमानी प्रागतिकांच्या (liberals) उरात भरली. आणि रडणाऱ्या मुलाला खेळणे देतात त्याप्रमाणे नव शिक्षित पुढाऱ्यांच्या हातात राष्ट्रीय सभेचे भपकेबाज खेळणे देऊन त्यांची चळवळ शिथिल करण्याच्या उपक्रमास ब्रिटिश प्रागतिकानी प्रारंभ केला. हे सर्वांस विदित आहे की, गॅडस्टन पंथाच्या ह्यूम नावाच्या एका सेवानिवृत्त ब्रिटिश नोकराने—ज्याला हिंदी राष्ट्रीय सभेचा जनक असे विशेषिले जाते—हिंदी शिक्षिताना देशाच्या राज्यकारभारापासून बहिष्कृत ठेवल्यामुळे देशात किती असंतोष माजत होता,याची स्पष्ट कल्पना तत्कालीन व्हाइसरॉय लार्ड डफरिन याच्या बुद्धीस पटवून दिली आणि त्याजकडून प्रारंभीच्या काँग्रेस अधिवेशनाना शुभाशिर्वादही मिळविला होता. पण इतिहासाविरुद्ध कट करून कधीही भागत नसते ! साम्राज्यशाही चतुर धोरणालाही सामाजिक शक्ती धाब्यावर बसवितात हेच अखेर सिद्ध झाले. तात्त्विक दृष्ट्या ब्रिटिश सनदशीर राजकारणाचे निस्सीम चहाते ह्मणून प्रसिद्धीस आलेले असे हिंदी बुद्धिजीवी, परिस्थितिप्रभावामुळे नवोदित हिंदी भांडवलदार वर्गाच्या हितसंबंधाचे संरक्षक बनले आणि हिंदी राष्ट्रवादाचे निशाण फडकाविते झाले. अल्पावधीतच स्वतंत्र व्यापारवादी ह्मणून गाजलेले जॉन ब्राईट यांचे हिंदी पट्टशिष्य हे, आपल्या राजनैतिक गुरूचे द्रोही बनले आणि हिंदी व्यापारसंरक्षक जकातींची मागणी उघड उघड करू लागले !

हिंदी राष्ट्रीय सभेचे पहिले अधिवेशन, इ. स. १८८५ मध्ये, नामांकित वकील डब्ल्यू. सी. बॅनरजी यांच्या अध्यक्षतेखाली, प्रधान औद्योगिक केन्द्र अशा मुंबई शहरी साजरे करण्यात आले. प्रांताच्या गव्हर्नराला पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष होण्यास विनविले होते, यावरून ते अधिवेशन किती निरुपद्रवी होते याची स्पष्ट कल्पना येते. पहिल्या

अधिवेशनातले मुख्य ठराव दोनच होते. एक कायदेमंडळाच्या विस्तारा-बद्दलचा; आणि दुसरा सरकारी नोकऱ्यांच्या वटनेबद्दल चौकशी करण्या-साठी रॉयल कमिशनची नेमणूक करण्याबद्दलचा. या ठरावद्वयात केवळ बुद्धिजीवींचेच तेवढे हक्क आणि गाऱ्हाणी प्रतिबिंबित झालेली दिसतात. तथापि या अधिवेशनाच्या पडद्यामागे हिंदी भांडवलदारांच्या आर्थिक हितसंबंधांची अदृश्य अशी प्रेरक शक्ति होती यात शंका नाही.

राष्ट्रीय सभा आणि सरकार यामधला हा स्नेहसंबंध फार काळ टिकू शकला नाही. अल्पावधीतच ब्रिटिश प्रातिनिधीक जीवंत तत्त्वांच्या अनु-रोधाने हिंदुस्थानात प्रातिनिधीक संस्था प्रचलित कराव्या अशी मागणी राष्ट्रसभा करू लागली. त्याबरोबर सरकारचे पित्त खवळू लागले. राष्ट्र-सभा ही एक सरकारविषयी अप्रीति निर्माण करणारी राजद्रोही संस्था आहे, अशा दृष्टीने सरकार तिजकडे पाहू लागले. तथापि हिंदी बुद्धिजींचा राजनिष्ठ पाठिंबा गमावू नये ह्मणून सरकारने १८८८ च्या स्थानिक स्वराज्य कायद्याने हिंदी जनतेला म्युनिसिपल कारभारात काही सवलती देऊ केल्या आणि १८९२ च्या हिंदी कौन्सिल कायद्याने जबाबदार हिंदी पुढाऱ्याच्या सल्ल्याने हिंदी राज्यशकट हाकण्यात यावा एवढे तत्त्व मान्य झाले. परंतु एवढ्याने हिंदी प्रागतिकांचे समाधान होण्याजोगे नव्हते. कारण, १८९२ च्या कायद्याने सल्लाकौन्सिले उभारण्यात आली तरी त्यात प्रातिनिधीक तत्त्वाची अमल-बजावणी होण्यास मुळीच अवसर नव्हता.

पण काही झाले तरी हिंदी प्रागतिकाना राष्ट्रीय स्वातंत्र्याची कल्पना सुचली नाहीं. आणि ती सुचणेही शक्य नव्हते. ते जातिवंत सुधारणावादी होते. इंग्रजी शिक्षण, सनदशीर लोकशाहीवर प्रीति, स्वयंस्फूर्त वर्गीय-स्निग्धता (instinctive class-affiliation) इत्यादीमुळें ब्रिटिश राजवटीचे त्याना कौतुकच वाटत असे. अशांची राज्यक्रांतीपर्यंत मजल जाणे शक्य नव्हते. त्यांची उडी फार तर, सरकारी राज्य यंत्रामध्ये

लोकप्रतिनिधी या नात्याने आपला समावेश करून घ्यावा इतकाच. सनदशीर मार्गाने हिंदुस्थानच्या राज्यकारभारात सुधारणा घडवून आणणे एवढाच त्यांचा कार्यक्रम होता. तत्कालीन काँग्रेस ही झाली तरी त्यांच्याच हातातली बाहुली होती. तदनुरूप काँग्रेसचाही कार्यक्रम असणे साहजिक होते. सारांश, प्रारंभीच्या काळात, राष्ट्रीय सभेचे ध्येय राष्ट्रीय सरकार हे नव्हते; लोकशाही सरकार हेच तिचे ध्येय होते. लोकशाही सरकार याचा अर्थ झाला तरी, देशाचा दिवाणी कारभार, सामाजिक नवयुगाचे अध्वर्यू असे जे हिंदी प्रागतिक यांच्या हवाली करावा, या अर्थापलीकडे जात नव्हता.

प्रारंभीच्या काँग्रेसचा हा राजनैतिक सुधारणावाद अपरिहार्य होता. तत्कालीन काँग्रेसचे पुढारी हे हिंदी नवजीवन चळवळीचे आद्यप्रणेते होते. त्यांच्या नजरेसमोर ब्रिटिश सनदशीरवादानें प्रेरित झालेल्या सरकारच्या नेतृत्वाखाली सामाजिक विकास आणि आर्थिक उत्क्रांति गाठणाऱ्या हिंदुस्थानचे चित्र होते. ब्रिटिश सत्तेच्या अभावी राष्ट्रीय जीवनाच्या प्रत्येक चाकोरीत ह्मणजे सामाजिक, राजकीय, धार्मिक इत्यादि सर्व बाबतींत देशातील प्रतिगामी शक्ती उचल खातील अशी भीति त्यांच्या हृदयात वास करीत होती. ह्मणून ब्रिटिश वर्चस्व खणून काढू पाहणारा जहाल राष्ट्रवाद अगर क्रांतिवाद हा तत्कालीन काँग्रेसचा कार्यक्रम असणे शक्य नव्हते. प्रागतिक बुद्धिजीवींना ब्रिटिश सत्ता उलथून टाकणे अशक्य वाटत होते हे तर खरेंच, शिवाय ती कल्पनाही त्याना असह्य होती. अर्थात् जहाल राष्ट्रवादाची उभारणी त्या काळात प्रतिगामी सामाजिक शक्तींवर होण्याशिवाय गत्यंतर नव्हते. ह्मणजे ब्रिटिश राज्याच्या ऐवजी एकतंत्री नृपसत्ता प्रस्थापित करणे आणि ब्रिटिश पूर्वकालीन सनातनी समाज अस्तित्वात आणणे, या प्रतिगामी राजकीय आणि सामाजिक ध्येयानी तत्कालीन जहालवाद प्रेरित झाला होता. परकीय भांडवलशीचे जू फेकीत असता एकसमयावच्छेदेकरून सामाजिक प्रतिक्रियेचा लोंढा थोपवून धरणाऱ्या शक्ती अद्याप समाजात

प्रादुर्भूत झालेल्या नव्हत्या. पण काही ह्मटले तरी त्या वेळच्या काँग्रेसधुरीणांचा ह्मणजे हिंदी प्रागतिक बुद्धिजीवींचा राष्ट्रवाद पुरोगामी किंवा ऐतिहासिक दृष्ट्या क्रांतिकारी होता असेच ह्मणावे लागते. कारण त्या राष्ट्रवादाची तरवार दुधारी होती. एका धारेने समाजातील वेडगळ धार्मिक कल्पना आणि सनातनी सामाजिक आचारविचार छाटून काढण्याचा चंग तिने बांधला होता; तर दुसऱ्या धारेने ब्रिटिश भांडवलशाहीच्या राजनैतिक निर्भेळ मक्तेदारीवर धाव घालण्यास ही पुरोगामी राष्ट्रवादाची तरवार सज्ज झालेली होती. अर्थात् त्या पुरोगामी राष्ट्रवादाचे विवेचन विस्तृतशः करणे क्रमप्राप्तच आहे, ते पुढील प्रकरणी.—

पुरोगामी राष्ट्रवाद : : ४

" You cannot be liberal by halves. You cannot be liberal in politics and conservative in Religion. It is an idle dream to expect men to remain enchained and enshackled in their own superstition and social evils, while they are struggling hard to win rights and privileges from their rulers. You cannot make the people at large conscious political unit so long as you are keeping learning a monopoly of the Brahman oligarchy; you cannot unite the people in a struggle for political advancement so long as you tell them to sacrifice material things for a spiritual life; you cannot make the people fight for national independence or democratic goverment, which will put you in power, unless you tell them that the future will be better than the present; you cannot expect the people to move forward carrying you to power on their shoulders, unless you free them from the influences of feudal and patriarchal customs which are hostile to modern political concepts "

वरील उतारा, १८९६ च्या ज़ानेवारीमध्ये केसरी पत्राने, राजकारण आणि समाजकारण यांचा अन्योन्यसंबंध नाही, असे केलेल्या विधानास न्या. रानडे यानी दिलेल्या उत्तरातून घेतलेला आहे. या उताऱ्यात पुरोगामी राष्ट्रवादाचे सर्व सार सामावलेले आहे. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात हिंदी प्रश्नाबद्दल सार्वत्रिक विचार करणाऱ्या ज्या व्यक्ती होऊन गेल्या, त्या सर्वांत न्या. रानडे यांचा दर्जा फार मोठा आहे. त्यांचा दृष्टिकोण व्यापक होता, इतकेच नव्हे, तर त्यांची दृष्टि भेदक आणि मूलगामी होती. प्रत्येक प्रश्नाबद्दलचा त्यांचा अभ्यास गाढ असे. त्यांच्या दीर्घकालीन अध्ययनाचा,

विचाराचा आणि अनुभवाचा निष्कर्ष वरील अवतरणात दृष्टोत्पतीस येतो. न्या. रानडे यांचा राष्ट्राभिमान उज्वल होता. हिंदी राजकारणात नवजीवन निर्माण करण्याबद्दलचे श्रेय न्या. रानडे यानाच देणे भाग आहे. रानडे आणि त्यांचे सहकारी यांचा राष्ट्राभिमान पुरोगामी होता, असे आह्मी का ह्मणतो, तर त्यांची दृष्टि पुढे धाव घेणारी होती, त्याना हिंदुस्थान देशाने सर्व बाबतीत यूरोपीय राष्ट्रांच्या पंक्तीस बसावे असे मनःपूर्वक वाटत होते. त्यांच्या नजरेला आपल्या धार्मिक आणि सामाजिक आचार विचारांचे राष्ट्रविघातक स्वरूप स्पष्ट दिसत होते, इतकेच नव्हे तर, त्या आचार-विचाराविरुद्ध त्यानी बंड पुकारले. अशाना सामाजिक दृष्ट्या क्रांतिवादी ह्मणणेच प्रशस्त होय !

अशाना, सामाजिक क्रांतिवादाचे शत्रू असे जे प्रतिगामी राष्ट्रवादी त्यानी ' अराष्ट्रीय ' किंवा ' ब्रिटिशांचे मर्कटानुकरण करणारे ' अशी दूषणे दिली होती. ती अत्यंत विपर्यस्त आणि चुकीची आहेत. या काँग्रेस पित्यानी राजकारणापेक्षा समाजकारणावर जी आपली दृष्टि केन्द्रित केली, त्याला कारण, जुन्या मोडकळीस आलेल्या समाजरचनेस मूठमाति देऊ पाहणाऱ्या सामाजिक शक्तींचे ते मूर्तिमंत अवतार होते. जुन्याचा धैर्यानें धिक्कार करून राजकीय पारतंत्र्यापेक्षा समाजरूढींचे दास्य हेच राष्ट्राच्या प्रगतीस जास्त विघातक आहे असे त्यानी सर्वांच्या निदर्शनास आणून दिले ! हिंदी जनता पुरोगामी सामाजिक ध्येयानी स्फूर्त झाल्याविना उच्च प्रतीच्या सामाजिक पायावर आधारलेली हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्ता डळमळू शकणार नाही अशी त्यांची बालंबाल खात्री होती. नव्या सामाजिक संबंधाच्या पाऊलावर पाऊले टाकीत नव्या राजकीय संस्था अस्तित्वात येतात, या समाजविकासाच्या नियमाने हिंदी बुद्धिजीवींची मनोवृत्ति नियंत्रित झालेली होती. त्याना यूरोपातल्याप्रमाणें येथेही भांडवलशाही समाज अस्तित्वात यावा असे वाटत होते. पण अशा तऱ्हेची समाज रचना

प्रचलित करण्यास, जे राष्ट्रीय राज्ययंत्र अगर सरकार उभारावे लागते, ते, सरंजामी परंपरा, पितृप्रधान कुटुंबातला सनातनवाद आणि धार्मिक खुळेपणा यांचा पूर्ण ताबा असलेल्या समाज घटनेच्या पायावर मुळीसुद्धा उभारता येणार नाही, हेही पण ते जाणून होते. सामाजिक चालीरीति आणि संस्था यांची भली मोठी धोंड बाजूस सारल्याशिवाय हिंदी समाजाचा प्रगतीचा ओघ चालू होणार नाही आणि त्या समाजात नवजीवनाचा संचार होणार नाही, हे ताडून त्यांचे समूळ उच्चाटन करण्याचा चंग या पुरोगामी राष्ट्र-वाद्यानी बांधला आणि आपण आगामी सामाजिक क्रांतीची अग्रसेनाच आहो असे आपल्या कृतीनें प्रस्थापित केले.

प्रारंभीच्या काँग्रेस अधिवेशनांचे सामाजिक महत्त्व विशेष होते. किंबहुना काँग्रेसबैठकीच्या मंडपातच सामाजिक परिषद् हटकून भरत असे. काँग्रेसच्या मंडपात, अशाप्रकारे सामाजिक खल होण्यास सनातन्यांचा विरोध उत्पन्न होऊ लागला. या सनातन्यांचा युक्तिवाद असा होता की आपल्या पारंतत्र्याचा आणि सामाजिक आचारविचारांचा काही एक संबंध नाही. दुर्दैवाने आपले स्वातंत्र्य गेले, ह्मणून संस्कृति मोडकळीस आली व धर्म बुडाला; आपल्या अवनतीस परदास्य हेच सर्वथैव कारण आहे; शिकलेली बाटगी मंडळी आपल्या देशात पाश्चात्य आचारविचार आणून समाजाची घडी बिघडवीत आहेत, किंबहुना समाजात स्वैराचार पसरवीत आहेत; ह्मणून सामाजिक सुधारणांचा आणि कोणत्याहि तऱ्हेचा काडीमात्रही संबंध असता कामा नये. पण सनातन्यांची ही विचारसरणी शास्त्रशुद्ध अथवा बुद्धिवादास पटणारी अशी नव्हती. ती समाजशास्त्राशी विसंगत अशीच होती.

ती जुन्यास कवटाळून धरून समाजास मागे खेचणारी होती. एकतंत्री राजसत्ता, हिंदू संयुक्त कुटुंबपद्धति, हिंदी ग्रामसंस्था, हिंदु जाति संस्था, वर्णा-श्रमधर्म, श्रुतिस्मृतिप्रामाण्य, सामाजिक आणि धार्मिक रूढी इत्यादींचा

उदो उदो करणारी ही जुनी बुरसलेली विचारसरणी प्रतिगामी स्वरूपाची, ह्मणजे हिंदी राष्ट्रास आणखी दोनशे वर्षे मागे नेणारी होती. अर्थात् या विचारसरणीला प्रतिगामी राष्ट्रवाद हेच नाव योग्य होय!

पूर्वग्रहापासून आपला मेंदू अलिप्त ठेवून विचार करणाऱ्याला या विचारसरणीत काही तथ्य आहे असे वाटणार नाही. वस्तुतः जगाचा इतिहास, यूरोपीय राज्यक्रांत्या आणि समाजविकास याकडे डोळेझाक केल्यामुळे या प्रतिगामी विचारसरणीला आपल्या देशाच्या राजकारणात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. या राष्ट्रवादाचे नेतृत्व लो. टिळकासारख्या तेजस्वी व कुशाग्रबुद्धीच्या व्यक्तीने पत्करावे हे देशाचे दुर्दैव होय! पुरोगामी विचारसरणीला ही सनातनी मंडळी पाश्चात्य ह्मणजेच परकी अथवा वाटगी विचारसरणी ह्मणून हिणवू लागली. वास्तविक पाहता, अमुक एक शिक्षण, ज्ञान अगर विचारसरणी ही पाश्चात्य आणि अमुक एक पौर्वात्य असा भेद करणे हेच चुकीचे आहे. ज्ञानाचे वांशिक किंवा राष्ट्रीय भेद पाडणे अगर 'west is west and east is rest the twin shall never meet' असे विधान करणे किपलिंगसारख्या साम्राज्यवाद्यालाच शोभते. उत्क्रांतिपथावरील मनुष्य जातीने अनेक अवस्था आक्रमण केल्या आहेत. प्रत्येक अवस्थेत मानव हा तदनुषंगिक सामाजिक तत्वज्ञान व संस्था निर्माण करीत असतो. आजच्या जगातला ज्ञानाचा जो ठेवा आहे, तो, निरनिराळ्या प्रदेशातील सर्व मानवानी आपल्या आक्रमणाच्या विविध अवस्थामध्यें संपादन केलेल्या ज्ञानाचा एकूणएक साठा आहे. तेव्हा ज्ञानाचे प्रादेशिक विभाग पाडून अमुक एक ज्ञान परके अतएव त्याज्य ह्मणून त्यावर बहिष्कार घालणे राष्ट्रहितविघातक आहे यात शंका नाही. जरूर पडेल तेव्हा इतरापासून ज्ञानाचे धडे घेण्यास लाज कसची? १५।१६ व्या शतकापर्यंत आपला समाज आणि यूरोपीय समाज हे एकाच वेगाने चालत आले. दोन्ही समाजांचा सांस्कृतिक सामाजिक आणि राजकीय दर्जा अगदी समसमान होता!

पण पुढें तीनशें वर्षे अंतर्गत यादवी आणि परचक्र यामुळें हिंदुस्थानास सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात यूरोपबरोबर कमालीची प्रगति करता आली नाहीं. यूरोपीय समाज भूमितिश्रेढीच्या वेगानें झपाझप पुढे पाऊले टाकू लागला, तर आपला समाज आहे तेथेच थबकून राहिला. तदनंतर गेली शंभर वर्षे तर ब्रिटिश आक्रमणामुळे आपला देश निचेष्ट होऊन पडलेला आहे. सहाजिकच भौतिक सुधारणेच्या बाबतीत हिंदुस्थान देश हा युरोपच्या पुष्कळच मागे पडला, यात विषाद वाटण्यासारखे काय आहे ? ही वस्तुस्थिति लक्षात घेऊन युरोपच्या पाऊलावर पाऊले टाकीत त्याच्या पंक्तीस जाऊन बसण्याचे सोडून देऊन, 'आध्यात्मिक' संस्कृतीच्या भपकेबाज नावाखाली आपल्या मागसलेपणाचे गोडवे गाणे ह्मणजे देशातील प्रतिगामी शक्तींच्या आहारी जाणे होय. हा शुद्ध वेडगळपणा आहे! जुन्या टाकाऊ झालेल्या परंपराना चिकटून राहणारा, इतर राष्ट्रापासून ज्ञानाचे आणि शहाणपणाचे धडे घेऊन पुढे भरधाव वेगाने जाण्याची मनांत आकांक्षा न बाळगणारा आणखी परकीय ज्ञानाचा धिक्कार करून स्वकीय अडाणीपणाचे कौतुक करणारा असा हा स्वयंमन्य राष्ट्रवाद,याला राष्ट्रवाद तरी ह्मणावे की काय याबद्दल जबर शंका येते !

अर्वाचीन भौतिक सुधारणेचा मूलभूत पाया अशी भांडवलशाही समाजरचनेची ध्येये आणि लोकशाही शासनपद्धतीचीं तत्त्वे, पहिल्या प्रथम यूरोपियन लोकानी विकसित ही गोष्ट खरी आहे. परचक्राचा संपर्क झाला नसता तर, आपल्या देशानेही याच स्वरूपाची राजनैतिक आणि सामाजिक तत्त्वे स्वतंत्र रीत्या उत्क्रांत केली असती याबद्दल शंका बाळगण्याचे कारण नाही. या तत्त्वांचा उदय ह्मणजे प्रत्येक मानव समाजाच्या एका विशिष्ट आर्थिक विकासावस्थेत उदय पावलेल्या विचारांचा परिपाक होय. ह्मणून त्यांच्या उत्पत्तीचे श्रेय केवळ एकाच यूरोपीय संस्कृतीला देणे अवास्तव आहे. मानवी संस्कृतीचा उदय प्रथम हिंदुस्थान, चीन, इजित इत्यादि

पौर्वात्य देशानी केला. पुढे त्याची प्रगति ग्रीस, रोम, अरब इत्यादि राष्ट्रांनी घडवून आणिली. पुढे ७।८ शें वर्षे तिची प्रगति स्थगित झाली; नंतर अगदी अलिकडे ह्मणजे ४०० वर्षांपूर्वी यूरोपातली राष्ट्रे जागी झाली व त्यानी मानवी संस्कृतीचा अर्वाचीन विकास घडवून आणिला. तात्पर्य, हल्ली जगातील जो ज्ञानाचा आणि संस्कृतीचा ठेवा आहे, तो सर्व, अखिल मानव जातीच्या संयुक्त मालकीचा आहे. त्याचे विभाग पाडता येत नाहीत, आणि त्यातील अमुक एक अंश अमुक राष्ट्राचा ह्मणून पृथक् करता येत नाही. त्या ठेव्यावर यूरोपचा जितका हक्क आहे तितकाच हिंदुस्थानादि आशियातील राष्ट्रांचाही आहे. तो आमचाच ठेवा आहे, अशी यूरोपीयन लोक शेखी मिरवतील किंवा तो परकी ह्मणून बहिष्कृत, असे आपले लोक मानू लागतील तर दोहोंचीही मूर्खांत गणना करावी लागेल! असो.

परकीय ब्रिटिश अंमल आपल्या देशाला विघातक का झाला, तर, मुख्यत्वे करून त्याने आपल्या समाजाचा विकास खुंटविला आणि यूरोपात उद्भवलेल्या लोकशाही कल्पना आणि संस्था आपल्या देशात उत्पन्न होऊ दिल्या नाहीत. याचे विस्तृत वर्णन मागे पहिल्या प्रकरणात येऊन गेलेच आहे. पुढे तो अंमल स्थिर होऊन काहीकाळ जशाचा तसा का टिकून राहिला? याला उत्तर हेच की, आपल्या समाजात असे प्रभावी द्रव्य नव्हते की, जे जुन्या सामाजिक आणि राजकीय घटना उध्वस्त करून त्याठिकाणी नव्या सामाजिक आणि राजनैतिक घटना उभारू शकेल. पण कालांतराने अशाप्रकारचे द्रव्य हिंदी भांडवलदार वर्गाच्या रूपानें क्रमाक्रमाने उदयास येऊ लागले; आणि त्या वर्गाचे बौद्धिक प्रतिनिधी ह्मणजे हिंदी बुद्धिजीवि, यूरोपीय सामाजिक आणि राजनैतिक विचार आत्मसात् करू लागले यात त्यांची बौद्धिक गुलामगिरी कशी सिद्ध होते हेच समजणें कठीण आहे. उलट, अशा तऱ्हेच्या विचाराना मेंदूत थारा मिळणे हे पुरोगामित्वाचे लक्षण नव्हे काय? त्या विचारा-

न्वये फार तर, हिंदी बुद्धिजीवींना यूरोपातली भांडवलशाही समाजपद्धति आणि शासनपद्धति आपल्या मायभूमीत प्रचलित करावयाची होती. या पुरोगामी सामाजिक आणि राजनैतिक तत्त्वांचा मक्ता अगर ताम्रपट केवळ यूरोपीय जनतेलाच देण्यात आला होता अशांतली गोष्ट नाही. ती तत्त्वे जागतिक होत! ज्या समाजात ती आत्मीयतेने ग्रहण करण्याची पात्रता आलेली असते, तो समाज भौतिक सुधारणेच्या अमुक एका विशिष्ट अवस्थेत पदार्पण करणारा असलाच पाहिजे ! कारण, कोणत्याही समाजाला ती विशिष्ट भौतिकावस्था प्राप्त झाली असता, तीत अशा पुरोगामी मनःप्रवृत्ति स्वयंस्फूर्तीने उदयास येत असतात. तेव्हां, ज्या पाश्चात्य शिक्षणानें हिंदी समाजात विचारक्रांति घडवून आणून त्यात राष्टीय नवजीवन संचारविले, त्या पुरोगामी शिक्षणास अराष्ट्रीय अगर बाटगे ह्मणून हिणविण्यात काय पुरुषार्थ आहे ?

असो, कॉंग्रेसने जन्मास आल्याबरोबर प्रथम कोणते कार्य पार पाडले ते आता पाहू. प्रारंभी राष्ट्रीय सभेने राज्यक्रांतीचे निशाण उभारण्याचे धाडस केले नाही. तथापि पुढे उभारण्यात आलेल्या हिंदी राष्ट्रवादाच्या मंदिराचा तिने पाया घातला ही गोष्ट निःसंशय आहे. तिने केलेल्या प्रातिनिधीक सरकारच्या घोषणेने जणू काय हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्तेला एक प्रकारचे आव्हानच दिले! इतकेच नव्हे, तर त्यायोगे, हिंदुस्थान देशातील अंतिम राजसत्ता (sovereign authority) ब्रिटिश पार्लमेंटमध्ये असता कामा नये, तर ती हिंदी जनतेमध्ये असली पाहिजे हा सिद्धांत प्रस्थापित झाला. प्रातिनिधीक सरकारची मागणी ही, हिंदुस्थानच्या राजकीय इतिहासात अभूतपूर्व अशीच होती. त्या मागणीने ब्रिटिश सर्वाधिकारित्वाचा हक्क तर नाकबूल केलाच, शिवाय तिने स्वराज्याच्या नावाखाली येथील संस्थानिकांच्या अंमलाखाली मागसलेल्या सरंजामी राज्यसंस्था पुनरुद्धृत करू पाहणाऱ्या प्रतिगामी राष्ट्रवादास विरोध दर्शविला. लो. टिळकांच्या प्रतिगामी राष्ट्रवादाचे कॉंग्रेसमध्ये वर्चस्व होईपर्यंत, कॉंग्रेसचा कार्यक्रम,

ब्रिटिश छत्राखाली इंग्लंडच्या धर्तीवर नवे हिंदी राष्ट्र अगर नवा हिंदी समाज निर्माण करणे हा होता. पुढे लो. टिळकानी काँग्रेसमध्ये जे बंडाचे निशाण उभारले, त्याचा रोख विशेषेकरून सरकारपेक्षा काँग्रेसच्या जुन्या पुढाऱ्यांचे पुरोगामी तत्त्वज्ञान आणि तदनुषंगिक त्यांची राजनीति ही हाणून पाडण्याकडे होता. टिळकांचा प्रतिगामी अगर सनातनी राष्ट्रवाद (orthodox nationalism) हा सनातन हिंदु धर्म आणि संस्कृति यावर आधारलेला होता. हिंदी राष्ट्र हे फार प्राचीन असून त्याची उभारणी हिंदी लोकांच्या संस्कृतिऐक्यावर होणे अवश्य आहे; अर्थात् ते राष्ट्र स्वयंपूर्ण असेच आहे. राष्ट्रवादाचे धडे घेण्यासाठी त्याला अन्य राष्ट्रांच्या तोंडाकडे पाहण्याची गरज नाही; अशी प्रतिगामी विचारसरणी जनतेपुढे मांडून पुरोगामी राष्ट्रवादाशी झुंज देण्यास टिळकानी सुरवात केली. या प्रतिगामी राष्ट्रवादाचा स्वतंत्र समाचार या पुढील प्रकरणात घेण्यात येईल. त्यापूर्वी पुरोगामी राष्ट्रवादाचे विवेचन पूर्ण करणे भाग आहे.

अखिल हिंदी जनतेच्या हिताचा मक्ता जणू काय ईश्वरी संकेताने आपल्याकडेच आला आहे असा आविर्भाव आणून, नवोदित हिंदी भांडवलदार वर्गाने काँग्रेसच्या मागे राष्ट्रीय हे विशेषण लाविले. आरंभी, काँग्रेसमध्ये अल्पसंख्य सरकारी अधिकारी, व्यापारी, कारखानदार, पुरोगामी जमिनदार आणि बुद्धिजीवी याचाच काय तो भरणा होता. मुक्या हिंदी बहुजनसमाजाचे आपण यथायोग्य यथान्याय असे प्रतिनिधी आहोत, अशी या मंडळींची भावना होती. अधिकाराकांक्षी (Office-seeking) बुद्धिजीवींची गाऱ्हाणी ह्मणजेच जनतेची गाऱ्हाणी ह्मणून पुढे मांडण्यात आली. हिंदी भांडवलदारांच्या महत्त्वाकांक्षांना हिंदी जनतेच्या अगर राष्ट्राच्या निसर्गसिद्ध हक्काचे स्वरूप देण्यात आले. सारांश, काँग्रेसच्या द्वारे हिंदी भांडवलदार आणि बुद्धिजीवी या द्विवर्गांच्या आकांक्षा संघटितपणे व्यक्त होऊ लागल्या. हे दोन्ही वर्ग अल्पसंख्य होते हे खरे, तथापि हेच

वर्ग बौद्धिक आणि आर्थिक दृष्ट्या, हिंदुस्थान हे एक राष्ट्र आहे, आणि राष्ट्रीयत्वाचे सर्व हक्क आणि सन्मान ही हिंदुस्थानास प्राप्त झाली पाहिजेत असा सिद्धांत मांडून त्याचा जोमाने पुरस्कार करण्यास सर्वथैव पात्र होते.तेव्हा काँग्रेसचा तत्कालीन लढा हा,या दोन वर्गांना आपल्या भौतिक विकासाबद्दल जी अंत:प्रेरणा झालेली होती तिने स्फूर्त झालेला होता. असंतुष्ट झालेले हे वर्ग वास्तविक स्वहितासाठीच सरकारशी लढा चालवीत होते; पण आपल्याला सरकारविरुद्ध जनतेचा पाठिंबा मिळावा ह्मणून, राष्ट्रीय हित आणि लोकप्रतिनिधीत्व यांची भाषा ते बोलत असत. याप्रमाणे अर्वाचीन राष्ट्रवादाची उभारणी प्रमुखपणे हिंदी भांडवलशाहीच्या आर्थिक–हितसंबंधांच्या पायावर झाली आणि तिच्या उत्कर्षासाठी ब्रिटिशाकडून आर्थिक सवलती प्रात करून घ्यावा, ह्मणून जी चळवळ आरंभण्यात आली, तिला राष्ट्रीय पुनर्घटनेची चळवळ असे गोंडस नाव देण्यात आले.

राष्ट्रीय सभेच्या प्रारंभीच्या अधिवेशनात सामाजिक प्रश्नाना जे महत्त्व होते, ते हळूहळू कमी होत जाऊन अखेर राष्ट्रीय सभेची आणि समाजकारणाची ताटातूट करण्यात आली. सामाजिक प्रश्न बहुतेक सर्व हिंदू समाजाविषयी असल्यामुळे त्यांचा समावेश काँग्रेसच्या कार्यक्रमात होऊ दिल्यास मुसलमान ख्रिश्चन आदिकरून इतर हिंदी समाज बिचकतात, ह्मणून राष्ट्रीय सभेपासून समाजकारण पृथक् करावे लागले असे जरी वरपांगी कारण सांगण्यात आले, तथापि तत्कालीन काँग्रेसनेत्याना हे पक्के कळून चुकले की, जुन्या चालीरीति आणि परंपरा याना अनुकूल अशी भौतिक परिस्थिति समाजात असेपावेतो त्यांचा विध्वंस होणार नाही; जुन्या उत्पादनपद्धतीचा हिंदी समाजाचा आर्थिक पाया उखडून काढून त्या जागी भांडवलशाही यांत्रिक उत्पादनपद्धतीचा नवा पाया रचल्याशिवाय जुन्या समाजपद्धतीवर नुसती टीकेची झाडे उठवून सामाजिक आचार विचारात क्रांति घडून येणार नाही; कायदा केल्याने अगर चळवळ उठवून दिल्याने

जातिभेद नष्ट होणार नाहीत, तर अखिल देशाच्या यंत्रीकरणानेच जाति-भेदांची पाळेमुळेही उपटून निघून समाजात पुढे त्यांचा मागमूसही सापडेनासा होईल त्याचप्रमाणे परकीय अंमलाखाली शैक्षणिक सवलती मिळत नसल्यामुळे अस्पृश्योद्धाराचा प्रश्नही सुखासुखी सुटणे शक्य नाही; वैज्ञानिक शिक्षणाच्या प्रसाराशिवाय धार्मिक वेडगळ आचारविचारांच्या मगरमिठीतून हिंदी समाजाची मुक्तता होणे अशक्य; पण ते शिक्षण जनतेस दिले तर, आपल्या सत्तेला खात्रीने धोका येईल,ही भीति सरकारपुढे दत्त म्हणून उभी असते म्हणून हिंदी लोकाना अज्ञानात ठेवण्यातच सरकारला आपला फायदा वाटतो; वस्तुतः सार्वजनिक शिक्षण प्रचलित करणे हे भांडवलशाही सरकारचे प्रधान सुलक्षण असते, पण ते हिंदुस्थानांत चालू करण्यास सरकारची कुरकुर; पुरोगामी सुधारकानी आकाश पाताळ एक केले तरी लोकांचे अज्ञान घालविण्याच्या कामी त्याना म्हणण्यासारखे यश येत नाही. तेव्हा, प्रतिकूल अशा आर्थिक आणि राजकीय परिस्थितीमध्ये आपला समाजसुधारणेचा कार्यक्रम फलद्रूप होत नाही याची खात्री झाल्याकारणाने तत्कालीन काँग्रेस पुढाऱ्यानी राष्ट्रीय सभेला केवळ राजनैतिक संस्था बनविली. यापुढे तिच्या चळवळीचे कार्यक्षेत्र सरकारच्या राज्यकारभारात आणि आर्थिक धोरणात सुधारणा घडवून आणण्यासाठी खटपट करण्यापुरतेच राहिले. व अखेर हिंदी बुद्धिजीवींना अधिकाधिक अधिकारी जागा देऊन सरकारी नोकऱ्यांचे हिंदीकरण करावे आणि अभिजात हिंदी यांत्रिक उद्योगधंद्यास संरक्षण द्यावे या दोनच मुख्य मागण्या काँग्रेसच्या ठरावास अंतर्भूत झाल्या.

याप्रमाणें नवोदित हिंदी मध्यम वर्ग हा हिंदी प्रागतिक बुद्धिजीवींचे नेतृत्व पत्करून हिंदी राजकीय लढा चालवू लागला हे जरी खरे असले, तरी त्याचा तो लढा पुरेशा आर्थिक शक्तीच्या अभावी पंगुच राहिला! काँग्रेसने सुरू केलेल्या या लढ्याचे स्वरूप थोडेसे विचित्र होते. प्रथमतः

समान वर्गीयामधला हा लढा होता हे विसरता कामा नये. ह्मणजे हा लढा ब्रिटिश भांडवलशाही व दलित अशी हिंदी जनता या मधला नव्हता, तर तो हिंदी भांडवलदार वर्ग आणि ब्रिटिश भांडवलदार वर्ग या एकाच वर्गाच्या दोन शाखामधला होता. हिंदी भांडवलदार वर्ग हा आपल्या या संरक्षक जकातीबद्दलचा लढ्याला राष्ट्रीय लढा ह्मणून संबोधू लागला, तर साम्राज्यशाही(ह्मणजेच ब्रिटिश भांडवलदार वर्ग)ही हिंदी लोक कल्याणासाठी आपला राज्य करण्याचा हक्क प्रतिपादन करू लागली. एकाच वर्गाच्या दोन शाखामधला हा लढा उघडउघड विकोपास न जाण्याचे कारण त्यापैकी एक शाखा ह्मणजे ब्रिटिश भांडवलशाही ही अत्यंत प्रबळ ह्मणजे जगाच्या एक चतुर्थांश भागावर साम्राज्यसत्ता गाजविणारी होती, तर दुसरी शाखा ह्मणजे हिंदी भांडवलशाही ही आपल्या आर्थिक विकासाच्या अर्भकावस्थेत कुचमत पडलेली होती. शिवाय तिचे हिंदी जनतेचे नेतृत्व केवळ कागदावर ह्मणजे सिद्धान्तात्मकच (theoretical) होते. त्या नेतृत्वाला व्यवहारात वाव नव्हती हिंदी बहुजनसमाजाचा पाठिंबा नव्हता. या हिंदी भांडवलदार वर्गाची दृष्टि आपल्या हितसंबंधापलीकडे नसल्या कारणाने त्याला बहुजनसमाजाशी समरस होऊन त्यात राष्ट्रीय जागृति निर्माण करता आली नाही; आणि लोकशक्तीचे पाठबळ आपल्या चळवळीस प्राप्त करून घेणे जुळले नाही. ह्मणून त्या वर्गाची चळवळ त्रिशंकू-प्रमाणें अधांतरी राहिली. तिची मजल सनदेशीरपणापलीकडे जाऊ शकली नाही.

हिंदी बुद्धिजीवि आणि सत्ताधीश मध्यम वर्गाच्या आकांक्षा झाल्या तरी, ब्रिटिशांची राजकीय तत्त्वे ब्रिटिशांच्याच गळी बांधण्याचा हा हिंदी प्रागतिकांचा प्रयत्न होता. पण तो प्रयत्न फलप्रद होईना. व १९ व्या शतकाच्या अखेरच्या दशकात ब्रिटिश ' उदार ' राजनीतीवरील कॉंग्रेसचा विश्वास उडू लागला. कॉंग्रेस धुरीणाची खात्री झाली की,

हिंदी धंद्याची वाढ ब्रिटिश धंद्यावर गदा आणील या भीतीने ब्रिटिश सरकार हिंदी धंद्यास संरक्षण देत नाही, आणि कॉंग्रेसच्या मागण्या परिपूर्ण होत नाहीत. हा ब्रिटिशांचा स्वार्थी हेतू उघडकीस आणण्याचे कार्य करून पुरोगामी राष्ट्रवाद मागे पडला. या राष्ट्रवादाच्या चळवळीची मर्यादा न्याय्य आणि सनदशीर मार्गांनी पार्लमेंटरी पद्धतीची लोकसत्ता या देशात निर्माण करण्यास झटणे या पलीकडे गेली नाहीं, तथापि हिंदी स्वातंत्र्याच्या चळवळीचा सिद्धान्तात्मक पाया त्या राष्ट्रवादाने घातला हें नाकबूल करता येणार नाही.

सारांश, हा पुरोगामी राष्ट्रवाद धेडगुजरी होता. त्यात यूरोपियन भांडवलशाही राष्ट्रवादाचे ओज आणि स्वतंत्रप्रतिभा ही आढळून येत नाहीत. त्याचप्रमाणे हिंदी प्रतिगामी राष्ट्रवादामधील बंडखोरीचा जोमही त्यात दृग्गोचर होत नाही.म्हणूनच रानडेप्रभृति प्रागतिक बुद्धिजीवी आणि त्यांचे राजकीय वंशज याना नेमस्त मवाळ किंबहुना नेभळट ह्मणण्याची प्रथा पडलेली आहे. या हिंदी प्रागतिकांच्या कमकुवत मन:प्रवृत्तीबद्दल त्याना व्यक्तिश: दोष देता येत नाहीं. ते ब्रिटीशकृपाछत्राखाली वाढलेल्या अशा दुबळ्या परतंत्र हिंदी भांडवलशाहीचे बौद्धिक प्रतिनिधी होते. आणि हिंदी भांडवलदार वर्गाची दुबळी मनोवृत्ति आणि नेभळट वर्तन ही हिंदी प्रागतिकांच्या विचारसरणीत आणि कृतीत पूर्णपणे प्रतिबिंबीत झालेली होती! वास्तविक येथेच पुरोगामी राष्ट्रवादाचे विवेचन संपते. यापुढे पुरोगामी राष्ट्रवादास हाणून पाडू इच्छिणाऱ्या प्रतिक्रियात्मक प्रतिगामी राष्ट्रवादाची छाननी करण्यास प्रारंभ करणे भाग होते. पण ते स्वतंत्रपणे पुढील प्रकरणी करण्यापूर्वी ज्या एका बाणेदार व्यक्तीने नवोदित यूरोपीय भांडवलशाहीचे सामाजिक तत्त्वज्ञान गेल्या शतकात मराठी भाषेतून महाराष्ट्रास सादर केले, त्या व्यक्तीच्या ओजस्वी विचारांचा या ग्रंथात ऊहापोह न केल्याने त्यात कायमची उणीव राहणार

आहे. ती व्यक्ति ह्मणजे प्रिन्सिपॉल गोपाळ गणेश आगरकर ही होय. आगरकरांच्या विचारसरणीत रानडे गोखल्यांचा कुमकुवतपणा व समन्वयवृत्ति यांचा संपूर्ण अभावच आढळून येतो! आगरकर हे यूरोपीय भांडवलशाहीचे अस्सल असे हिंदी प्रतिनिधी होते. सामाजिक क्रांति हे त्यांचे ध्येय असून समाजात आमूलाग्र विचारक्रांति घडून आल्याशिवाय राज्यक्रांति व समाजक्रांति ही घडून येणे शक्य नाही असा त्यांचा ठाम निश्चय होता. त्यानी महाराष्ट्रात केलेल्या कार्याची तुलना फ्रान्स देशात रुसो–व्हाल्टेरनी केलेल्या कार्याशीच तेवढी करता येईल. त्यांच्या विचारसरणीचा कल पुरोगामी राष्ट्रवादापेक्षा क्रांतिवादाकडे जास्त झुकतो. आपल्या मागसलेल्या समाजाची त्याचप्रमाणे सरकारचीही त्यानी केव्हांच कदर बाळगली नाहीं. ह्मणून त्यांचे राजकारण समाजकारणाइतकेच जहाल होते, असे गौरवाने प्रतिपादिले जाते. त्यांच्या लेखणीमध्यें नवोदित यूरोपीय भांडवलशाही विचारवंतांचा (rising European bourgeois thinkers) जोम मुसमुसत होता.

तेव्हा, प्रि. आगरकरांनी केलेला हिंदी समाजाच्या वस्तुस्थितीचे मूलग्राही निदान, त्यावर त्यानी सुचविलेले जालिम उपाय इत्यादि त्यांच्याच अधिकारवाणीत देणे योग्य होय. हिंदी समाजजीवनाविषयी प्रि. आगरकर ह्मणतातः—" इंग्रजी होईपर्यंत आमचें सर्व व्यक्तिजीवित्व व राष्ट्रजीवित्व, ठशांत घालून ओतलेल्या पोलादासारखें किंवा निबिड श्रृंखलाबद्ध बंदिवानासारखें, अथवा उदकाच्या नित्य आघातानें दगडाप्रमाणे कठिण झालेल्या लाकडासारखें किंवा हाडकासारखें शेकडों वर्षें होऊन राहिलें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. "

" मूळ आर्यशाखा येथे येऊन तिच्यापासून जे झाड येथे लागले, तेच आजमितीपर्यंत अस्तित्वात आहे. ग्रीक, शिथियन, तार्तर, मोंगल, अफगाण वगैरे लोकांच्या ज्या वावटळी त्यावर आल्या, त्यामुळे त्याला

बराच त्रास झाला. कधीं त्याच्या कांहीं फांद्या मोडून पडल्या; कधी ते मुळापासून उपटून पडत आहे कीं काय असे वाटले; हें जरठ झाड कसे तरी अजून उभे आहे! पण त्यांत कांही त्राण उरलेले नाही! ते आंतून अगदीं शुष्क होत आले आहे व त्याचे खोड व फांद्या डळमळूं लागल्या आहेत. याला आता असेच उभे ठेवण्यास व यापासून नवीन शाखांचा उद्भव होऊन यास फिरून नवीनावस्था आणण्यास एकच उपाय आहे. तो कोणता ह्मणाल तर, त्याची खूप खच्ची करून त्यास अर्वाचीन कल्पनांचे भरपूर पाणी द्यावयाचे! त्यापासून नूतन शाखावृत वृक्ष अस्तित्वांत येईल, पण तसे न केले तर त्यावर प्रस्तुतकालीं चोहोकडून जे तीव्र आघात होत आहेत,त्याखाली ते अगदी जेर होऊन अखेरीस जमिनीवर उलथून पडेल... येथे येवढेंच सांगितले पाहिजे कीं, या पाश्चिमात्य नवीन शिक्षणाचा व त्याबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत, त्यांचा आह्मी योग्यरीतीनें अंगीकार करीत गेलो, तरच आमचा निभाव लागणार आहे. त्यांचे अभिनंदन करून त्यांचा आपण अंगीकार केला पाहिजे असे जे आह्मी ह्मणतो हे अशासाठीं कीं त्या शिक्षणात व त्या कल्पनांत मनुष्य सुधारणेच्या अत्यवश्य तत्वाचा समावेश झाला आहे. ह्मणून (ज्या) लोकांस लयास जावयाचे नसेल त्यांनी त्यांचे अवलंब केलेंच पाहिजे, त्याशियाय गत्यंतर नाहीं ज्या तत्वाचे अवलंबन केल्यामुळें इतर राष्ट्रें अधिकाधिक सुधारत चालली आहेत,त्या तत्त्वाचा स्वीकार करण्यास आह्मी आनंदाने तयार झालें पाहिजे."

"ज्या दुर्मतांनी, दुराग्रहानी व दुराचारानी महारोगाप्रमाणे या देशाच्या बुद्धीचा, नीतीचा व शरीर सामर्थ्याचा हजारो वर्षे फडशा चालविला आहे, त्यांचे यथाशक्ति निर्मूलन करण्याचा प्रयत्न करणे अत्यंत उचित होय."

ते निर्मूलन बुद्धिवादाची कुऱ्हाडच करू शकेल हे जाणून अगरकरानी "अंधश्रद्धेचा युग सरो, बुद्धिवादाचा विजय असो" हा बेक-

नचा प्रख्यात मंत्र महाराष्ट्र जनतेस दिला. आपल्या समाजातील धर्माचे सिंहासन आधिभौतिक शास्त्रानी बळकाविले पाहिजे; धार्मिक अंधश्रद्धेच्या स्थानी बुद्धिवादाची प्राणप्रतिष्ठा केली पाहिजे; सचेतन व अचेतन सृष्टीचा दास मी नाही तर तिला दास करण्याचा हक्क मला आहे असा विचार प्रत्येक हिंदी सुशिक्षिताच्या डोक्यात ओकावू लागल्याशिवाय हिंदी समाज प्रगतिपथारूढ होणार नाहीं अशी आगरकरांची क्रांतिवादी शिकवण होती. पाश्चात्य भांडवलशाही विचारवंतानी उध्दृत केलेल्या व्यक्तिस्वातंत्र्य, अधिकतमांचे अधिकतम सुख, समता, बंधुभाव, लोकशाही इत्यादि कल्पना त्यांनी आपल्या समाजास सादर केल्या. किंबहुना वर्गकलहाचे समर्थन, संपत्तीची समान वाटणी इत्यादि मार्क्सपूर्वकालीन फ्रेंच समाजवाद्यांच्या विचारांचा मनमुराद ऊहापोह सुद्धा आगरकरांच्या लिखाणात सापडतो.

प्रि. आगरकर हे केवळ व्यक्तिस्वातंत्र्यवादी होते, त्याना समाजसत्तावाद पसंत नव्हता असे जे आगरकरांचे चरित्रकार प्रो. आळतेकर ह्मणतात ते सत्यास धरून नाही. आता आगरकरांच्या लिखाणात मार्क्स किंवा मार्क्सवाद यांचा उल्लेख नाही हे खरे! याला कारण मार्क्सचे विचार रशियन क्रांति होईपावेतो हिंदुस्थानात अवतीर्ण झाले नव्हते! तथापि त्यांच्या विचारसरणीचा कल समाजसत्तावादाकडे होता हे त्यांच्या खालील विचारावरून स्पष्ट होते:—

“ हिंदुस्थानांतील एकूण एक प्रौढ स्त्रीपुरुषास लिहिता वाचता आले पाहिजे; तसेच प्रत्येक व्यक्तीस चरितार्थ चालविण्यासारखा एखादा तरी धंदा येत असला पाहिजे. सारांश, वयात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस उदरनिर्वाहासाठी दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याची पाळी येऊ नये. इतकेंच नाही तर सहजगत्या उदरपोषण करता येऊन दिवसाचा काही काळ आवडत्या शास्त्राच्या अभ्यासाकडे, मनास रुचेल ती करमणूक करण्याकडे किंवा

विश्रांतीकडे लावता आला पाहिजे. या सर्व गोष्टी घडून येण्यास किती शतके लागतील हे सांगता येत नाहीं. ”

या अवतरणावरून आगरकरांना समाजसत्तावादाची अंधुक कल्पना होती, इतकेंच नव्हे, तर तिला मूर्त स्वरूप मिळावे अशी त्यांची इच्छाही पण होती हे स्पष्ट होतें. व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि विकास याना ज्या समाज व्यवस्थेत भरपूर वाव नाही, तिला खरी समाजवादी समाजव्यवस्थाच ह्मणता येणार नाहीं, हे प्रो. आळतेकराना माहित नाहीसे दिसते. सारांश, आगरकरांची मतप्रणाली विज्ञानशुद्ध बुद्धिवादावर अधिष्ठित होती ह्मणूनच तिची मजल क्रांतिवादापर्यंत जाऊ शकली. असो, आता प्रतिगामी राष्ट्रवादाकडे वळू.

प्रतिगामी राष्ट्रवाद : : ५

" या देशात ज्या विद्येचा पाय शिरला आहे, ती आमच्या राज्य विषयक विचाराप्रमाणे आमच्या धार्मिक व सामाजिक विचारांतही प्रचंड क्रांति करणार आणि तदनुसार आमचे आचरण बदलत जाणार...... आमच्या अर्वाचीन विचारांस ज्या धार्मिक व सामाजिक गोष्टी अप्रशस्त वाटू लागल्या आहेत, त्यास शेकडो मनूंचे व सहस्रावधि पाराशरांचे आधार दाखविलेत, व त्यांचा प्रसार न व्हावा ह्मणून त्यांच्या मार्गांत कोट्यावधि लोकांचा मूर्खपणा, वृथा धर्माभिमान आणि उठावणीचे आरडे आणून घातलेत तरी ज्या प्रमाणें पर्वताच्या माथ्यावरील सरोवराच्या भिंती फोडून तुफान वेगानें कड्यावरून पडू लागलेल्या वारिवाहाची गति कुंठित करण्यास कोणीहि धजत नाहीं, त्याप्रमाणे आमच्या मूर्खपणाच्या सामाजिक व धार्मिक समजुतीस लागलेला वणवा कोट्यावधि अजागळ कीटकांच्या क्षुद्र पक्षवातानें किंवा मोठ्या किड्यांच्या शुष्क श्वासवातानें विझण्याचा मुळींच संभव नाहीं. "

प्रि. आगरकर.

पुरोगामी राष्ट्रवादाचा अंमल काँग्रेसमध्ये सामान्यतः १८८५ पासून १९०५ पर्यंत असा वीस वर्षे होता. पण या कालवधीत तो अव्याहतपणे चालू होता असे मात्र ह्मणता येणार नाही. काँग्रेसच्या आरंभ काळातच विरोधी प्रतिगामी राष्ट्रवादाची बीजे दृग्गोचर होऊ लागली होती. किंब-हुना १८९५ मध्ये पुण्यास काँग्रेसचे अधिवेशन भरण्याच्या वेळेस राष्ट्र-सभेच्या मंडपात सामाजिक परिषद् भरविल्यास मंडप जाळण्यात येईल, असा धाक तत्कालीन काँग्रेस धुरीणाना प्रतिगामी राष्ट्रवाद्यानी घातला

होता असा विश्वसनीय प्रवाद प्रचलित आहे. १८९१ मध्ये संमतिवयाचें बिल मध्यवर्ति मंडळात आल्यावेळीं या दोन्ही राष्ट्रवाद्यामध्ये जी रणे माजली त्यास हिंदुस्थानच्या इतिहासात तोड नाही ! विवाहास संमति देण्याच्या वेळी मुलीचे वय दहाऐवजी बारा असावे असा त्या बिलाचा आशय होता. वास्तविक यात वावगे असे काय होते ? बालविवाहाचे दुष्परिणाम लक्षात घेऊन त्यास कायद्याने थोडेसे नियंत्रण घालण्याचा सरकारचा हेतु होता. पण एवढेसुद्धा प्रतिगामी राष्ट्रवाद्याना खपले नाही ! रानडे, तेलंग, भांडारकरादि पुरोगामी राष्ट्रवाद्याना मात्र ही सुधारणा अत्यवश्य वाटली. ह्मणून त्यानी शास्त्राधारासह असे सिद्ध केले कीं कायद्याने जी वयाची अट घालण्याचे घाटत होते त्यापेक्षा अधिक वयाची अट शास्त्रासंमत आहे. पण अशा सुधारणेलाही प्रतिगामी राष्ट्रवादाचे प्रणेते टिळक यानी सरकारने सामाजिक बाबतीत हात घालता कामा नये अशा सबबीवर विरोध केला. इतक्यावर लो. टिळक थांबले नाहीत; तर पुण्याच्या सनातनी मंडळींची, राष्ट्रीय सभेच्या मंडपात सामाजिक परिषद् भरवू न देण्याबद्दलची कैफियत काँग्रेस चालकाना सादर करण्यासही ते पुढे सरसावले ! या चळवळीचे पर्यवसान अखेर मंडप जाळण्याची धमकी देण्यात झाले; आणि राष्ट्रीय सभेची आणि सामाजिक परिषदेची ताटातूट करणे भाग पडले. वर प्रि. आगरकरांचे जे अवतरण दिलेले आहे ते, राजकीय सुधारणा आणि राष्ट्रसभा तेवढीच पाहिजेत सामाजिक सुधारणा आणि सामाजिक परिषद् नकोत असा आकांड तांडव करणाऱ्या टिळकप्रभृति प्रतिगामी राष्ट्रवाद्यास उद्देशून होते.

लो. टिळक हे हिंदी राजनैतिक नभोवितानावर जे पहिल्या प्रथम चमकूं लागले, ते, काँग्रेस धुरीणांच्या ' अराष्ट्रीय देशाभिमानाचे ' विरोधक आणि प्रतिगामी राष्ट्रवादाचे ह्मणजेच सनातनी विचारसरणीचे अर्ध्यू या नात्यानेच ! राष्ट्रीय धर्म आणि संस्कृति यांचे संरक्षण करण्यासाठी जनतेची

संघटना करण्याची भूमिका त्यानी पत्करली. तत्कालीन काँग्रेसचा विकासात्मक राष्ट्रवाद राष्ट्रीय जीवन विघटित करतो या भावनेने 'स्वयंपूर्ण राष्ट्रवादा' चा नवा सिद्धांत उध्दृत करून तो त्यानी जनतेपुढे मांडला. त्यांच्या स्वयंपूर्ण अगर प्रतिगामी राष्ट्रवादाचा अर्थ हाच की, आमची **प्राचीन वैभव आणि परंपरा ही अत्युच्च दर्जाची आहेत, त्या राष्ट्रीय परंपरेचे ह्मणजे सनातन धर्म, आर्य संस्कृति, अनादिकालापासून चालत आलेले आचार विचार, मोक्षप्राप्तीसाठी इह लोकीची यात्रा कष्टमय करण्याबद्दलची हिंदी मनःप्रवृत्ति इत्यादींचे जतन करणे अत्यवश्य आहे, अर्थात् स्वराज्याशिवाय प्राचीन परंपरेचे संरक्षण आणि प्राचीन वैभवाची पुनरावृत्ति ही अशक्य आहेत, एतदर्थ हिंदुस्थानास स्वातंत्र्य हवे!**

हा प्रतिगामी राष्ट्रवाद वरवर दिसायला क्रांतिकारी दिसतो, कारण परकीय सत्तेपुढे केव्हाही मान न वाकविता तिला आव्हान देणे हे त्या राष्ट्रवादाचे ब्रीद आहे. परंतु त्याच्या राजकीय आणि सामाजिक ध्येयांच्या दृष्टीने विचार केला असता राष्ट्रीय चळवळीचा हा टिळकप्रणीत अवतार पुरोगामी राष्ट्रवादापेक्षा कमी क्रांतिकारी किंबहुना प्रतिगामीच आहे! कारण 'स्वयंपूर्ण राष्ट्रवाद' आपल्या सनातन सामाजिक वस्तुस्थितीमध्येंच स्वयंतृप्त असतो. त्याला यूरोपीय संस्कृतीचे वावडे असते. त्याचा अंमल प्रचलित करता आला तर आपला समाज आणखी ३००–४०० वर्षे मागे खेचला जाईल यात शंका नाहीं. असे होत असेल तर मग स्वराज्य संपादन करून तरी काय फायदा? या प्रतिगामी विचारसरणीतूनच दहशतवादाचा (Terrorism) उगम झाला. आपले प्राचीन वैभव आणि परंपरा परत कशी आणवावी या विचारानी तरुणांची डोकी भंडावून गेली. त्यासाठी सशस्त्र बंडाचा उठाव करण्याच्या तयारीस काही युवक लागले. याचा सविस्तर विचार पुढे क्रमवार करू. त्यापूर्वी प्रतिगामी राष्ट्रवादाच्या स्वरूपाचा सांगोपांग ऊहापोह करणे जरूर आहे.

काँग्रेस पुढाऱ्यांच्या नेमळट राजकारणाविरुद्ध प्रतिगामी राष्ट्रवादाने बंड उभारले हे तर खरेच ! पण यावरून त्या वादाचे स्वरूप स्पष्ट होत नाही. बाह्यात्कारी प्रतिगामी राष्ट्रवादाची चळवळ क्रांतिवादी वाटत असली तरी, खरी वस्तुस्थिति तशी नाही. ही नवी चळवळ ह्मणजे रानडे, तेलंग, गोखले, मेहता इत्यादि काँग्रेसनेत्यांच्या सामाजिक क्रांतिवादाविरुद्ध पुराणप्रिय विचारसरणीचे बंड होय. या बंडाचे पुढारीपण लो. टिळकानी पत्करले हे वर अनेक वेळा विदित झालेले आहेच. वस्तुतः लो. टिळक हे 'अराष्ट्रीय' पाश्चात्य शिक्षणपद्धतीनुसार शिक्षण घेतलेले असे तरुण बुद्धिजीवि होते. सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील एक उत्साही कार्यकर्ते या नात्याने लो. टिळकानी आगरकराबरोबर आपल्या सार्वजनिक जीवनास प्रारंभ केला. आगरकराप्रमाणे मिल्ल–स्पेन्सर प्रभृति भौतिकवाद्यांचे ते चहाते होते. १८८५ च्या सुमारास झालेल्या डेक्कन कॉलेजच्या संमेलन-प्रसंगी मिल्ल स्पेन्सरच्या विचारसरणीवर टीका करणाऱ्या न्या. रानड्यांचा त्यानी आगरकराप्रमाणेच खरपूस समाचार घेतला होता.पण१८९०नंतर लो. टिळकानी आपली 'पगडी फिरविली' आणि सनातन्यांचा सतत कैवार घेण्यास प्रारंभ करून समाजसुधारणेला या नाहीतर त्या नावाखाली एकसारखा विरोध करण्यास सुरवात केली. याच सुमारास स्वामी विवेकानंद उदयास आले. हिंदुधर्माचे मूलभूत सिद्धान्त स्वच्छ व शुद्ध पाण्यासारखे आहेत; त्यावर वेडगळ धार्मिक आचार विचार आणि सामाजिक चालीरीति यांचे माजलेले शेवाळ दूर सारले ह्मणजे झाले, असे विवेकानंद जोमाने प्रतिपादन करू लागले. हिंदु धर्माच्या शुद्धीकरणार्थ रामकृष्ण मिशन संस्थासुद्धा त्यानी स्थापन केली. हिंदुधर्माची शिकवण आणि आधुनिक यूरोपीय विचारसरणी यांचा समन्वय घडवून आणून हिंदुधर्मास उजळा देण्याचा हा प्रयत्न होता. हिंदुधर्मातिल अध्यात्मवाद हा जगाला सुख शांति देणार; तेव्हा मागे वेद उपनिषदांच्या 'सुवर्ण' युगाकडे नजर फिरवून मिळालेल्या

स्फूर्तिप्रसादाने हिंदी राष्ट्राची उद्धार आणि प्रगति ही घडवून आणा अशी विवेकनंदांची शिकवण होती. लो. टिळकांनीही अध्यात्मवादाचा उदो उदो केलाच; शिवाय चंद्रगुप्त, अशोक, शिवाजी, हर्ष, चालुक्य, विजयनगर इत्यादि कालाकडे हिंदुस्थानचे लक्ष वेधून पुढील प्रगतीसाठी प्राचीन हिंदी भौतिक उत्कर्षापासून स्फूर्ति मिळवून घेण्याचा जनतेस उपदेश केला.सारांश स्वामी विवेकानंद काय, अगर लो.टिळक काय,या दोन्ही सुप्रसिद्ध व्यक्तींची दृष्टि प्रतिगामीच! पुरोगामी राष्ट्रवादाशी या टिळकप्रणीत प्रतिगामी राष्ट्रवादाचा अतिनिकराचा झगडा होऊन अखेर उत्तरोक्त राष्ट्रवादच काँग्रेसमध्ये विजयी झाला. ही हकीकत यापुढे यावयाची आहे. पण प्रतिगामी शक्तीचा वर्चष्मा कसा झाला ? त्याला कोणती भौतिक परिस्थिति कारणीभूत झाली ?

काँग्रेस पुढाऱ्यांच्या पुरोगामी सामाजिक मतामुळे तिचे कार्यक्षेत्र केवळ संपन्न सुशिक्षित आणि पुरोगामी भांडवलदार अशा मूठभर मंडळीपुरतेच मर्यादित राहिले होते ! बहुसंख्य जनता काँग्रेसच्या वजनकक्षेबाहेरच होती ! काँग्रेसवाल्यांच्या राजकीय आकांक्षा आणि सामाजिक पुरोगामित्व यांचे दरसाल तुणतुणे वाजल्याचा बहुजनसमाजाच्या भौतिक आणि सांस्कृतिक वस्तुस्थितीत बदल घडून येण्यास काहीच उपयोग झाला नाहीं. अशा परिस्थितीत काँग्रेसला बहुजनसमाजाचा पाठिंबा मिळणे शक्य नव्हतें. कनिष्ठ मध्यम वर्गात एकसारखी बेकारी वाढत होती. त्यामुळें तरुणात असंतोषाचे वारे सारखे पसरत होते. असंतुष्ट युवकाना काँग्रेस कार्यक्रमाचे दूरदर्शित्व पटेना. विश्वविद्यालयाच्या पदवीधराना नोकऱ्यांचा हमरस्ता बंद झाला. त्यामुळें त्यांच्यापुढे स्वतःच्या भवितव्याबद्दलचा काळाकुट्ट अंधार पसरू लागला. उत्कर्षाचे किंबहुना सन्मानाचेसुद्धा जिणे कंठणे कठीण होऊन बसले. नवे शिक्षण आणि आधुनिक नागरी वातावरण यामुळे तरुण मंडळीत अभिनव कल्पना आणि आकांक्षा यांचा संचार होऊ लागला.

या आर्थिक झगड्यात बहुसंख्य युवक नामोहरम झाले. त्यांचा सांस्कृतिक अधःपात होऊ लागला. कसेबसे उदरंभरण आणि कुटुंबपोषण करण्यापलिकडे देशातील राजकारणाकडे किंवा समाजकारणाकडे त्यांचे लक्ष वेधले जाईना ! अशा या कनिष्ठ मध्यम वर्गातूनच बेफाम वृत्तीचे बंडखोर निर्माण होऊ लागले. 'धीरे गाडी हाक रे' ह्मणणारी कॉंग्रेस मुळमुळीत चर्चा आणि ठराव करून या तरुणांची बंडखोरी वृत्ति शमवू शकेना. त्याना तात्कालिक आणि मूलग्राही बदल हवा होता. ह्मणून त्यानी दहशतवादाची कास धरली ! त्यांची दहशतवादाची ती चळवळही अखेर निष्फळ ठरली.

कॉंग्रेसच्या कार्यक्रमात कनिष्ठ मध्यम वर्गीयांच्या हितसंबंधाना मुळीच स्थान नव्हते. कारण तो कार्यक्रम वर वर्णिल्याप्रमाणे सुसंपन्न बुद्धिजीवि व हिंदी भांडवलदार यांच्या हितसंबंधाविषयीचा होता. तेव्हा अशा कॉंग्रेसला पुळपुळीत, मवाळ अशा विशेषणांचा अहेर कनिष्ठ मध्यम वर्गाने बहाल केला असल्यास नवल नाही ! पण काही झाले तरी, हिंदुस्थानच्या आर्थिक हलाखीस ब्रिटिश पिळणूक ही कारणीभूत आहे अशी शिकवण कॉंग्रेसनेत्यानी हिंदी जनतेस पढविली ही गोष्ट निर्विवाद आहे. असंतुष्ट युवकाना ही शिकवण पटली तरी अर्ज विनंत्या करण्याचे कॉंग्रेसमवाळांचे मार्ग त्याना बिलकूल पसंत नव्हते. त्या मार्गाविरुद्ध कनिष्ठ मध्यम वर्गीय युवकानी बंड पुकारले. पृथ्वीवर कारखानदारी युग अवतीर्ण झाले असता हिंदुस्थान देश हा जुलुमाने कृषिजीवनावस्थेत डांबून ठेवला गेल्याने त्याला दरिद्रावस्था प्राप्त झाली आहे हा बुद्धिवादप्रणीत आर्थिक सिद्धांत युवकांच्या डोक्यात काहीच प्रकाश पाडू शकेना ! लोकशाही, राष्ट्रवाद इत्यादींचा देशात अंमल प्रचलित होण्यास तद्गत समाज विशिष्ट आर्थिक विकासावस्थेप्रत पोचावा लागतो, ह्मणजे त्यात कारखानदारी आणि तिचा चालक भांडवलदार वर्ग ही अस्तित्वात यावी लागतात. या समाजविकास

नियमाकडे युवकांचे लक्ष गेले नाही, व ते लो. टिळकांच्या प्रतिगामी पण मोहक विचारसरणीस बळी पडले. "आह्माला संपूर्ण स्वराज्य पाहिजे, हप्त्याहप्त्याने दिल्या जाणाऱ्या राजकीय सुधारणा नकोत, मवाळांचा भिक्षांदेही मार्ग निरर्थक आहे; हिंदुस्थान देशचे राष्ट्रीयत्व स्वयंसिद्ध आहे, तो स्वराज्यास पूर्णपणे पात्र आहे, त्याचे स्वतंत्र राष्ट्र बनण्यास अमुक तऱ्हेचा आर्थिक विकास घडून येण्याची गरज नाही. मवाळांचे राजकारण उधळून लावले पाहिजे." इत्यादि विचारप्रणालीचा हल्ला लो. टिळकानी ज्यावेळीं कॉंग्रेस पुढाऱ्यावर चढविला, त्यावेळी कनिष्ठ मध्यम वर्गातील असंतुष्ट आणि बंडखोर तरुण त्यांच्याभोवती उत्साहाने गोळा झाले; आणि 'टिळक महाराज की जय' या गर्जनेने त्यानी आकाश दुमदुमून सोडलें!

परंतु लो. टिळकांचा हा राष्ट्रवाद इतिहासाकडे डोळेझाक करणारा होता! तो आर्थिक पायावर आधारलेला नव्हता, त्याची प्रतिष्ठापना आत्मप्रतिष्ठेच्या भावनेवर केलेली होती. सामाजिक विकासक्रमाच्या मागसलेल्या अवस्थेत असलेल्या जनतेमधून राष्ट्र बनविण्याचे कार्य सर्वसामान्यतः मातबर मध्यम वर्ग करीत असतो असा इतिहासाचा दाखला आहे. हा नवोदित मध्यम वर्ग एकतंत्री सरंजामी राजसत्ता धुळीस मिळवून भांडवलशाही लोकसत्ता प्रस्थापित करतो. हिंदुस्थानात तर, सरंजामी राजसत्ता उलथून पाडण्याचे ऐतिहासिक कार्य ब्रिटिश साम्राज्यशाहीने अगोदरच करून ठेविले होते; परंतु साम्राज्यशाही ही हिंदी जनतेला जुन्या जीर्ण सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेतून वर तोंड काढू देईना. वास्तविक, जुन्या सामाजिक आणि आर्थिक संस्था या कारखानदारीमुळेच उध्वस्त होऊ शकतात; आणि कारखानदारीने अख्खा देश व्यापिला जाण्यास भांडवलदार वर्गास समाजात वर्चस्व प्राप्त व्हावे लागते. अशा भांडवलदार वर्गाचा देशात उत्कर्ष होऊन सर्वास देशभर कारखानदारी व्हावी ह्मणून धडपड करणारा कॉंग्रेसनेत्यांचा राष्ट्रवाद पुरोगामी किंबहुना (देशाच्या आर्थिक विकास

दृष्ट्या) क्रांतिकारी होता असे ह्मणण्यास हरकत नाही ! परंतु टिळकांचा राष्ट्रवाद हा या उपर्युक्त समाजविकास नियमाकडे दुर्लक्ष करणारा असा आर्थिक बिनबुडाचा, देशाच्या आर्थिक कोंडमाऱ्यास सहाय्य करणारा आणि भूतकालीन " वैभवा " कडे बोट दाखवून राष्ट्रास मागे खेचणारा ह्मणजेच प्रतिगामी स्वरूपाचा होता ! प्रतिगामी राष्ट्रवादाचे अध्वर्यू एकटे लो. टिळकच होते अशातला भाग नाही, तर वीसाव्या शतकारंभी टिळकाना बंगालचे पाल आणि अरविंद बाबू आणि पंजाबचे लाला लजपतराय हे येऊन मिळाले. ही सर्व मंडळी प्रतिगामी राष्ट्रवादाचे राजनैतिक पुढारी आणि प्रणेते होत. पण या राष्ट्रवादाच्या मूलभूत तत्त्वज्ञानाची भूमिका १९ व्या शतकाच्या शेवटीच नरेन्द्रनाथ दत्त ह्मणजे स्वामी विवेकानंद यानी तयार केली होती.

महाराष्ट्रात विष्णुशास्त्री चिपळूणकर यानी रानडे लोकहितवादी प्रभृति पुरोगामी विचारसरणीच्या सामाजिक पुढाऱ्यांची रेवडी उडविण्याचा खटाटोप १८७४ पासून 'निबंधमाले' च्या द्वारे चालवून आपल्या भोवती. सनातनी आणि शास्त्री मंडळी गोळा केली होती. चिपळूणकरांची विचार-सरणी ही कीं 'आपले राष्ट्र स्वयंपूर्ण पराक्रमी आहे, त्याची नाडी साफ चालत असून त्याला कोणताही विकार जडलेला नाही. 'नीचैर्गच्छत्युपरिच दशा चक्रनेमिक्रमेण' या कालनियमाने आपला देशाला अवनत दशा प्राप्त झाली आहे. ब्रिटिशांचे राज्य हा सुद्धा एक कालचक्राच फेरा आहे. त्यातून मुक्त झालो ह्मणजे आपल्या देशाला पूर्वीचे वैभव प्राप्त होईल.' याच विचारसरणीतून पुढे लो. टिळकानी राजकीय तत्त्वज्ञान निर्माण करून तिची काँग्रेसमध्ये आणि अन्यत्र संघटना करून रानडे गोखले मेहता आदिकरून पुरोगामी राष्ट्रवाद्यास शह देण्याचा प्रयत्न चालविला. महाराष्ट्रांत पुरोगामित्वाची लाट जशी जोराची त्याचप्रमाणे प्रतिगामित्वाची प्रतिक्रिया हीही जोराची होती.

बंगाल पंजाबातील प्रतिगामी विचारसरणीचे स्वरूप थोडेसे निराळे होते. तेथे जुन्या नव्याचा मेळ घालण्याचा प्रयत्न चालला होता. हिंदु-धर्मातील वेडगळ आचारविचार आणि हिंदुसमाजातील खुळचट चालीरीति या, पंजाब बंगाल्यातील प्रतिगामी राष्ट्रवाद्याना पटेनात म्हणून हिंदुधर्माचे शुद्ध स्वरूप व्यक्त व स्पष्ट करण्यासाठी पंजाबात आर्यसमाज आणि बंगालमध्ये रामकृष्ण मिशन स्थापन करण्यात आले. टिळक चिपळूणकर पंथाप्रमाणे पंजाब बंगाल्यातील प्रतिगामी पंथानी सनातन्यांची व शास्त्री मंडळींची तळी उचलून धरली नाही. धर्मशुद्धि आणि समाजसुधारणा याबद्दल त्यांचे धोरण महाराष्ट्रातील टिळकपंथापेक्षा किती तरी उदार होते. तदनुसार त्यांचे जारीचे प्रयत्न ही आपापल्या प्रांतात चालू होते.

१९ व्या शतकाच्या शेवटच्या दशकात मूलभूत हिंदुधर्मतत्त्वांचे 'जागतिक महत्त्व' प्रस्थापित करण्यासाठी दोन तेजस्वी व्यक्ती पुढे सरसावल्या. त्या म्हणजे बंगाली स्वामी विवेकानंद आणि पंजाबी स्वामी रामतीर्थ होते. त्यानी पाश्चात्य देशात विशेषतः अमेरिकेत हिंदुधर्माचा विश्वधर्म म्हणून प्रचार करण्यास प्रारंभ केला होता. हिंदुधर्म आणि पाश्चात्य विज्ञान यांचा समन्वय घडवून आणण्याचा त्यांचा अट्टाहास होता! विशेषतः स्वामी विवेकानंदाच्या विचारसरणीचा त्यांच्या आवेशयुक्त भाषण शैलीमुळे हिंदी युवकांच्या मनावर अतिशय परिणाम झाला. कनिष्ठ मध्यम वर्गीय युवकातील बंडखोरांचा जोम विवेकानंदामध्ये मुसमुसत होता. सामान्य लोकांच्या हालअपेष्ठा पाहून त्यांचे हृदय द्रवले. देशातील दुःस्थिति अवलोकन करून त्यांचा जीव बेचैन झाला; आणि तिजवर उपाय शोधून काढण्यासाठी त्यानी हिंदी तत्त्वज्ञान सागरात बुडी घेतली. हिंदी तत्त्वज्ञानातील अद्वैत वेदांतामध्ये त्याला समतावादी, भूतदयात्मक अशा विश्वधर्माचे स्वरूप आढळून आले. विवेकानंदाच्या मते, हिंदु धर्माचा मूळ पाया असा जो अद्वैत वेदांत तो स्वच्छ पाण्याप्रमाणे शुद्ध असून त्यावर जुन्या बुसरलेल्या

धार्मिक आचारविचारांचे आणि सामाजिक चालीरीतींचे शेवाळ माजले आहे; ते शेवाळ दूर सारल्याने हिंदु धर्माचे पवित्र आणि शुद्ध स्वरूप जगाच्या निदर्शनास येऊन तो विश्वप्रिय धर्म बनेल. पाश्चात्य संस्कृतिपेक्षा हिंदी संस्कृति श्रेष्ठ आहे, असा विवेकानंदाचा गाढ विश्वास होता आणि हिंदी संस्कृतीच्या पायावरच भविष्यकालीन हिंदी राष्ट्राची उभारणी झाली पाहिजे असे निश्चयाने प्रतिपादन करण्यास त्याने प्रारंभ केला.

पण टिळकापेक्षा विवेकानंदामध्ये हा विशेष होता की विवेकानंदाना आपल्या समाजाचा धार्मिक बाबतीला सनातनीपणा आणि सामाजिक बाबतीतले मागसलेपण ही पसंत नव्हती. इतकेच नव्हे तर स्वामी विवेकानंद धूर्त आणि दूरदर्शी होते. त्यानी ओळखले की प्रचलित हिंदुधर्माच्या ओबड धोबड स्वरूपामुळे अर्वाचीन राष्ट्रात त्याचे महत्त्व प्रस्थापित होणार नाहीं, ह्मणून त्यानी धर्म आणि विज्ञान यांचा समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न केला; हिंदु धर्मतत्त्वे बुद्धिवादाच्या सहाय्याने विवरण करण्याचा यत्न चालविला. विज्ञानाच्या मदतीने हिंदुधर्माचे स्पष्टीकरण केल्याने तो विश्वधर्म बनेल असे त्याना वाटले. अशाप्रकारे हिंदुधर्माला गोंडस स्वरूप देऊन विवेकानंद स्वस्थ बसले नाहीत, तर हिंदु धर्माला केवळ आधिभौतिक सुखात रत झालेल्या पाश्चात्य जगाला आध्यात्मिक संदेश द्यावयाचा आहे असा अमेरिका यूरोप जपान इत्यादि सुधारलेल्या राष्ट्रात प्रचार करण्यास प्रारंभ केला. जगाच्या उद्धारासाठी हिंदुस्थान स्वतंत्र झाला पाहिजे, त्याने आपल्या भौतिक उत्कर्षाकडे अधिक लक्ष दिले पाहिजे असे प्रतिपादन करण्यास सुरवात केली. आपल्या आध्यात्मिकतेच्या बळावर हिंदुस्थानाने जग जिंकावे असे ह्मणणाऱ्या या विवेकानंदाच्या राष्ट्रवादाला आध्यात्मिक साम्राज्यवाद हेच नाव अधिक शोभते !

या जग जिंकणाऱ्या कल्पनेने बेकार बनत चाललेल्या हिंदी बुद्धिजीवीमध्ये एक प्रकारचे चैतन्य संचारिले. प्रचलित राज्यपद्धतीखाली भरडले

जाणारे असे हे हिंदी बुद्धिजीवी युवक त्या राज्यपद्धतीविरुद्ध बंड करून तिचा नाश करण्यास प्रवृत्त झाले. ब्रिटिश सत्ता हीच आपल्या सर्व दुःखास कारण आहे, असे त्यांच्या मनाने घेतले. वास्तविक या बंडखोर बुद्धिजीवि वर्गाने सामाजिक वर्गयुद्धात हिंदी दलित जनतेचे नेतृत्व पत्करण्यास हवे होते, पण जग जिंकणाच्या आध्यात्मिक कल्पनेने या तडफदार हिंदी युवकांची दिशाभूल झाली. त्यांचा सर्व रोख ब्रिटिश सत्तेविरुद्ध होता हे जरी खरे होते, तथापि प्राचीन भारतीय अध्यात्मिक सुख पुनः देशाला प्राप्त व्हावे, जगाला अध्यात्मिक संदेश देता येण्याजोगे आपल्या देशात सामर्थ्य निर्माण व्हावे ह्मणून ब्रिटिश सत्ता उलथून टाकिली पाहिजे असे त्याना वाटे ! पाश्चात्य राष्ट्रानी ज्या मार्गाने आपला सामाजिक, राजनैतिक आणि सांस्कृतिक विकास घडवून आणला त्याच मार्गाचा अवलंब हिंदुस्थानने केला पाहिजे असे त्याना वाटत नसे. ह्मणजे त्यांची दृष्टि प्राचीन हिंदी संस्कृतीकडे ह्मणजे भूतकालाकडे होती. अखिल जगाच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा फायदा घेऊन हिंदुस्थानचा भविष्य काल बनवावा असे त्याना वाटत नव्हते! उलट, आपल्या देशाचा उद्धार होण्यास ब्रिटिश राज्याबरोबर आलेली अर्वाचीन पाश्चात्य संस्कृति ही सुद्धा देशातून घालवून दिली पाहिजे असा त्यांचा निश्चय झाला. याप्रमाणे त्यांचा दृष्टिकोण प्रतिगामी असला तरी देशाची आर्थिक स्थिति सुधारावी; आपल्या देशबांधवाचा अज्ञानतिमिर नष्ट व्हावा; आपल्या देशाचे पूर्वीचे सुवर्णयुग पुन्हा प्रचलित व्हावे इत्यादि युवकांच्या मनाला लागून राहिलेली तळमळ अप्रतिम होती. या तळमळीमुळेच त्यांची वृत्ति बंडखोरी बनली होती.या त्यांच्या आकांक्षांचे मूळ देशातील आर्थिक दुःस्थिति ही होय. या दृष्टीने विचार केल्यास हे (objectively) क्रांतिकारी वाटतात. विवेकानंद टिळक प्रभृति पुढाऱ्यांच्या विचारसरणीच्या कैचीत हे युवक सापडल्यामुळे ध्येयदृष्ट्या ते प्रतिगामी

बनलेले होते. तथापि टिळकांच्या जहाल पक्षाच्या मागे या तरुणाची बंडखोर प्रवृत्ति ह्मणजे एक प्रचंड शक्ती बनून राहिलेली होती. ह्मणूनच काँग्रेसमधील पुरोगामी राष्ट्रवाद मागे पडून प्रतिगामी राष्ट्रवादाची सरशी झाली. दहशतवादाला ऊत आला. बॉंब गोळे, पिस्तुले इत्यादींच्या सहाय्याने ब्रिटिश सत्ता आणि पाश्चात संस्कृति यांचा नायनाट करण्याच्या उद्योगास ही उतावळी तरुण मंडळी लागली. अरविंद हे या युवकांचे राजकीय गुरू बनले. विवेकानंदाची शिकवण त्यानी राजकारणास लागू केली. हिंदुस्थानची अध्यात्मिकता वाढविण्यासाठीच स्वातंत्र्य पाहिजे असे ते प्रतिपादू लागले. तेव्हा हिंदी संस्कृतीच्या आड येणारी ब्रिटिशसत्ता कोणत्याही मार्गाने उधळून लावण्यास हरकत नाही असे बंडखोर वृत्तीच्या तरुणाना वाटू लागले. त्तदनुरूप हिंदुधर्मातील शास्त्राधारही त्यानी शोधून काढले.

या ब्रिटिश विरोधी चळवळीत बंगालच्या फाळणीमुळे आणखी एक नवीन द्रव्य सामील झाले. एथपर्यंत बंगाल्यातील जमिनदार वर्गाचा सरकारला राजनिष्ठ पाठिंबा होता.

बंगालच्या फाळणीमुळे कायमधारा पद्धतीवर गदा येणार या भीतीने जमिनदार वर्ग खवळला. वंगभंगाच्या चळवळीमुळे पाल, टिळक आणि घोष या प्रतिगामी राष्ट्रवाद्याना उत्साहाचे भरते आले. ही मंडळी आध्यात्मिक ध्येयापासून वास्तववादी राजकारणाच्या आखाड्यात उतरली. या मंडळीनी ठासून प्रतिपादण्यास सुरवात केली की अर्ज विनंत्यांचा भिक्षांदेही मार्ग निरर्थक आहे; हक्क मागून मिळत नसतात; आपण आपल्या मागण्या तयार करून त्या परिपूर्ण व्हाव्या ह्मणून देशात प्रचंड शक्ति निर्माण केली पाहिजे. याप्रमाणे आध्यात्मिक राष्ट्रवाद बाजूस सारून त्यावेळीं बाल, पाल प्रभृति पुढारी व्यावहारिक भूमिकेवर येऊन खऱ्याखुऱ्या राजकारणाची भाषा बोलू लागले. त्यावेळी राष्ट्रीय चळवळीस जोम आला. पुढे १९०६ च्या डिसेंबर महिन्यात दादाभाईंच्या अध्यक्षतेखाली जी राष्ट्रसभा भरली

होती, तीत स्वदेशी, बहिष्कार इत्यादि व्यावहारिक झगड्याचे ठराव पसार झाले, इतकेच नव्हे,तर दादाभाई नौरोजी यानी अध्यक्षीय व्यासपीठावरून असे निक्षून सांगितले की, हिंदुस्थानास स्वराज्याशिवाय तरणोपाय नाही आणि स्वराज्य हेंच काँग्रेसचे ध्येय असले पाहिजे. तात्पर्य, काँग्रेसमध्ये टिळकांच्या जहालपक्षाचा जो वर्चष्मा होऊ लागला, त्याला प्रतिगामी राष्ट्रवाद्यांचे भूतकालाकडे पाहणारे तत्त्वज्ञान कारणीभूत नसून हिंदुस्थानात भांडवलशाहीचा उत्कर्ष करू पाहणारी पुरोगामी राष्ट्रवाद्याची ‘ अराष्ट्रीय ’ भूमिकाच कारण झाली! जहाल पक्षाच्या विजयाची तीन प्रधान भौतिक कारणे देता येतील.

१ हिंदी औद्योगिक भांडवलाची क्रमाक्रमाने झालेली वाढ.

२ बेकारीमुळे कनिष्ठ मध्यमवर्गात माजलेला असंतोष.

३ बंगालच्या फाळणीने जमिनदार वर्गाच्या हक्कसंबंधावर आणलेली गदा.

या तिन्ही कारणात प्रतिगामी राष्ट्रवाद्यांच्या अध्यात्मिकतेचा धागादोरा कोठेही आढळून येत नाही. १९०४।०५ च्या पूर्वी काँग्रेस ही देशी उद्योग धंद्याच्या वाढीस सरकारचे संरक्षण मागत होती. १९०५ साली स्वदेशी बहिष्काराचा ठराव पसार करून देशी उद्योगधंद्यांच्या उत्कर्षासाठी तिने स्वावलंबनाचा मार्ग पत्करला. हा पुरोगामी राष्ट्रवाद्यांचाच विजय होय. अर्वाचीन भांडवलशाहीच्या उदयावरच हिंदी राष्ट्राचे पुनरुज्जीवन अवलंबून आहे हा त्यांचा सिद्धांत प्रतिगामी राष्ट्रवाद्यानी पुरस्कारिला, इतकेच नव्हे, तर त्यानी जी तडफ दाखविली त्यामुळे काँग्रेसमध्ये एक प्रकारचे चैतन्य निर्माण झाले आणि स्वदेशी बहिष्कारादि हिंदी भौतिक उत्कर्षासंबंधाचे ठराव पास झाले. अशाप्रकारे प्रतिगामी राष्ट्रवाद्याच्या आध्यात्मिक आणि हिंदी प्राचीन संस्कृतीच्या कल्पना हवेमध्येच तरंगत राहिल्या आणि त्याना पुरोगामी राष्ट्रवादाची वास्तव भूमिका

पत्करावी लागली. बनारस येथे १९०५ साली भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशन प्रसंगी लो. टिळकानी अर्वाचीन उद्योगधंद्याच्या वाढीनेच हिंदी दारिद्र्याचा प्रश्न सुटणार आहे असे भाषण करून पुरोगामी सामाजिक तत्त्वज्ञानाचा विजय नकळत कबूल केला.

येथपर्यंत काँग्रेस ही संस्था फक्त बडे जमिनदार, भांडवलदार आणि मातबर बुद्धिजीवि यांचीच होती. लो. टिळक, बिपिन बाबू आणि अरविंद घोष यानी काँग्रेस पुढाऱ्यांचे दोष, विशेषतः त्यांची निष्क्रियता आणि भेकड वृत्ति यांचा अविष्कार करून आपल्याभोवती युवक गोळा केले.कनिष्ठ मध्यम वर्गीय, प्रमुखतः बेकार बुद्धिजीवी यांचा भरणा काँग्रेसमध्ये होऊ लागला. त्याबरोबर त्यांच्या मनावरची अध्यात्मिक आणि सनातनी पकड शिथिल होऊ लागली. देशाच्या औद्योगीकरणाचे पुरोगामी तत्त्वज्ञान त्याना पटू लागले. त्यांची परिस्थिति बेकारीची आणि हलाखीची असल्यामुळे त्यानी आपले विचार ताबडतोब अमलात आणण्यास प्रारंभ केला. बोलघेवड्या मातबर नेमस्त बुद्धिजीवींच्या पुढे राजकारणात त्यानी आघाडी मारली. कनिष्ठ मध्यम वर्ग हा दिवाळखोर बनला होता. प्रचलित समाज व्यवस्थेत आमूलाग्र बदल होणे त्याला अवश्य होते. परंतु संपन्न बुद्धिजीवि आणि मत्ताधीश भांडवलदार याना प्रचलित वस्तुस्थितीत क्रांतिकारक फेरफार नको होते. आपले धन आणि हक्कबाबी यांच्या संरक्षणार्थ सरकारचे सहाय्य त्याना सर्वतोपरी हवे होते. मातबर मध्यम वर्गाचे सामाजिक तत्त्वज्ञान कितीही पुढारलेले होते, तथापि ब्रिटिश सरकारला तो दुखविण्यास तयार नसल्यामुळे तो वर्ग कृतीत सदैव शेळपट आणि निष्क्रियच राहिला. कनिष्ठ मध्यम वर्गाची गोष्ट तशी नव्हती. त्याजजवळ गमाविण्याजोगे असे काहीच नव्हते. ह्मणून तो राजकारणात बेफाम बंडखोर बनू शकला. त्याच्या डोक्यात ब्रिटिश राजवटी उलथून टाकण्याचे ज्वलज्जहाल विचार शिरू शकले. एकंदरीत काँग्रेसमध्ये झालेल्या कनिष्ठ मध्यम वर्गाच्या प्रवेशामुळे काँग्रेस जोमदार आणि सक्रिय बनू लागली.

१९०७ मध्ये विपिन चंद्रपाल यानी जो जहाल पक्षाचा कार्यक्रम आखला, तो, टिळक विवेकानंदांच्या आध्यात्मिक सनातनी पंथाच्या तत्त्वापासून अलिप्त आणि राष्ट्रीय भौतिक उत्कर्षास सहाय्यकारी असाच होता. तो कार्यक्रम ह्मणजे:—

(१) शक्य तो सार्वत्रिक शिक्षण
(२) स्वयंसेनादलाची उभारणी
(३) राष्ट्रीय उद्योगधंद्यांची वाढ
(४) वेळ येईल तेव्हा राज्यसूत्रे हातीं घेता येतील या दृष्टीने एकादी राजनैतिक संस्था उभारणे.

या कार्यक्रमाची अंमलबजावणी याचाच अर्थ राष्ट्रीय राज्यक्रांति आणि सामाजिक क्रांति होत नाही काय? इतका हा कार्यक्रम क्रांतिकारक होता! जहालपक्षाचे सामाजिक तत्त्वज्ञान कितीही प्रतिगामी असो. यावरून हे सिद्ध झाले की ब्रिटिश साम्राज्यशाहीसारख्या अत्यंत प्रबल अशा अर्वाचीन शत्रूशी टक्कर देण्यास प्रतिगामी राष्ट्रवाद दुबळा ठरतो. ब्रिटिश साम्राज्यशाहीने १५० वर्षे हिंदी भांडवलशाहीची मुस्कटदाबी करूनही तिची बीजे नाहीशी झाली नाहीत, इतकेच नव्हे तर त्या बीजांचे अर्वाचीन भांडवलशाही विकासात रूपांतर झाले. सारांश, प्रतिगामी राष्ट्रवादाचे आध्यात्मिकता हे ध्येय असूनही समाज विकासाच्या प्रभावी भौतिक नियमांपुढे हार खाऊन, त्याना शरण जाणे त्या राष्ट्रवादाला भाग पडले. कारण तो राष्ट्रवाद जर आपल्या मुळच्या आचार विचार पद्धतीस चिकटून राहिला असता, तर त्याला अर्वाचीन राजनैतिक चळवळीत कोंणतेच स्थान प्राप्त झाले नसते!

बहिष्काराच्या चळवळीचा राजकीय दृष्ट्या विशेष महत्वाचा असा परिणाम झाला नाही. स्वदेशीच्या प्रचाराला सुद्धा जनतेचा

स्वदेशी बहिष्काराच्या चळवळी फलप्रद न होण्यास कारण, आर्थिक दृष्ट्या दोषपूर्ण विचारसरणीवर त्यांची उभारणी झालेली होती. तथापि या चळवळीपासून देशास दोन फायदे झाले. एक, हिंदी भांडवलावर उभारलेल्या यंत्रोद्योगाना पुष्कळ उत्तेजन मिळाले; दुसरा, राजकीय पुढाऱ्याना धडा मिळाला. त्याना कळून चुकले की, सरकारशी बिनतडजोड सतत लढा चालविण्याइतका जनतेचा पाठिंबा काँग्रेसच्या मागे नाही. सरकारने हे ताडले आणि काही मामुली सवलती देऊ करून प्रागतिकाना जिंकले; व जहालांच्या पाठीवर दडपशाहीचा बडगा बडविण्यास प्रारंभ केला. त्या सवलती ह्मणजे १९०९ च्या मोर्लेमिंटो सुधारणा या होत. या सुधारणानी भांडवलशाहीच्या आकांक्षा परिपूर्ण झाल्या अशातला भाग नाही. पण भांडवलशाही व तिचे पुढारी नेमस्त याना नवीन मन्वंतरास सुरवात झाली असे वाटले. या सुधारणा ह्मणजे नेमस्तांची फसवणूकच होती. नेमस्ताना आपल्याभोवती गोळा करून (rallying the modrates) मोर्लेसाहेबानी पुरोगामी भांडवलशाही शक्तीचे सामर्थ्य ओळखून तिजशी गट्टी करून राष्ट्रीय चळवळ हाणून पाडली.

१९०९ नंतरच्या सालात क्रमाक्रमाने देशी उद्योगधंद्याची वाढ होऊ लागली. सरकारी विरोधास हिंदी भांडवलशाही जुमानेनाशी झाली! पुढे महायुद्धोत्तरकाली तर हिंदुस्थानासारख्या वसाहतीविषयीचे साम्राज्यशाही धोरण पालटले. दिवसेंदिवस विलायतीतले अधिकाधिक भांडवल हिंदुस्थानात गुंतले जाऊ लागले. त्यायोगे देशाच्या औद्योगिकरणास सुरवात झाली. परिणामी हिंदी भांडवलदार वर्गाला देशाच्या राज्यकारभारातून वगळणे अशक्य झाले.

आतापावेतो बहुजनसमाज हा काँग्रेसच्या चळवळीपासून अलिप्त होता. पुरोगामी राष्ट्रवादाचा कार्यक्रम भांडवलदार वर्गापुरताच होता. प्रतिगामी राष्ट्रवाद हा सुद्धा जुन्या सामाजिक संस्था आणि अध्यात्मिक शिकवण यावर

आधारलेला असा ह्मणजे केवळ भावनात्मक असल्यामुळे त्याचा सतत पोटासाठी काबाडकष्ट करणाऱ्या बहुजनसमाजावर काहीच परिणाम होईना. बहुजनसमाजाला आपल्या आर्थिक गाऱ्हाण्याशिवाय काहीच सुचत नसते. कॉंग्रेसचा कार्यक्रम हा अद्याप बहुजन समाजाला आकर्षक असा बनलेला नव्हता. त्यातल्या त्यात हिंदी भांडवलशाहीचा उत्कर्ष करू पाहणारा पुरोगामी राष्ट्रवादाचा कार्यक्रमच जास्त वास्तववादी ह्मणजेच व्यावहारिक स्वरूपाचा होता. टिळक प्रभृति जहालांनी सुद्धा देशी धंद्यास उत्तेजन देण्याचे ठरवून पर्यायाने पुरोगामी राष्ट्रवादाचा कार्यक्रम अंगिकारिला होता. परंतु जहालांच्या बेफाम बंडखोरी वर्तनामुळे त्यांच्यापासून कॉंग्रेसचा बचाव करण्याच्या प्रयत्नास नेमस्त लागले.सुरतेची दुही झाली तरी, त्याच प्रयत्नांचे फळ होय. या दुहीमुळे नेमस्त आणि जहाल हे दोन्ही पक्ष नामोहरम झाले आणि सर्व राजकीय क्षेत्र दहशतवाद्याना मोकळे झाले. काही युवक सरकार-विरुद्ध सशस्त्र बंड करण्याच्या उद्योगास लागले. सरकारने दडपशाहीचे शस्त्र पाजरले. लो. टिळकाना सहा वर्षे मंडालेला पाठविण्यांत आले. इतर जहाल पुढाऱ्यानासुद्धा विविध मुदतीच्या शिक्षा झाल्या. दीड वर्षांची शिक्षा भोगून अरविंद बाबू राजकारणाला कंटाळले आणि त्यानी यतिधर्माची दीक्षा घेतली. पालबाबूच्या राजकीय धोरणात बदल होऊन ते नेमस्त बनले आणि त्यानी १९०८ सालीच ब्रिटिश लोकशाहीचे आर्जव करण्यासाठी विलायतेचा रस्ता धरला. पुढे १९०८ पासून १९१४ पर्यंत राजनैतिक-दृष्ट्या हिंदुस्थानात जिकडे तिकडे सामसूम होते. कॉंग्रेस ही संस्था फक्त नावाने जिवंत होती.

१९१४ चे ऐतिहासिक साल उजाडले. लो. टिळकांची मंदालेच्या कारागृहवासातून सुटका झाली. महायुद्धाने पेट घेतला. दहशतवादाला ऊत आला. सरकारविरुद्ध सशस्त्र बंड अगर कट उभारण्यास ही संधि आहे असे काही अविवेकी युवकाना वाटून त्या उद्योगास ते लागले. १९१५साली लो.

टिळकाचे प्रतिस्पर्धी नेमस्त पुढारी गोखले व मेहता हे दोघेही कालवश झाले. राजकीय हक्क आणि आर्थिक सवलती प्राप्त करून घेण्यास युद्धाची संधि बरी आहे असे टिळक प्रभृति जहालांना वाटले. त्यानी काँग्रेसचे वसाहतीच्या स्वराज्याचे ध्येय मान्य करून काँग्रेसमध्ये शिरकाव केला. जहाल मवाळ एक झाले. पुरोगामी राष्ट्रवादाचा विजय झाला. युद्धामुळे देशी उद्योगधंद्यास चालना मिळाली; अभिनव उद्योगधंदे अस्तित्वात आले. हिंदी भांडवलशाहीची दिवसेंदिवस वाढ होऊ लागली. काँग्रेस ही झाली तरी भांडवलशाहीची राजनैतिक हत्यार बनली.

१९१६ साली सुरू झालेली होमरूलची चळवळ ही हिंदी भांडवलदार वर्गाला राजकीय हक्क आणि आर्थिक सवलती प्राप्त व्हाव्या ह्मणून उभारलेली चळवळ होय! त्या चळवळीच्या उत्पादिका ॲनी बिझांटबाई या ब्रिटिश साम्राज्याच्या प्रेमानें ओथंबलेल्या होत्या. साम्राज्यातून हिंदुस्थानाने फुटून जाऊ नये या दूरदृष्टीने त्या बाईंनी ही चळवळ आरंभिली. लो. टिळक प्रभृति जहालानी आणि सुरेन्द्र बॅनर्जी आदिकरून नेमस्तानी त्या चळवळीला जोराचा पाठिंबा दिला. ऐतिहासिक दृष्ट्या १९१६ साल हे अत्यंत महत्त्वाचे होऊन गेले. त्या वर्षी हिंदु मुसलमान ऐक्य घडून आले.

१९१६ सालच्या डिसेंबरमध्ये काँग्रेसचे अधिवेशन लखनौ येथे भरले. मुस्लिम लीगची बैठक हीसुद्धा याच वेळेस लखनौ येथेच यशस्वीपणे पार पडली. काँग्रेसचा कार्यक्रम आणि मागण्या याना मुस्लिम लीगने बिनशर्त एकमुखी पाठिंबा दिला. काँग्रेसचा आणि लीगचा असा मिळून एकच स्वराज्याचा खर्डा बाहेर पडला. साम्राज्यांतर्गत स्वराज्य (ज्यात पूर्ण आर्थिक स्वायत्तता आहे असे) हे दोन्ही संस्थांचे ध्येय ठरले.

येथपर्यंत मुसलमान हे काँग्रेसपासून बहुशा अलिप्त असेच होते. नाही ह्मणायला काँग्रेसच्या संस्थापकात एक दोन मुसलमानांची नावे आढ-

ळून येतील. याला मुख्य कारण काँग्रेसमध्ये प्रभावी बनलेला सनातनी अगर प्रतिगामी राष्ट्रवाद असे ह्मणता येईल. या राष्ट्रवादाची उभारणीच आधी आक्रमक हिंदु धर्मतत्त्वावर केलेली होती. त्याला हिंदु राष्ट्रवाद हेच नाव अधिक शोभते. अर्थात् जहाल पक्ष हा एक हिंदूंचाच पक्ष आहे असे मुसलमानाना वाटू लागले. शिवाय मुसलमानातील वरिष्ठ वर्ग हा हिंदूंना तुच्छ मानत असे. मुसलमान जेते आणि राज्यकर्ते आणि हिंदू जित गुलाम असे तो वर्ग ह्मणत असे. हिंदुस्थानाशी आपले हितसंबंध निगडित झाले आहेत, हिंदुस्थान हे आपले राष्ट्र आहे ही भावना त्या वर्गांत प्रादुर्भूत झालेली नव्हती. या वरिष्ठ वर्गांचे पुढारी मुसलमान बुद्धिजीवि यांची दृष्टि तुर्कस्थानादि मुसलमान राष्ट्रांच्या संयुक्त घटनेवर होती. त्या काल्पनिक घटनेत हिंदी मुसलमानानी सामील व्हावे असे त्याना वाटे.

हिंदी बुद्धिजीवीप्रमाणे त्यांचा दृष्टिकोण पुरोगामी झालेला नव्हता. कारण ज्या अलिगड कॉलेजमध्ये त्याना शिक्षण दिले जात होते तेथे मुसलमानी धर्मांचे अत्यंत प्रस्थ होते. शिवाय ब्रिटिशानी हिंदुस्थानास सत्ता समर्पण केल्यास, हिंदूंचे प्राबल्य होईल आणि आपला धर्म बुडेल या भीतीने मुसलमान वरिष्ठाना ब्रिटिश राज्यच हवेसे वाटे. मुसलमान बुद्धिजीवींच्या मनावरची इस्लामी सरंजामी विचारसरणीची पकड अद्याप निसटलेली नव्हती. हिंदु बुद्धिजीवि आणि मुसलमान, बुद्धिजीवि यांच्यातील भिन्न विचारसरणीचा फायदा परकीय राज्यकर्त्यांनी घेतला असल्यास त्यात नवल वाटण्याजोगे काय आहे?

पण ही वस्तुस्थिति फार काळ टिकली नाही. विसाव्या शतकारंभी हिंदूंच्याप्रमाणे मुसलमानातही क्रमाक्रमाने व्यापारी आणि औद्योगिक भांडवलदार वर्ग उदय पावला. त्याबरोबर त्या वर्गाचा बौद्धिक नेता मुसलमान सुशिक्षित वर्ग याचीही वाढ होऊ लागली. मुसलमान भांडवलदार

वर्ग आणि सुशिक्षित याना मुसलमान समाजाचे हितसंबंध हिंदी राष्ट्राशीच कायमचे निगडित झालेले आहेत याची जाणीव झाली. त्यानी आगाखान अमीर अल्ला आदिकरून सनातनी पुढाऱ्याना उलथून टाकून मुस्लीम लीगला ताळ्यावर आणले. सारांश, ज्याप्रमाणे काँग्रेस ही हिंदूंची भांडवलशाही संस्था बनली, त्याचप्रमाणे मुस्लीम लीग ही इस्लामी भांडवलदारांची संस्था झाली. १९१६ मध्ये या दोन्ही संस्थांची एकी होऊन हिंदी भांडवलशाहीचा एक अभेद्य किल्ला निर्माण झाला. अर्थात्‌च त्या भांडवलशाहीने वसाहतीचे स्वराज्य ह्मणजेच हिंदी भांडवलशाहीचे राज्य हे ध्येय पुढे ठेवून काँग्रेसलीग या दोन्ही संस्थांच्या द्वारे जोमाचा राजकीय लढा चालविला. तथापि अद्यापपावेतो बहुजनसमाज हा मग तो हिंदूंचा असो, किंवा मुसलमानांचा असो, राजकीय चळवळीपासून अलिप्त होता.

१९१६ पासून काँग्रेसच्या चळवळीला निराळे वळण लागले. टिळक बिझांटप्रभृति हिंदी संस्कृतीचे श्रेष्ठत्व गाणाऱ्या पुढाऱ्यांच्या हाती काँग्रेसची सूत्रे आल्यामुळे कनिष्ठ मध्यम वर्गाच्या तरुणाची मने होमरूल चळवळीकडे आणि काँग्रेसकडे आकर्षित झाली. आतापर्यंत काँग्रेस ही संस्था राजकीय विषयावर चर्चा करून ठराव पसार करण्यापलिकडे काही एक कार्य करीत नव्हती. १९१६ पासून तिला संघटित स्वरूप प्राप्त होऊ लागले, आणि ती कृतिक्षम बनू लागली. ब्रिटिश साम्राज्यशाहीशी झगडणाऱ्या अशा राजनैतिक पक्षात तिचे रूपांतर होणार अशी चिन्हे दिसू लागली. जनतेत जागृतीचे चैतन्य खेळू लागले. सरकारपासून जास्त सवलती प्राप्त करून घेण्यास ही संधि बरी आहे असे हिंदी भांडवलदाराना व त्यांच्या नेमस्त पुढाऱ्यांना वाटू लागले. या युद्धप्रसंगी सरकारही हिंदी भांडवलदाराना उदार हस्ते आर्थिक आणि राजनैतिक सवलती देण्यास पुढे सरसावले. हिंदी कारखान्याकडे युद्ध साहित्य पुरवण्यासाठी मागण्या पाठविण्यात येऊ लागल्या. हिंदी भांडवलावर उभारलेल्या व युद्धसामुग्री उत्पन्न करणाऱ्या

कारखान्याना सरकारी सक्रिय प्रोत्साहन मिळू लागले. इतकेच नव्हे तर, हिंदी भांडवलावर कोणते अर्वाचीन उद्योगधंदे उभारता येतील हे मुक्रर करण्यासाठी चौकशी कमिशन नेमण्यात आले. ब्रिटिश पंतप्रधान ॲस्क्वीथ हे हिंदुस्थानाकडे नवीन दृष्टीने पाहण्यात येईल अशी भाषा बोलू लागले.तत्कालीन व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंज हिंदुस्थानासाठी नवा सुधारणा कायदा बनविण्याच्या खटपटीस लागले.हे सरकारी अनुकूल धोरण ह्मणजे "प्रसादचिन्हानि पुरःफलानि " असे सर्वांना वाटू लागले. आता वसाहतीचे स्वराज्य हमखास मिळणार असे आशेचे वातावरण सर्वत्र पसरले. केवळ काँग्रेस आणि लीग या संस्थानीच सुधारणांचा खर्डा तयार केला अशातली गोष्ट नसून मध्यवर्ति कायदे मंडळाच्या लोकनियुक्त एकोणीस सभासदानी सुद्धा एक सुधारणांचा मसुदा बनविला. आपण युद्धास बहुमोल मदत करीत आहोत, त्याचा मोबदला आपल्याला मिळाला पाहिजे असा अट्टाहास करण्यास हिंदी भांडवलदारानी सुरवात केली. याच सुमारास महायुद्धाच्या पिळणुकीखाली भरडला जाणारा बहुजन समाज जागा होऊ लागला होता. जागृत जनतेचा आपल्याला पाठिंबा आहे असा सरकारला त्यानी धाक घातला. १९०६ साली वसाहतीचे स्वराज्य हे ध्येय काँग्रेसने निश्चित केले होते,त्या ध्येयालाच ताबडतोब मूर्त स्वरूप देण्यात यावे अशी अट्टाहासाची मागणी १९१६ साली करण्यात येऊ लागली. जहाल मवाळ हिंदुमुसलमान इत्यादि भेद राष्ट्रसभेत विलीन झाले; आणि वसाहतीचे स्वराज्य आणि संपूर्ण आर्थिक स्वायत्तता या एकमुखी मागण्या राष्ट्रीय सभेच्या द्वारे ब्रिटिश सरकारला सादर करण्यात आल्या.

काँग्रेसमधील सार्वत्रिक एकीचा तसाच निश्चित धोरणाचा आणि प्रवृत्तीचा सरकारवर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. सरकारने लगेच हिंदी भांडवलदार वर्गाला खूष करण्याजोग्या सुधारणा प्रचलित करण्याची चिन्हे प्रदर्शित केली. आयात मालावरील विशेषतः कापडावरील जकाती

वाढविण्यात आल्या. एवढ्या सवलतीवरच हिंदी भांडवलदार बेहोष होऊन त्याने ब्रिटनला १० कोटी पौंडांचा युद्धनिधि बहाल केला. हिंदविषयक ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या आर्थिक धोरणात आमूलाग्र बदल होणार असे जकातवाढीमुळे हिंदी भांडवलशाहीला वाटून तिचा आनंद गगनात मावेना ! या नंतर लगेच १९१७ च्या आगष्ट महिन्यात भारत मंत्रि मॉटेग्यूसाहेब यांची हिंदुस्थानास क्रमाक्रमाने जबाबदारीचे स्वराज्य बहाल करण्यात येणार अशी जाहीर घोषणा बाहेर पडली. मग काय विचारता, हिंदी भांडवलदार आणि त्यांचे पुढारी नेमस्त यांच्या आनंदाला पारावार नाहीसा झाला. त्याना असे वाटलं की ब्रिटिश सरकार जे काही देते त्याचा स्वीकार करून त्याच्या बळावर आणखी जास्त जास्त मिळवीत जावे, सध्या जे देऊ केले आहे ते अपुरे नाही. महात्मा गांधी यावेळी राजकारणाच्या आखाड्यात उतरले नव्हते, तथापि त्यानासुद्धा या सुधारणा स्वीकरणीय वाटल्या इतकेच नव्हेतर सैन्य भरती करणे, शुश्रूषा-पथके उभारणे इत्यादि युद्धसहाय्य कण्याचा त्यांनी सपाटा चालविला.

ब्रिटिश सरकार हे कॉंग्रेसच्या भांडवलशाही चळवळीला दाद देण्या-इतके नरम केव्हाच नव्हते. मग हिंदी भांडवलशाहीला राजकीय हक्क आणि आर्थिक सवलती उदारपणे बहाल करण्यास ते पुढे कसे सरसावले हा प्रश्न शिल्लक राहतोच ! महायुद्धोत्तर जगभर चाललेल्या जनतेच्या उठावांची झळ हिंदी बहुजनसमाजाला लागणे साहजिक आहे हे धूर्त साम्राज्यशाही मुत्सद्यांच्या लगेच लक्षात आले. हिंदी जनतेच्या उठावाची जोड हिंदी राष्ट्रीय चळवळीला मिळाल्यास आपल्या सत्तेला धोका आहे हे जाणून ब्रिटिश सरकारने बहुजनसमाजाच्या उठावाविरुध्द राष्ट्रीय चळवळीच्या नेमस्त पुढाऱ्यांची सहानुभूति मिळविण्याची खटपट चालविली. ती सहानुभूति १९०८ सालच्या मोर्लेसाहेबांच्या फसवेगिरी मार्गाने आता मिळणे शक्य नव्हते. ह्मणून हिंदुस्थानाला ह्मणजेच हिंदी भांडवलशाहीला

राजकीय हक्क आणि आर्थिक सवलती देणे साम्राज्यशाही मुत्सद्यांना भाग पडले.

पुढे १९१८ मध्ये मॉंटेग्यूचेमस्फर्ड सुधारणांचा कच्चा खर्डा बाहेर पडला. या खर्ड्यांने नेमस्तांची तृप्ति झाली. पण लो. टिळकानी ' उजाडले पण सूर्य कोठे आहे ? ' ' बेटा जनाब ! देहली तो बहुत दूर है ' इत्यादि केसरीत अग्रलेख लिहून सुधारणा निराशाजनक आहेत असे दिग्दर्शन केले. बंगालचे दास आणि पाल आणि मद्रासचे सत्यमूर्ति यानी लो. टिळकांना साथ दिली. याचा परिणाम असा झाला की नेमस्त मंडळी कॉंग्रेसमधून फुटून बाहेर पडली आणि त्यानी नॅशनल लिबरल फेडरेशन नावची नवीन राजकीय संस्था उभारली.

यावेळी हिंदुस्थानात आणखी एका नवीन वस्तुस्थितीचा प्रादुर्भाव दृग्गोचर होऊ लागला होता. हिंदी बहुजनसमाजात असंतोषाचे वारे पसरू लागले. आर्जवाने वागणारी हिंदी भांडवलशाही आणि तिचे नेमस्त पुढारी यांची भीती सरकारला कधीच वाटली नाही. प्रतिगामी राष्ट्रवाद्यांच्या निष्फळ आणि निरर्थक चळवळींची सुद्धा सरकारने केव्हाही कदर बाळगिली नाही. केवळ नेमस्तांचे समाधान करून सरकारचे भागेना. चार वर्षांच्या युद्धकालात सतत चाललेल्या पिळणुकीमुळे जनता गांजली होती. त्यांच्या परंपरागत सहनशीलतेवर या काळाइतका कधीही ताण पडलेला नव्हता. नवीन औद्योगिक केन्द्रे स्थापन होऊन तेथे दलित जनतेची खेचाखेची होत होती. पूर्वीच्या तिच्या खेडूत राहणीपेक्षा सांप्रतचे तिचे नागर जीवन तिला असह्य बनत चालले होते. युध्दारंभी अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात काम करणारे हिंदी कामगार आपल्या मायदेशास परतले होते. त्यानी अमेरिकेत उच्च राहणी अनुभविली होती. शिवाय अमेरिकेतून क्रांतिकारी राजनैतिक कल्पना ही कामगार मंडळी आपल्याबरोबर घेऊन येऊन त्यांचा ती हिंदुस्थानात प्रसार करीत होती. याखेरीज दहा लक्षापेक्षा अधिक हिंदी

सैनिक यूरोपच्या रणक्षेत्रावर लढाईस गेले होते. त्यानी यूरोपमधील शहरातील आणि खेड्यातीलसुद्धा राहणीचा उच्च दर्जा प्रत्यक्ष अवलोकिला होता. हे शिपाई जेव्हा यूरोपहून हिंदुस्थानास परतले, त्यावेळी त्यानी आपल्या अनुभवाचा प्रसार हिंदी खेडोपाडी करण्यास प्रारंभ केला. यामुळे हिंदुस्थानात सर्वत्र अभूतपूर्व असे असंतोषाचे आणि क्रांतीचे वातावरण निर्माण होऊ लागले.

सारांश, आतापर्यंत असंतोष हा मध्यम वर्गापुरताच मर्यादित होता, तो आता वर वर्णिल्याप्रमाणे खेडोपाडी सर्वत्र बहुजनसमाजात पसरू लागला. हिंदी ग्रामीण जनतेच्या दैवाधीन वृत्तीला त्याने जबरदस्त धक्का दिला. ही वस्तुस्थिति ही काही, पुरोगामी राष्ट्रवादी नेमस्तांच्या किंवा प्रतिगामी राष्ट्रवादी जहालांच्या चळवळींचा परिपाक ह्मणून प्रादुर्भूत झालेली नव्हती. युद्धोत्तर जगातील सामाजिक शक्तींच्या आंदोलनांचा तो परिणाम होता! तेव्हा नेमस्ताना खूप करून अगर जहालाना तुरुंगात डांबून आता कार्यभाग होण्याजोगा नव्हता. जनतेच्या प्रचंड उठावाची भयदायक चिन्हे जी सर्वत्र दृग्गोचर होत होती, ती काही केवळ साम्राज्यशाही पिळणुकीचा परिणाम ह्मणून नव्हे, तर त्याना हिंदी भांडवलदाराची पिळणूक ही सुद्धा तितकीच जबाबदार होती. जहालानी या वस्तुस्थितीचा फायदा घेऊन बहुजनसमाजाच्या उठावाचे नेतृत्व पत्करून त्यात ब्रिटिशविरोधी भावनेचे वातावरण निर्माण केले. एकंदरीत काँग्रेसपिते नेमस्त हे जरी तिला सोडून गेले, तथापि बहुजनसमाज आता काँग्रेसमध्ये सामील झाल्याने ती एक प्रचंड शक्ति बनली होती.

याप्रमाणे हिंदी राष्ट्रवादाची चळवळ प्रचंड स्वरूप धारण करीत असता, ती हाणून पाडण्यासाठी सरकारने दुधारी तरवार हाती धरली. एका हाताने माँटेग्यूचेमस्फर्ड सुधारणा द्यावयाच्या आणि दुसऱ्या हाताने रौलेट कायद्याचा सोटा चालू करावयाचा असे दुहेरी धोरण प्रचलित

करण्यास सरकारने प्रारंभ केला. रौलेट बिल पास करण्याच्यावेळीं 'प्रस्थापित सत्तेच्याविरुद्ध अनेक सुधारलेल्या राष्ट्रात जो प्रतिकार दृष्टोत्पत्तीस येत आहे, त्याचा हिंदुस्थानावर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही; अनिष्ट शक्ती सर्व जगभर थैमान घालीत आहेत.' असे जे उद्गार व्हाइसरॉयने काढले त्यावरून त्याला रशियन क्रांति व जर्मनी, हंगेरी, बवारिया, जपान इत्यादि राष्ट्रातील जनतांचे उठाव यांचा वास आलाच असला पाहिजे. अन्यत्र झालेल्या क्रांत्यांची धडकी व्हाइसरॉय साहेबांच्या उरात भरणे साहजिक होय. अखिल हिंदी राष्ट्राच्या मतास पायाखाली तुडविले जाऊन रौलेट बिलाचे अखेर कायद्यात रूपांतर करण्यात आले.

यावेळी टिळक, पाल प्रभृति कॉंग्रेस पुढाऱ्यांचे शिष्टमंडळ पार्लमेंटकडून शक्य तो अधिकाधिक सुधारणा प्राप्त करून घ्याव्या म्हणून विलायतेत गेले होते. त्या मंडळाने इंग्लंडमध्ये दौरे काढून अनुकूल वातावरण निर्माण केले होते. इतकेच नव्हे तर ब्रिटिश मजूर पक्षाचा पाठिंबाही कॉंग्रेसच्या मागण्याना मिळविला होता. हे शिष्टमंडळ मायदेशास परतल्यानंतर लगेच अमृतसरचे कॉंग्रेस अधिवेशन भरले. त्यात मॉंटेग्यू सुधारणा निराशाजनक असल्या तरी राबवाव्या असे धोरण निश्चित झाले. तदनुसार लो. टिळकानी डेमॉक्रॅटिक स्वराज्य पक्ष स्थापन करून एक निवडणुकीचा जाहीरनामाही काढला. 'जे दिले आहे ते खिशात घालावे आणखी जास्त मिळवण्यासाटी हात पुढे करावा आणि चळवळ चालू ठेवावी' या धोरणाचा प्रसार करण्यास लो. टिळकानी सुरवात केली. याप्रमाणे १९०८ च्या जहाल पुढाऱ्यानी प्रतिगामी राष्ट्रवादाचा अव्यहार्य कार्यक्रम सोडून दिला आणि व्यावहारिक भूमिकेवरून ते बोलू लागले. कॉंग्रेसची गाडी पुरोगामी राष्ट्रवादाच्या सनदशीर रुळावर आणण्यात आली. परंतु देशातील किसान जनतेत असंतोष माजला होता. कामकऱ्यांच्या संपांची उठावणी सर्वत्र देशभर चालू होती. या बहुजनसमाजाचे नेतृत्व पत्करून स्वातंत्र्याचा लढा

पुढे रेटण्याचे सामर्थ्य पुरोगामी राष्ट्रवादात नव्हते. ते केवळ मार्क्सप्रणीत क्रांतीच्या तत्त्वज्ञानातच असू शकते.हे तत्त्वज्ञान अद्याप हिंदुस्थानात अवतीर्ण झालेले नव्हते. परंतु ‘ दुधाची तहान ताकावर भागवावी ’ या न्यायाने बहुजनसमाज महात्मा गांधींच्या दिसायला क्रांतिकारी पण अत्यंत प्रतिगामी अशा सत्याग्रही तत्त्वज्ञानाला बळी पडला. गांधीयुग सुरू झाले. आणि देशाचे राजकारण विचित्र दिशेने वाहू लागले. काँग्रेसमध्ये गांधीवादाचे प्रस्थ माजण्यास प्रारंभ झाला. अर्थात् गांधीवादाचा उहापोह करणे याउपर क्रमप्राप्तच आहे. ते पुढील प्रकरणी.

" Although somewhat unique in its idiosyncracies and fanaticism, the Gandhi cult is not an innovation. Divested of the rebellious spirit and the shrewd politician in him, Tilak would resemble Gandhi in so far as religious beliefs and spiritual prejudices are concerned. But for his versatility in modern thoughts and characteristic looseness of conviction, Bepin Chandra Pal would perchance, join the Mahatma in the passionate denunciation of everything that adds to the material comfort of man. Had he been more of a monomaniac than a profound thinker with metaphysical pre-occupations, Arabinda Ghose would subscribe to Gandhi's philosophy, which pretends to command a rushing tide; " thus for shalt thou go and no farther. "

"Gandhism is nothing but pettybourgeois humanitarianism hopelessly bewildered in the clashes of the staggering forces of human progress. The crocodile tears of this humanitarianism are shed ostensibly for the undeniable sufferings of the majority in capitalist society, but they are really caused by grief over the end of the old order, already destroyed or about to be so. Gandhism pines for that ancient golden age when the majority were kept in blissful ignorance in order that a few could roll in idle luxury, undisturbed by the revolt of the discontented; the spiritual culture of which was based on the barbarism of the people at large; the simplicity of which was the sign of its backwardness. "

Com. M. N. Roy.

रौलेट बिलाच्या चळवळीचे नेतृत्व महात्मा गांधीने पत्करले.तोपर्यंत हिंदी राजकारणाच्या आखाड्यात ते उतरलेले नव्हते. गांधीनी बहुजनसमाजाच्या चळवळीचा अनुभव दक्षिण आफ्रिकेत मिळविलेला होता. चंपारण्यातील शेतकऱ्यांच्या चळवळीत काम करीत असता त्याना बहुजनसमाजाच्या मनोवृत्तीची चांगलीच कल्पना आलेली होती. गांधीच्या या अनुभवाचा फायदा रौलेट बिल विरोधी चळवळीस झाला. युद्धोत्तर खेडा चंपारण्यातील शेतकऱ्यांच्या चळवळी आणि ठिकठिकाणी हिंदुस्थानामध्ये अश्रुतपूर्व असे घडून येत असलेले कामकऱ्यांचे संप यामुळे बहुजनसमाजात किती कमालीचा असंतोष माजला होता याची स्पष्ट कल्पना येते. या असंतोषात रौलेट बिलाची ठिणगी पडली. जहाल मवाळ हिंदुमुसलमान इत्यादि सर्व एक झाले, आणि त्यानी बिलाचा कसून निषेध केला. आतापर्यंत सभा भरवून सरकार विरोधी ठराव अगर निषेध करण्यापलिकडे कोणताच मार्ग हिंदी जनतेस अवगत नव्हता. नाही ह्मणायला १९०४ ते ८ पर्यंतच्या कालावधीत वंगभंगोत्तर झालेली चळवळ प्रत्यक्ष प्रतिकाराची होती यात शंका नाही.परंतु तिची झळ बंगाल महाराष्ट्राबाहेर पसरलेली अशी दृग्गोचर होत नाही. तिचे क्षेत्रही कनिष्ठ मध्यम वर्गापुरतेच मर्यादित होते. तिच्यात बहुजनसमाज सामील झालेला नव्हता. परंतु या रौलेट बिल विरोधी लढ्यात बहुजनसमाजास पाचारण करण्यात आले होते.रौलेट कायद्यासारखे कायदे मोडण्यासाठी हिंदी जनतेने शपथा घेण्यास प्रारंभ केला. देशभर हरताळ पाळण्यात आला. दडपशाहीचे कायदेहि मोडण्यात आले. हरताळाने राष्ट्रीय संपाची किंबहुना असहकारितेच्या चळवळीचीच मुहूर्तमेढ रोविण्यात आली. हरताळ यशस्वी होण्यास बहुजनसमाजात पसरलेला असंतोष हाच वस्तुतः कारण होता. पुढे बहुजनसमाजाच्या या असंतोषाच्या प्रचंड लाटेतूनच पंजाब प्रकरण उद्भवले. सारांश, असंतोषरूप दारूची कोठारे देशभर विखुरलेली होती. म. गांधीने या असंख्य कोठारावर ठिणग्या फेकण्याचे तेवढे कार्य केले.

देशभर भडका उडाला. नेमस्तांचे धाबे दणाणले. त्यानी ब्रिटिश साम्राज्यशाहीकडे धाव घेतली, आणि जाहीरनामा काढून हरताळाचा निषेध केला. मुंबई अहमदाबाद वगैरे औद्योगिक केन्द्रात हरताळ यशस्वी झाला. पंजाबामधील युद्धामुळे अत्यंत गांजलेल्या जनतेत चळवळीला ऊत आला. म. गांधी पंजाबच्या वाटेवर असता त्याना पकडण्यात आले. अहमदाबादेतील ५० हजार कापड कामगार आणि रेल्वे कामगार खवळला. पंजाबात सैन्य नेता येऊ नये, ह्मणून आगगाडीचे रस्ते उपटून काढण्यात आले. चळवळीला जोम चढला. बहुजनसमाज दंगाधोपा करून हिंसा करतो या सबबीवर गांधीनी रौलेट बिलविरोधी सत्याग्रह तहकूब केला. आणि जनतेच्या उत्साहावर विरजण घातले. यावरून एक गोष्ट मात्र सिद्ध झाली की गांधीजी हे बहुजनसमाजाचे पुढारी ह्मणून पुढे सरसावले असले तरी त्याना, हिंदी भांडवलशाहीचे पुढारी जे नेमस्त त्यांच्याप्रमाणेच सामान्य जनतेच्या उठावाची भीति वाटते आणि भांडवलशाही मालमत्तेची काळजी ही पण लागून राहते.

एकंदरीत आतापर्यंतची हिंदी राष्ट्रवादी चळवळ ही–मग ती पुरोगामी राष्ट्रवादाची असो किंवा प्रतिगामी राष्ट्रवादाची असो–हिंदी भांडवलशाहीच्या प्रगतीची चळवळ होय! दोन्हीहि राष्ट्रवाद्यांचे प्रयत्न प्रमुखपणे हिंदी यांत्रिक धंदे वाढण्यासाठी होते. त्यांच्या कार्यक्रमांत बहुजन-समाजाच्या मागण्या प्रतिबिंबित झालेल्या नव्हत्या. प्रातिनिधीक संस्था, आर्थिक स्वायत्तता, देशाच्या राज्यकारभारात उच्च अधिकारी जागा, आयात मालावर जकाती इत्यादि मागण्या फलद्रूप झाल्यापासून हिंदी भांडवलशाही आणि बुद्धिजीवि मध्यमवर्ग यांचाच तितका उत्कर्ष होण्याजोगा होता; बहुजनसमाजास कोणतीच फलनिष्पति होण्याजोगी नव्हती. पुरोगामी राष्ट्रवादी नेमस्त काय किंवा प्रतिगामी राष्ट्रवादी जहाल काय, दोहोंची मजल वरील मागण्यापलिकडे गेली नाही. जहाल मंडळी ही-सुद्धा हिंदी संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाचे गोडवे गात असता, राजकार-

णाच्या क्षेत्रात राष्ट्रीय भांडवलशाही हितसंबंधाच्या वरील मागण्यानाच अग्रस्थान देत होती. हे, जहालाग्रणी लाल, बाल आणि पाल यांच्या १९१६ नंतरच्या आचार उच्चारावरून स्पष्ट होते. सारांश, १९१८ पर्यंतचा हिंदी स्वातंत्र्याचा लढा हा, ब्रिटिश भांडवलदारांच्या अर्थात् साम्राज्यशाहीच्या आर्थिक आणि राजनैतिक मक्तेदारीविरुद्ध हिंदी मध्यम वर्गाचा लढा होय. या लढ्यात यश संपादन करण्यासाठी किंबहुना काही सवलती प्राप्त करून घेण्यासाठीसुद्धा बहुजनसमाजाच्या पाठिंब्याची त्या वर्गाला गरज होती. कारण,संख्येने तसाच आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या तो वर्ग दुबळा होता. तेव्हां बहुजनसमाजास आपल्या स्वतःच्या लढ्यात,राष्ट्रीयत्वाच्या नावाखाली, गुंतविणे मध्यम वर्गास भाग पडले. या लढ्यात हिंदी भांडवलशाहीस विजय मिळाला तरी, बहुजनसमाजास झीज सोसावी लागूनही ह्मणण्यासारखा भौतिक फायदा झाला नाही !

तथापि हिंदी भांडवलाच्या पेरणीमुळे होणाऱ्या हिंदी औद्योगिक विकासाने श्रमजीवि जनतेच्या जीवनात क्रांति घडून आली, आणि ती जनता राजकीय चळवळीत खेचली गेली. हिंदी भांडवलदार वर्गाच्या विकासामुळे भांडवलशाही आणि श्रमजीवि वर्ग यामधला वर्गविरोध सखोल तसाच स्पष्ट झाला. याचा परिणाम असा झाला की हिंदी स्वातंत्र्याचा लढा हा वरपांगी दिसायला बहुजनसमाजाच्या पाठिंब्याने चालविलेला असा राजकीय स्वरूपाचा दिसत असला तरी त्याचे अंतरंग वर्गयुद्धात्मक बनत चालले होते. ह्मणजे पिळणूक करणाऱ्या विरुद्ध पिळले जाणाऱ्यांचा उठाव हे अंतःस्वरूप त्या लढ्याला प्राप्त होत होते. एका बाजूला ब्रिटिश साम्राज्यशाही आणि तिचे अंकित हिंदी भांडवलदार, जमिनदार, संस्थानिक इत्यादि तर दुसऱ्या बाजूला हिंदी दलित वर्ग ह्मणजे शेतकरी, कामकरी आणि कनिष्ठ मध्यम वर्ग असे या लढ्यात दोन पक्ष प्रादुर्भूत होऊ लागले.

टिळक युगातले जहाल अर्थात् गांधी युगातले असहकारवादी हे

नेमस्तापेक्षा राष्ट्रीय चळवळींत बहुजनसमाजास खेचण्याकामी अधिक यशस्वी ठरले. जहालाना यश प्राप्त होण्यास कारण आर्थिक पिळणुकीमुळे बहुजनसमाजात जो असंतोष माजला होतां त्यातूनच जहालानी राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या मागणीचा लौकिक देखावा निर्माण केला. जहालांच्या सनातनी प्रवृत्ती आणि धार्मिक लहरी कशाही असोत, प्रत्यक्ष राजकारणाच्या आखाड्यात ते नेमस्ताशी सहमत होऊ शकतात हे वर दिग्दर्शित केलेले आहे.बहुजनसमाजाच्या स्वयंस्फूर्त उठावामध्ये हिंदी भांडवलशाहीला विजय संपादन करून देण्यास उपयोगी पडणारी शक्ति आहे हे जहालानी ताडले.पण बहुजनसमाजाच्या अंत:प्रेरणा आणि सामाजिक आकांक्षा याना अनुरूप असे त्या शक्तीचे नेतृत्व पत्करून बहुजनसमाजाच्या चळवळीतील सामर्थ्याचा विकास जहालानी घडवून आणला नाही. उलट बहुजनसमाजाच्या अज्ञानाचा पुरेपूर फायदा घेऊन राष्ट्रीय चळवळ बळकट करण्याच्या मोहास ते बळी पडले. जनतेच्या अज्ञानाचा फायदा घेण्याचा उत्कृष्ट मार्ग ह्मणजे राष्ट्रवादाचा धर्म बनविणे हा होय. राजकारणात धर्माचे प्रस्थ माजवू देणाऱ्या जहालांच्या डावपेचांचा परिणाम ह्मणजेच कॉंग्रेसमध्ये गांधीवादाचे वर्चस्व होय. जहालांच्या अध्यात्मप्रवण शिकवणुकीनेच गांधीवादाची पार्श्वभूमि तयार केली व म. गांधी हे हिंदी राजनैतिक क्षितिजावर चमकू लागले. त्यांच्यापुढे जहालमवाळादि इतर सर्व राजकीय आणि सामाजिक पुढारी लोपले. ह्मणून गांधीवादातच इतर सर्व राजनैतिक आणि सामाजिक प्रवृत्तींचा लोप झाला.पुरोगामी राष्ट्रवादातील क्रांतिकारी सामाजिक शक्तीचा नायनाट करण्याच्या हेतूनेच गांधीवाद अवतीर्ण झाला. गांधीवाद ह्मणजे हिंदुस्थाच्या इतिहासातील यच्चावत् प्रतिगामी शक्तींचा अतितीव्र आणि अत्यंत बेफाम असा आविष्कार होय.

अर्वाचीन हिंदुस्थानात राष्ट्रवादाचा उगम झाल्यापासूनच त्यात परस्परविरोधी अशा दोन प्रवृत्ती दृष्टिगोचर होतात. एक प्रवृत्ति

राजकारणात पुरोगामी पण समाजकारणात क्रांतिकारी आणि सतत तडजोडीच्या मार्गाने हिंदी राष्ट्राचा विकास घडवून आणू पाहणारी. दुसरी प्रवृत्ति परकीय सत्तेशी दिसायला सतत फटकून वागणारी पण सामाजिक प्रश्नांच्या बाबतीत प्रतिगामी अशी. पुरोगामी राष्ट्रवादाचे राजनैतिक तत्त्वज्ञान सुधारणावादी असले तरी पुरोगामी भांडवलशाही समाजरचना अस्तित्वात आणण्याबद्दल त्याचा खटाटोप असल्याकारणाने क्रांतिकारी परिस्थिति निर्माण करण्याच्या कामी तो सहाय्यकारी बनतो.परंतु क्रांतिवादी चळवळीचे नेतृत्व पत्करून क्रांति घडवून आणण्याचे सामर्थ्य त्या वादात आता उरलेले नव्हते. कारण निर्भेळ भांडवलशाही क्रांति घडून येण्याजोगी परिस्थिति आजच्या हिंदुस्थानात राहिलेली नव्हती. ह्मणजे हिंदी राष्ट्रीय चळवळी ही, उदयोन्मुख व्यापारी आणि व्यावसायिक मध्यम वर्ग व मरणोन्मुख सरंजामशाही या दोहोतील लढ्याचे फ्रेंच क्रांतिकालीन स्वरूप धारण करणे आता शक्य नव्हते. किंबहुना हिंदी भांडवलशाही ही कोणत्याच वर्गयुद्धात केव्हाही गुंतलेली नव्हती. १९१८ पर्यंत तिने काँग्रेसच्या द्वारे चालविलेली राष्ट्रीय चळवळ ह्मणजे कमकुवत व कुचंबित अशी हिंदी भांडवलशाही आणि अत्यंत प्रबळ व सर्वसत्ताधारी अशा ब्रिटिश साम्राज्यशाही या एकच वर्गाच्या दोन शाखा मधली निवळ चुरस होय! हिंदी सरंजामशाहीच्या गुलामगिरीतून उत्पादक वर्गाची सुटका करण्याचे ऐतिहासिक कार्य हिंदी मध्यम वर्गाच्या हातून ब्रिटिश साम्राज्यशाहीने दीडशे वर्षांपूर्वीच कसे हिरावून घेतले होते हे या ग्रंथारंभी विशद केले आहे. तेव्हा २० व्या शतकातला हिंदी भांडवलशाहीचा साम्राज्यविरोधी सामना अटितटिचा होणे केव्हाही शक्य नव्हते. कारण हिंदी भांडवलशाहीचा विकास व उत्कर्ष ही साम्राज्य–विनाशवरच अवलंबून नव्हती. किंबहुना साम्राज्यशाहीची मर्जी संभाळून आपला कार्यभाग साधून घेणे तिला अशक्य नव्हते. हिंदी भांडवलशाही ब्रिटिश भांडवलशाहीपुढे अत्यंत दुर्बल

ठरत असल्यामुळे तिचे राष्ट्रीय तत्वज्ञान (अर्थात् राष्ट्रवाद) कितीही पुरोगामी असले तरी, तिला आपले धोरण ब्रिटिश साम्राज्यशाहीशी जुळणारे ह्मणजे समन्वयात्मक (Compromising) ठेवण्याशिवाय गत्यंतर नव्हते. अनिर्वाह पक्ष ह्मणून भांडवलशाही संस्कृतीस हिंदुस्थानात थारा देऊ इच्छिणाऱ्या ब्रिटिश सत्तेपेक्षा, हिंदी सामाजिक आणि राजकीय पुनरुज्जीवन करू पाहणाऱ्या प्रतिगामी राष्ट्रवादाशीच पुरोगामी राष्ट्रवादाचे वैर जास्त असते. याखेरीज प्रतिगामी राष्ट्रवादाच्या वर्चस्वाखाली असो, किंवा वर्ग युद्धाच्या स्वयंस्फूर्त प्रेरणेमुळे असो, बहुजनसमाजाचा उठाव हा, आपल्या आर्थिक हितसंबंधांची व सामाजिक स्नेहसंबंधांची संपूर्णपणे जाणीव असणाऱ्या पुरोगामी राष्ट्रवाद्यांची छाति दडपून टाकतो. प्रतिगामी राष्ट्रवादाच्या नेतृत्वाखालचा उठाव हा सामाजिक आणि राजकीय पुनरुज्जीवनाच्या कार्यक्रमाने प्रेरित असल्यामुळे पुरोगामी राष्ट्रवाद्याच्या राष्ट्रीय औद्योगिकरणाच्या कार्यक्रमाला पायबंद घालतो. तर वर्गयुद्धमूलक क्रांतिवादाच्या नेतृत्वाखालील बहुजनसमाजाचा उठाव भांडवलशाही अर्थकारणाला खीळ घालतो. सारांश, हे दोन्ही तऱ्हेचे उठाव हे ब्रिटिश सत्तेपेक्षा हिंदी पुरोगामी भांडवलशाहीला भीतिजनक होत! ह्मणून पुरोगामी राष्ट्रवादी हे क्रांतीला चालना देणारे भांडवलशाही अर्थकारण देशात प्रचलित करण्यास धडपडत असले तरी, बहुजनसमाजाच्या चळवळीचे रान उठवून तिचे नेतृत्व पत्करण्यास ते राजी नसतात. इतकेच नव्हे, तर भांडवलशाहीचा शांतिपूर्ण उत्कर्ष करणाऱ्या भांडवलशाही संस्थावर अशा चळवळी घाव घालीत असल्यामुळे, त्या चळवळी उपस्थित झाल्यावेळी साम्राज्यशाहीच्या संरक्षक छत्राखाली दडून बसण्याशिवाय त्याना गत्यंतर नसते.

प्रतिगामी राष्ट्रवादाची गोष्ट तशी नाही. भूतकालाचा व परंपरेचा उदोउदो करणारा प्रतिगामी राष्ट्रवाद जनतेच्या लक्षात लौकर भरतो. त्याबद्दल अज्ञ जनतेला जिव्हाळा वाटत असल्यामुळे तो तिला चेतवू शकतो.

अज्ञ जनता सनदशीर लोकशाहीपेक्षा धर्मप्रवण राष्ट्रवादाला लगेच पाठिंबा देते, परंतु त्या राष्ट्रवादाच्या प्रतिगामी प्रवृत्तीमुळेच परकीय सत्तेचा पाया हादरून सोडून जनतेला पुढील विकासक्रमाच्या मार्गास लावण्याजोगे प्रभावी असे क्रांतिकारी सामर्थ्य त्या राष्ट्रवादात नसते. तथापि वर स्पष्ट केल्याप्रमाणे बहुजनसमाजाच्या राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व पत्करण्यास पुरोगामी राष्ट्रवादी कचरल्यामुळे साहजिकच क्रांतिवादी नेतृत्वाच्या अभावी, धर्म आणि संस्कृति यांच्या नावाखाली परकीय सत्तेविरुद्ध जनतेस चेतवून तिचे नेतृत्व काबीज करण्यास प्रतिगामी राष्ट्रवाद्याना आयतेच फावले! यामुळे बहुजनसमाजाच्या चळवळीत अंतर्विरोध निर्माण होऊन स्वातंत्र्य लढ्याची हानिच झाली. साम्राज्यशाही पिळणुकीमुळे बहुजनसमाजातील सहनशीलता व धार्मिक धिमेपणा ही पार उडून जात होती; उलट प्रतिगामी गांधीवादी नेतृत्व हे अहिंसेची अफू चारून कॉंग्रेसच्याद्वारे समाजास आर्थिक दुःखे सोसण्यास प्रोत्साहन देत होते. सारांश, गांधीवादी नेतृत्व हे बहुजन समाजातील क्रांतिकारक शक्ती दडपून टाकण्यास पुढे सरसावले. ह्मणजे एका बाजूने आर्थिक हलाखीमुळे जनतेची दैववाद, ईश्वरवाद इत्यादि दुबळ्या तत्त्वज्ञानावरील श्रद्धा उडून जात होती, इतकेच नव्हे तर तिच्यात क्रांतिप्रवण शक्ती संचार करीत होत्या, तर दुसऱ्या बाजूने गांधीवाद हा जनतेस सत्य अहिंसेची कास धरण्यास व ईश्वरावर भार टाकून अंधश्रद्धेने स्वस्थ बसण्यास शिकवीत होता. तुफान वेगाने प्रगतिपथ आक्रमू पाहणाऱ्या क्रांतिरूप वाहनास गांधीवादाचा ब्रेक मागे खेचीत होता! तेव्हा अशा परिस्थितीखाली हिंदी राष्ट्रीय चळवळ गेल्या दोन दशकात काहीच प्रगति करू शकली नाही, एवढेच नव्हे तर, अखिल हिंदी जनतेला वरपांगी क्रांतीची भाषा बोलून, खरोखर अंधारात चाचपडत ठेवण्यास ती कारणीभूत झाली यात नवल कसचे? गांधीवादाचे वर्चस्व जनतेला मागसलेल्या मनुकालीन प्राथमिक युगाकडे नेऊ शकत

नाही, हे जरी खरे असले तरी जनतेची दिशाभूल होऊन ती दिङ्मूढ होते; तिची विचार शक्ति नष्ट होते व पुढील प्रगतीचा किंबहुना राष्ट्रीय स्वातंत्र्याचा मार्ग कसा चोखाळावा हे तिला समजेनासे होते. तेव्हा जनतेची खच्ची करून तिच्या क्रांतिवेगाला सतत बावीस वर्षे थोपवून धरणारा गांधीवाद ह्मणजे काय चीज आहे याचे विश्लेषणात्मक विवेचन करणे क्रमप्राप्तच आहे. वर प्रकरणारंभी कॉ. मानवेन्द्रनाथ रॉय यांच्या १९२२ साली लिहिलेल्या 'संधिकालीन हिंदुस्थान' या ग्रंथातील जो उतारा दिलेला आहे, त्यास गांधीवादाचा काढलेला अर्क ह्मणता येईल. त्याचा अनुवादः–" विक्षिप्तपणा आणि कडवेपणा यात गांधीपंथ हा अद्वितीय असला तरी, तो काही गांधींनी नव्याने या देशात आणला असे ह्मणता येणार नाही. बंडखोरी जोम आणि राजनैतिक धूर्तपणा हे टिळकांचे विशेष गुण न विसरता, धार्मिक श्रद्धा आणि अध्यात्मिक पूर्वग्रह याबाबतीत टिळक आणि गांधी समसमान होते असे ह्मणण्यास प्रत्यवाय कोणता? आधुनिक विचारांची बहुविधता आणि मतचांचल्य हे पालबाबूंचे विशेष, विशेष ध्यानात धरूनही, मानवी भौतिक सुखवर्धन करणाऱ्या गोष्टींचा विरोध करणाच्या बाबतीत ते गांधींची साथ धरतील असे विधान केल्यास अवास्तव ठरणार नाही. अरविंद बाबू हे पूर्वग्रहदूषित आध्यात्मिक विचारात विलीन होण्यापेक्षाही जास्त एकनादी बनले असते तर, क्रांतीच्या प्रचंड ओघाला थोपवून धरणाऱ्या गांधी तत्त्वज्ञानाचाच त्यानी पाठपुरावा केला असता! मानव समाजाच्या प्रगतिसाठी धडपडणाऱ्या शक्तींच्या झगड्यात बेभान गोंधळून गेलेला कनिष्ठ मध्यम वर्गीय भूतदयावाद ह्मणजेच गांधीवाद. या भूतदयावादाचे नक्राश्रू वरपांगी भांडवलीशाही समाज रच-नेतील बहुसंख्यांच्या निःसंदिग्ध हाल अपेष्ठासाठी गाळिले जातात, पण त्या अश्रूस जुन्या जीर्ण झालेल्या समाज–पद्धतीचा सावकाश चालू असलेला अंत हाच वास्तविक कारणीभूत असतो! ज्या युगात असंतुष्ट जनतेच्या

बंडाचा बाध न येता मूठभर लोकाना खुशाल चैनीत लोळता यावे ह्मणून बहुसंख्य जनतेस आनंदमय अज्ञानात डांबले जाते, बहुतेक सर्व जनतेच्या रानटीपणावर ज्या युगातली संस्कृति आधारली जाते, ज्या युगातला साधेपणा ह्मणजे मागासलेपणाचे चिन्ह होय, अशा प्राचीन सुवर्ण युगाची पुनरावृत्ति व्हावी ह्मणून गांधीवाद हा खंगत असतो."

१९०८ साली म. गांधी दक्षिण आफ्रिकेत असता, त्यानी अप्रतिकारात्मक आणि आत्मबलात्मक अशा आपल्या तत्त्वज्ञानाची मांडणी आपल्या 'इंडियन होम रूल' या ग्रंथात केलेली आहे. त्या ग्रंथात त्यानी प्राश्चात्य संस्कृतीचा पुरेपूर धिक्कार केलेला असून हिंदी मध्ययुगीन ग्रामसंस्कृतीचा जोमाने पुरस्कार केलेला आहे. गांधीजी ह्मणतातः—

"I feel that if India would discard modern civilisgation, she can only gain by doing so. If India adopted the dootrine of love as an active Part of her religion and introduced it in her politics, Swaraj would descend upon India from heaven"
या गांधीजींच्या ह्मणण्याचा आशय हा की, पाश्चात्य अर्वाचीन संस्कृतीची उभारणी हिंसेवर झालेली असल्यामुळे ती हिंदुस्थानास त्याज्य होय! प्रीतीवर ह्मणजेच अहिंसेवर आधारलेली जी हिंदी संस्कृती तिचाच अंमल हिंदुस्थानात व्हावा. ह्मणजे स्वराज्य स्वर्गातून हिंदुस्थानावर एखाद्या माळेप्रमाणे गळून पडेल. यावरून गांधीजींचा रोष हा ब्रिटिश सरकारवर नसून त्या सरकारच्याद्वारे हिंदुस्थानात अवतीर्ण झालेल्या पाश्चात्य संस्कृतीवर आहे हे स्पष्ट होते. अर्थात् पाश्चात्य संस्कृति हिंदुस्थानात आणण्याचा किंवा तिचा प्रसार करण्याचा खटाटोप जर हिंदी सरकार करील तर तेही सरकार गांधीजीना ब्रिटिश सरकाराइतकेच अमान्य होईल. भांडवलशाही संस्कृतीचा मनापासून तिटकारा मानणाऱ्या व्यक्तीच्या हाती भांडवलशाही समाजरचना अस्तित्वात आणू पाहणाऱ्या चळवळीची सूत्रे असावीत यापेक्षा असंबद्ध वस्तुस्थिति ती कोणती! यावरून हिंदी स्वातंत्र्याचा लढा पुढे रेटण्यासाठी

त्या लढ्याची गांधीवादापासून मुक्तता करणे अत्यवश्य आहे हे निःसंदिग्ध होत नाही काय ?

अर्वाचीन भांडवलशाही समाजरचनेवर गांधीजी जी टीका करतात ती रास्त आहे. पण तिजवर जो उपाय ते सुचवितात तो केवळ चुकीचाच आहे असे नसून तो अशक्य कोटीतलाही पण आहे. हल्लीच्या समाजव्यवस्थेवर टीका करणारा भावनात्मक भूतदयावादी किंवा धर्मवेडा असला पाहिजे अशातली गोष्ट नाही. भौतिक आणि सामाजिक शास्त्रांचे ज्याना ह्मणून ज्ञान आहे, त्याना गांधी आणि त्यांचे आंतराष्ट्रीय बांधव यांच्या भूतदयेत किंवा धर्मशीलतेत घातुक प्रतिगामी शक्ती चांगल्या खोलवर वावरत असलेल्या आढळून येतात! आता गांधीवादातील काही तत्त्वे घेऊ आणि त्यांचे खरेखुरे सामाजिक स्वरूप उघडकीस आणू. गांधीजी ह्मणतात:–" आह्मी इंद्रियांचे चोचले पुरवू लागलो, ह्मणजे ती बिन्लगामी घोड्याप्रमाणे सैरावैरा धावू लागतात. ह्मणून आमच्या पूर्वजानी विषयोपभोगास मर्यादा घातली. बहुतांशी सुख ही एक मानसिक अवस्था आहे हे त्याना आढळून आले. मनुष्य श्रीमंत असला ह्मणजे सुखी असतोच असे नाही; किंवा दरिद्रि असला ह्मणजे तो बहुशा दुःखी होतोच असे ह्मणता येणार नाही. कोट्यावधी लोक हे नेहमी दरिद्रीच असणार. हे सर्व लक्षात घेऊनच आमच्या पूर्वजानी आह्मास चैनीपासून आणि विषयोगापासून परावृत्त केले." हे दारिद्र्याचे दांभिक तत्त्वज्ञान सर्वांच्या परिचयाचे आहे. ज्यांची भविष्ये इतिहासाने खोटी ठरविलेली आहेत, अशा अनेक भविष्यवाद्यांनी हे तत्त्वज्ञान पढविलेले आहे. इतकेच नव्हे, तर त्यांचा भूतदयावाद हाही साशंक ठरलेला आहे! मानवाने मानवाच्या चालविलेल्या पिळणुकीवर आधारलेल्या विविध युगातील विविध तऱ्हेच्या आर्थिक हितसंबंधांच्या संरक्षणाची हमी घेणे, हे एकच कार्य या दांभिक तत्त्वज्ञानाने साधलेले आहे. दरिद्री जनतेने दारिद्र्यात कायमचे समाधान मानण्यानेच

त्याना पिळून काढणाऱ्या श्रीमंत जनतेची कायमची चंगळ चाल-णारी आहे.

भांडवलशाही समाजरचना कुसलेली आहे; पण ती अपरिहार्य आहे. तथापि ती नित्य शाश्वत आहे असे समजण्याचे कारण नाही. समाज-विकासाच्या अनुक्रमात योग्यवेळी तीही पण नाश पावणार आहे. ज्याप्रमाणे तत्पूर्वीच्या समाज रचनेचे स्थान तिने पटकाविले, त्याचप्रमाणे नव्या समाजरचनेस ती आपले स्थानही मोकळे करून देणार आहे. भावनात्मक भूतदयावाद्याना भांडवलशाही समाजव्यवस्था निर्दयता आणि अन्याय यानी पूर्ण भरलेली आहे असे आढळून येते ह्मणून ती कोलमडून पडेल अशातला भाग नाही. अंतर्गत विरोधाच्या दडपणाखालीच तिचा चकाचूर होणार आहे. भांडवलशाही समाजरचना आह्मास हवी असो वा नसो, त्या अवस्थेतून जाणे मानव जातीस अवश्यक आहे. मानव जातीच्या नैतिक आणि भौतिक बंधनांचा निरास होऊन मानवाना संस्कृतीचा उच्च दर्जा गांठण्यासाठी प्रयत्न करण्यास अनुकूल परिस्थिति भांडवलशाही समाजसंस्कृति प्राप्त करून देते. तेव्हा राष्ट्रीय स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर हिंदुस्थान मागे वळणार नाही, तर जोमाने पुढे पाऊल टाकण्यास सज्ज होईल. भांडवलशाही समाजव्यवस्थेत काही अभिजात दोष आहेत हे खरे आहे. परंतु पितृप्रधान किंवा सरंजामी समाजव्यवस्थेतील गांधीप्रिय संस्कृतीपेक्षा भांडवलशाही संस्कृति निःसंशय सुधारलेली असते. म. गांधी व त्यांच्या विचारसरणीचे तत्त्वज्ञानी यांच्या इच्छाप्रयत्नास न जुमानता हिंदी समाज हा भांडवलशाही संस्कृतीकडे वेगाने दौडत आहे. त्यास मागे खेचू पाहणे ह्मणजे नदीस आपल्या उगमा-कडे परतविण्याचा वायफळ प्रयत्न करण्यासारखे आहे. याप्रमाणे गांधीवाद हा हिंदी राष्ट्रवादास मारक आहे.

अशाप्रकारे गांधीवाद हा प्रगतिप्रतिबंधक असल्यामुळे हिंदी राष्ट्रवादाच्या तत्त्वज्ञानाची बैठक बनविणे त्याला अशक्य झालेले आहे. राष्ट्रवादाचे क्रांतिकारी स्वरूप त्यास विरोधक ठरते! इतके असूनही गेली बावीस वर्षे गांधीवादाने किंबहुना गांधी या व्यक्तीने हिंदी राष्ट्रीय चळवळीत इतके थैमान घातले आहे की त्याला इतिहासात दुसरी तोड नाही. ज्या काळांत शेतकरी, कामकरी आदिकरून बहुजनसमाज कॉंग्रेसच्या झेंड्याभोवती गोळा होत होता, त्याचकाळात अत्यंत प्रतिगामी आणि प्रतिक्रांतिकारक अशा शक्तींच्या दडपणाखाली कॉंग्रेसची व तिच्याद्वारे चाललेल्या प्रचंड राष्ट्रीय चळवळीची वाताहत व्हावी हे देशाचे दुर्दैव नव्हे तर काय?

१९१९ सालापासून कॉंग्रेस ही संस्था बहुजनसमाजाची बनत चालली. त्यावेळेपासून कॉंग्रेसपुढे बहुजनसमाजाचा कार्यक्रम ठेवण्यास हवा होता. म. गांधींचा असहकारतेचा कार्यक्रम हा भावनात्मक आणि अव्यवहार्य असा होता. त्या कार्यक्रमामुळे देशात प्रचंड खळबळ उडाली तरी, बहुजनसमाजाची संघटना झाली नाही. विद्यार्थ्यांनी शाळा कॉलेजे सोडणे, वकीलांनी कोर्टाची पायरी न चढणे, आणि आमदारानी कायदे मंडळावर बहिष्कार घालणे या बहिष्कारत्रयीचा आणि बहुजनसमाजाचा काही एक संबंध नव्हता. जनता जागृत झाली पण फलनिष्पत्ति काही झाली नाही. उन्हाळ्यातील ढगाप्रमाणे चळवळीने गडगडाट केला परतु पाऊस पडला नाही. यावेळी राष्ट्रीय संप पुकारला जाणार; करबंदीचा कार्यक्रम अमलात आणला जाणार; सामुदायिक कायदेभंगास सुरवात होणार; सरकारला पेचात पकडले जाणार; एका वर्षांत स्वराज्य मिळणार; इत्यादि भुलथापा जनतेला दिल्या गेल्या. पण सामुदायिक सत्याग्रहाची तशीच करबंदी वेळ आली असता चौरी चौराच्या दंग्याचे निमित्य करून राष्ट्रीय चळवळ बंद पाडण्यात आली. जनतेच्या उत्साहावर विरजण घालण्यात आले. आणि देशभर निराशेचा अंधार पसरला. असंख्य विद्यार्थ्यांनी शाळा–कॉलेजे सोडली, हजारो वकीलांनी आपली

बहुमूल्य व्यवसायावर पाणी सोडले; शेकडो आमदारानी कौन्सिल बहिष्कार अमलात आणला. पण या जनतेच्या स्वार्थत्यागाचे फळ काय? तर बारडोलीचा नेभळट कार्यक्रम की ज्या कार्यक्रमाने जनतेतील प्रतिकारी शक्ति व क्रांतिकारी मनोवृत्ति ही नामोहरम व्हावीत! जी जनतेतील क्रांतिकारी शक्ति सरकारच्या दडपशाहीपुढे बेदाद ठरली, तिची बारडोलीच्या विधायक कार्यक्रमाच्या ठरावाने खच्ची केली. दासबाबूने ह्मटल्याप्रमाणे जनतेने स्वार्थत्यागाची कमाल केली पण 'you bungled and mismanaged' 'तुह्मी घोडचुका करून चळवळीची वाताहत केली.' हे वाक्य पर्यायाने गांधीनाच उद्देशून होते. अद्यापही त्या बारडोलीच्या नादान विधायक कार्यक्रमाचे कॉंग्रेसमध्ये स्तोम माजविले जाते. त्या कार्यक्रमाने केवळ राष्ट्रीय चळवळच हाणून पाडली असे नसून, बहुजनसमाजाने आपल्या चळवळीने निर्माण केलेल्या कॉंग्रेससारख्या क्रांतिकारी संस्थेच्या नरडीचा घोट घेतला. असो.

१९२० ते १९२२ पर्यंतच्या अवधीत संबंध देशभर जो क्रांतिकारी उठाव झाला, त्याचा बीमोड होण्यास सरकारची दडपशाही कारण झाली नाही तर गांधीप्रणीत राष्ट्रीय चळवळीचे तत्त्वज्ञान हेच त्या उठावाचा निःपात करण्यास कारणीभूत बनले होते. क्रांतीची धुरा ज्या मूठभर लोकांच्या हाती होती, तेच मुळी क्रांतिविरोधी होते. "The movement was within an ace of success;" "mightiest empire was almost on its knees" "चळवळ ही अगदी विजयाच्या टप्प्यांत आलेली होती;" "प्रबलतम साम्राज्य गुडघेटेकीस आलेले होते." असे उद्गार केवळ राष्ट्रीय पुढाऱ्यानीच काढले अशातली गोष्ट नसून तत्कालीन मुंबईचे गव्हर्नर जार्ज लॉईड यानीसुद्धा आपल्या कर्तृत्वाची शेखी मिरवीत असता याच मासल्याचे शब्द उच्चारलेले होते. चळवळीची अशी जी वाताहत झाली, त्याबद्दल गांधी किंवा तत्सम एक दोन पुढाऱ्याना दोष देण्यात अर्थ नाही. तर समाजातील उच्च वर्गांच्या हितसंबधाना हा प्रचंड जानपद उठाव धोका

आणणारा होता, ह्मणून त्या उठावाची परिणति क्रांतीत होऊ नये याची खबरदारी त्या वर्गाच्या काँग्रेसमधील पुढाऱ्यानी घेतली. खरे पाहिले असता सरकार हे १९२१ च्या चळवळीचा पराभव करूच शकले नाही. जनतेचा क्रांतिकारी उत्साह दडपशाहीस दाद देत नाहीसे पाहून सरकार अगदी गोगलगाय बनलेले होते. अशाप्रसंगी बारडोलीचा कार्यक्रम पुढे करून अहिंसेच्या नावाने माघार घेण्यास काहीच कारण नव्हते. अहमदाबाद काँग्रेसने सामुदायिक कायदेभंग पुकारला असता, तर जनतेने त्यात प्रचंड उत्साहाने भाग घेतला असता. सारांश, बहुजनसमाज क्रांतीच्या द्वारात येऊन ठाकला असता पुढाऱ्यानी त्यास दगा दिला! नाही तर काँग्रेसमधील लोकशक्तींचा संघटित उठाव सरकारच्या लष्करी सामर्थ्यासही धाब्यावर बसवू शकताच अशी वेळ तेव्हा येऊन ठेपली होती.

परंतु काँग्रेसचे पुढारी हे पहिल्यापासून जनतेच्या क्रांतिकारी चळवळीस बिचकत होते. ह्मणून शेतकरी, कामकरी आदिकरून बहुजनसमाजास चेतवून त्यास क्रांतिप्रवण करणारा कार्यक्रम काँग्रेपुढाऱ्यानी जनतेपुढे मांडलाच नाही. असहकारितेचा कार्यक्रम अव्यवहार्य आणि अहिंसेने नियंत्रित असा होता. सर्वसामान्य राष्ट्रीय संपाची पार्श्वभूमि किंवा पूर्व–तयारी या दृष्टीने असहकारितेचा कार्यक्रम योग्य होता. परतु चौरंगी बहिष्काराचा असहकारितेचा कार्यक्रम शेतकरी कामकरी वगैरे दलित जनतेच्या सार्वत्रिक संपापासून अलिप्त ठेवण्यात आलेला होता. शेतकरी आणि कामकरी या बहुजनसमाजाच्या दैनंदिन गाऱ्हाण्यावरती तसाच आकांक्षावर त्या कार्यक्रमाची उभारणी झालेली नव्हती, ह्मणून लढा सतत चालू ठेवण्याबद्दल आस्थाही पण शेतकरी–कामकऱ्यामध्ये उत्पन्न होणे शक्य नव्हते. कलकता काँग्रेसच्या जादा अधिवेशनात पास झालेल्या असहकारितेच्या ठरावात, देशभर बंडे करणाऱ्या शेतकऱ्याना अनुलक्षून असा कोणताच कार्यक्रम समाविष्ट करण्यात आलेला नव्हता. त्यात करबंदीचा उल्लेख होता. करबंदी

ह्मणजेच खंडबंदी अशी शेतकऱ्यांची समजूत होऊन ते असहकारितेच्या चळवळीत सामील झाले.

युद्धखर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी वाढविलेल्या करांचे ओझे आणि महागाई यामुळे गांजून असंतुष्ट पावलेला शेतकरी वर्ग बंडास प्रवृत्त झालेला होता. या शेतकऱ्यांच्या बनलेल्या बंडखोर प्रवृतीस अनुसरून असहकारितेच्या चळवळीस वळण देणे अवश्य होते. परंतु कलकत्ता काँग्रेसने शेतकरी व कामकरी यांच्यापुढे कोणताच कार्यक्रम ठेवला नव्हता. १९२१ च्या डिसेंबर महिन्यात युवराजांची स्वारी इकडे आल्यावेळी कामगार वर्गाने हरताळात भाग घेऊन हिंदुस्थानातील बहुतेक सर्व शहरात तो यशस्वी करून दाखविला, हे कामकऱ्यांच्या असंतुष्ट मनाःप्रवृत्तीचे तत्कालीन प्रतीक होते. परंतु याचवेळी काँग्रेसचे सर्वाधिकारी म. गांधी हे अहिंसेच्या नावाखाली असहकारितेच्या चळवळीमागील शेतकरी कामकऱ्यांच्या प्रचंड शक्तीना हतबल करण्यास पुढे सरसावले. असहकारितेचा कार्यक्रम कसाही असो, स्वराज्याखाली किंवा 'गांधीराज्याखाली' आपली जमिनदार सावकाराच्या पिळणुकीपासून मुक्तता होणार अशी भावना शेतकऱ्यानी करून घेतली. त्यामुळे शेतकरी वर्गात एक प्रकारचे चैतन्य खेळू लागले. पण हा शेतकरी कामकऱ्यांचा उत्साह म. गांधीच्या हळुवार अहिंसात्मक मनोरचनेस पचण्यासारखा नव्हता. लागलाच बारडोलीचा विधायक कार्यक्रम गांधीनी पुढे केला. त्या कार्यक्रमाच्या खडकावर जनतेच्या उत्साहाचे तारू आपटून त्याचा चुराडा उडाला. सारांश, सरकारच्या दडपशाहीने असहकारितेची चळवळ पराभूत केली नाही. तर अंतर्गत विरोधामुळे तिची अशी दुर्दशा झाली. कारण, काँग्रेसचे पुढारी पडले जमिनदार भांडवलदार वर्गाचे प्रतिनिधी; त्याना क्रांतीकडे खेचणारा दलित जनतेचा उत्साह असह्य झाला हेच खरे.

उध्वस्त झालेल्या असहकारितेच्या चळवळीच्या अवशेषातूनच पुढे दासबाबूंच्या स्वराज्य पक्षाचा उदय झाला. बहुजनसमाजापासून त्याची

तातातूट झाल्यामुळे त्या पक्षात आता असहकारितेमधला राजनैतिक जोम राहिलेला नव्हता. तथापि चळवळीतील असंतुष्ट शक्तींना कोठेतरी वाव हवा होता. तो स्वराज्य पक्षाच्या पार्लमेंटरी विरोधाच्या कार्यक्रमात थोडाबहुत मिळू लागला. स्वराज्य पक्षापासून देशाचा एवढाच फायदा झाला की काँग्रेस ही संस्था चरखालय किंवा प्रार्थनामठ बनणार होती, त्या अवस्थे-पासून स्वराज्यपक्षाने नेमस्तांच्या सनदशीर राजकारणाची पुनश्च प्रतिष्ठापना केली. एका अर्थाने शत्रूवर बहिष्कार घालून त्याला परिस्थितीचा संपूर्ण स्वामी बनू देण्यापेक्षा त्याच्या कार्यक्षेत्रात घुसून लढा चालविणे जास्त उत्सा-हजनक व परिणामकारक असते. पण पार्लमेंटरी लढ्यास बाहेरील जनतेच्या उठावाची जोड दिल्याशिवाय तो फलप्रद होऊ शकत नाही. विशेषतः हिंदुस्थानातल्या बेगडी पार्लमेंटातील ह्मणजे कायदे कौंसिलातील असला एकांगी लढा तर अगदीच निष्फळ ठरतो. तथापि स्वराज्यपक्षाने आपले शक्तिसर्वस्व पार्लमेंटरी चळवळीवर वेचले. याचा परिणाम असा झाला की साम्राज्यशाही ही राष्ट्रवादी शक्तीपासून विनशर्त शरणागतीची अपेक्षा करू लागली. राष्ट्रीय चळवळीतील कमकुवतपणा, समन्वयवृत्ति, प्रतिगामित्व इत्यादि दोषामुळे १९२१–२२ च्या प्रचंड चळवळीची वाताहत झाली आणि स्वराज्यपक्षाच्या भपकेबाज पार्लमेंटरी लीलाही निरर्थक ठरल्या. ही वस्तुस्थिति आकस्मिकपणे किंवा एकाद्या व्यक्तीच्या इच्छेनुरूप घडून आली असे ह्मणता येणार नाही. राष्ट्रीय चळवळीतील वर्गमूलक परस्पर विरोधी अशा हितसंबंधांचा तो परिणाम आहे. युवराजाच्या भेटीच्यावेळी कामगारांच्या संपांची जी उठावणी झाली किंवा बारडोली सत्याग्रहप्रसंगी शेतकऱ्यांचा जो उठाव होणार होता, त्याना जो पायबंद घालण्यात आला त्यातच वर्गविरोधाचे स्वरूप अगदी स्पष्ट झाले. कामकऱ्यांच्या संपाविरुद्ध काँग्रेसने भांडवलदारांची बाजू घेतली आणि बारडोलीस रचनात्मक कार्य-क्रमाचा ठराव पास करून शेतकऱ्यांच्या उत्साहाचे मातेरे केले. स्वराज्य

पक्षाचीही अशीच गत झाली. शेकडा ९८ हिंदी जनतेला स्वराज्य प्राप्त करून देणार अशा दिमाखाने स्वराज्यपक्ष उदयास आला;पण एका वर्षाच्या आतच शेकडा दोन इतके असणाऱ्या जमिनदार–भांडवलदारांचे त्या पक्षाने नेतृत्व पत्करिले.कायदेमंडळात प्रतिकाराचा देखावा निर्माण करण्यासाठी त्या पक्षास नेमस्ताशी गट्टी करावी लागली;बहुजनसमाजाशी असलेल्या संबंधाचे मोल द्यावे लागले; भांडवलशाही हितसंबंधाखेरीज इतर सर्व गोष्टी आपल्या कार्यक्रमातून वगळाव्या लागल्या. याशिवाय दुसरा एक मार्ग स्वराज्य पक्षास मोकळा होता. तो ह्मणजे देशात बहुजनसमाजाच्या चळवळीचे रान उठवून तदनुरूप पार्लमेंटरी लढा चालविणे हा. पण हा मार्ग क्रांतिप्रत नेणारा होता. स्वराज्य पक्षाचा जन्म हाच आधी बहुजनसमाजाच्या चळवळीस बाजूस सारणाऱ्या क्रांतिविरोधी मनोवृत्तीतून झाला होता; क्रांति विरुद्ध सनदशीर सुधारणा हाच तर त्या पक्षाचा दंडक होता हे थोड्याच अवधीत स्पष्ट झाले.

प्रारंभी प्रारंभी तर ब्रिटिश सरकारला स्वराज्य पक्षाचे भय वाटत होते. बहुजनसमाजाच्या चळवळीचा पाठिंबा घेऊन कौन्सिलांतर्गत लढा स्वराज्य पक्ष चालवील अशी सरकारला धास्ती होती. पण कायदेमंडळात स्वराज्य पक्षाने पदार्पण केल्याबरोबर त्याचे धोरण पालटले व तो पक्ष हा पक्का सुधारणावादी ह्मणजेच नेमस्त बनला. स्वराज्य पक्षाने अडवणुकीचा मार्ग ह्मणजे पुणेकरांच्या शब्दात कौन्सिलात घुसून घासण्याचा पंथ पत्करला. तरी तो निष्फळ ठरला. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या केसालाही धक्का पोचला नाही. ती आपल्या ताठरपणात स्वस्थ होती व चळवळीचा बीमोड करण्यास योग्य संधीची वाट पहात होती. चळवळ उखडून काढण्यास सरकारने आणखी एक उपाय योजिला. त्यामुळे स्वराज्य पक्षाची तर कंबरच खचली. तो म्हणजे समाजातील वरिष्ठ वर्गाला विशेषतः अत्युच्च हिंदी भांडवलशाहीला आर्थिक सवलतींची लांच देऊन आपलेसे करावयाचे. एका बाजूस बहुजनसमाज चळवळीपासून अलिप्त ठेवण्यात आला होता, त्यामुळे स्वराज्य

पक्षाविषयी सरकार निर्धास्त बनले, तर दुसऱ्या बाजूस आर्थिक सवलती बहाल करून नेमस्त पक्ष, स्वतंत्र पक्ष, आणि प्रतिसहकार पक्ष (स्वराज्य पक्षाचाच केळकर जयकरानी तोडून घेतलेला एक भाग) याना स्वराज्य पक्षापासून अलिप्त करण्यात आले. अशाप्रकारे एकाकी पडलेल्या स्वराज्य पक्षाला सरकारशी 'सन्माननीय समेट' करण्याशिवाय गत्यंतर नव्हते ! पण साम्राज्यशाहीस स्वराज्य पक्षाची बिनशर्त शरणागति हवी होती. सारांश, क्रांतीच्या भीतीने स्वराज्य पक्षाने बहुजनसमाजास दूर सारिले व वरिष्ठ हिंदी भांडवलशाहीस मिठी मारली. आर्थिक सवलती देऊन सरकारने त्या भांडवलशाहीस आपल्याकडे खेचून घेतले. स्वराज्य पक्षास त्रिशंकूप्रमाणे अधांतरी राहण्याचा प्रसंग येऊन त्याची वाताहत झाली. स्वराज्य पक्ष हा बहुजनसमाजाच्या असहकार चळवळीचाच अवशेष होता. त्याची अशी विल्हेवाट होऊन १९२०–२१ च्या बहुजनसमाजाच्या प्रचंड आंदोलनाचा अशाप्रकारे खेदजनक शेवट झाला.

एकंदरीत या वस्तुस्थितीपासून ब्रिटिश साम्राज्यशाहीचे आसन अधिक दृढतर झाले. हिंदी वरिष्ठ भांडवलशाहीला टॅरिफच्या आर्थिक सवलती देऊ केल्यामुळे साम्राज्यशाहीच्या हिंदुस्थानातील राजसत्तेला कोणत्याही प्रकारचा बाध तर आलाच नाही; उलट लांचखाऊ हिंदी भांडवलशाहीचा तिला पूर्ण पाठिंबा मिळाला. शिवाय हिंदुस्थानास केवळ कृषिजीवि ठेवून आता ब्रिटिश साम्राज्यशाहीचे भागण्याजोगे नव्हते. त्याच्या औद्योगिकरणास प्रारंभ करणे हेच ब्रिटनला याउपर किफायतशीर होते. हिंदुस्थानात ब्रिटिश भांडवल गुंतवून उद्योगधंदे उठविण्याने हिंदुस्थानातील अतिस्वस्त श्रम आणि कच्चा माल यापासून अलोट नफा प्राप्त करून घेण्याची यावेळी ब्रिटनला अतिगरज भासत होती. यायोगे हिंदी जनतेची विक्रय शक्ति वाढून ब्रिटिश मालाचा हिंदुस्थानात उठाव होण्याजोगा होता हे निराळेच ! जमिनदार, सरदार, संस्थानिक आदि करून

जुने ब्रिटिश साम्राज्यशाहीचे दोस्त आता निरुपयोगी बनले होते. नवे दोस्त हुडकून काढणे तिला आता अवश्य वाटू लागले. ते तिने लगेच शोधूनही पण काढले. ते म्हणजे हिंदी भांडवलशाहीचा वरचा थर बनलेले असे पत-पेढीवाले (Bankers) कारखानदार, बडे व्यापारी आणि त्यांचे राजनैतिक नेमस्त प्रतिनिधी हे होत. याप्रमाणे ब्रिटीश साम्राज्यशाही आणि हिंदी भांडवलशाही यांच्या एकजुटीची जनताविरोधी फळी या देशात उभारण्यात आली. हिंदुस्थानात ब्रिटीस सत्ता सुस्थिर करण्यास बहुमोल मदत केल्याबद्दल साम्राज्यशाही औद्योगिक मक्तेदारीत भागीदार बनण्याचे पारितोषक हिंदी भांडवलशाहीला मिळाले. अर्थात् साम्राज्यशाहीविरुद्ध चळवळ करण्यास तिला आता कोणतेच कारण उरले नाही.

तात्पर्य, कोणत्याही लढ्याचे स्वरूप तो चालविणाऱ्या वर्गांच्या आर्थिक गरजानी निश्चित केले जाते. परकीय सत्तेविरुद्ध हिंदी जनतेचा जो लढा आहे; त्याला कारण त्या जनतेच्या आर्थिक गरजा हेच होय. जोपर्यंत हिंदी भांडवलशाहीच्या वाढीला ब्रिटिश साम्राज्यशाहीचा प्रतिबंध होता, तो पर्यंत हिंदी राष्ट्रीय लढा हिंदी भांडवलशाहीने चालविला. पण ज्यावेळी ब्रिटिश भांडवलशाहीने हिंदी भांडवलशाहीला हिंदी जनतेच्या पिळणुकीत सहभागी करून घेतले, त्यावेळी तिच्या आर्थिक गरजांची थोड्याबहुत अंशाने परिपूर्ति झाली व तिने राष्ट्रीय चळवळीची धुरा आपल्या मानेवरून ताडकन् फेकून दिली. अर्थात् यापुढे राष्ट्रीय लढा चालविण्याचे कार्य बहुजनसमाजावरच येऊन पडले. परंतु हिंदी बहुजनसमाज अत्यंत मागसलेला. त्याचे राजनैतिक शिक्षण ह्मणावे तर त्याच्या नावाने आवळ्याएवढे पूज ! त्यात कामगार वर्गाची अद्याप जनतेचे नेतृत्व पत्करण्याइतकी वाढ झालेली नव्हती. रशियन क्रांति व तदुत्तर उलाढाली यांच्या वाऱ्याची थोडीशी झुळूक हिंदुस्थानापर्यंत आल्याशिवाय राहिली नाही. त्यायोगे कामगारांच्या चळवळीना जोराची चालना मिळाली हे खरे. या चळवळींच्या

इतिहासाची छाननी पुढील क्रांतिवादाच्या प्रकरणी करू. तत्पूर्वी १९३० च्या राष्ट्रीय लढ्याचे नेतृत्व अंगिकारून त्याचा बोजवारा म. गांधीनी कसा उडविला याचा थोडासा इतिहास देणे या स्थळी यथायोग्य होणारे आहे.

असहकारितेची प्रचंड चळवळ व तिचेच पुच्छ म्हणजे स्वराज्य पक्षाची कौंसिलांतर्गत धडपड याची अशाप्रकारे वाताहत झाल्यावर योग्य नेतृत्वाच्या अभावी कॉंग्रेसमध्ये व देशात इतरत्र निराशेचे वातावरण पसरले. जनता दिङ्मूढ बनली. याप्रमाणे कॉंग्रेसचे नेतृत्व क्रांतिमारक होते, तथापि देशातील परिस्थिति दिवसेदिवस अधिकाधिक क्रांतिकारक बनत चालली होती. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या पिळणुकीने दिवसेदिवस हिंदी जनता त्रस्त झालेली होती. कामगार, शेतकरी, हरहुन्नर करून पोट भरणारे लोक, लहान सहान दुकानदार, कारागीर व मध्यम वर्गीय सुशिक्षित तरुण इत्यादि सर्वांना आर्थिक अरिष्टांच्या झंझावाताने अगदी 'त्राहि भगवान्' करून सोडले होते. विशेषतः मोठमोठ्या कारखान्यात राबणाऱ्या कामगारांची स्थिति तर अत्यंत शोचनीय झालेली होती. त्याचे दृश्य फळ ह्मणजे १९२५ सालापासून ठिकठिकाणी संपाचा वणवा भडकू लागला हे! १९२५ सालात १३३, १९२६ सालात १२७, १९२७ साली १२९ व १९२८ साली २०० असे निरनिराळ्या कारखान्यातून संप झाले. १९२८ सालाच्या मुंबईच्या गिरणी कामगारांचा संप अत्यंत चिरस्मरणीय होऊन गेला. यावेळी मुंबई गिरणी कामगारांची बलाढ्य संघटना बनून, या लढाऊ युनियनच्या निशाणाखाली सत्तर हजार कामकरी एकत्रिक झाले होते.

या संपाच्या धामधुमीत, काही तरुण कम्युनिस्ट कानपूर खटल्याने तुरुंगात डांबले गेले होते तरी, नव्या दमाचे तरुण पुढे सरसावले. यावेळी हिंदी कम्युनिस्ट चळवळींची सर्व सूत्रे कॉ. रॉय हे मास्कोतून हालवीत होते. रॉय यांची विचारसरणी व कार्यक्रम यानी तरुणांची मने भारून गेली होती. या सर्व गोष्टींचा कॉंग्रेसने चालविलेल्या स्वातंत्र्यलढ्यावर परिणाम होऊ

लागला. १९२७ सालीच मद्रास येथे भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात मवाळगटास–किंबहुना म. गांधीसही धाब्यावर बसवून संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास करण्यात आला; पण त्या ठरावानुसार जो कार्यक्रम व जी दिशा आखणे अवश्य होते, तिकडे कॉंग्रेस पुढाऱ्यांचे दुर्लक्ष झाले. हिंदी स्वातंत्र्याचा लढा, हा खरोखर शेतकरी क्रांतीचा लढा आहे. हिंदी कामगारांचे जीवितही काही अंशी शेतीवर अवलंबून असते. संपाच्या वेळी कामगार आपल्या खेड्याकडे वळतात. तेव्हा त्याना शेतीचा मोठा आधार वाटतो. बरे, कामगार तरी आहेत किती? ते शेतकऱ्यांच्या संख्येच्या पासंगासही पुरणार नाहीत. हिंदी लढ्याचा भाग शेतकरी क्रांतीचा आहे हे पहिल्यापासून कॉ. रॉय हे जनतेच्या मनावर बिंबवीत होते. पण रॉयप्रणीत शेतकरी क्रांतीचा कार्यक्रम कॉंग्रेसच्या पचनी पडेना.

१९१७ सालापासूनच शेतकऱ्यात अस्वस्थता निर्माण होऊ लागली होती. खेडा, चंपारण्याची उदाहरणे सर्वश्रुत आहेतच. १९२६ साली व १९२७ सालात मुंबई, मद्रास, मध्यप्रांत, सरहद्दप्रांत व बलुचिस्थान इत्यादि भागात दुष्काळामुळे हाहाकार उडून गेला. १९२८ इसवीमधली बारडोली तालुक्यातील८८००० शेतकऱ्यांच्या करबंदीच्या संग्रामाची आठवण सर्वांना ताजी असणारच. यामुळे शेतकरी चळवळीत नवा जोम उत्पन्न होऊन शेतकरी समाजाचे पाऊल क्रांतीच्या मार्गावर वेगाने दौडू लागले. कामगारातील अस्वस्थता, शेतकरी उठाव, कॉंग्रेसची संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी यामुळे साम्राज्यशाही पेचात पडली. तात्काळ हिंदी लोकास राजकीय हक्क देण्यासंबंधाची चौकशी करणारे 'पांढरे' सायमन कमिशन नेमण्यात आले. प्रत्येक ठिकाणी कमिशनविरोधी हरताळ पडले. निषेधार्थ मिरवणुकी निघाल्या व सभा झाल्या. सायमन कमिशनला उत्तरादाखल घटना समितीची मागणी करून, आर्थिक कार्यक्रमावर आधारलेल्या राष्ट्रीय चळवळीची उठावणी करावी, असा यावेळीच रॉय यांचा अभिप्राय होता. सायमन

कमिशन, त्यावरील सार्वत्रिक बहिष्कार व ब्रिटिश साम्राज्यशाहीने एकाही हिंदी माणसास न नेमून केलेला अपमान, या सर्व गोष्टींचा परिणाम कॉंग्रेसमधील तरुणांच्या मनावर हळूहळू होत होता. देशात सर्वत्र माजलेल्या या असंतोषातून जनतेची प्रबळ संघटना घडवून आणण्यास क्रांतिवादी नेतृत्व हवे होते. या नेतृत्वाच्या अभावी भडकलेल्या तरुणांची मने पुनश्च दहशतवादाकडे झुकू लागली. या वस्तुस्थितीवर सायमन बहिष्कार–समयी लाला लजपतराय या लोकप्रिय पुढाऱ्यावर झालेला लाठीमार आणि त्यात त्यांचा झालेला अंत या गोष्टीची ठिणगी पडली! याचा परिणाम असा झाला की, देशभर दहशतवादास ऊत आला. भगतसिंगप्रभृतींनी सँडर्सवर गोळ्या झाडून त्यास ठार केले. जतींद्रदास तुरुंगातील छळास अन्नसत्याग्रहाचे उत्तर देऊन बळी गेला. "जतीन्द्र, भगतसिंग की जय" "गांधीवादाचा धिक्कार असो," इत्यादि तरुणांच्या आरोळ्यानी आकाश पाताळ एक करून सोडले!

मिरत आणि दिल्ली येथील कम्युनिस्टांचे खटले, भगतसिंगप्रभृतींचे दहशतवादी लढे यानी चहूकडे जे एकच रान उठविले आणि तरुणांची मने जी भडकावून सोडली, त्यामुळे चरखा खादी, प्रार्थना, इंद्रिय दमनाचे प्रयोग इत्यादि आपल्या नित्याच्या आश्रम व्यवसायात गर्क झालेले म. गांधी खडबडून जागे झाले! देशभर हिंसा थैमान घालून आपला अहिंसेसहित पराभव करते अशी मूर्तिमंत् भीती त्यांच्यासमोर दत्त हाणून उभी राहिली. लगेच कॉंग्रेसमधून संन्यास घेणारे म. गांधी पटकन् कॉंग्रेसच्या व्यासपीठावर आरूढ होऊन कॉंग्रेसचे नेतृत्व पत्करण्यास सज्ज झाले.

मध्यंतरी भारतमंत्रि बर्कनहेड साहेब यानी सर्व पक्षास संमत असणारी घटना निर्माण करण्याबद्दल स्वराज्यपक्षास आव्हान दिले. ते स्वराज्यपक्षाचे धुरीण पं. मोतीलाल नेहरू यानी स्वीकारले. लगेच पं. मोतीलालजींनी सर्वपक्षीय परिषद् आमंत्रिली;वसाहतीच्या स्वराज्याच्या धर्तीवर

हिंदुस्थानची राज्यघटना बनविणारा नेहरू रिपोर्टचा खर्डा त्या परिषदेने तयार केला. या खर्ड्याला काँग्रेसचा पाठिंबा मिळविण्यासाठी पं. मोतीलालजींची सारी धडपड होती. कारण देशातली परिस्थिति इतकी भडकली होती की संपूर्ण स्वातंत्र्याशिवाय कशानेही देशातील युवकांची भूक भागण्याजोगी नव्हती. पं. जवाहरलालजीनी यावेळी तरुणांचे पुढारीपण पत्करले. पं. मोतीलाल नेहरू यानी आपल्या रिपोर्टास काँग्रेसचा पाठिंबा मिळावा ह्मणून म. गांधीकडे धाव घेतली. म. गांधीनाही आपले नेतृत्व पुनश्च प्रस्थापित करण्यास संधि हवी होती. पं. मोतीलालजींचे आमंत्रण येताच राजकारणातून अंग काढणारे गांधी काँग्रेसच्या राजकारणात एकदम उडी घेते झाले. १९२८ च्या कलकत्ता काँग्रेसमध्ये म. गांधींच्या नेतृत्वाखाली नेहरू रिपोर्टचा स्वीकार करण्यास सरकारला एक वर्षाचा अवधि देण्यात आला. स्वीकार न झाल्यास सत्याग्रह-संग्राम सुरू करण्याची धमकी देण्यात आली. लगेच १९२९ साली लाहोर काँग्रेसने पं. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली एकमताने संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पसार करून राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या मार्गावरील बरीच मोठी मजल मारली होती. पण या ठरावाच्या जोडीला साम्राज्यविरोधी लढा देण्यासाठी आर्थिक कार्यक्रमावर बहुजनसमाजाची संघटना करण्याकरता काँग्रेसने काहीच उपाय योजना केलेली नव्हती. युद्धोत्तर ब्रिटीश साम्राज्यशाहीवर आर्थिक अरिष्टावर अरिष्टे येऊन ती विलक्षण आर्थिक भोवऱ्यात सापडली होती. अशा परिस्थितीतच १९३०।३२ सालांचा बहुजनसमाजाचा क्रांतिकारक उठाव साम्राज्यशाहीस उखडून काढतो की काय अशी धास्ती साम्राज्यमुत्सद्यांना वाटू लागली. देशातल्या उपरिनिर्दिष्ट क्रांतिकारक चळवळी हाणून पाडण्यासाठी त्यानी एका बाजूस गोलमेज परिषदेचा डाव टाकला, तर दुसऱ्या बाजूस दडपशाहीचे सत्र एकसारखे चालू ठेविले.

१९२९च्या लाहोर काँग्रेसच्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या ठरावाने काँग्रेसचे

ध्येय निःसंदिग्ध केले. म. गांधींना स्वेच्छेविरुद्ध या ध्येयाला मान्यता देणे भाग पडले. वसाहतीच्या स्वराज्याने बहुजनसमाजाची पिळणूक थांबण्याजोगी नाही. उलट त्यामुळे पिळणूक तीव्रतर होते. कारण वसाहतीच्या स्वराज्यात हिंदी भांडवलदार वर्ग हा साम्राज्यशाही पिळणुकीत भागीदार बनतो. तेव्हा संपूर्ण स्वातंत्र्य याचा खरा अर्थ बहुजनसमाजाची पिळणुकीपासून मुक्तता असा होतो! अर्थात् लाहोर काँग्रेसमध्ये संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पसार झाल्याबरोबर गांजलेला बहुजनसमाज व त्याचे कनिष्ठ मध्यमवर्गीय बुद्धिजीवि पुढारी यांच्यामध्ये उत्साहाचे चैतन्य खेळू लागले. म. गांधींनी आपले वर्चस्व काँग्रेसमध्ये पुनः प्रस्थापित करण्याकडे जनतेच्या या अलोट उत्साहाचा उपयोग करून घेतला. १९३० च्या मार्च महिन्यात दांडीच्या दौऱ्याचा उपक्रम करून म. गांधींनी साम्राज्यविरोधी असंतोषास तोंड फोडले. तदनंतरच्या मिठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, प्रभातफेऱ्या, लाठीमार, सरकारचे वटहुकूम आणि दडपशाही इत्यादि हकिकती सर्वांच्या ताज्या आठवणीच्या आहेत.

गुजराथ, कारवार जिल्हा, संयुक्तप्रांत इत्यादि भागातील शेतकऱ्यांचा उठाव अवर्णनीय होता. त्यावेळी साठ सत्तर हजार लोक तुरुंगात गेले. बहुजनसमाजाच्या १९३० सालच्या उठावामुळे ब्रिटिश साम्राज्यशाही हादरून गेली. ती कोलमडून पडते काय अशी भीतिही साम्राज्य मुत्सद्यांच्या हृदयास चिकटून गेली. या आणिबाणीच्या प्रसंगी साम्राज्यशाहीला हिंदी भांडवलदार वर्गाची बहुमोल मदत झाली. या वर्गालासुद्धा या प्रचंड उठावाची क्रांतीत परिणति होईल अशी धास्तीही पण होतीच. या चळवळीचा त्या वर्गाला लंडन येथील पहिल्या गोलमेज परिषदेच्यावेळी आपली बाजू जोमाने मांडण्याच्या कामी झाला होताच. आणि त्या वर्गाचा कार्यभागही उरकला होता. साम्राज्यशाही आणि हिंदी भांडवलशाही यामधील समेटाचा पाया याच परिषदेत घालण्यात आला. लगेच

कॉंग्रेसमधील हिंदी भांडवलशाहीच्या हस्तकांनी चळवळ थांबविली आणि गांधी–आयर्विन करार घडवून आणला. म. गांधी कॉंग्रेसचे एकमेव प्रतिनिधी ह्मणून दुसऱ्या गोलमेज परिषदेस जाण्यास सज्ज झाले. गोलमेज-परिषदेत म. गांधींनी साम्राज्य सरकारशी 'सन्माननीय' समेट घडवून आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला.परंतु हिंदुस्थानातील शेतकरी (गोलमेज-परिषदेत हिंदी भांडवलशाहीस काही हक्क देऊ केल्याने) समाधान पावणे शक्य नव्हते. व्यापाराच्या मंदीमुळे शेतकरी हवालदील झाला होता. कामकरीही संघटित बनून साम्राज्यविरोधी लढ्यात प्रामुख्याने भाग घेण्यास पुढे सरसावत होता. कनिष्ठ मध्यम वर्गीय बुद्धिजीवि हाही शेतकरी कामकऱ्यांना क्रांतिकारी मार्गदर्शन करून त्यांचे प्रत्यक्ष नेतृत्व पत्करण्यास बद्धपरिकर झाला होता. अशा परिस्थितीत साम्राज्यशाहीशी समेट घडून येणे अशक्य होते. अर्थात् म. गांधीजी गोलमेजपरिषदेहून परतून हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर पदार्पण करतात न करतात, तोच चळवळीस तोंड लागले. पुनश्च सार्वत्रिक कायदेभंग, सरकारी वटहुकुमांची सरबत्ती, धरपकडीचे सत्र इत्यादींनी हिंदुस्थानातील वातावरण भरून गेले. पण पुढे १।२ वर्षांतच चळवळ ओसरली. मॅकडोनेल्डच्या जातीय निवाड्यात अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ उभारण्याची योजना असल्यामुळे म. गांधींनी प्राणांतिक उपवास सुरू केला आणि राजकीय चळवळीवरून जनतेचे लक्ष हरिजनचळवळीकडे ओढून घेण्यात आले. नाही ह्मणायला म. गांधींच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसने वैयक्तिक कायदेभंग पुकारला. पण त्यात यश येण्याचे बाजूलाच राहिले, उलट सत्याग्रह संग्रामाचा बोजवारा उडाला. तात्काळ कॉंग्रेसच्या राजकारणाचे तारू प्रचंड चळवळीवरून सनदशीर मार्गाच्या बंदराकडे येऊन पुनः थबकले. पुढे कॉंग्रेसने निवडणुकी लढविल्या; सर्वत्र कायदेमंडळात कॉंग्रेसचे बहुजन झाले; आठ प्रांतात कॉंग्रेसची मंत्रिमंडळे बनली. १९३५ चा सुधारणा कायदा मोडू पाहणारी कॉंग्रेस अत्यंत उत्सा-

हाने तो राबवू लागली. देशातील बहुजनसमाजाची फसगत झाली. सारांश, प्रतिगामी राष्ट्रवादाचे नेतृत्व अपेशी ठरले. या राष्ट्रवादाच्या नेतृत्वाखाली तीन वेळा साम्राज्यविरोधी लढा देण्यात आला, पण तीनही वेळा राष्ट्रीय शक्ती पराभूत झाल्या.

प्रतिगामी राष्ट्रवादाने टिळक अरविंदबाबूंच्या नेतृत्वाखाली साम्राज्यशाहीशी पहिला लढा दिला. 'नेमस्तापुढें भाकरीचे तुकडे फेकून जहालांना झोडा' या धोरणाचा मोर्लेप्रभृति ब्रिटिश मुत्सद्यानी अवलंब करूस राष्ट्रीय चळवळ मोडून टाकिली. अखेर पराभूत झालेल्या प्रतिगामी राष्ट्रवादी शक्ती सनदशीर राजकारणाच्या रूळावर आल्या. जहालांची ही सनदशीर प्रवृत्ति आपल्या मरणापूर्वी लो. टिळकानी मॉंटफर्ड सुधारणा राबविण्याच्या दृष्टीने काढलेला लोकशाही स्वराज्यपक्ष आणि त्याचा जाहीरनामा यात प्रतिबिंबित झालेली स्पष्टपणे दिसून येते. दुसरा लढा कॉंग्रेसमधून म. गांधींच्या नेतृत्वाखाली अहिंसात्मक असहकारितेच्या रूपात देण्यात आली. या चळवळीची वाताहत कशी झाली आणि त्या चळवळीच्या अवशेषातून सनदशीर स्वराज्य पक्ष कसा निर्माण झाला याचे विस्तृत विवेचन वर येऊन गेलेलेच आहे. यावेळीसुद्धा ब्रिटीश साम्राज्यशाहीने पुनरपि वरिष्ठ हिंदी भांडवलदार वर्गास आर्थिक सवलती देऊन विकत घ्यावयाचे व त्याला इतर राष्ट्रीय शक्तीपासून अलग करून त्या शक्तीवर दडपशाहीचा बडगा सतत चालू ठेवावयाचा याच मार्गाचा अवलंब केला. तिसरा लढा १९३० सालच्या सत्याग्रह संग्रामाचा. या समयी धूर्त साम्राज्य शाहीने गोलमेज परिषदेचा डाव टाकून हिंदी भांडवलशाहीस वश करून घेतले आणि त्यांच्या कॉंग्रेसमधील हस्तकाकरवी कॉंग्रेसला गांधी आयर्विन कराराच्यारूपाने ब्रिटीश सरकारपुढे लोटांगण घालण्यास लाविले.

तरीसुद्धा कॉंग्रेसमधील क्रांतिकारी शक्तीनी आपला लढा चालू ठेवलाच. परंतु क्रांतिवादी नेतृत्वाच्या अभावी ह्मणजे बहुजनसमाजाचे

हितसंबंध, प्रेरणा आणि आकांक्षा यावर आधारलेल्या पुढारीपणाच्या अभावी सत्याग्रह संग्राम थंडावला. 'पुनश्च हरिः ॐ' ह्मणून भुलाभाई, सत्यमूर्ति इत्यादि प्रछन्न नेमस्तांच्या हाती कॉंग्रेसचे राजकारण गेले; आणि कॉंग्रेसच्या अनेक ठरावानी धिःकृत असा १९३५ चा सुधारणा कायदा मनसोक्त राबविण्यात आला. तात्पर्य, पुरोगामी राष्ट्रवादी नेमस्त घ्या, किंवा प्रतिगामी राष्ट्रवादी जहाल घ्या, दोहोंच्या कपाळी साम्राज्यविरोध लढ्यात शरणागति ही ठरलेली! हेच गेल्या तीन तपाच्या राष्ट्रीय राजकारणाने सिद्ध झाले. आता सांप्रतचे युद्ध सुरू झाल्यानंतर अहिंसेच्या नावाखाली चवथ्या फार्सवजा युद्धविरोधी लढ्यास तोड जुंपलेले आहे. त्यात गांधीवादी नेतृत्वाचे दिवाळे वाजलेले जनतेस स्पष्ट कळून येत चालले आहेच; ते नेतृत्व कॉंग्रेसला युद्धविरोधाची भूमिका घेण्यास भाग पाडून फॅसिझमूला मदत करीत आहे. ह्मणजेच त्याने हुकूमशाहीशी लढणाऱ्या जगातल्या सर्व लोकशाही शक्तीविरुद्ध लढा चालू ठेवलेला आहे. यावरून प्रतिगामी राष्ट्रवाद अर्थात् गांधीवाद कसा क्रांतिविरोधी आहे हे स्पष्ट झाले आहे. या क्रांतिविरोधाचे पर्यवसान स्वातंत्र्य लढा चालविणाऱ्या कॉंग्रेसच्या निर्वाणावस्थेत झाले आहे. सारांश,जर्मनीत ज्याप्रमाणे महायुद्धोत्तर घडून आलेल्या कामगारांच्या दोन तीन क्रांत्यांचा नाझीवादाने निःपात केला. तेच कार्य हिंदुस्थानात बहुजनसमाजाचे उठाव अहिंसेच्या नावाखाली जिरवून गांधीवादाने केले आहे. जर्मनीतील अतिमानव (Superman) हिटलर आणि हिंदुस्थानातील अतिमानव म. गांधी या दोघांचे कार्य आणि वैचारिक भूमिका ही एकच आहेत. परिस्थिति भिन्नतेमुळे हिटलरने जे काम जर्मनीत हिंसेने केले. तेच कार्य गांधीजीना हिंदुस्थानात अहिंसेने करावे लागत आहे. जगांतील क्रांतीचा पुरा विध्वंस करण्याचा दोघानी आता चंग बांधलेला सध्या दृष्टोत्पत्तीस येतो, अर्थात् बहुजनसमाजास राजकीय स्वातंत्र्य आणि सामाजिक मुक्तता प्राप्त करून देणाऱ्या क्रांतिवादी लोकपक्षाची

स्थापना होणे अवश्य झाले. ह्मणून कॉ. रॉय यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसमध्ये काम करणाऱ्या क्रांतिवादी कॉंग्रेस–जनसंघाला (The league of Radical congressmen) कॉंग्रेस सोडून देणे भाग पडले. त्याने नवा क्रांतिवादी लोकपक्ष (Radical Democratic Party) स्थापन केला. तेव्हा क्रांतिवाद ह्मणजे काय, त्यांचे या देशात बीजारोपण कसे झाले; त्याचे तत्त्वज्ञान आणि कार्यक्रम ही काय आहेत आणि अखेर क्रांतिवादी नेतृत्व बहुजनसमाजास स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यास कसे पात्र आहे इत्यादि साद्यंत विवेचन करणे याउपर अवश्य होते. पण क्रांतिवादाची पार्श्वभूमि ह्मणजे वैचारिक क्रांति ही हिंदुस्थानात घडून येणे कसे अवश्य आहे याचा थोडासा ऊहापोह तत्पूर्वी करणे यथानुक्रम ठरते. तिकडे आता वळू.

क्रांतिवादाची पार्श्वभूमि : : ७

" मानवी समाजाच्या बौद्धिक व सांस्कृतिक प्रगतीच्या मार्गांत अंधश्रद्धा हा एक मोठा अडथळा आहे. आपली सध्याची मानहानिकारक स्थिति, आपलें दारिद्र्य, दुःख व परावलंबित्व हें नष्ट करावयाचें असेल तर आपल्या प्रगतीच्या आड येणाऱ्या अंधश्रद्धेची धोंड आपण एकजुटीनें उचलून फेकून दिली पाहिजे. अंधश्रद्धा ह्मणजेच आमची नैतिक श्रेष्ठता अगर आध्यात्मिक प्रगति असें मानण्याची सवय आपल्या अंगांत खिळून गेलेली आहे. ती सवय हिंदी जनतेने प्रथम सोडून दिली पाहिजे. हिंदी बांधवहो, तुह्मी " बाबा वाक्यं प्रमाणं " ही वृत्ति सोडून बुरसलेल्या व टाकाऊ अशा सामाजिक चालीविरुद्ध बंड पुकारा; व कोणत्याही गोष्टीवर अंधविश्वास न ठेवतां जरा डोळस बनून वस्तुस्थितीचें खरे ज्ञान संपादन करा. आपला गतेतिहास कितीहि उज्ज्वल असला तरी " जुने तेच सोने " ही समजूत काढून टाका. "

—डॉ. रवीन्द्रनाथ टागोर.

कोणालाही साहजिकच आश्चर्य वाटते की काँग्रेसने सतत ५० वर्षे साम्राज्यविरोधी लढा चालविला, बहुजनसमाजाच्या क्रांतिकारी उठावांचे निदान दोनदा तरी नेतृत्व पत्करले, पण फलनिष्पत्ति काहीच झाली नाही व नजीकच्या भविष्यकाळात ती होईल असेही पण वाटत नाही. याचे कारण काय? या वस्तुस्थितीची काहीशी मूलगामी मीमांसा होणे अवश्य आहे. एकाद्या जमिनीत आपण बी अनेक वेळ पेरले; पण ते अंकुरत सुद्धा नाही असे आढळून आले, तर त्या जमिनीत काही दोष असावेत किंवा तिची मशागत बरोबर झालेली नसावी इत्यादि कारणमीमांसा आपण करतो.

तद्वत् राष्ट्रीय स्वातंत्र्याचे बी आपल्या देशात का रुजत नाही? राष्ट्रीय चळवळीची प्रचंड आंदोलने एका चुटकीसरशी दडपून टाकण्यात आली. याला म. गांधी ही एकच एक व्यक्ति कारणीभूत झाली असे ह्मणणे इतिहासक्रमाविषयीचे अज्ञान प्रगट करण्यासारखे आहे. त्यास गांधींचे तत्त्वज्ञान जबाबदार धरावे तर गांधींचे तत्त्वज्ञान तरी या देशात फोफावून कसे थैमान घालू शकते याचा मूलग्राही विचार होणे जरूर आहे. गांधींचे तत्त्वज्ञान हे काही हिंदुस्थानात नव्याने आणलेले नाही. हिंदुस्थानच्या प्राचीन परंपरेवरच ते आधारलेले आहे. याचा अर्थ असा की सामाजिक विकासक्रमामधील ज्या अवस्थेत प्राचीन परंपरेची व त्यावर रचिलेल्या गांधींच्या मध्ययुगीन तत्त्वज्ञानाची आणि आचारक्रमाची होळी केली जाते, त्या अवस्थेपर्यंतच आपला हिंदी समाज पोचलेला नाही. ह्मणजे श्रद्धायुगातून बुद्धियुगामध्ये आपल्या समाजाने अद्याप पदार्पणच केलेले नाही. हेच जनभाषेतच सांगावयाचे ह्मणजे आपला समाज अद्याप श्रद्धाळू आहे, तो बुद्धिवादी नाही. 'अंधश्रद्धेचे युग सरो, बुध्दिवादाचा विजय असो' ही बेकनप्रणीत वैचारिक क्रांतिच आपल्या देशात घडून आलेली नाही. ती यूरोपमध्ये तीनशे वर्षांपूर्वीपासूनच घडून येऊ लागली ह्मणून अर्वाचीन विज्ञानयुग, यंत्रप्रणीत भांडवली संस्कृति, आजची यंत्रप्रधान समाजव्यवस्था इत्यादींचा उदय यूरोपमध्ये दीड–दोनशे वर्षांपूर्वीच होऊन ती एकसारखी उत्कर्ष पावू लागली. यूरोपीय समाज हा विकासक्रमाच्या वरच्या पायरीवर उत्क्रान्त झाला.

तेव्हा हिंदुस्थान देशास जर उत्क्रांत यूरोपच्या पंक्तीस जाऊन बसावयाचे असेल तर यूरोपातल्याप्रमाणेच येथेही बुद्धिवादाचे प्राबल्य वाढले पाहिजे. अंधश्रद्धा किंवा शब्दप्रामाण्य यांचे स्थान बुध्दिप्रामाण्याने पटकाविले पाहिजे. धर्माच्या सिंहासनावर विज्ञानाची प्रतिष्ठापना झाली पाहिजे. याचाच अर्थ वैचारिक क्रांति घडून आली पाहिजे. हिंदी बुध्दिजीवि जनतेचा

दृष्टिकोण आमूलाग्र बदलला पाहिजे.युरोपीय वैचारिक क्रांतीचा इतिहास येथे देणे अस्थानी होणार नाही. कारण त्यायोगे यूरोप पुढे कसा गेला, हिंदुस्थान मागे का राहिला आणि यूरोपच्या पाऊलावर पाऊले टाकीत भरधाव वेगाने दौडणे हिंदुस्थानास कसे अवश्य आहे, याची स्पष्ट कल्पना हिंदी बुद्धिजीवि जनतेच्या बुद्धीस पटून मनावर बिंबून राहील.

गॅलिलिओ, कोपरनिकस आणि केप्लर यांचे युगप्रवर्तक शोध बाहेर पडल्यापासून परमेश्वरावरील श्रद्धा, तज्जन्य तत्वज्ञान, जीवन व विश्व यांच्याकडे पाहण्याचा आध्यात्मिक दृष्टिकोन यांचा पायाच यूरोपमध्ये डळमळू लागला. नैसर्गिक दृश्यांच्या मूलभूत कारणांचा भौतिक उलगडा उपर्युक्त शोधामुळे ज्यावेळी होऊ लागला, त्यावेळी धर्मप्रणीत, दैविक व पारलौकिक कल्पनांचा व विचारसरणींचा निरास झाला व वैचारिक क्रांति घडून आली. विश्व, जीवन, समाज व इतिहास यांच्याबद्दलच्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल घडून आला. या विचारक्रांतीचे पर्यवसान १८।१९ व्या शतकातील यूरोपीय क्रांत्यात झाले. व तेथूनच पुढे अर्वाचीन संस्कृतीच्या युगास प्रारंभ झाला. प्रारंभी फ्रॅन्सीस बेकन व डेकार्टा यानी प्रयोगजन्य विज्ञानावरच तत्वज्ञानाची उभारणी करण्याची प्रथा सुरू केली. ईश्वराच्या अस्तित्वाचा प्रश्न बुद्धिवादाच्या कसास लावूनच सोडविला पाहिजे असे प्रतिपादन करून धर्माच्या मूळावरच कुठारीचा प्रहार केला. कारण धर्म हा श्रद्धाप्रणीत असल्यामुळे धर्माला बुद्धिवादात आणून सोडणे ह्मणजे माशाला पाण्यातून बाहेर काढण्यासारखेच आहे. या बेकनच्या काळापासूनच धर्म व विज्ञान यांच्या लढ्याला सुरवात झाली. विज्ञानाने अनेक पराक्रम गाजवून अनेक दिव्य असे विजय संपादन केलेले आहेत. तथापि अंतिम विजय त्याला अद्याप मिळवावयाचा आहे! बेकनचा समकालीन डेकार्टा याने बेकनच्याही पुढे पाऊल टाकले. याने इंद्रिनजन्य ज्ञान तेवढेच खरे, विश्वसनीय

व इंद्रियातीत असे जे ज्ञान ते संपूर्ण संशययुक्त असे सावेश प्रतिपादन केले व ईश्वरज्ञानाविरुद्ध संशयवादाची पताका उभारली. अर्थातच तर्कशास्त्राच्या कसोटीस लावल्याबरोबर धर्म व ईश्वरवाद यांच्याखाली अटळपणे मिरवीत असलेले सिंहासन डळमळू लागले. साहजिकच आदितत्वाबद्दल युरोपीय समाजामध्ये साशंक वृत्ति पसरू लागली; व समाज हा आपल्या नेहमीच्या व्यवहारात विज्ञानावरच अधिकाधिक विसंबून राहू लागला.

विज्ञानाचे याप्रमाणे मानवी मनावर प्रभुत्व बसत चालले तरी ज्या नैसर्गिक दृश्यांच्या कारणांचा भौतिक उलगडा होत नसे, अशांचे कर्तृत्व निसर्गातीत अशा परमेश्वरी तत्त्वावर लादण्यात येउ लागले. उदाहरणार्थ, वास्तवविज्ञान, रसायनविज्ञान आणि ज्योतिष्यविज्ञान या तीन्ही शास्त्रात विज्ञानपंडितांची भौतिक दृष्टी सफाईने वावरत होती. तथापि प्राणीवनस्पतिशास्त्र व मानसशास्त्र यात अध्यात्मवाद व आस्तिक्यवाद यांचा गोंधळ कायमच होता. पण या शास्त्रातही पुढे प्रगति होऊ लागली. मानव प्राण्याचा उदय हा खालच्या दर्जाच्या प्राण्यापासून झाला असून सर्व सजीव सृष्टी ही देखील एका मूलभूत जड द्रव्यापासून उत्पन्न झाली असे शोध बाहेर पडू लागले. संकल्पविकल्पात्मक मन हे सुद्धा मेंदू या जडेंद्रियाचे कार्य आहे हे सिद्ध करण्यात आले. याप्रकारे विश्वाची उत्पत्ति व स्थिति यांचा परमेश्वराशी काही एक संबंध नाही, असे विज्ञानाच्या विविध अंगानी प्रस्थापित केले व परमेश्वरावरील श्रद्धेची इतिश्री झाली.

परमेश्वरी इच्छेवर अधिष्ठित झालेली सरंजामी सत्ता व समाज-व्यवस्था ढासळून पाडण्यास ईश्वरी साम्राज्याविरुध्द बंड करणाऱ्या विज्ञानप्रणीत विचारक्रांतीचा भांडवलदार वर्गाला अनुपम उपयोग झाला. पण जेव्हां तो वर्ग सत्ताधीश बनला, तेव्हां त्याला आपली सत्ता

समाजावर चिरस्थायी करण्यासाठी निसर्गातीत तत्त्वाच्या अधिष्ठानाची जरूरी भासू लागली. परंतु सगुण परमेश्वर व जुन्या वेडगळ धर्म समजुती यांची पुनः प्रतिष्ठापना करण्यास भांडवलदार वर्गाच्या प्रगत व सुसंस्कृत मनास लाज वाटू लागली. ह्मणून त्या वर्गाने धर्माच्या आसनावर अर्वाचीन अध्यात्मवादाची स्थापना करून विज्ञानाने ज्याच्या ठिकऱ्या उडवून दिल्या होत्या, अशा वैयक्तिक सगुण ईश्वराच्या जागी निर्गुण ब्रह्माची योजना केली. कॅन्टने तर इंद्रियजन्यज्ञान व स्फूर्तिजन्यज्ञान (Phenomenal and nomenal experience) अशी ज्ञानाची विभागणी केली. इंद्रियाला गोचर होणाऱ्या वस्तूपलीकडे वस्तुतत्व (the thing in itself) असून अखिल विश्वापलीकडे अध्यात्मतत्व असलेच पाहिजे असे त्याने अध्यात्मवादाचे कल्पनाजाल पसरिले. तथापि अध्यात्मवादाचा हा डोलारा टिकून राहणे शक्य नव्हते. कॅन्टच्या लागोपाठ हेगेल पुढे आला. त्याने मूलभूत आत्मतत्वाचा पुरस्कार केला होता तरी विश्वाच्या विकासाची उपपत्ति त्याने विरोधविकासाच्या नवीन तर्कपद्धतीने लाविली.

या नूतन तर्कपद्धतीचे शस्त्र हाती घेऊन, दलितांच्या तत्वज्ञानाचे प्रणेते व सर्व विज्ञानांचे बोलते चालते ज्ञानकोश असे मार्क्स व एंजल्स हे सव्यसाची वीर पुढे सरसावले व त्यानी अध्यात्मवादाची पाळेमुळे खणून काढिली. त्यांचे विशिष्ट कार्य हे की, त्यानी तीनशे वर्षे सतत चालू असलेल्या विज्ञानशोधांच्या अनुरोधाने जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी मानवाना प्राप्त करून दिली.

या मिळालेल्या नवीन भौतिक दृष्टीच्या योगाने, निसर्ग, जीवन इतिहास व समाज यांच्या बुडाशी प्रेरक अशी कोणतीच गूढ व निसर्गातीत शक्ति नाही; आपणच आपल्या नशिबाचे धनी आहोत, आपणच आपल्या प्रयत्नानी प्रगतीचे आत्यंतिक शिखर गाठले पाहिजे इत्यादि आत्मकर्तृत्वाची व आत्मवैभवाची जाणीव मानवात प्रादुर्भूत होते. विज्ञा-

नालाही विश्वाच्या सर्व रहस्याचा अद्यापही उलगडा झालेला नाही. परंतु विज्ञानप्रणीत ज्ञानाची निश्चिती अनुभवसिद्ध आहे. जगात अज्ञेय असे कांहीच नाही. आपले ज्ञान हे अपूर्ण आहे, पण आपली ज्ञातृत्वशक्ति हीही अमर्याद आहे. विज्ञानाने मात्र पूर्ण ज्ञान व अनाद्यनंत स्वरूप यांचा बोजवारा उडविलेला आहे यात शंका नाही. विज्ञानप्रणीत ज्ञानाचा निष्कर्ष हा कीं, जगात स्थिर व चिरस्थायी असे काही नाही. अमर्याद बदल हा विश्वाचा धर्म आहे. विश्वामध्ये एकसारखी दृग्गोचर होणारी स्थित्यंतरे ही देखील निसर्गातील गुणधर्मानुसारच चाललेली आहेत.

विज्ञानाच्या विकासाचा एवढा मात्र परिणाम झाला आहे की तत्त्वज्ञानाने आपले क्रियाशून्य व भोंगळ कल्पनाजालाचे स्वरूप टाकून दिले व विज्ञानांचे विज्ञान (The science of all sciences) ही श्रेष्ठ पदवी पटकावून तदनुरूप आपल्या क्रियापूर्ण व तेजस्वी पराक्रमाचा झेंडा फडकविला. सारांश, विज्ञान हे तत्त्वज्ञानाशी समरस होऊन तत्त्वज्ञान हे सर्व विज्ञानांचा परिपाक बनलेला आहे.

अशा तऱ्हेची वैचारिक क्रांति हिंदुस्थानात घडून आल्याशिवाय हिंदुस्थानात राज्यक्रांति व तदुत्तर समाजविकास ही घडून येणार नाहीत. यूरोपात ही वैचारिक क्रांति घडवून आणण्यास अनेक गॅलिलियो, कोपरनिकस ब्रूनोसारख्या यूरोपीय विज्ञानविशारदांना अनेक दिव्यातून मार्ग आक्रमण करावा लागला. त्यामुळे यूरोप खंड हे आज जागतिक संस्कृति आणि प्रगति यांच्या अग्रभागी विराजमान झालेले आढळून येते. हिंदुस्थानात अद्यापही बुद्धिवादप्रणीत विज्ञान युगाचा उदय झालेला नाही. हिंदुस्थानातील वातावरण अंधश्रध्दा धर्मभोळेपणा आणि वेडगळ सामाजिक आचारविचार यांच्या दुर्गंधानी व्यापलेले असे अजूनही नजरेस पडते. असे का असावे याचा थोडासा विचार झाला पाहिजे. याबरोबरच हिंदी स्वातंत्र्य आणि वैचारिक क्रांति यांचा अन्योन्यसंबंध काय आहे याचाही येथे अंमळ खल होणे अप्रस्तुत नाही.

मानवी सुधारणा आणि सांस्कृतिक प्रगति (civilisation and cultural progress) या दृष्टीने विचार केल्यास पंधराव्या शतकाच्या अखेरपर्यंत हिंदुस्थान आणि यूरोप हे दोन्ही भूप्रदेश सुधारणा आणि संस्कृति यांच्या एकाच ह्मणजे समसमान पातळीवर होते. दोहोकडील विचारसरणींचा विकास एकाच धर्तीवर आणि सारख्याच वेगाने होत गेला. यूरोपमधील जुनी ग्रीक विचारसरणी ह्मणा, अगर हिंदुस्थानातील जुनी सांख्य कणादांची तत्त्वज्ञाने–किंबहुना औपनिषदिक विचारसरणी ह्मणा, दोन्हीही प्रमुखपणे भौतिकवादीच आहेत. दोहोंचे अधिष्ठान चिकित्साबुध्दि (spirit of enquiry) हीच आहे. पण पुढे केवळ चिकित्सा बुध्दीच्या योगाने दोहोंकडील मानवाना नैसर्गिक दृश्यांच्या भौतिक कारणांचा उलगडा होईना. ह्मणून प्राच्य आणि पाश्चात्य मानवानी नैसर्गिक दृश्यांच्या बुडाशी दैवी शक्ती कल्पिल्या. येथपासून दोहोकडील मानवांच्या मनावर धार्मिक विचारसरणीचा पगडा बसू लागला. मानवांची स्वतंत्र प्रतिभा धार्मिक विचारसरणीच्या कोंडीतच अडकून राहिली. ती कोंडी कालांतराने ह्मणजे १५ व्या व १६ व्या शतकात यूरोपच्या क्षितिजावर नव्याने उदित होणाऱ्या क्रांतिप्रवण सामाजिक शक्तीनी फोडली. या गोष्टीचा असा परिणाम झाला की चिकित्साबुध्दीचे पुनरुज्जीवन झाले; शब्दप्रामाण्य मागे पडून बुध्दि-प्रामाण्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले; धर्माचे सिंहासन विज्ञानाने बळकाविले. यानंतर युरोपात घडून आलेल्या वैचारिक क्रांतीचा संक्षिप्त इतिहास वर विदित केलेलाच आहे. त्या इतिहासात नवोदित सामाजिक शक्ती कोणत्या याचेही पण थोडेसे दिग्दर्शन केलेले आहे. त्या सामाजिक शक्ती ह्मणजे नवोदित व्यापारी मध्यम वर्ग आणि त्याची मोठी आवृत्ति अशी यूरोपीय भांडवलशाही ही होत. या सामाजिक शक्तींचा पुरेसा विकास हिंदुस्थानात झाला नाही; ह्मणून तेथे बुध्दिवादाचा उगम होऊ शकला नाही; आणि विज्ञान युगास प्रारंभही पण झाला नाही.

येथे असा प्रश्न उपस्थित होतो की, यूरोपला मानवी विकासाच्या आघाडीवर नेऊन सोडणाऱ्या त्याचप्रमाणे नव्या वैचरिक घटना व नवी सांस्कृतिक मूल्ये यूरोपात निर्माण करणाऱ्या उपरोक्त सामाजिक शक्ति हिंदुस्थानात का प्रादुर्भूत झाल्या नाहींत? याचे उत्तर शोधून काढण्यासाठीं आपल्यामागील इतिहासाकडे वळले पाहिजे. ब्रिटिश आक्रमणामुळें त्या सामाजिक शक्ती मुळातच खुरडल्या गेल्या, हे खरे असले तरी ब्रिटिशांची सत्ता येथे अवघी दोनशे वर्षेच आहे. त्यापूर्वी त्यांचा येथे पादुर्भाव का झाला नाही ? ब्रिटिशापूर्वी झाला तरी आपला देश परचक्रांकित होताच.

सर्वसाधारणपणे गेली सातशे वर्षे आपला देश परकीय आक्रमणाखाली आहे. त्यामुळें त्याची खची दोऊन तद्गत समाजाच्या विकासक्रमास प्रचंड अडथळे आले. त्यामुळे देशातील आर्थिक शक्तींचा कोंडमारा होऊन यूरोपातल्याप्रमाणे सरंजामशाहीला तीतील समाजरचना, वैचरिक घटना, जीर्ण संस्था, सांस्कृतिक मूल्ये इत्यादीसह उलथून टाकण्यास समर्थ अशी प्रभावी भांडवलशाही येथे विकास पावू शकली नाही.सारांश,याप्रमाणे शेकडो वर्षे हिंदी समाज परचक्राच्या कोंडीत असता यूरोपमध्यें वैचारिक क्रांतीची प्रचंड चळवळ (The great renaissance movement) क्रांत्यामागून क्रांत्या उठवूंन देत होती. परचक्राच्या सातत्यामुळे हिंदुस्थानास वैचारिक क्रांतीची चळवळ निर्माण करता आली नाही; जगाच्या इतर प्रदेशात ती दाणादाण उडवून देत असता, बाहेरच्या देशातून तिला येथे आणून तिचे बी येथे रुजविण्याचे सामर्थ्यही आपल्या देशात राहिले नाही. पुढे ब्रिटिश सत्ता येथे स्थिर झाल्यानंतर तर हिंदी सामाजिक आर्थिक शक्तींचा अधिकाधिक कोंडमारा होऊ लागला. ब्रिटिशानी अर्वाचीन सुधारणेची आगगाड्या तारायंत्रे इत्यादि बाह्य चिन्हे या देशात प्रचलित केली; पण अर्वाचीन क्रांतिप्रवण विचार प्रवाहापासून आपल्या देशातील सुशिक्षितास अलग ठेवण्याची खबरदारी घेतली. अर्वाचीन पुरोगामी विचारापासून अलिप्त

ठेवण्यात आलेली आमच्या सुशिक्षितांची मने अर्थात् आपल्या देशाच्या मागील इतिहासाकडे पाहून समाधान मानून घेऊ लागली. उत्साहविध्वंसक अशा निराशाजनक वर्तमान काळास कंटाळलेले हिंदी बुध्दिजीवि साहजिकच भूतकाळास कवटाळू लागले व त्यातून स्फूर्ति प्राप्त करून घेण्याची अपेक्षा करू लागले. आमची प्राचीन संस्कृति फार उच्च दर्जाची होती, आमचे पूर्वज बौध्दिक श्रेष्ठतेच्या परमोच्च बिंदूपर्यंत पोचलेले होते, आमची प्राचीन संस्कृति व बुध्दिवैभव यापुढे पाश्चात्य संस्कृति हिणकस ठरते, ती संस्कृति भौतिक आहे आणि आपली संस्कृति अध्यात्मिक आहे अशा घातुक विचाराना आपले शिक्षित तरुण बळी पडू लागले. वास्तविक अशा विचारांचे जाळे पसरून त्यात आपल्या होतकरू युवकाना अडकावून निष्क्रिय करण्याचा किपलिंगसारख्या साम्राज्य मुत्सद्यांचा हा डाव आहे. ‘East is East and West is West and the twin shall never meet’ या किपलिंगच्या सूत्राचा मूळ उद्देश हा की आम्ही आमच्या अध्यात्मिक विचारात तल्लीन व प्राचीन वैभवाच्या कल्पनातर्क होऊन स्वस्थ बसावे आणि पाश्चात्यानी आमच्या सर्व भौतिक गरजा–राज्य करण्यापासून ते सुई टाचणीसारख्या क्षुद्र वस्तू पुरविण्यापर्यंत–भागवाव्या.

पूर्व ही अध्यात्मवादी आणि पश्चिम ही भौतिकवादी असे तरी का ह्मणावे? हिंदुस्थानात भौतिकवाद नव्हता की काय? अगर जगाच्या भौतिक संस्कृतीत हिंदुस्थानाने काहीच का भर घातली नाही? आमच्या प्राचीन पूर्वजानी संपादिलेल्या भौतिक ज्ञानावर आणि अनुभवावर अर्वाचीन पाश्चात्य संस्कृति काही अंशी आधारलेली आहे. मग पाश्चात्यानी वाढविलेल्या विज्ञानप्रणीत भौतिक संस्कृतीचा उपयोग आपला देश उत्कर्षित करण्यास आपण का करूं नये? आह्मी पाश्चात्यांच्या मागे राहिलो यात आमचा काहीच अपराध नाही. काही ऐतिहासिक घडामोडीमुळे ह्मणजे परदास्य बौद्धिक कोंडमारा, आर्थिक पिळणूक इत्यादि कारणामुळे मानवी विकासास

आपण पारखे झालो आहोत. आपल्याला आता तो मानवी विकासाचा टप्पा गाठावयाचा आहे. त्यासाठी आपल्याला पाश्चात्यापासून पुष्कळ गोष्टी शिकावयाच्या आहेत. सांस्कृतिक दृष्ट्या आपण स्वयंपूर्ण आहोत असे समजून घेणे हे देशहितविघातक आहे.

तेव्हा, ज्या वैचारिक क्रांतीच्या चळवळीने यूरोपमधल्या मध्ययुगीन विचारसरणीचा निरास घडवून आणला आणि यूरोमध्ये नव्या सामाजिक चळवळींना चालना देणारी आणि बहुजनसमाजास अधिकाधिक स्वातंत्र्य प्राप्त करून देणाऱ्या राजनैतिक दृष्टिकोणास प्रसवणारी आधुनिक विज्ञानप्रणीत विचारसरणी विकास पावण्यास अनुकूल अशी वस्तुस्थिति निर्माण केली, त्या वैचारिक क्रांतीच्या चळवळीचा सूत्रधारी आत्मा कोणता हे आता पाहूं. तो ह्मणजे इतिहासाचे चिकित्सक दृष्टीने निरीक्षण करणे हा! ह्मणजे आपल्या परंपरागत कल्पना, सर्व भूतकालीन वैचारिक घटना, रूढ मानवी संस्था, इत्यादि सर्व सारासार विवेकबुद्धीच्या कसोटीस लावून त्यात आपल्या सामाजिक विकासास सहाय्य करणारे काय आहे आणि त्यास अडथळा आणणारे काय आहे याचे संशोधन करणे. एवढे करून स्वस्थ बसावयाचे नाही, तर भूतकालातील आपल्या ज्या कल्पना, वैचारिक घटना आणि संस्था आपल्या सामाजिक प्रगतीस उपयुक्त आहेत तेवढ्या ठेवून बाकीच्या सर्व वर्ज्य करणे. असे पहा की जर आह्मास अर्वाचीन राष्ट्र या नात्याने प्रगति करावयाची आहे, त्याचप्रमाणे जर आमच्यातील दुःखांचे डोंगर, अज्ञानाचा अंधार, धर्मवेडाचा कळस, मागसलेपणाची परिसीमा, दुराग्रहांची कोळिष्टके इत्यादि आह्मास समूळ नष्ट करावयाची आहेत, तर यूरोपने तसे करण्यास जी दिशा धरली, त्या दिशेने आह्मास जावयास नको काय? केवळ भूतकालाच्या चिंतनाने आह्मी जगू शकत नाही. उलट, भूतकालाच्या वेडामधून आह्मी आमची मुक्तता करून घेतली पाहिजे. भूतकाल हा मेलेला आहे, त्याला आह्मी गाडले पाहिजे. आता आमच्या

भविष्यकालीन प्रगतीस हातभार लावणारे भूतकालात काही तरी सापडले तर त्याचा भविष्यकालास उपयोग करून घ्यावा. त्यासाठी आमच्या मागील इतिहासाची आह्मी चिकित्सक दृष्टीने छाननी केली पाहिजे. याचा अर्थ आह्मी बौद्धिक अगर बुद्धिप्रामाण्याची चळवळ अख्या देशभर उटवून दिली पाहिजे. या चळवळीच्या नांगरणीने स्वातंत्र्याचे बी पेरण्यास अनुकूल अशी भूमिका या देशात तयार होईल. आतापर्यंत आह्मी हाती धरलेल्या चळवळी का फसल्या? कारण आह्मी आमच्या भूतकालाचे नाहक गोडवे गातो. आह्मास आमच्या जुन्या जीर्ण झालेल्या कल्पना आणि परंपरा यांचे पुनरुज्जीवन करावयाचे आहे. एवढेच नव्हे तर या कल्पनांचे आणि परंपरांचे लोण आह्मास जगातल्या कोन्या-कोपऱ्यापर्यंत पोचवावयाचे आहे असे आह्मी ह्मणतो. जगास आह्मास संदेश द्यावयाचा आहे या कल्पनेत आह्मी रममाण होतो. आह्मास आमचाच उद्धार करता येत नाही, तर आह्मी जगास कसे तारणार या गोष्टीचा आह्मास विसर पडतो. भूतकालाकडे ह्मणजे मागे दृष्टि ठेवून आह्मास पुढे ह्मणजे भविष्याप्रत जाता तरी येईल कसे? भूतकालापासून स्फूर्ति मिळविण्याची कल्पनाच आधी आपण सोडून दिली पाहिजे.

आपण जगाच्या इतिहासाकडे सूक्ष्म आणि सखोल दृष्टीने पाहू लागलो, तर आपल्याला असे आढळून येईल की जगातील अर्वाचीन पुढारलेल्या राष्ट्रांना आपल्या भूतकाळाची राखरांगोळी केल्याशिवाय आपल्या वैभवाचा भविष्यकाळ उभारता आला नाही. त्या राष्ट्रांनी आक्रमिलेले मार्ग आक्रमण्याशिवाय आह्मास दुसरी गति नाही. राजनैतिक क्रांति किंवा सामाजिक उठाव घडून येण्यापूर्वी वैचारिक क्रांति घडून आलीच पाहिजे हेच आह्मास जगातील प्रत्येक पुढारलेल्या राष्ट्राचा इतिहास सांगतो. आमच्या विचार करण्याच्या पद्धतीस शेकडो वर्षांच्या सवयीमुळे धार्मिक वळण लागलेले आहे. एका निसर्गातील शक्तीच्या इच्छेनुसार जगातल्या सर्व

घडामोडी चाललेल्या आहेत अशी आमची श्रद्धा आहे. एका वाक्यात सांगावयाचे ह्मणजे हिंदी बहुजनसमाजाची मनोवृत्ति ही ईश्वरवादी ह्मणजेच दैववादी आहे. त्याना ईश्वर इच्छेनुरूप चाललेल्या प्रचलित वस्तुस्थितीमध्ये बदल घडवून आणणे पाप वाटते. साम्राज्यशाही आक्रमण हे देखील ईशेच्छेचाच परिणाम आहे असे तो समाज मानतो. ह्मणून साम्राज्यविरोधी लढा चालविण्यापूर्वी बहुजनसमाजाच्या मनावर जी परमेश्वरी साम्राज्याची पकड आहे ती आधी नष्ट केली पाहिजे. तेव्हा आह्माला जर राजकीय स्वातंत्र्य मिळवावयाचे आहे,तर वैचारिक क्रांतीची चळवळ ह्मणजे आपल्या भूतकालाकडे आणि रूढ परंपराकडे चिकित्सक दृष्टीने पाहावयास शिकविणारी बौद्धिक चळवळ ही आधी हाती घेतली पाहिजे. एकादा गृहस्थ आमचेजवळ आला आणि स्वातंत्र्याच्या चळवळीत का सामील व्हावे यासंबंधी चिकित्सा करू लागला, तर स्वातंत्र्याच्या चळवळीपासून त्या गृहस्थाचे हित होणारे आहे व त्यास सुख लागणारे आहे अशी त्याची खात्री आह्मास करून देता आली पाहिजे ह्मणजे मनापासून तो स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेईल. स्वातंत्र्य–प्राप्ति ही आपल्या प्रगतीच्या मार्गातील अनेक अडथळे व अडचणी नाहीशी करील आणि सर्व समाजाचे आर्थिक आणि सांस्कृतिक प्रश्न ती सोडवील असे अखिल जनतेच्या बुद्धीस पटवून दिले ह्मणजे सगळी जनता स्वातंत्र्याच्या चळवळीशी समरस होईल.

त्यातल्या त्यात आमच्या स्वातंत्र्याच्या चळवळीत एकप्रकारचा जोम, एकप्रकारचा उत्साह आणि एकप्रकारची एकजूट निर्माण व्हावयास पाहिजे, तर आमच्या मनावर जी हजारो वर्षांच्या जुन्या मतांची आणि रूढींची पकड आहे, तीतून आपल्या मनाची मुक्तता झाली पाहिजे. ते कसे करावयाचे ? आपला इतिहास, आपल्या सामाजिक परंपरा, आपली प्राचीन विचारपध्दति, आपले तत्त्वज्ञान आणि धार्मिक मते आणि अखेर जीवनाकडे पाहण्याच्या आपला प्रचलित दृष्टिकोण इत्यादि सर्व चिकित्सक ह्मणजे टीका-

त्मक बुध्दिवादाच्या कसास लावली पाहिजेत! ह्मणजे आपल्यास असे कळून चुकेल की ती सर्व, स्वातंत्र्य–प्राप्ति करून देण्याच्या कामी तसेच सामाजिक प्रगति घडवून आणण्याच्या कामी अगदी कुचकामाची आहेत. याचा अर्थ असा नव्हे की यूरोपातून आलेल्या सर्वच्या सर्व कल्पना आपण स्वीकाराव्या. त्या कल्पना प्रचलित हिंदी वस्तुस्थितीस कितपत जुळणाऱ्या आहेत हे आपण आपल्या बुद्धिवादाच्या कसास लावून पाहावे. मार्क्सची किंवा लेनिनची सर्वच्या सर्व वाक्ये म्हणजे आप्तवाक्ये किंवा वेदवाक्ये अशी मानण्याची प्रथा काही हिंदी युवकात पडत चाललेली आहे. हा सुद्धा आपल्या बौद्धिक गुलामगिरीच्या सवयीचा परिणाम आहे. कल्पना कोणत्याही असोत, मग त्या प्राचीन असोत अगर अर्वाचीन असोत, त्या प्राच्य असोत किंवा पाश्चात्य असोत; त्या ग्रहण करण्यापूर्वी आपल्या चिकित्सक अशा टीकात्मक बुद्धीच्या कसास लावून त्या आपल्या स्वातंत्र्य प्राप्तीच्या आणि सामाजिक प्रगतीच्या कामी उपयुक्त असतील तरच ग्रहण कराव्या. यूरोपमध्ये १७।१८ व्या शतकात झालेल्या वैचारिक क्रांतीच्या चळवळीचे अंतर्गत स्वरूप असेच होते. हिंदी वैचारिक क्रांतीची जळवळ हाती धरणाऱ्यानी मध्ययुगीन आचारविचारातून यूरोपची मुक्तता करणाऱ्या अठराव्या शतकातील रूसो व्हाल्टेरसारख्या फ्रेंच तत्त्ववेत्यापासून स्फूर्ति मिळविली पाहिजे आणि हिंदी समाजाची मध्ययुगीनता ह्मणजे त्यातील पैतृक परंपरा, (patriarchal traditions), वर्णाश्रममूलक नानाविध ज्ञातिविषयक उच्चनीच श्रेणीकल्पना, प्राचीन चालीरीती इत्यादि समूळ नष्ट करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. तात्पर्य, अशातऱ्हेची वैचारिक क्रांति घडून आल्याशिवाय राजकीय किंवा सामाजिक क्रांति आपल्या देशात घडून येणेच अशक्य. आपले राजकीय प्रश्न आणि संस्कृति सुधारणा या संबंधाचे प्रश्न यांचे परस्पर संबंध अत्यंत निकट असेच आहेत. आमच्या राजकीय गुलामगिरीसुळे क्रांतिकारक कल्पनांचा येथे उदय होण्यास अनुकूल वस्तुस्थिति निर्माण

होऊच शकली नाही. आमच्या परकीय राज्यकर्त्यांनीही आपल्या स्वार्थासाठी आमच्या जुन्या परंपरागत कल्पनावर आधारलेल्या सामाजिक संबंधावर, घटनावर आणि संस्थावर तजेला चढविण्याच्या कामी आपला हातभार लावलेला आहेच. ह्मणून आह्मास राजनैतिक मुक्तता हवीच हवी. गुलमांच्या राष्ट्रास संस्कृति असूच शकत नाही! परंतु ज्या प्राचीन परंपरापासून आम्हास शेकडो वर्षे परदास्यात खितपत पडावे लागले आहे त्यांच्या बंधनातून आपली सुटका करून घेण्याचे धैर्य आपल्या अंगी आल्याशिवाय राजनैतिक स्वातंत्र्य मिळविण्याचे सामर्थ्य आपल्या अंगी येणार नाही.

जोवर हिंदी बहुजनसमाज आपली अध्यात्मिकता, आपले धर्मवेड घालवून देत नाही, तोवर ऐहिक प्रगतीची गोष्टच काढू नका. नवी सृष्टि, नवी समाजरचना निर्माण करण्याच्या दृष्टीने केलेली मानवी चळवळ ही जगातल्या यच्चावत् हालचाली परमेश्वरी इच्छेनुसार चाललेल्या आहेत या धार्मिक कल्पनेशी जुळणारी नाही. धर्म हा जनतेपासून सर्व संगपरित्यागाची अपेक्षा करतो; तो मानवाना सर्वस्वी देवावर भार टाकून राहण्यास शिकवितो, म्हणजे त्याना तो दैववादी बनवितो; धार्मिक विचारपद्धति ही मानवातील स्वतंत्र प्रतिभा नाहीशी करून टाकते; त्यामधील क्रांतिकारी मनःप्रवृत्ति मारून टाकते; प्रचलित समाजव्यवस्था किंवा चालू राज्यपद्धति ही ईश्वरनिर्मित आहे अशी त्यांची भावना करून सोडतो. म्हणून त्याविरुद्ध बंड करण्यास धार्मिक विचारसरणीचा मनुष्य धजत नाही. परमेश्वरी शक्तीच्या काल्पनिक इच्छेवर विसंबून राहणारा हा मनुष्य मनाने गुलाम, कमकुवत, बावळट आणि कसल्याही वस्तुस्थितीत समाधान मानून घेणारा बनतो. त्याच्यातील सर्व कर्तृत्व शक्ति नष्ट होऊन जाते.

हे एक चित्र झाले! याच्या उलट चित्र विज्ञानप्रणीत विचारसरणीच्या मनुष्याचे असते. विज्ञान निर्माण करून मानवानी निसर्गाला जिंकले आहे असे त्याला वाटते. तसेच मानव हा जितके जितके जास्त प्रयत्न करील,

तितक्या तितक्या प्रमाणात त्याला निसर्गावर अधिकाधिक विजय संपादन करता येतील असा त्याचा ठाम निश्चय असतो. या भावनेमुळे त्याच्यामध्ये आत्मविश्वास आणि आत्मकर्तृत्व यांची जाणीव निर्माण होते. आपल्या नशिबाचा धनी ईश्वर वगैरे कोण नसून आपणच आपल्या नशिबाचे शिल्पकार आहोत अशी त्याची खात्री असते. त्यामुळे आत्मबळाचा जोम त्याच्या अंगात नुसता मुसमुसत असतो. त्याच्या नखशिखांत क्रांतीचे चैतन्य खेळत असते. या मासल्याची वैचारिक क्रांति हिंदी समाजात घडून आली पाहिजे. ती घडवून आणण्यासाठी हिंदी बुद्धिजीवि जनतेने चंग बांधला पाहिजे. राज्यक्रांति किंवा समाजक्रांति घडवून आणण्यापूर्वी वैचारिक क्रांतीची पार्श्वभूमि तयार करावी लागते हेच आपल्याला जगाच्या इतिहास सांगतो. वर दिग्दर्शित केल्याप्रमाणे यूरोपमध्ये बेकन, डेकार्टा,व्हाल्टेर, कँट, हेगेल,मार्क्स, एंगल्स इत्यादि युगप्रवर्तक विचारवंतानी वैचारिक क्रांति घडवून आणली, म्हणूनच १६८८ सालच्या इंग्रजी राज्यक्रांतीपासून ते तहत १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीपर्यंतच्या अवधीत अनेक यूरोपीय राज्यक्रांत्या आणि समाज–क्रांत्या घडून आल्या. अर्वाचीन विज्ञानविकास आणि औद्योगिक प्रगति ही त्याच क्रांत्यांचे मधुर फळ आहे. याच विचारवंतांच्या विचारप्रक्षोभक लिखाणानी यूरोपातील मध्ययुगीन कल्पना आणि श्रद्धा यांची होळी केली आणि त्यांच्या राखेतूनच नवे विज्ञानप्रणीत जग निर्माण करण्याच्या कार्याचा पाया घातला.

चालू वीसाव्या शतकात देखील आपले विचार, आपल्या श्रद्धा, आपल्या चालीरीति ह्या मुख्यत्वेकरून मध्ययुगीन आहेत. आमचा दृष्टिकोण धार्मिक आहे. अंधश्रद्धेवर आमची सर्व भिस्त. दैनंदिन जीवनात आम्ही अगदी क्वचित् प्रसंगी बुद्धिवादी असलेले आढळून येतो. अशी जोवर वस्तुस्थिति आहे तोवर आमच्या राष्ट्रास स्वातंत्र्य मिळणे, तद्वत समाजाचा विकास होणे आणि आपल्या अभागी राष्ट्रास जगातल्या पुढार-

लेल्या राष्ट्रांच्या पंक्तीचा लाभ मिळणे या गोष्टी मृगजलवत् आहेत असेच मानणे भाग आहे. म्हणूनच हिंदी सुशिक्षितानी विशेषत: युवकानी या बौद्धिक गुलामगिरीविरुध्द बंड पुकारून त्यातून हिंदी समाज मुक्त करण्यास बध्दपरिकर झाले पाहिजे. असो, आता हिंदी समाजाची राजनैतिक आणि आर्थिक दास्यातून सुटका करण्याची ताकद ज्या वादात आहे अशा क्रांतिवादाकडे वळूं.

क्रांतिवाद

" The Indians will not reap the fruits of the new elements of society scattered among them by the British bourgeoisie, till in Great Britain itself the now ruling classes shall have been supplanted by the industrial proletariat, or till the Hindus themselves shall have grown strong enough to throw off the English yoke altogether. At all events, we may safely expect to see, at a more or less remote period, the regeneration of that great and interesting country, whose gentle natives are, to use the expression of Prince Saltykov, even in the most inferior classes, " plus fins et plus adroits que les Italiens, " whose submission even is counterbalanced by a certain calm nobility, who, notwithstanding their natural languor, have astonished the British officers by their bravery, whose country has been the source of our languages, our religions, and who represent the type of the ancient German in the Jat and the type of the ancient Greek in the Brahmin. "

---*Karl Marx on India.*

वरील उतारा अर्वाचीन क्रांतिवादाचा आद्यजनक जो कार्लमार्क्स त्याने १८५३ इसवीत लिहिलेल्या एका पत्रातून घेतलेला आहे. त्याप्रमाणे हिंदुस्थानात होऊ घातलेल्या क्रांतीच्या संभवासंबंधाने मार्क्सने दोन विकल्प अनुमानिलेले आहेत. हिंदी जनता संघटनेची साम्राज्यविरोधी फळी उभारून ब्रिटिश साम्राज्यशाही उलथून टाकील त्यावेळी, किंवा ब्रिटिश भांडवलशाहीची सत्ता कामगार वर्गाच्या हाती जाईल म्हणजे ब्रिटनमध्ये कामगार क्रांति होईल त्यावेळी, अशा दोहोपैकी कोणत्या तरी एका प्रसंगी हिंदुस्थानात क्रांति घडून येईल आणि हजारो वर्षे कुचंबिलेला हिंदी समाज प्रगति पथावर

आरूढ होईल असे विज्ञानप्रणीत भविष्य मार्क्सने वर्तविलेले आहे. पहिल्या विकल्पानुसार क्रांति घडवून आणण्याचा अयशस्वी प्रयत्नही पण हिंदी जनतेने काँग्रेसच्या जन्मापासून ते चालू महायुद्धास तोंड लागेपर्यंत ह्मणजे जवळजवळ ५४ वर्षे साम्राज्यविरोधी लढा देऊन केला, त्याचा साद्यंत इतिहास आतापर्यंत कथन करण्यात आलेला आहेच. सांप्रतच्या नाझीविरोधी युद्धाने ब्रिटनमध्ये घडवून आणलेल्या परिवर्तनामुळे, दुसऱ्या विकल्पानुसार ब्रिटनमध्ये आणि तदुत्तर हिंदुस्थानात क्रांत्या घडून येण्याचा संभव मात्र नजरेसमोर स्पष्ट दिसतो आहे. क्रांतीच्या प्रक्रियेला इंग्लंडात सुरवात झालेली असून दिवसेदिवस कामगार पक्षाचे वर्चस्व तेथे जास्त जास्त वाढत असलेले दृग्गोचर होत आहे. ह्मणूनच मार्क्सवादाचे हिंदी तज्ञ कॉ. मानवेन्द्रनाथ रॉय हे आपला साम्राज्यविरोधी लढ्याचा प्रबंध बाजूला ठेवण्यास सांगत असून हुकूमशाहीविरुद्ध ब्रिटिश कामगारानी चालविलेल्या सांप्रतच्या लढ्यात सहभागी होऊन हिंदी जनतेने ब्रिटिश कामगाराना विजय संपादन करण्यास मदत करावी असा सल्ला देत आले आहेत. सध्याचे युध्द सुरू झालेल्या घटकेस आंतरराष्ट्रीय साम्राज्यविरोधी लढ्याचे पर्यवसान हुकूमशाहीविरुध्द जागतिक लोकशाहीच्या लढ्यात होते असलेले त्यांच्या सूक्ष्म आणि भेदक अशा मार्क्सवादी दृष्टीस स्पष्ट दिसून आले. चालू युद्धासंबंधाचे कॉ. रॉय यानी त्यावेळी काढलेले अनुमान नाझींच्या सोव्हिएट रशियावरील आक्रमणाने खरे ठरविलेले आहे. कॉ. रॉय हे हिंदी क्रांतिवादाचे प्रणेते आहेत. त्यानी १९२० सालापासून आतापर्यंत क्रांतीचे तत्त्वज्ञान आणि कार्यक्रम यांचा सुसंगत विकास घडवून आणलेला आहे. कॉ. रॉय हे मुळचे प्रतिगामी राष्ट्रवादी, दहशतवादाच्या अवलंबनाने हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्ता उलथून टाकण्याच्या खटपटीत असता त्यानी अमेरिकेस प्रयाण केले. मेक्सिकोत क्रांति घडवून आणीत असता ते पक्की मार्क्सवादी बनले. त्यानी मार्क्सवाद आणि लेनिनवाद यांचा केलेला अभ्यास गाढ असून अनेक

जागतिक क्रांत्यांचा त्यांचा अनुभव ताजा आहे. असो, रॉयप्रणीत हिंदी क्रांतिवादाचे तत्त्वज्ञान आणि कार्यक्रम विशद करून सांगण्यापूर्वी हिंदुस्थानात क्रांतिवादी चळवळीचा उगम आणि फैलाव कसा झाला याचा इतिहास देणे अत्यवश आहे.

महायुद्धामुळे शेतकरीकामकऱ्यांची हवालदील झालेली वस्तुस्थिति व रशियनक्रांति यशस्वी झाल्यामुळे नवविचारप्रवाहाची आलेली लाट या परिस्थितीतून हिंदी क्रांतिवादी चळवळीचा उगम झाला. याच सुमारास 'थर्ड इंटरनॅशनल' या नावच्या कामगारांच्या मध्यवर्ति जागतिक संस्थेचा लेनिनच्या नेतृत्वाखाली जन्म झाला. ही संस्था स्थापन करण्याच्या कामी कॉ. रॉय हेही एक प्रमुख होते. जी जी राष्ट्रे साम्राज्यशाहीच्या दडपणाखाली आहेत, त्याना त्यांच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीत मदत करणे, हे तिसऱ्या इंटरनॅशनलचे ध्येय व कर्तव्य आहे, असे तिच्या १९२० च्या दुसऱ्या अधिवेशनाने जाहीर केले आणि तदनुसार हिंदी राष्ट्रीय सभेच्या काही पुढाऱ्याशी वाटाघाटी झाल्या. पण ते पुढारी शेतकरीकामकऱ्याच्या कार्यक्रमाला अत्यंत घाबरले व त्यानी कम्युनिस्ट इंटरनॅशनलशी सख्य करण्यास विलक्षण किंबहुना अपमानास्पद अशा अटी घातल्यामुळे दोहोंचा स्नेह जमण्याचे तसेच राहून गेले. उलट, पूर्ण स्वातंत्र्य संपादन करण्यासाठी क्रांति जर करावयाची व त्या क्रांतीचे जू शेतकरी–कामकऱ्यांच्या मानेवर ठेवावयाचे, तर त्यांची दैनंदिन गाऱ्हाणी व आकांक्षा यांच्या पायावर कार्यक्रमाची उभारणी करणे अवश्य नाही काय, असा इंटरनॅशनलचा तर्कशुद्ध अभिप्राय होता. ही इंटरनॅशनलची विचारसरणी नवोदित कम्युनिस्ट गटाने गया काँग्रेसमध्ये (१९२२) पत्रके वाटून प्रसृत केली. पण ब्रिटिशांच्या धमक्या व क्रांतीची भीति यामुळे त्रस्त झालेल्या कॉंग्रेसधुरीणांच्या गळी काही केल्या, इंटरनॅशनलची क्रांतिवादी विचारसरणी उतरेना.

'थर्ड इंटरनॅशनल' चे ध्येय, धोरण व कार्यक्रम ठरविण्यात कॉ.

रॉय यांचे बरेच सहाय्य होत असे. या संस्थेचे कार्यकारी मंडळ व अध्य-क्षमंडळ यांत रॉय यांची निवडणूक झाली. कॉ. रॉय यानी लेनिनच्या सहकार्याने हिंदी राजकीय प्रश्नाबाबत एक प्रबंध यावेळी लिहिला. हिंदी राजकीय प्रश्नांची यात सांगोपांग चर्चा करण्यात आली होती. हिंदुस्थानातील कम्युनिस्टानी तेथील राजकीय लढ्यात कोणते धोरण अमलात आणावयाचे याचे स्पष्ट दिग्दर्शन त्यात केले होते. १९२० सालच्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या द्वितीय अधिवेशनात तो प्रबंध मान्य करण्यात आला व तदनुसार वर उध्दृत केलेले इंटर–नॅशनलचे वासाहातिक धोरण आखण्यात आले. किंबहुना कॉ. रॉय यांच्याचमार्फत बर्लिनमध्ये 'व्हॅनगार्ड' नावचे पत्र वसाहतीतील कम्युनिस्ट चळवळीकरता इंटरनॅशलनने सुरू केले. रॉय यांचे पहिल्यापासूनच असे ह्मणणे होते की, देशातील क्रांतिकारक विचाराच्या तरुणानी राष्ट्रीय क्रांतीचा कार्यक्रम देशापुढे ठेवण्यासाठी कॉंग्रेसमधून चळवळ करावी. १९२१ सालीच अहमदाबाद येथील कॉंग्रेसमध्ये हजरत मोहानी यानी संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव आणला होता. रॉय यानी ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीचे बरेचसे सभासद व इतर देशकार्यकर्ते मिळून दोनअडीचसे हिंदुस्थानातील मंडळीशी परिचय करून घेऊन कॉंग्रेसच्या चळवळीची गाडी मार्क्सवादाच्या रुळावर यावी ह्मणून खटपट चालविली. त्याचेच प्रतिबिंब हजरत मोहानीच्या ठरावात, दासबाबूंच्या अध्यक्षीय भाषणात, व कम्युनिस्ट मंडळीनी वाटलेल्या पत्रकात दृग्गोचर होते. विशेषतः प्रत्यक्ष देशबंधु दास यांच्याशी रॉय यानी निकट परिचय करून घेतला. १९२२ साली गया कॉंग्रेसचे अधिवेशन कै. देशबंधु दास यांच्याच अध्यक्षतेखाली झाले. त्यावेळी त्यांचे जे अध्यक्षीय भाषण झाले, त्यातील महत्वाचा व अर्थपूर्ण भाग अद्याप हिंदी जनतेच्या कानात घुमत असेलहि. 'गोऱ्या नोकरशाहीऐवजी काळ्या नोकरशाहीचे राज्य हिंदुस्थानात झाले ह्मणजे हिंदुस्थानला स्वराज्य मिळाले

असे नसून, शेकडा ९० लोकांच्या हातात जेव्हा सत्ता येईल त्यावेळी हिंदी लोकाना स्वातंत्र्य मिळाले असे होईल. ' हे उद्गार दे. दास यानी अध्यक्ष-पदावरून काढले होते. या भाषणावर टीका करताना साम्राज्यवादी बातमीपत्रानी दे. दास यांच्यामध्ये कम्युनिझमचा संचार होत असल्याचा आरोप त्यांच्यावर केला. या काळात कॉ. रॉय यांच्या लिखाणातून हिंदी राजकीय लढ्यासंबंधी स्पष्ट असे विचार बाहेर येऊ लागले व त्यांच्या विचारांचा पगडा हिंदी तरुणांच्या मनावर जास्त जास्त बसू लागला. म. गांधींच्या असहकारितेच्या चळवळीचा बोजवारा उडाल्यानंतर, साहजिकच तरुणांची मने दुसरे मार्ग शोधू लागली व रॉय यांच्या स्पष्ट विचारसरणीने त्या वेळच्या बऱ्याचशा काँग्रेस कार्यकर्त्यांचे व क्रांतिकारक युवकवर्गाचे लक्ष रॉय यांच्याकडे लागून राहिले.

मध्यंतरी, १९२० च्या सुमारास मुसलमानांची पवित्र ठिकाणे मक्का व मदिना यावर ब्रिटन स्वारी करणार अशा समजुतीने, त्या पवित्र जागांचे संरक्षण करण्यासाठी काही मुसलमान तरुण स्वदेश सोडून, मुसलमानी देशात येऊ लागले होते. पवित्र ठिकाणांचे संरक्षण करणे हे आद्य कर्तव्य असे त्यास वाटले. काबूलमध्ये पाय टेवल्यावर या मुसलमान तरुणांच्या डोळ्यात अंजन पडले. तेथे अमानुल्लाने धार्मिक पवित्र ठिकाणावर ब्रिटन स्वारी करणार वगैरे सर्व हूल व वायफळ गप्पा आहेत असे त्या तरुणाना पटवून दिले. तथापि ते हिंदुस्थानाला परत जाण्यास तयार होईनात. हे सर्व तरुण सुशिक्षित होते. ते परत फिरत नाहीतसे पाहून अमानुल्लाने त्याना त्रास देण्यास सुरू केले. त्याबरोबर काही जण मायदेशी परतले; व इतरानी रशियन तुर्कस्थानचा रस्ता धरला. वाटेत काहीना सशस्त्र अफगाण दरोडेखोरांनी पकडले, पण त्यांच्या सुदैवाने ही बातमी कॉ. रॉय यांच्या कानावर गेल्यामुळे कॉ. रॉय यानी लागलीच सैन्य पाठवून त्यांची सुटका केली व त्याना रशियन तुर्कस्थानात आणले; व ताशकंद येथे एक लष्करी शाळा काढण्यात आली

होती तेथेच या तरुणांनी राहावे असा रॉय यानी त्याना सल्ला दिला. लष्करी शाळेला जोडून ' इंडिया हाउस ' ह्मणून एक वसतिगृह काढण्यात आले होते. तेथे हे सर्व तरुण काही दिवस राहिले. रॉय स्वतः या हिंदी तरुणांची फार काळजी घेत असत.

कॉ. रॉय यांच्याशी जसजसा या तरुणांचा सहवास वाढू लागला, तसतसा त्यांच्या डोक्यातील धार्मिक कल्पनांची कोळिष्टके पार झडून निघाली. राजकीय स्वातंत्र्याची स्पष्ट अशी कल्पना त्याना येऊ लागली; व परत हिंदुस्थानात गेल्यानंतर कोणता मार्ग अवलंबावा याचा धडा रॉय यांच्या सहवासात तेथे त्याना मिळाला. काही तेथे लष्करी शिक्षण घेऊन तरबेजहि झाले. पुढे ' लष्करी शाळा ' व ' इंडिया हौस ' बंद झाल्यावर मास्को येथील ' प्राच्यविद्यापीठात ' त्यांच्या शिक्षणाची रॉय यानी सोय करून दिली. रॉय यांच्या सहवासात हिंदी राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा कसा चालवावा याचे त्याना उत्कृष्ट शिक्षण मिळालेले होते. प्रथम कॉ. फजली हुसेन व त्यानंतर उस्मानी हिंदुस्थानात येऊन दाखल झाले.

हिंदुस्थानात आल्यावरोबर त्यानी ताबडतोब कार्याला सुरवात केली, बहुजनसमाजाला शिक्षण देऊन त्याना स्वातंत्र्याच्या लढ्यात खेचण्याचे कार्य मोठ्या मेहनतीचे व कुशलतेचे असते, बहुजनसमाजाच्या जागृतीचे काम हे राष्ट्रीय लढ्याचा आत्मा आहे व हे कार्य करीत असताना वर्षानुवर्षे हिंदुस्थानात चरत असलेली ब्रिटिश साम्राज्यशाही स्वस्थ बसून ही चळवळ चालू देणार होती असे थोडेच आहे! सुरवातीच्या काळात कॉ. रॉय यांच्या हाताखाली तयार झालेले दोन कार्यकर्ते, मुझफर अहमद व उस्मानी यानी कम्युनिस्ट ह्मणजेच क्रांतिवादी चळवळीचा पाया हिंदुस्थानात घातला.हळूहळू त्या चळवळीला अधिकाधिक कार्यकर्ते लाभू लागले. तात्काल हिंदुस्थान सरकारच्या रोषास ती पात्र झाली. १८१८ चा गंजलेला कायदा परजण्यात आला व लगेच काही तरुणावर सरकारचा पाहुणचार घेण्याचा प्रसंग

येऊन ठेपला.

हिंदुस्थानात क्रांतिवादी चळवळीचा पाया घातला जाण्यास कारणीभूत होणारे रॉय, तो पाया तर्कशुद्ध घातला जावा यासाठी थर्ड इंटरनॅशनलमध्ये कमालीची धडपड करीत होते. १९२० साली मान्य झालेल्या रॉय यांच्या हिंदुस्थानविषयक प्रबंधाला १९२२ साली भरलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत पुन: पुष्टि देण्यात आली. मध्यंतरी दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्यावेळी लेनिनने वसाहतींच्या प्रश्नावर एक प्रबंध लिहिला होता. त्यावर लेनिन यानी रॉय यांचे मत विचारले. बऱ्याच महत्त्वाच्या गोष्टीवर रॉय यांचा लेनिनशी मतभेद झाल्यामुळे रॉय यानी आपला स्वतंत्र प्रबंध लिहून मतभेद दर्शविला. कॉंग्रेसमध्ये दोन्ही प्रबंध पुढे मांडण्यात आले व त्यावर पुष्कळ वादविवादही झाला. सरतेशेवटी भवति न भवति होऊन दोन्ही प्रबंध मान्य करण्याची शिफारस स्वत: लेनिनने परिषदेस केली. पुढे १९२४ साली पांचव्या कॉंग्रेसने कॉ. रॉय यांचा दृष्टिकोन पूर्णपणे मान्य केला. १९२२ साली प्रसिद्ध झालेल्या 'संधिकालचे हिंदुस्थान' या पुस्तकात रॉय यानी हा दृष्टिकोन विस्ताराने मांडलेला आहे. १९१९ ते १९२८ पर्यंत कॉ. रॉय हे थर्ड इंटरनॅशनलच्या पंचप्राणापैकी एक प्राण गणले जात असत. या आठ वर्षांच्या काळात तुर्कस्थान, इराण, चीन, हिंदुस्थान या देशातील कम्युनिस्ट चळवळीला वळण देण्याचे महत्त्वपूर्ण काम कॉ. रॉय यानी स्वीकारलेले होते. असो. या चळवळींचे हिंदुस्थानावर प्रत्यक्ष काय परिणाम झाले व क्रांतिवादी चळवळीची हिंदुस्थानात कशी प्रगति झाली याचा आता विचार करू.

मुजफर महमद, उस्मानी इत्यादि वर उल्लेखिलेल्या आणि त्या वेळी मास्कोहून नुकतेच आलेल्या तरुणानी कामगारवर्गाच्या संघटनेकडे विशेष लक्ष देऊन कार्यास सुरवात केली.त्या संघटनेची दृश्येही लगेच दिसू लागली. महायुद्धाच्या कालपर्यंत हिंदुस्थानात संप किंवा कामगारसंघ यांचे

नावहि कोठे ऐकू येत नसे. महायुद्धानंतर मात्र ही स्थिति पालटली. कामगारांचे संप होणे हा नेहमीचा शिरस्ताच होऊन राहिला. कामगार-संघाची स्थापना ठिकठिकाणी होऊं लागली. १९१९ ते १९२४ सालापर्यंत कापडाच्या व तागाच्या गिरण्या, लोखंडी व पोलादी कारखाने, कोळशाच्या खाणी, रेल्वे या ठिकाणीं मोठमोठाले संप घडून आले. कामगारांनीं संघस्थापनेस सुरवात केली. कामगारांच्या या संघटनेच्या अगदी सुरवातीस ब्रिटिश साम्राज्यशाहीने दडपशाहीचे हत्यार उपसले. १९२४ सालांत कित्येक कॉंग्रेस कार्यकर्त्यांस, त्यांनीं कामगारचळवळींत भाग घेतल्याच्या आरोपावरून पकडण्यांत येऊन त्यांस तुरुंगात डांबण्यांत आले व हिंदुस्थानातील ब्रिटिश राज्यसत्ता नष्ट करण्यासाठीं कॉ. रॉय यांच्या सहकार्याने कट केल्याच्या आरोपावरून इं. पि. कोड १२१ कलमाप्रमाणे भाई डांगे, उस्मानी, भाई मुझफर अहमद, भाई गुप्ता व इतर कांही तरुण कार्यकर्ते यांच्यावर खटला भरण्यांत आला. हा खटला कानपूर कटाचा खटला या नांवाने प्रसिद्ध आहे. या खटल्यातून हे आरोपी निर्दोषी सुटतील अशी आशा नव्हतीच व अपेक्षेप्रमाणे सर्व कार्यकर्त्यांना निरनिराळ्या मुदतीच्या शिक्षा देण्यांत आल्या. या खटल्यांत जो महत्वाचा म्हणून पुरावा कोर्टापुढे सादर करण्यांत आला, त्यांत मुख्यतः कॉ.रॉय यांचे लेख, पत्रे, जाहीरनामे यांचाच विशेष भरणा होता. खालच्या कोर्टाने आरोपींना शिक्षा फर्माविल्या व या शिक्षेविरुद्ध हायकोर्टाकडे अपील करण्यात आले. अलाहाबाद हायकोर्टानें अपील फेटाळून देऊन खालील कोर्टाने दिलेल्या शिक्षा कायम केल्या.

१९२४ च्या खटल्यानंतर कम्युनिस्ट पक्षाची उघड उघड स्थापना झाली, व १९२५ मध्ये कानपूर येथे कम्युनिस्ट परिषदहि भरविण्यात आली. हिंदुस्थानात ठिकठिकाणी कम्युनिस्ट गटही तयार होत होते. मुंबई गटात कॉ. डांगे, मिरजकर, घाटे, पर्वते इत्यादि मंडळीचे 'सोशालिस्ट' नायचे

पत्र चालूच होते. ही मंडळी कामगारवर्गात जाऊन थोडीबहुत चळवळही करत होती. कलकत्त्यात मुझफर अहमद यांचा व पंजाब, यू. पी. वगैरे भागात उस्मानी व मजीद यांचा असे गट यथामति कामगारचळवळी करीत असत. या सर्व गटांचा एक संघटित पक्ष करण्याचा उपक्रम १९२५ मध्ये सुरु झाला. तदनुसार उपर्युक्त पक्षस्थापना व परिषद ही घडून आली.

मध्यंतरी, १९२५ सालापासून१९२८ पर्यंतच्या अवधीत कामगारांचे झालेले शेकडों संप, शेतकऱ्यांचे उठाव, पांढरे सायमन कमिशन आणि त्यावरील बहिष्कार, यातूनच उद्भवलेला सत्याग्रह संग्राम आणि सरकारने टाकलेला गोलमेजपरिषदेचा डाव इत्यादींचे विवेचन या पूर्वीच्या 'गांधीवाद' या प्रकरणात करण्यात आलेले आहे. त्यांची येथे पुनरुक्ति नको.

क्रांतिवादी चळवळ नुकतीच कोठे हिंदुस्थानात मूळ धरू लागलेली होती. हिंदुस्थानात त्यावेळी चीनच्याप्रमाणे काहीसा बलवान् कम्युनिस्ट पक्ष असता, तर चीनच्या लढ्याप्रमाणेच हिंदी लढ्यास बाणेदार वळण लागले असते. हिंदी कम्युनिस्ट पक्षाला काँग्रेसमध्ये थारा न मिळण्यास, काँग्रेसचे अर्धवट सरंजामी, अर्धवट भांडवली असे संमिश्र पुढारीपण हेच कारण झाले. शिवाय कामगारवर्ग मागसलेला असून त्याला राजकीय शिक्षण मिळालेले नव्हते. तेव्हा कम्युनिस्ट पक्ष सुसंघटित कसा होईल यासंबंधी रॉय यांचे तत्कालीन विचार मननीय आहेत. 'प्राप्त परिस्थितीत कम्युनिस्टांचे बळ वाढवावयाचे ह्मणजे कामगारवर्गाने राष्ट्रीय क्रांतीच्या लढ्यात स्वतः भाग घेणे हा एकच मार्ग कामगाराना मोकळा आहे. काँग्रेस ही क्रांतिकारक संस्था आहे व राष्ट्रीय सभेने साम्राज्यविरोधी लढा यशस्वीपणे जिंकावा असे ज्या तरुणाना वाटते, त्यानी कामगारवर्गाला या लढ्यामध्ये भाग घ्यावयास लावूनच ते कार्य साधता येईल. या लढ्यातूनच क्रांतिकारी कामगारपक्ष निर्माण होईल. कम्युनिस्ट पक्षाची वाढ व संघटना याना जोम येईल. पण हे रॉयप्रणीत धोरण सहाव्या इंटरनॅशनल परिषदेपर्यंत सर्वत्र मान्य

झालेले होते. व तदनुसार हिंदुस्थानात कार्यही चालले होते. मात्र १९२९ नंतर जेव्हां रॉय यांना इंटरनॅशनलमधून महत्त्वाच्या मतभेदामुळे दूर करण्यात आले, त्यावेळेपासून हिंदी कम्युनिस्ट चळवळीची काही वर्षे रेवडी उडून गेली याचे आता वर्णन करावयाचे आहे.

कॉ. रॉय यांचा कम्युनिस्ट इंटरनॅशनलशी मतभेद होण्यास कारण इंटरनॅशनलने आंतरराष्ट्रीय कामगारचळवळीविषयी व वसाहतीविषयी आखलेले चुकीचे व यापूर्वी निर्दिष्ट केलेले असे एकान्तिक धोरण होय. १९२८ मधल्या सहाव्या परिषदेने ठराव पास करून हिंदी राष्ट्रीय कॉंग्रेस ही भांडवलदारांची प्रतिक्रांति संस्था आहे. जवाहरलाल नेहरूसुद्धा सर्व कॉंग्रेसचे पुढारी साम्राज्यशाहीचे बगलबच्चे आहेत, तेव्हा कॉंग्रेसशी हिंदी कम्युनिस्टांनी कोणताही संबंध ठेऊ नये असा सल्ला दिला. रॉय याना हे धोरण अत्यंत आत्मघातकी असे वाटले. कारण हिंदुस्थानातला अपक्व, अल्पसंख्य, मागसलेला, अडाणी व अननुभविक असा असणारा कामगारवर्ग हा, इतर वर्गांशी, तसेच इतर क्रांतिप्रवण वर्गांच्या बलाढ्य संस्थाशी फटकून वागून क्रांतीची धुरा एकाकी वाहण्यास असमर्थ आहे असे रॉय यांनी टासून सांगितले.

राजकीय चळवळीचा पारा वेगाने चढत असताच इंग्लंडमध्ये गोलमेजपरिषद भरली होती. गोलमेजपरिषदेविरुद्ध घटनासमितीची घोषणा करण्याच्या ऐवजी हवेत तरंगणारी आपली कम्युनिस्ट मंडळी ‘ कामगारांचे बंड, ’ सोलापुरात ‘ सोव्हिएट सत्तेची स्थापना ’ अशा विदेशीय घोषणांचा मारा सुरू करू लागली. कॉंग्रेसच्या निशाणाखाली साम्राज्यविरोधी लढा चालू होता; लोकावर लाठीमार होत होता; हजारो तरुण स्त्रीपुरुष तुरुंगात डांबले जात होते. अशावेळी कॉंग्रेस ही भांडवलशाही संस्था आहे असे म्हणून हिंदुस्थानात सोव्हिएट–स्थापनेची घोषणा करीत राहणे म्हणजे, स्वतःच्या अकलेचे प्रदर्शन करण्यासारखे होते, आणखी काय! हिंदी

स्वातंत्र्याच्या लढ्याला ‘ सोव्हिएट ’ ही घोषणा मारक ठरते. वसाहतीतील लोकाना ‘ सोव्हिएट ’ ची खरी कल्पना त्यावेळी येणे शक्यच नव्हते. संपाच्या प्रसंगी कामगार दगड फेकू लागला म्हणजे कामगार जागृत झाला, असे म्हणणे राजकीय अज्ञानाचे द्योतक होय. कम्युनिस्टांच्या धोरणात हा सर्व गोंधळ माजून राहण्यास कारण, कम्युनिस्ट चळवळीचा सुकाणू रॉय-सारख्या कुशल कर्णधाराच्या हाती नव्हता.

कम्युनिस्टानी बहुजनसमाजाशी व काँग्रेसचळवळीशी कोणते धोरण ठेवावयास हवे होते यासंबंधी रॉय यांचे उद्गार खाली दिले आहेत. त्यावरून कम्युनिस्टांचे कोठे चुकले हे स्पष्ट कळते. “कोणताही पक्ष बळकट करावयाचा म्हणजे त्याला खालच्या वर्गाकडूनच सक्रिय पाठिंबा मिळाला, तरच तो पक्ष प्रबल पावतो. ज्याना कम्युनिस्ट तत्वे १०० टक्के मान्य आहेत त्यानीच आमच्या पक्षात यावे असा हट्ट धरला तर, हिंदुस्थानात कम्युनिस्ट पक्ष कधीच बलवान होणार नाहीं. परंतु देशातील इतर वर्गातील लोकानाहि आपल्या संघटनेत सामील करून घेणे हे कम्युनिस्टांचे काम आहे. त्याकरता ठिकठिकाणी परिषदा बोलावून, त्यांच्यातर्फे आपला व्यापक असा कार्यक्रम जनतेला समजावून दिला पाहिजे. राष्ट्रीय सभा, युवकसंघ, स्वयंसेवकदले या संस्थामधूनहि कम्युनिस्टानी अंग मोडून काम केले पाहिजे. ठिकठिकाणच्या काँग्रेस कमिट्यातून आपल्या कार्याला चांगला वाव मिळण्यासारखा आहे. अशा रीतीने देशातील अत्यंत मागासलेल्या व वरिष्ठ समाजाकडून पिळल्या जाणाऱ्या वर्गाच्या सहानुभूतीने, आपली संघटना बलिष्ठ झाली तरच आपण हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्यात खात्रीने यश संपादन करून काँग्रेससारख्या संस्थातून भांडवली नेतृत्वामुळे जी स्वातंत्र्याच्या लढ्याची वाताहत होत चालली आहे, तिला पायबंद घालता येईल. हिंदुस्थानात कम्युनिस्ट पक्षाची संघटना जोरदार व्हावी अशी इच्छा असेल तर, त्याला हाच एक मार्ग आहे व स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रश्नानंतरच कम्युनिस्ट समाजरचनेचाही प्रश्न

सुटणार आहे.

या चुकीच्या धोरणासंबंधात कॉ. डांगे हेही म्हणतात कीं, ' यावेळी कम्युनिस्ट पक्षाने कामकरी संघाची मदत घेऊन, सत्याग्रहात पडणाऱ्या राष्ट्रीय क्रांतिकारक जनतेच्या आघाडीस जाण्याचे धोरण राखावयास पाहिजे होते, ते त्याने केले नाही. भांडवली पुढाऱ्यांनी वरील गोष्टीचा फायदा घेऊन कॉंग्रेसनिशाणाखाली जमणाऱ्या जनतेला असे पटविले की, कम्युनिस्ट हे राष्ट्रीय स्वातंत्र्याच्याविरुद्ध आहेत. ' याच्या उलट कम्युनिस्ट पक्षाने काय केले ? तर कॉंग्रेसवर व तिच्या पुढाऱ्यावर शिव्यांची लाखोली वाहून तो जनतेच्या विश्वासास अपात्र ठरला. काहीकाळ भाई म्हणजे ' पारिभाषिक शब्दांच्या तोफांची सरबत्ती देणारा एक विलक्षण प्राणी आहे ' असा प्रवाद जनतेच्या तोंडी ऐकू येऊ लागला.

एकंदरीत क्रांतिवादी दृष्टिकोनाने केलेली राष्ट्रीय चळवळीची छाननी मात्र लोकाना पटत चालली. कामकरी, शेतकरी व मध्यमवर्ग यांचे लढ्यातील महत्त्व सर्वांना पटल्यामुळे कॉंग्रेसने १९२२ सालापासून जो कार्यक्रम कम्युनिस्ट सतत कॉंग्रेसपुढे मांडत आले होते, त्यातला बराच भाग आपल्या ' मूलभूत हक्कां ' च्या ठरावात कराचीला समाविष्ट केला. तेव्हांपासून कॉंग्रेस ही संस्था शेतकरी व कामकरी यांची आहे असे सर्वांना वाटू लागले. लाहोर कॉंग्रेसपासून पं. जवाहरलालजीनी समाजवादाचा जो सतत प्रचार चालविला, आणि कराची व फैजपूर येथे आर्थिक कार्यक्रम व शेतकरी कार्यक्रम यासंबंधी जे ठराव पसार करून घेतले त्यामुळे, राष्ट्राने मार्क्सवादी अर्थात् क्रांतिवादी दृष्टिकोनाच्या चळवळीत प्रचंड प्रगति केलेली होती यांत शंका नाही. यानंतर रॉय हे १९३६ मध्ये तुरुंगातून सुटून आल्यानंतर स्वातंत्र्यप्राप्तीसाठी व समाजविकासाच्या मार्क्सप्रणीत दृष्टीने, कोणता कार्यक्रम देशापुढे ठेवलेला आहे. त्याचे विवेचन आता करावयाचे आहे.

कॉ. रॉय १९३६ इसवीच्या नोव्हेंबर महिन्यात तुरुंगातून सुटून येण्यापूर्वी त्यांच्या क्रांतिवादी मतांचीं छाप कॉंग्रेसच्या वेळोवेळी पास झालेल्या ठरवावर दिसून येते. लाहोर येथील इतिहास–प्रसिद्ध अधिवेशनात पास झालेला संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव आणि तदनुसार घडून आलेला बहुजनसमाजाचा उठाव हे दोन्ही, त्यानी हिंदुस्थानभर परदेशातून सतत दहा वर्षे फैलाविलेल्या क्रांतिवादाचा परिपाक होय. कराचीच्या कॉंग्रेसच्या अधिवेशनप्रसंगी डॉ. महमूद या नामधारी वेषात कॉ. रॉय हे हजर होते. अर्थात् त्यांच्या मतांचा ठसा कराचीच्या ठरावावर उमटल्याशिवाय कसा राहणार ? नंतर तुरुंगात गेल्यावर देखील तेथून हस्तपत्रके आणि ग्रंथ लिहून ते प्रसिद्धीसाठी बाहेर पाठवीत असत. त्यांचा प्रसार देशभर होई. त्याचा परिणाम युवकावर होऊन विविध समाजवादी मताचे पंथ देशात निर्माण होऊ लागले; या समाजवाद्यांच्या द्वारे लखनौ येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनात रॉयप्रणीत क्रांतिवादी विचारसरणी आपला छाप बसवीत होतीच, हे अध्यक्षीय भाषण व लखनौच्या अधिवेशनात पसार झालेल्या ठरावावरून निःसंदिग्ध होतेच. पुढे ते तुरुंगातून सुटून आल्यानंतर फैजपूर अधिवेशन-प्रसंगी संपूर्ण स्वातंत्र्य याचा अर्थ बहुजनसमाजाने सत्ता काबीज करणे असा करविण्यात त्यांच्याच हात होता. त्याचप्रमाणे फैजपूरचा शेतकरी कार्यक्रमाचा ठरावही त्यांच्या दिग्दर्शनाखालीच बनविण्यात आला. यानंतर जनतेपुढे आणि कॉंग्रेसपुढे त्यानी कोणकोणते क्रांतिवादी कार्यक्रम सादर केले आणि त्यामुळे कॉंग्रेसमध्ये क्रांतिवाद आणि गांधीवाद यामध्ये झगडा सुरू होऊन कॉंग्रेस ही अखेर गांधीवादात कशी निर्वाण पावली हे आता पाहू.

फैजपूर कॉंग्रेसच्या अधिवेशनानंतर कॉ. रॉय यानी मार्क्सप्रणीत क्रांतीवादानुसार साम्राज्यविरोधी लढ्याचे तत्त्वज्ञान, तंत्र आणि कार्यक्रम जनतेपुढे विशद करून मांडण्यास प्रारंभ केला. कॉंग्रेसमधील बहुजनसमाज व त्याचा लढा क्रांतिकारी असला तरी गांधीवादी नेतृत्व प्रतिगामी स्वरूपाचे

असल्यामुळे ते आपल्या राष्ट्रीय लढ्यास पायबंद घालून अखेर मारून टाकते; ह्मणून पर्याय असे क्रांतीवादी नेतृत्व उभारून त्या नेतृत्वाच्या हाती राष्ट्रीय चळवळीची सूत्रे आली पाहिजेत, ह्मणजे ते नेतृत्त्व बहुजनसमाजास राजकीय स्वातंत्र प्राप्त करून देऊन त्याची आर्थिक गुलामगिरीतून मुक्तता करील अशी शास्त्रशुद्ध विचारसरणी कॉ. रॉय यानी जनतेपुढे, त्याचप्रमाणे कॉंग्रेसमध्ये मांडली. आधी स्वातंत्र्य ह्मणजे काय, ते कोणकोणत्या वर्गास हवे आहे, स्वातंत्र्य हे ध्येय नसून हिंदी समाजाचा विकास घडवून आणण्याचे ते एकमेव साधन कसे आहे, बहुजनसमाजाची आर्थिक गाऱ्हाण्यावर संघटना करून साम्राज्यविरोधी स्वातंत्र्याचा लढा कसा उभारावा, त्या लढ्यातून लोकसत्तेची प्रस्थापना करून अखिल राष्ट्राचे औद्योगीकरण कसे घडवून आणावे इत्यादींची ह्मणजे राज्यक्रांति आणि तदुत्तर समाजक्रांति या सत्यसृष्टीत कशा उतरविता येतील याची विज्ञानशुद्ध मीमांसा करणारा राष्ट्रीय लोकसत्ताक क्रांतीचा सिद्धांन्त कॉ. रॉय यानी आपल्या 'इंडिपेंडंट इंडिया' या साप्ताहिकाच्या द्वारे हिंदी जनतेस सादर केला. त्या सिद्धांताची आता संक्षिप्त मांडणी करू.

कॉ. रॉय यांचे ह्मणणे असे आहे की साम्राज्यशाही अतिक्रमणामुळे आपला देश इतर युरोपीय राष्ट्रापेक्षा सामाजिक, राजकीय व औद्योगिक दृष्ट्या निदान दोनशे वर्षे मागे आहे. ते अंतर आपल्या देशास भरून काढावयाचे आहे. ते कसे करावयाचे? तर ज्या साम्राज्यशाहीने आपल्या राष्ट्राचा विकासक्रम थोपवून धरलेला आहे, तिच्या हातून आह्मी सत्ता काबीज करून घेतली पाहिजे. ह्मणजे राज्यक्रांति घडवून आणली पाहिजे; लोकसत्ता प्रस्थापित केली पाहिजे. हे कार्य कोणते वर्ग करू शकतील? तर ज्या वर्गांना साम्राज्यशाही अर्थकारणाच्या चौकटीत स्थान नाही, किंबहुना ती चौकट फोडल्याशिवाय ज्या वर्गांचा विकास होणे शक्य नाही असे वर्गच साम्राज्यविरोधी लढयास तयार होतील. हिंदुस्थानात असे वर्ग ह्मणजे, शेतकरी, काम-

करी, किरकोळ दुकानदार, कारागीर, बेकार बुधिजीवि इत्यादि शेकडा नव्वद जनता होय ! या वर्गांनीच सत्ता काबीज करून बहुजनसमाजाच्या आकांक्षा परिपूर्ण करणारी अशी जनसत्ता प्रस्थापित केली पाहिजे. त्या आकांक्षा ह्मणजे शेतकऱ्यास जमीन व कामगार आणि बेकार सुशिक्षित यांच्यासाठी औद्योगीकरण या आकांक्षा क्रांतीच्या ह्मणजे साम्राज्यविरोधी लढ्याच्या कार्यक्रमात प्रतिबिंबित झाल्या पाहिजेत.

पण ती सत्ता कशी काबीज करावयाची हा प्रश्न शिल्लक राहतोच. त्यासाठी कॉ. रॉय यानी घटना समितीचे (Constituent Assembly) तंत्र शोधून काढले. घटना समिती ही जीवनातील दैनंदिन गरजासाठी चालविलेल्या बहुजनसमाजाच्या आर्थिक लढ्यातून उत्क्रांत झाली पाहिजे आणि तिच्या द्वारे बहुजनसमाजाने साम्राज्यशाहीच्या हातात असलेली सत्ता ग्रहण केली पाहिजे असे रॉय यांचे साम्राज्यविरोधी लढ्यातील प्रमुख तंत्र होते.

यानंतर सत्ता ह्मणजे काय व तिचा घटना–समितीमार्फत ग्रास कसा करावयाचा यासंबंधी रॉय काय ह्मणतात ते पाहू. साम्राज्यशाहीत परिणत पावलेल्या ब्रिटिश भांडवलशाहीने आपली राजकीय सत्ता हिंदुस्थानावर कायम राहावी ह्मणून हिंदी नोकरशाहीची कडेकोट संघटना उभारलेली आहे. या संघटनेत ब्रिटीश सत्ता वास करीत आहे. अर्थात् ती सत्ता हिंदुस्थानावर कायम राहावी ह्मणून हिंदी नोकरशाहीच्या पोलादी चौकटीतून ती सत्ता काढून दुसऱ्या क्रांतीकारक संघटनेत ओतणे असाच होतो. तेव्हा राजकीय सत्ता काबीज करण्यासाठी प्रचलित राज्ययंत्राइतकीच एक क्रांतिकारक राजकीय संघटना निर्माण करण्यास हवी. विशेषतः विसाव्या, शतकात राजकीय सत्ता काबीज करण्यासाठी संघटित हत्यार असणें अत्यावश्यक आहे; आणि हिंदुस्थानच्या राजकीय परिस्थितीत हे शस्त्र ह्मणजे घटना समिती होय. घटना समितीचे स्वरूप हे आव्हानात्मक ह्मणजेच

क्रांतिकारी आहे. आह्माला हिंदी सरंजामशाहीची जागा पटकविणाऱ्या साम्राज्यशाहीचे राज्ययंत्र जे पार्लमेंट, त्याच्या स्वयंमन्य सत्तेला आव्हान दिले पाहिजे. साम्राज्यशाहीच्या अनियंत्रित सत्तेमुळे आमचा सामाजिक व राजनैतिक विकास खुंटलेला आहे; आपली जनता दारिद्य, दुःख व मंदमरण (Slow death) यानी व्याकुळ झालेली आहे. ह्मणून ब्रिटिश पार्लमेंटला आमचे राजकीय भवितव्य ठरविण्याचा अधिकार नाही.

तो अधिकार आपल्या जनतेचा आहे. आमची राज्यघटना बनविण्याचा अधिकार आमचा आहे. आह्मी आमचे राज्ययंत्र उभारून आमच्या देशाचा सामाजिक, राजकीय व आर्थिक विकास घडवून आणणार आहोत. या स्वयंनिर्णयाच्या तत्वासाठी आमचा राजकीय लढा चालू आहे. फ्रेंच राज्य क्रांतीच्या वेळी राजाचा दैवी हक्क विरुद्ध लोकसत्ता हा जसा झगडा चालू होता, त्याच प्रमाणे आमच्या देशाच्या सद्यःस्थितीत आमचे भवितव्य ठरविण्याचे साम्राज्यशाहीचे अधिकार विरुद्ध आपले भवितव्य आपणच ठरविण्याचे जनतेचे अधिकार (ह्मणजेच जनतेचा स्वयंनिर्णयाचा हक्क) असा लढा चालू केला पाहिजे. ह्मणजे आमची राज्यघटना बनविण्याचा अधिकार पार्लमेंटला नाही; तो आह्मी निवडून दिलेल्या प्रतीनिधी-सभेचा ह्मणजेच घटना समितीचा आहे असे सक्रिय आव्हान देणे हेच पार्लमेंटचे घटना बनविण्याच्या अरेरावीस जनतेचे समर्पक उत्तर आहे. या घटना समितीच्या मागणी भोवती हिंदुस्थानातील क्रांतिप्रवण शक्ती गोळा करून सत्ता काबीज केली पाहिजे असा रॉय यांचा अनुभवपूर्ण संदेश होता.

काँग्रेसचेच घटनासमितीत रूपांतर करावे असे कॉ. रॉय यांचे ह्मणणे होते. ते असेः—" घटना समिती ही केवळ चळवळीची अगर प्रचाराची घोषणा नसून ती कृतिक्षम घोषणा आहे. घटना समिती ही स्वर्गातून गळून पडत नसते. दैनंदिन आर्थिक झगडे खेळून धीट व शिस्तनिष्ठ बनलेल्या क्रांतिवादी जनतेचे भरभक्कम पाठबळ असल्याशिवाय, सत्ता ग्रहण करण्याचे

सामर्थ्य घटना समितीत प्राप्त होत नसते. ज्यावेळीं जनतेच्या दैनंदिन झगड्यातून घटना समिति उत्क्रांत होईल, त्याचवेळी साम्राज्यशाहीकडून सत्ता हिसकावून घेण्याची पात्रता तिच्यामध्ये निर्माण होईल. काँग्रेसने जर बहुजन समाजाचे आर्थिक लढे आपल्या हाती घेतले, व स्थानिक काँग्रेस समित्या या जर जनतेच्या आर्थिक झगड्याची केन्द्रे ह्मणून वावरू लागल्या, तर योग्यकाळीं बहुजन समाजाची प्रातिनिधीक संघटना ह्मणून तिचे घटना-समितीत रुपांतर का होणार नाही? घटना समितीला निमंत्रण देण्याचा हा अत्यंत नजीकचा मार्ग आहे. पण यासाठीं काँग्रेसची घटना व स्वरूप यामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले पाहिजे.सध्या काँग्रेस ही बहुजन-समाजाची शिस्तनिष्ठ संघटना असण्याऐवजी ती बहुजनसमाजाची अशी एक निव्वळ चळवळ आहे. ह्मणून तिला साम्राज्य-विरोधी लढ्याचे बळकट केन्द्र,अर्थात् हिंदी जनतेचा क्रांतिवादी पक्ष बनविले पाहिजे.तेव्हाच ती घटना समितीत रुपांतरित होऊन साम्राज्यविरोधी लढा यशस्वी करून दाखवू शकेल."

घटना समितीच्या योगाने सत्ता काबीज केल्यानंतर राष्ट्राचा सामाजिक विकास कसा करावा यासंबंधीही रॉय यांचे खालील मार्गदर्शन आहे. कोणत्याना कोणत्याहि रूपाने साम्राज्यशाहीला दरसाल अडीचशे कोट रुपयांचा तनखा पोचतो व संस्थानिक, राजेरजवाडे हे दरसाल प्रजेचे दोनशे कोट रुपये नाहक गिळंकृत करतात. त्या द्रव्यौघाचा उपयोग शेती सुधारणे, उद्योग धंदे उभारणे इत्यादि गोष्टी अमलात आणण्याकडे केला तर हिंदभूमीतील सर्व उत्पादनशक्ती खुल्या होऊन अल्पावधीत चहूकडे संपत्तीचे झरे वाहू लागतील. भूमितिश्रेढीने हिंदुस्थानचा आर्थिक व औद्योगिक विकास होण्यास सुरवात होऊन जगातल्या अव्वल दर्जाच्या राष्ट्रांच्या पंक्तीस जाऊन बसण्यास आपल्या मायभूमीस रशियापेक्षाही थोडा काळ लागेल. कालक्रमानुसार जागतिक परिस्थितीस अनुलक्षून तिचे समाजशाहीत पदार्पणही आपोआपच होईल."

याप्रमाणे हिंदुस्थानात क्रमाक्रमाने राज्यक्रांति आणि समाजक्रांति घडवून आणणारा साम्राज्यविरोधी लढ्याचा हा कार्यक्रम रॉय यानी कॉंग्रेस-पुढे आणि हिंदी जनतेपुढे सादर केला. या रॉयप्रणीत सिद्धान्तालाच ' राष्ट्रीय लोकसत्ताक क्रांती ' चा सिद्धान्त असे नाव देण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाची पूर्ण अमलबजावणी झाली ह्मणजे हिंदुस्थान देश हा आपण आणि यूरोपीय राष्ट्र या मधले दोनशे वर्षांचे अंतर गाठून त्या राष्ट्रांच्या योग्यतेस चढेल. त्या राष्ट्रांच्या पदवीस चढण्यास हिंदी राष्ट्राने–जनसत्तेची प्रस्थापना–शेतकरीक्रांति–औद्योगीकरण–समाजशाहीत संक्रमण–ही सोपान परंपरा आक्रमिली पाहिजे. परंतु काही केल्या हा क्रांतिकारी कार्यक्रम कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या पचनी पडेना. इतक्यात १९३९ चा सप्टेंबर महिना उजाडला आणि प्रचलित महायुद्धास तोंड लागले. साम्राज्यविरोधी लढ्याचे स्वरूप पालटले. वास्तविक नाझी आक्रमणाविरुध्द ब्रिटिश साम्राज्यशाहीने पुकारलेले युद्ध आकस्मिक होते. साम्राज्यशाही आणि हुकूमशाही या दोन्ही भांडवल-शाहीच्या दोन निरनिराळ्या अवस्थेतीत भांडवलशाहीची भिन्न भिन्न रूपेंच होत. त्यात परस्पर–विग्रह असणे शक्य नसते. साम्राज्यशाही ही उत्कर्षित भांडवलशाहीची परिणतावस्था होय; तर हुकूमशाहीचा उदय हा भांडवल-शाहीच्या दिवाळखोरी अवस्थेतून होत असतो. या दोहोंचा रोख निसर्गतः रशियातील कामगारशाही विरुध्द असणे वाजवी होते. तसे होतेंही पण. ब्रिटिश मुख्यप्रधान चेंबरलेन हे म्युनिकच्याप्रमाणे हिटलरपुढे आणखी एक लोटांगण घालण्यास सज्ज होते. पण हिटलरच्या उतावळेपणामुळे हिटलरला पोलंडचे भक्ष्य देऊन शांत करण्यास चेंबरलेनसाहेबाना संधि मिळाली नाही. पुढे युद्ध पुकारले तरी, चेंबरलेनचे सरकार मनापासून युद्ध लढेना आणि युद्धाची जय्यत तयारीही करेना. त्या सरकारला हिटलरशी कसाबसा तह करून युद्ध आटोपते घ्यायचे होते; पण डेन्मार्क व नार्वे पडल्याबरोबर ब्रिटिश जनता चकित झाली, आणि तिने चेंबरलेन सरकारविरुद्ध एकच हलकल्लोळ

उडवून दिला. लागलेच चर्चिलचे नवे मंत्रिमंडळ अस्तित्वात आले आणि त्याने युद्ध जारीने, जोमाने व जय्यत तयारीने लढविण्याचा चंग बांधला. ब्रिटिश सेना बेल्जममध्ये पाठविण्यात आली.तथापि नाझी युद्धयंत्रापुढे टिकाव लागणार नाही ह्मणून इंग्लंडच्या बचावासाठी डन्कर्कहून तीन लाख ब्रिटिश सैन्य परत इंग्लंडमध्ये बोलविण्यात आले. त्या सैन्याने नाझी युद्ध यंत्राच्या सामर्थ्यांची व हुकूमशाहीखाली भरडणाऱ्या यूरोपीय जनतेची केविलवाणी वस्तुस्थिति यांची कल्पना ब्रिटिश जनतेस आणून दिली. तात्रडतोब ब्रिटिश जनता खाडकन् जागी झाली व तिने नाझीविरोधी युद्ध शेवटपर्यंत लढण्यास सरकारास भाग पाडले. ब्रिटिश मंत्रिमंडळात मजूर पक्षाचे काही पुढारी घेण्यात आले. चालू युद्धाला हुकूमशाही विरुध्द लोकशाहीचे युध्द असे स्वरूप स्पष्ट प्राप्त झाले. पुढे फ्रान्सचा पाडाव झाला. हिटलरने बाल्कन राष्ट्रे गिळंकृत केली. अखेरला नाझींच्या सोव्हिएट रशियावरील आक्रमणाने तर युद्धाचे स्वरूप अगदी निश्चित झाले. नाझींना जगातली लोकशाही नष्ट करून विश्व जिंकावयाचे आहे हे निःसंदिग्ध झाले. अर्थात् हुकूमशाही विरुद्ध इंग्लंड आणि रशियामधील जनतेने चालविलेला लढ्याला, लोकशाही करता साम्राज्यशाहीशी लढणाऱ्या हिंदी जनतेने मनःपूर्वक मदत करावयास हवी.

अशाप्रसंगी काँग्रेस मंत्रिमंडळानी राजीनामे देऊन युद्धविरोधी अहिंसेचा प्रचार करणे ह्मणजे पर्यायाने हुकूमशाहीस सहाय्य करणे नव्हे काय? हूकूमशाहीविरुद्ध स्पेन, चीन, अबिसिनिया इत्यादि राष्ट्रांनी चालविलेल्या लढ्यास ब्रिटिशानी मदत करून हुकूमशाहीचा बीमोड करावा ह्मणून ठराव करणाऱ्या काँग्रेसने, ब्रिटिशानी हुकूमशाहीविरुद्ध प्रत्यक्ष शस्त्र उगारल्यावेळी सत्याग्रहाचा मार्ग पत्करावा हे देशाचे दुर्दैव होय!नाझीविरुद्ध जागतिक लोकशाहीने चालविलेल्या युद्धात मनःपूर्वक सहभागी होण्यास हिंदी जनतेस भाग पाडून जागतिक राजकारणात महत्त्वाचे स्थान काँग्रेसला

सहज प्राप्त करून घेता आले असते. पण " प्राप्तीचिये वेळे। निदैवा आंधळेपणाचे डोहळे। जे आसते आपुले डोळे। आपणचि झाकी " या ज्ञानेश्वर-महाराजांच्या उक्तीप्रमाणे काँग्रेसला प्राप्त संधीचा फायदा घेण्याऐवजी तुरुंगात जाऊन बसण्याची बुद्धि आठवली याला काय ह्मणावे?

ब्रिटन हे सोव्हिएट रशियासहसमवेत जागतिक लोकशाही स्वातंत्र्यासाठी लढत असता, हिंदुस्थानातील २।३ पक्ष वगळले असता बहुतेक सर्व बहुसंख्य पक्ष युध्दास विरोध का करतात याचे कारण शोधून काढले पाहिजे. आमच्यामते ते कारण ह्मणजे ब्रिटिशानी हिंदुस्थानच्या, सतत गेली दोनशे वर्षे चालविलेल्या कमालीच्या पिळणुकीमुळे प्रत्येक हिंदी मनुष्याच्या मनात ब्रिटिश–विरोधी भावना वास करीत आहे, ती भावना (ब्रिटनने हुकूमशाही विरुध्द लोकशाही या लढ्यात पुढाकार घेतल्याकारणाने) हिंदी जनतेस जागतिक लोकशाहीच्या बाजूने लढू देत नाही. ब्रिटिशांच्या खांद्यास खांदा लावून लढणे हिंदी जनतेस कसेसेच वाटते! परंतु हुकूमशाहीच्या पाडावात आणि लोकशाहीच्या विजयात जगाचे व त्याबरोबर हिंदुस्थानचे उज्वल भवितव्य अंतर्भूत आहे, हे ओळखून खऱ्या राष्ट्रवाद्याने लोकशाहीच्या बाजूने मनःपूर्वक लढण्यास पुढे सरसाविले पाहिजे. ब्रिटिश विरोधी भावनेने एक अनिष्ट साधलेले आहे. ते कोणते, तर हिंदुस्थानातील युद्धापूर्वीच्या क्रांतिकारी शक्ती युद्धोत्तर युद्धविरोध करून जागतिक प्रतिक्रांतीस ह्मणजे फॅसिझमला पर्यायेकरून सहाय्य करीत आहेत.

अशा परिस्थितीत हिंदी राष्ट्राचे भवितव्य काय? हिंदुस्थानात हिंदी राष्टीय क्रांतीचा कार्यक्रम ह्मणजे लोकसत्तेची प्रस्थापना—शेतकरी क्रांति औद्योगीकरण इत्यादि कार्यक्रम कसा अमलात यावयाचा? अर्थात्, हिंदुस्थानचे भवितव्य आता जागतिक भवितव्यावर अवलंबून आहे. सांप्रतच्या युध्दात नाझींचा जय झाला तर विज्ञानप्रणीत संस्कृतीचा विध्वंस आणि मध्ययुगीन झोटिंगशाहीचा अंमल ही सुरू होऊन जगाला पुनः अज्ञानति-

मिरात कित्येक शतकें चाचपडत पडून राहण्याची पाळी येईल, याची कल्पनाच करवत नाही. इसवी सनाच्या प्रारंभ काळात ज्याप्रमाणे यूरोपच्या रानटी टोळ्यानी ग्रीक आणि रोमन संस्कृतींचा नायनाट करून हजार दीड हजार वर्षेपर्यंत टिकणारा तमोयुगाचा अंमल चालू केला, त्याचप्रमाणे नाझी प्रवर्तक नव्या तिमिरयुगाचा अंमल या भूतलावर किती काळ टिकेल हे देवच जाणे! पण जगावर असा प्रसंग पातण्याचा संभव कमी.सोव्हिएट रशियाचा अफाट प्रदेश, लाल सेना व गनिमी टोळ्यानी जर्मन सेनेचा चालविलेला संहार, तीन पंचवार्षिक कार्यक्रमांनी सोव्हिएट रशियानी वाढविलेले आपले यंत्र-सामर्थ्य, इंग्लंड अमेरिकेपासून मिळणारे सहाय्य या सर्व गोष्टी लक्षात घेता अंतिम विजयश्री सोव्हिएट रशियाला वरणार हे खास दिसते. असे झाले तर मात्र यूरोपभर शांतिपूर्ण क्रांत्या होऊन खऱ्याखुऱ्या लोकशाहीचा अंमल (पार्लमेंटरी ह्मणजे भांडवली लोकशाहीचा नव्हे) चालू होईल. त्याचा फायदा आशिया—आफ्रिका खंडातील जनतेस मिळाल्याशिवाय राहणार नाही. विजयी झालेल्या क्रांतिवादी लोकशाही शक्ती जगातल्या इतर राष्ट्रात क्रांति घडवून आणून तेथेही लोकशाहीचा अंमल सुरू करण्यास सहाय्य केल्याशिवाय राहणार नाहीत. जागतिक नाझीवादाशी झगडणाऱ्या दोस्तांच्या क्रांतिवादी सैन्यानी इराणात घडवून आणलेली राज्यक्रांति, कित्येक वर्षे कुंचबिलेल्या इराणीय समाजाची मुक्तता इत्यादि, विजयपथारूढ अशा खऱ्या लोकशाही शक्तींची 'प्रसादचिन्हानि पुरःफुलानि' ह्मणण्यास हरकत नाही. सारांश, हिंदी जनता जर संघटनेच्या जोरावर ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या पकडीतून आपली सुटका करून घेऊ शकली नाही, तर ब्रिटिश भांडवलशाहीकडून सत्ता हिसकावून घेणारा कामगार हिंदुस्थानची मुक्तता होण्यास मदत करील असे मार्क्सने वर्तविलेले भविष्य खरे होईलसे वाटते.

आता,मार्क्सला भांडवलशाहीने सध्या धारण केलेल्या झोटिंगशाहीच्या स्वरूपाची व तिच्या विरुध्द सांप्रत चाललेल्या जागतिक लोकशाही लढ्याची

कल्पना नव्वद वर्षांपूर्वी येणे शक्य नव्हते. मार्क्सला असे वाटले होते की प्रत्येक देशातील कामगार आपापल्या देशातील भांडवलशाही नष्ट करून आपापल्या राष्ट्रात समाजशाही युग निर्माण करील. जागतिक नाझीवाद विरुध्द जागतिक लोकशाही या आंतरराष्ट्रीय वर्गयुध्दाची कल्पना मार्क्सला सुचणेच अशक्य होय. ह्मणून मार्क्सने आपल्या विज्ञानप्रणीत दृष्टीने वर्तविलेल्या भविष्याचा अर्थ हल्लीच्या काळास अनुसरून केला तर, आह्मी वर दिग्दर्शित केल्याप्रमाणे नाझीवादाचा नायनाट करून विजयी झालेल्या क्रांतिवादी लोकशाही शक्तीच हिंदुस्थानचा उध्दार करू शकतील असे दिसते. पण या संधीचा पुरेपूर फायदा घेण्यास आपल्या देशातील पुरोगामी लोकशाही शक्ती सतत जागृत व संघटित ठेवणे जरूर आहे, हेच आपल्याला खराखुरा राष्ट्रवाद ह्मणजे क्रांतिवाद सांगतो. तात्पर्य, राष्ट्रीय क्रांतिवाद हा आता आंतरराष्ट्रीय क्रांतीवादाशी समरस झालेला आहे. आणि त्याचे भवितव्य हेंही आंतरराष्ट्रीय क्रांतिवादाशीं संपूर्ण निगडित झालेले आहे. या दृष्टीने विचार केल्यास हिंदी राष्ट्राच्या भवितव्याबद्दल निराश होण्याचे कारण नाही.

सुंठणकर बंधूंचे पुरोगामी प्रकाशन

महाराष्ट्राच्या राजकीय साहित्यात अमूल्य भर

प्रकाशित ग्रंथ.

प्रकाशन १ ले–मार्क्सवाद लेः–स. रं. सुंठणकर एल्. एल्. बी. (१९३६) किं. ८ आणे. पृ. सं. १२०

" २ रे–मॅक्झिम गॉर्की लेः–स. रं. सुंठणकर एल्. एल्. बी. (१९३७) किं. १ आणा. पृ. सं. २०

" ३ रे–मार्क्सवादाचा प्रयोग–सोव्हिएट रशिया लेः–स. रं. सुंठणकर एल्.एल्.बी. (१९३८) किं. १॥ रु. पृ.सं.५५०

" ४ थे–रॉयवाद–वसाहतीतील क्रांतीचे तत्वज्ञान लेः–बा.रं. सुंठणकर बी. एजी. (१९३८) किं. १ रु. पृ.सं. ३५०

" ५ वे–रॉय आणि रॉयवाद (कानडी) लेः–स. रं. सुंठणकर, एल्. एल्. बी. (१९३९) किं. १२ आणे. पृ. सं. २००

" ६ वे–हिंदुस्थान आणि महायुद्ध लेः–बा. रं. सुंठणकर बी. एजी. (१९४०) किं. ८ आणे. पृ. सं. १००

" ७ वे–हिंदी राष्ट्रवाद–विकास आणि भवितव्य लेः–स. रं. सुंठणकर एल्. एल्. बी.(१९४१)किं. १॥ रु. पृ.सं.१८०

शुद्धीकरण.

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
१५	१०	वृष्टीने	दृष्टीने
३६	१२	inlelligenta	intelligentsia
३६	१६	Vanguatd	vanguard
५९	२४	अर्धयू	अध्वर्यू
७२	२४	जनतेचा	जनतेची ना.
७९	१४	कण्याचा	करण्याचा
९२	१६	विशेष	विद्वेष
९४	१८	विषयोगा–	विषयभोगा–
९८	१४	कॉंग्रेपुढाऱ्यानी	कॉंग्रेस पुढाऱ्यानी
११०	७	करूस	करून
११०	१३	आली	आला
१२१	१४	कल्पनातर्क	कल्पनात गर्क
१३०	२४	पक्की	पक्के
१४९	१९	पुरःफुलानि	पुरःफलानि



या पुस्तकात -

ब्रिटिशपूर्व राष्ट्रवाद

राष्ट्रवादाची पार्श्वभूमि

राष्ट्रवादाचा उगम

पुरोगामी राष्ट्रवाद

प्रतिगामी राष्ट्रवाद

गांधीवाद

क्रांतिवादाची पार्श्वभूमि

क्रांतिवाद

इत्यादि हिंदी राष्ट्रवादाच्या विविध अंगांचे विज्ञानप्रणीत दृष्टीने मुद्देसूद आणि सांगोपांग विवेचन केलेले आढळून येते.

ब्रिटिशपूर्व राष्ट्रवाद या १ ल्या प्रकरणातील पहिली आठ पृष्ठे 'जनता प्रेस' मध्ये मुद्रित करण्यात आलेली आहेत.

